# *Faculty Members Invited as Resource Persons during April 2023*

# *Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi Invited as Resource Person on 10th April 2023*

Progressive Education Society's

**Modern College of Arts, Science & Commerce**

S.No.117, Popular Nagar, New Mumbai-Bangalore Highway, Opp. Mai Mangeshkar Hospital Warje,
Pune-411058 Affiliated to Pune University.
Office: 020-25237755 Mob: 9503096487, 9921419915 Website: pesmodernwarje.com
शासन मान्यता क्र 2019/(133/19) मशि -4 दि 15 जून 2019
संलग्निकरण क्र PU/PN/ACS/493/2019

| | | |
|---|---|---|
| **Dr. G.R. Ekbote**<br>M.S., M.N.A.M.S.<br>Chairman,<br>Business Council,<br>P.E. Society, Pune-5 | **Dr.Varsha M. Bapat**<br>M.Sc. (Electronics Sci) Ph.D.SET.,DFS,<br>Principal | **Prof. S.S. Deshmukh**<br>M.Sc. Computer Science<br>Secretary, P.E. Society,<br>Pune-5 |

प्रति, दि. ०८/०४/२०२३

प्रा. डॉ. निशा भंडारी,
मॉडर्न कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
शिवाजीनगर, पुणे – ०५

**विषय : 'एकांकिका' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी वक्ता म्हणून येण्याबाबत**

सप्रेम नमस्कार !

प्रथम वर्ष कला शाखेच्या मराठीच्या विद्यार्थ्यांना सत्र दोन मध्ये 'एकांकिका' हा साहित्यप्रकार अभ्यासाला आहे, हे आपण जाणताच. या साहित्य प्रकाराची अधिक चांगली ओळख व्हावी यासाठी **'एकांकिका साहित्य प्रकाराचे आकलन व अध्ययन'** या विषयावर एक व्याख्यान आयोजित करत आहोत. आपण या विषयातील तज्ज्ञ असल्यामुळे आपल्याकडून या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे, अशी इच्छा आहे. यासाठी मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, वारजे शाखेत आपल्याला वक्ता म्हणून आमंत्रित करत आहोत.

व्याख्यान १0 एप्रिल २०२३ रोजी सकाळी १0 वाजता आयोजित केले आहे. तरी आपण उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ही नम्र विनंती.

कळावे,

आपली,

PES's Modern College of Arts, Science and Commerce Warje Pune-58.

08/04/2023
डॉ. वर्षा म. बापट
प्राचार्या











# *Dr. Shantashree Sengupta, Librarian Invited as Resource Person on 23rd April 2023*

Dear friends,
On the occasion of World Book Day and Copyright Day (23.4.2023), I was invited as one of the Speakers in an Open Debate and Discussion Forum on 'Changing Forms of Books and Importance of Libraries (पुस्तकांचे बदलते स्वरूप आणि ग्रंथालयाचे स्थान)' organised by the 175 years old Pune Nagar Vachan Mandir, Pune in association with Katha by Snehal Baakre and Zankar Publishing Studio. The event was under the innovative program series of 'Block to Blog'.
It was a great platform to discuss and share ideas, facts, experiences about changing forms of documents, library professionals, innovative things that can be introduced in libraries, user needs etc. The program also witnessed the presence of invited speakers like Dr. Kiran Kulkarni (IAS); Author Mrunalini Vanarse; Mrs. Suvarna Joglekar, Secretary, Pune Nagar Vachan Mandir; Author Mrs. Sangeeta Puranik and Media Personality Mrs. Shilpa Deshpande. Shri. Prasad Bharde did the compering of the program which was very well planned and organised by Shri. Satyajeet Pangu .

**Regards,**
**Dr.Shantashree Sengupta,**
**Librarian.**








# *Dr. Shantashree Sengupta, Librarian Invited as Resource Person on 23rd April 2023*














# *Dr. Shantashree Sengupta, Librarian Invited as Resource Person on 23rd April 2023*
















# *Dr. Shantashree Sengupta, Librarian Invited as Resource Person on 23rd April 2023*

## तंत्रज्ञानानुसार ग्रंथालयांमध्येही बदल घडावेत...

### जागतिक पुस्तक दिनी परिसंवादात वक्त्यांची अपेक्षा

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. २३** - ग्रंथालये केवळ पुस्तकांची देवाण घेवाण करण्याची जागा नाही तर ही ज्ञानकेंद्रे आहेत. मुले पुस्तके वाचत नाहीत या म्हणण्यात काही तथ्य नाही. मात्र बदलत्या तंत्रज्ञानानुसार ग्रंथालयांमध्ये आवश्यक बदल घडवून आणणे अपेक्षित आहे. जनसामान्यांना ग्रंथालयांशी कसे जोडता येईल यादृष्टीने अभिनव उपक्रम राबवले जावेत, अशी अपेक्षा 'पुस्तकांचे बदलते रूप आणि ग्रंथालयाचे स्थान' या विषयावर आयोजित परिसंवादात वक्त्यांनी व्यक्त केले.

जागतिक पुस्तक दिनानिमित्त रविवारी पुणे नगर वाचन मंदिर, कथा बाय स्नेहल बाकरे आणि झंकार पब्लिशिंग स्टुडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'ब्लॉक ते ब्लॉग' या अभिनव उपक्रमाअंतर्गत 'पुणे नगर वाचन मंदिर' येथे या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

यात भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, लेखिका मृणालिनी वनारसे, पुणे नगर वाचन मंदिराच्या कार्यवाह सुवर्णा जोगळेकर, लेखिका आणि पुणे नगर वाचन मंदिराच्या कार्यकारी सदस्य संगीता पुराणिक, माध्यम तज्ज्ञ शिल्पा देशपांडे, मॉडर्न महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. शांतश्री सेनगुप्ता यांचा सहभाग होता. पुणे नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे, झंकार स्टुडिओचे सत्यजित पंगु यांनी चर्चासत्राचे आयोजन केले होते.

पुस्तकाच्या बदलत्या रूपाची ग्रंथालयांनी दखल घेणे आवश्यक आहे. लेखकाने वाचकाला वाचनासाठी उद्युक्त करणे गरजेचे आहे. ग्रंथालये आणि ग्रंथपाल हे समाजातील महत्त्वाचे घटक असल्याने ते अद्ययावत असणे आवश्यक असून ग्रंथालये ही त्या त्या परिसरातील सांस्कृतिक उर्जाकेंद्रे बनावित अशी अपेक्षा वक्त्यांनी व्यक्त केली.

वनारसे, देशपांडे, डॉ. सेनगुप्ता, पुराणिक यांचीही भाषणे झाली. सूत्रसंचालन आणि समन्वय प्रसाद भारदे यांनी केले. आभार पुणे नगर वाचन मंदिराच्या कार्यवाह सुवर्णा जोगळेकर यांनी मानले.

प्रभात PuneCity, 24 Apr 2023, Page:007
https://epaper.dainikprabhat.com

लोकमत

परिसंवादातील सूर : जागतिक पुस्तक दिनानिमित्त पुणे नगर वाचन मंदिरात 'ब्लॉक ते ब्लॉग' उपक्रम

## छे छे! पुस्तके वाचली जात नाहीत, यात काहीच तथ्य नाही

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** 'ग्रंथालये केवळ पुस्तकांची देवाण-घेवाण करण्याची जागा नाही, तर ही ज्ञानकेंद्रे आहेत. मुले पुस्तके वाचत नाहीत, असे म्हणण्यात काहीच तथ्य नाही. मात्र, बदलत्या तंत्रज्ञानानुसार ग्रंथालयांत आवश्यक बदल घडवून आणणे अपेक्षित आहे.

ग्रंथालये ही केवळ अभिजन वर्गासाठी नसून तळागाळातील जनसामान्यांना ग्रंथालयांशी कशा पद्धतीने जोडता येईल, यादृष्टीने अभिनव उपक्रम राबविले जावेत, असा सूर 'पुस्तकांचे बदलते रूप आणि ग्रंथालयाचे स्थान' या विषयावर आयोजित परिसंवाद आणि खुल्या चर्चासत्रात उमटला.

जागतिक पुस्तक दिनानिमित्त पुणे नगर वाचन मंदिर, कथा बाय स्नेहल बाकरे व झंकार पब्लिशिंग स्टुडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'ब्लॉक ते ब्लॉग' या अभिनव उपक्रमांतर्गत पुणे नगर वाचन मंदिर येथे या चर्चासत्राचे आयोजन केले होते.

या परिसंवादात भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, लेखिका मृणालिनी वनारसे, पुणे नगर वाचन मंदिराच्या कार्यवाह सुवर्णा जोगळेकर, कार्यकारी सदस्य संगीता पुराणिक, माध्यम तज्ज्ञ शिल्पा देशपांडे, मॉडर्न महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. शांतश्री सेनगुप्ता यांचा सहभाग होता. पुणे नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे, झंकार स्टुडिओचे सत्यजित पंगू यांनी चर्चासत्राचे आयोजन केले होते.

### पुस्तके पोहोचली पाहिजेत तळागाळापर्यंत : डॉ. कुलकर्णी

डॉ. किरण कुलकर्णी म्हणाले, ग्रंथालये केवळ अभिजन वर्गासाठी संकुचित न राहता तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे. पुस्तकांच्या बदलत्या रुपाची ग्रंथालयांनी दखल घेणे आवश्यक आहे.

मुलांनी काय वाचावे, यासाठी पालकांनी दबाव टाकू नये. मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून त्यांना जे आवडेल ते वाचायला प्रवृत्त करावे.
**-शिल्पा देशपांडे, माध्यम तज्ज्ञ**

### पुस्तकाचा आता फॉर्म बदलायला हवा : वनारसे

मृणालिनी वनारसे म्हणाल्या, बदलत्या काळानुसार नवतंत्रज्ञान दाखल झाले आहे. पुढची पिढी या तंत्रज्ञानाच्या वापरातून पुस्तकांकडे, वाचनाकडे वळवता यावीत याकरिता पुस्तके विविध रुपात वाचकांच्या हाती आली पाहिजेत.

डॉ. शांतश्री सेनगुप्ता म्हणाल्या, एखाद्या विषयाची सखोल माहिती मिळविण्यासाठी अनेक पर्याय आज उपलब्ध आहेत. त्यांचा अभ्यास करून ग्रंथालयांनी नवीन तंत्रज्ञान स्वीकारत सुधारणा करणे आवश्यक आहे.

सूत्रसंचालन प्रसाद भारदे यांनी केले तर आभार सुवर्णा जोगळेकर यांनी मानले.

Hello Pune
Page No. 6 Apr 25, 2023
Powered by: erelego.com

# *Dr. Shantashree Sengupta, Librarian Invited as Resource Person on 23rd April 2023*

पुढारी



'पुस्तकांचे बदलते रूप आणि ग्रंथालयाचे स्थान' या विषयावरील परिसंवादात सहभागी झालेले वक्ते.

## ग्रंथालये ही ज्ञानकेंद्रे

**मान्यवरांचा परिसंवादात सूर**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

ग्रंथालये केवळ पुस्तकांची देवाणघेवाण करण्याची जागा नाही, तर ही ज्ञानकेंद्रे आहेत. बदलत्या तंत्रज्ञानानुसार ग्रंथालयांमध्ये आवश्यक बदल घडवून आणणे अपेक्षित आहे. ग्रंथालये ही केवळ अभिजन वर्गासाठी नसून, तळागाळातील जनसामान्यांना ग्रंथालयांशी कशा पद्धतीने जोडता येईल, याहष्टीने अभिनव उपक्रम राबविले जावेत, असा सूर 'पुस्तकांचे बदलते रूप आणि ग्रंथालयाचे स्थान' या विषयावर आयोजित परिसंवादात उमटला.

जागतिक पुस्तक दिनानिमित्त पुणे नगर वाचन मंदिर, कथा बाय स्नेहल बाकरे व झंकार पब्लिशिंग स्टुडिओच्या वतीने 'ब्लॉक ते ब्लॉग' या अभिनव उपक्रमांतर्गत परिसंवादाचे आयोजन केले आले होते. डॉ. किरण कुलकर्णी, मृणालिनी वनारसे, सुवर्णा जोगळेकर, संगीता पुराणिक, शिल्पा देशपांडे, डॉ. शांतश्री सेनगुप्ता यांचा सहभाग होता. पुणे नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे, सत्यजित पंगू उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, की लेखकाने वाचकाला वाचनासाठी उद्युक्त करणे गरजेचे आहे.ग्रंथालये ही त्या-त्या परिसरातील सांस्कृतिक ऊर्जाकेंद्रे बनावीत. वनारसे म्हणाल्या, की बदलत्या काळानुसार नवतंत्रज्ञान दाखल झाले आहे. पुढची पिढी या तंत्रज्ञानाच्या वापरातून पुस्तकांकडे, वाचनाकडे वळवता यावी.

My Pune Edition
Apr 25, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *Dr. Shantashree Sengupta, Librarian Invited as Resource Person on 23rd April 2023*

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2023-04-24 | Page- 3
epaper.mahamtb.con

## ग्रंथालये ही देवाणघेवाण नव्हे, ज्ञानकेंद्रे

### परिसंवादातील सूर : जागतिक पुस्तक दिनानिमित्त पुणे नगर वाचन मंदिरात 'ब्लॉक ते ब्लॉग' उपक्रम

**पुणे, दि. २३ : प्रतिनिधी**

ग्रंथालये केवळ पुस्तकांची देवाणघेवाण करण्याची जागा नाही, तर ही ज्ञानकेंद्रे आहेत. मुले पुस्तके वाचत नाहीत, या म्हणण्यात काही तथ्य नाही. मात्र, बदलत्या तंत्रज्ञानानुसार ग्रंथालयांमध्ये आवश्यक बदल घडवून आणणे अपेक्षित आहे. ग्रंथालये ही केवळ अभिजन वर्गासाठी नसून तळागाळातील जनसामान्यांना ग्रंथालयांशी कशा पद्धतीने जोडता येईल यादृष्टीने अभिनव उपक्रम राबविले जावेत, असा सूर 'पुस्तकांचे बदलते रूप आणि ग्रंथालयाचे स्थान' या विषयावर आयोजित परिसंवाद आणि खुल्या चर्चासत्रात उमटला.



जागतिक पुस्तक दिनानिमित्त दि. २३ एप्रिल रोजी पुणे नगर वाचन मंदिर, कथा बाय स्नेहल बाकरे व 'झंकार पब्लिशिंग स्टुडिओ' यांच्या संयुक्त विद्यमाने 'ब्लॉक ते ब्लॉग' या अभिनव उपक्रमांतर्गत पुणे नगर वाचन मंदिर येथे या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, लेखिका मृणालिनी वनारसे, पुणे नगर वाचन मंदिराच्या कार्यवाह सुवर्णा जोगळेकर, लेखिका व पुणे नगर वाचन मंदिराच्या कार्यकारी सदस्य संगीता पुराणिक, माध्यमतज्ज्ञ शिल्पा देशपांडे, मॉडर्न महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. शांतश्री सेनगुप्ता यांचा सहभाग होता. पुणे नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे, 'झंकार स्टुडिओ'चे सत्यजित पंगू यांनी चर्चासत्राचे आयोजन केले होते. कार्यक्रमास पुस्तकप्रेमींची लक्षणीय उपस्थिती होती.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''ग्रंथालये केवळ अभिजन वर्गासाठी संकुचित न राहता तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे. ग्रंथालये ही त्या त्या परिसरातील सांस्कृतिक ऊर्जाकेंद्रे बनावित. वनारसे म्हणाल्या, ''पुढची पिढी या तंत्रज्ञानाच्या वापरातून पुस्तकांकडे, वाचनाकडे वळवता यावी याकरिता पुस्तके विविध रूपात वाचकांच्या हाती आली पाहिजेत.'' डॉ. सेनगुप्ता म्हणाल्या, ''अभ्यास करून ग्रंथालयांनी नवीन तंत्रज्ञान स्वीकारत सुधारणा करणे आवश्यक आहे.''

**जागतिक पुस्तक दिन**

पुराणिक म्हणाल्या, ''पुढील पिढीला वाचनालयांकडे वळविणे गरजेचे आहे, त्यासाठी तंत्रज्ञानाची जरूर मदत घ्यावी. परंतु, ग्रंथालयातून त्यांना पुस्तकांचा अनुभव देणे आवश्यक आहे.'' स्वाती तडफळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि समन्वय प्रसाद भारदे यांनी केले. आभार पुणे नगर वाचन मंदिराच्या कार्यवाह सुवर्णा जोगळेकर यांनी मानले.

Powered by iDocuments

## पुणे नगर वाचन मंदिरातर्फे परिसंवादाचे आयोजन

**पुणे नगर** वाचन मंदिर, कथा बाय स्नेहल बाकरे व झंकार पब्लिशिंग स्टुडिओ यांच्यातर्फे 'ब्लॉक ते ब्लॉग' उपक्रमांतर्गत 'पुस्तकांचे बदलते रूप आणि ग्रंथालयाचे स्थान' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. प्रशासकीय सेवेतील अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, लेखिका मृणालिनी वनारसे, पुणे नगर वाचन मंदिराच्या कार्यवाह सुवर्णा जोगळेकर, लेखिका संगीता पुराणिक, शिल्पा देशपांडे, मॉडर्न महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. शांतश्री सेनगुप्ता यांचा परिसंवादात सहभाग होता.

लोकसत्ता Fri, https

# *Dr. Vaijayantimala Jadhav, Department of Marathi Invited as Resource Person on 23rd April 2023*



सस्नेह निमंत्रण

सातारा मराठा विद्याप्रसारक समाज, सातारा

कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा

मराठी, हिंदी, इंग्रजी विभाग

आणि

युगदक्ष वाङ्मय परिवार, महाराष्ट्र राज्य

यांच्या संयुक्त विद्यमाने

एकदिवशीय आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय परिषद

'फकिरा' कादंबरीचा इंग्रजी आविष्कार

( डॉ. बळीराम गायकवाड अनुवादित 'फकिरा' कादंबरीच्या अनुषंगाने)

रविवार, दिनांक २३ एप्रिल, २०२३ रोजी संपन्न होत आहे.

नाव नोंदणी – सकाळी १०.०० ते १०.३०

उद्घाटन समारंभ – सकाळी १०.३० ते १२.३०

उद्घाटक - मा. जयेंद्र चव्हाण (चेअरमन, सातारा मराठा विद्याप्रसारक समाज, सातारा)

बीजभाषक - प्रा. मंदार भानुसे (विभाग प्रमुख विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग, आयडॉल.) संचालक, अध्ययन व्यवस्थापन प्रणाली, मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रमुख पाहुणे - डॉ. प्रकाश महानवर (संचालक, दूरस्थ आणि स्वयं अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई)

अध्यक्ष - डॉ. डी. बी. गायकवाड (प्र. प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा)

सत्र पहिले (वेळ : १२.३० ते १.३०)

'फकिरा' भाषांतर प्रक्रिया : मुक्त संवाद

मुलाखत प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड

(माजी कुलसचिव मुंबई विद्यापीठ, मुंबई)

संचालक अण्णाभाऊ साठे अध्यासन, मुंबई विद्यापीठ, मुंबई

संवादक डॉ. संतोष राठोड

इंग्रजी अधिविभाग मुंबई विद्यापीठ, मुंबई

भोजन अवकाश (वेळ : दु. १.३० ते २.३०)



सत्र दुसरे (वेळ : दु. २.३० ते ३.३०)

'फकिरा' कादंबरीचा वैविध्यपूर्ण अभ्यास

साधनव्यक्ती डॉ. नीता जोखे

डॉ. वैजयंतीमाला जाधव - भोसले

डॉ. प्रियांका कुंभार

डॉ. संदिप किरदत

प्रा. जयश्री बाबर

सत्राध्यक्ष डॉ. वैजयंती पाटील

(सदस्य इंग्रजी अभ्यास मंडळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

सत्र तिसरे (वेळ : दु. ३.३० ते ४.३०)

शोधनिबंध सादरीकरण

सत्राध्यक्ष डॉ. धनंजय होनमाने

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल

सत्र चौथे (वेळ : दु. ४.३० ते ५.००)

समारोप समारंभ

प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. महेश गायकवाड

शि. म. बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड

अध्यक्ष डॉ. प्रकाश दुकळे

समन्वयक, युगदक्ष वाङ्मय परिवार, महाराष्ट्र राज्य

आपले विनीत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रा. प्रकाश कांबळे | डॉ. सुवर्णा कांबळे | डॉ. भरत जाधव | डॉ. प्रकाश दुकळे | डॉ. डी. बी. गायकवाड |
| ८३९०७७५१५१ | ९८५०११२५९६ | ७३८५२२११९३ | ९४२१२३३०८९ | ९८५०५१०९३१ |
| सहसमन्वयक | सहसमन्वयक | समन्वयक, चर्चासत्र | समन्वयक, युगदक्ष परिवार | प्र. प्राचार्य |

आणि युगदक्ष वाङ्मय परिवाराचे सर्व सदस्य

टीप : १) नाव नोंदणी शुल्क ३०० रू.

२) संशोधकांनी आपले शोधनिबंध युनिकोड फॉन्टमध्ये या Email : marathi2023@ gmail.com पाठवावे.

चर्चासत्राचे स्थळ : राजर्षी शाहू सभागृह, कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा





# *Modern Achievements*

# *Congratulatuions Dr. Prerana Ubale Head, Department of Hindi*

Dr. Prerna Ubale, head, Department of Hindi is Selected as VC Nominee in Board of Studies in Hindi at Saint Mira College for Girls of Sadhu Vaswani Mission, Pune.

***Dr. Prerana Ubale***
***HOD, Hindi***

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे- ४११००७
**Savitribai Phule Pune University**
Ganeshkhind, Pune – 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79ईमेल/Email
:boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाइट/Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र : सी.बी.एच./ ६५

दिनांक :०८/०२/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य,

साधु वासवानी मिशनचे
सेंट मीरा कॉलेज फॉर गर्ल्स,
कोरेगाव रोड,
पुणे– ४११००१

विषय : अभ्यासमंडळावरील नामनिर्देशित सदस्यांबाबत.
संदर्भ : आपले पत्र क्र. U-171/2022-23 दि. २४/०१/२०२३

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्राबाबत मा. कुलगुरू यांनी दिलेल्या आदेशानुसार आपल्या स्वायत्त महाविद्यालयाच्या अभ्यासमंडळावर मा. कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नामनिर्देशित प्रतिनिधीचे खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात येत आहे.

| Sr.No | Boards of studies | Nominee Name |
|---|---|---|
| 1. | Marathi | Dr. Prabhakar Ghodke |
| 2. | Hindi | Dr. Prerana Ubale |
| 3. | English | Dr. Smital Pawar |
| 4. | Politics | Dr. Nitin Birmal |
| 5. | History | Dr. Swati Kalbhor |
| 6. | Sociology | Dr. Chetana Desai |
| 7. | Psychology | Dr. Anjali Kedari |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी अन्वये तयार करण्यात आलेला सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र. ३ (१२)(३) (एक) (घ) नुसार, मा. कुलगुरू यांनी अभ्यासमंडळावरील नामनिर्देशनकेलेल्या सदस्यांचा कालावधी सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र. ३(१२)(३) (दोन) अन्वये पत्र निर्गमित झालेल्या दिनांकापासून तीन वर्षांकरिता राहील, कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव








## *Congratulatuions Dr. Vaijayanti Jadhav, Department of Marathi*

**मातंग साहित्य परिषद,पुणे**

**डॉ.धनंजय भिसे** (M.A.,B.ED.,M.PHIL.,DCS,PH.D.NET,SET.)

**( संस्थापक/अध्यक्ष )**

**निर्मल सावली,सर्व्हे नं.** 79/21, **आयोध्या नगरी, कोकणे नगर, काळेवाडी, पिंपरी पुणे** -411017

Mob.No:9822508492/8421633408 Email:dhananjaybhise2018@gmail.com

संदर्भ:१५/२०२३ दि..०१/०४/२०२३

साहित्य लोकशाहीर अण्णा भाऊ साठे वाड्मय पुरस्कार सोहळा व कृतज्ञाता सन्मान वितरण सोहळा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संत ज्ञानेश्वर सभागृह,मुख्य इमारत

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे वाड्मय पुरस्कार २०२३ निवड पत्र

**प्रति,**
मा. डॉ. वैजयंतीमाला जाधव-भोसले

विषय: **साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे वाड्मय पुरस्कार २०२३**

महोदय,
मातंग साहित्य परिषद, पुणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन व समरसता साहित्य परिषद,महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या "अरुण कोलटकरांची मराठी कविता। " या साहित्यिक कलाकृतीची सन २०२३ च्या **साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे वाड्मय पुरस्कार २०२३** च्या राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारासाठी निवड केली गेली आहे. सदर पुरस्कारामुळे आपल्या लेखन कार्यास गती व साहित्यिक क्षेत्रात प्रसिध्दी मिळेल अशी अपेक्षा आहे. उपरोक्त पुरस्कार स्वीकारण्यासाठी सहपरिवार व मित्रमंडळींसह उपस्थित रहावे ही विनंती.

आपले मनापूर्वक अभिनंदन व पुढील साहित्यलेखनास हार्दिक शुभेच्छा।

वितरण: दि.११ एप्रिल २०२३ वेळ दु.३.००वा., आद्यसमाज सुधारक महात्मा फुले जन्मदिनी,
स्थळ :संत ज्ञानेश्वर सभागृह,मुख्य इमारत,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे-०५

आपले स्नेहांकित,

| डॉ.धनंजय भिसे | डॉ.अंबादास सगट | डॉ.प्रसन्न पाटील | डॉ.सुनिल भंडगे |
|---|---|---|---|
| संस्थापक/अध्यक्ष | समन्वयक | कार्यवाह,समरसतासाहित्यपरिषद | प्रमुख,अध्यासन |

(मो.नं/९८२२५०८४९२)
(मो.नं.९१७५८२०९०७)।
( मो.नं+९१९८२२४३५५३९/+९१९८२२४३५५३९)

(मो.नं.+९१९९६०५००८२७)

प्रेषक,
मातंग साहित्य परिषद ,महाराष्ट्र.
निर्मल सावली,सर्व्हे नं.७९/२१,
अयोध्यानगरी,कोकणेनगर,काळेवाडी,
पिंपरी,पुणे-४११०१७।
dhananjaybhise२०१८@gmail.com

टीप- १) पुरस्कार वितरण समारंभाला आपण स्वतः अथवा प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक आहे.
२) पुरस्कार निवडपत्र घेऊन येणे बंधनकारक आहे.
३) पुरस्कार प्राप्त व्यक्तीने आपल्या येण्याजाण्याचा प्रवासखर्च ,भोजनाचा खर्च व निवास व्यवस्था स्वतः करावयाची आहे.
४) आपण पुरस्कार स्विकारल्याबाबतचे संमतीपत्र डॉ.धनंजय भिसे **मातंग साहित्य परिषद,निर्मल सावली,सर्व्हे नं.७९/२१, अयोध्यानगरी,कोकणेनगर,काळेवाडी, पिंपरी,पुणे-४११०१७ अथवा** dhananjaybhise२०१८@gmail.com या मेलवर पाठवून देणे आवश्यक आहे.

## समीक्षात्मक ग्रंथासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे २०२३ चा वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला

११ एप्रिल २०२३, मंगळ.रोजी म .फुले जयंतीचं औचित्य साधून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन, विद्यार्थी विकास मंडळ, तसेच समरसता साहित्य परिषद (महाराष्ट्र) आणि मातंग साहित्य परिषद, पुणे ह्यांनी संयुक्तपणे दुपारी ४ ते ६ ह्या वेळेत साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे वाङ्मय पुरस्कार २०२३ चा प्रदान समारंभ आयोजित केला होता. त्यात अरुण कोलटकरांची मराठी कविता ह्या समीक्षात्मक पुस्तकांसाठी हा पुरस्कार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.कारभारी काळे, पद्मश्री भिकुजीदादा इदाते आणि पद्मश्री रमेश पतंगे ह्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे ह्या पुरस्काराचे स्वरूप आहे.ह्या पुरस्कार प्रदान समारंभाला विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे, आमदार सुनील कांबळे, समरसता साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ.प्रसन्न पाटील, निलेश गद्रे, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ.सुनील भंडगे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. संतोष परचुरे, मातंग साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.धनंजय भिसे हे विचारमंचावर उपस्थित होते.

*Congratulations!*

## *Congratulatuions Dr. Vaijayanti Jadhav, Department of Marathi*

कुलगुरू कारभारी काळे यांच्या हस्ते समीक्षात्मक लेखनासाठी साहित्यरत्न शाहीर अण्णाभाऊ साठे वाङ्मयीन पुरस्कार २०२३








सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन,विद्यार्थी विकास मंडळ
मातंग साहित्य परिषद व समरसता साहित्य परिषद
यांच्या संयुक्त विद्यमाने
साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे वाङ् मय पुरस्कार - २०२३
प्रमाणपत्र

श्री. / श्रीमती डॉ. वैजयंतीमाला जाधव-भोसले यांच्या
अरुणा कोलटकरांची मराठी कविता या साहित्यकृतीला २०२३ या वर्षातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे वाङ् मय पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

डॉ.धनंजय भिसे, अध्यक्ष:मातंग साहित्य परिषद
डॉ.प्रसन्न पाटील, कार्यवाह:समरसता साहित्य परिषद
डॉ.सुनील भंडगे, प्रमुख:अध्यासन
डॉ.संतोष परचुरे, संचालक:विद्यार्थी विकास मंडळ

मंगळवार, दि. ११ एप्रिल, २०२३,स्थळ : संत ज्ञानेश्वर सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ











# *Congratulations Prof. A.V. Kamble, Department of Electronic Science, Prof. Mrs. Sonali Deshmukh, Department of Computer Science and students of the college*

Hearty Congratulations to Prof. A.V. Kamble, Department of Electronic Science, Prof.Mrs. Sonali Deshmukh, Department of Computer Science and concerned students of our college, for the Patent granted to them.



ORIGINAL

मूल/No : 133092

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
पेटेंट कार्यालय
THE PATENT OFFICE
डिजाइन के पंजीकरण का प्रमाणपत्र
CERTIFICATE OF REGISTRATION OF DESIGN

| | | |
|---|---|---|
| डिजाइन सं. / Design No. | : | 368142-001 |
| तारीख / Date | : | 22/07/2022 |
| पारस्परिकता तारीख / Reciprocity Date* | : | |
| देश / Country | : | |

प्रमाणित किया जाता है कि संलग्न प्रति में वर्णित डिजाइन जो **VIRTUAL CONTROLLING SPECTACLES FOR LABORATORY EXPERIMENTS** से संबंधित है, का पंजीकरण, श्रेणी **14-02** में 1.Prof. Sonali Anil Deshmukh 2. Prof Ashok Vitthal Kamble 3.Lt.(Ncc)Dr. K H. Nagare 4.Abhisek Jalinder Asawale 5.Abhishek Manoj Waghmare 6.Aditya Rajesh Bhosale 7.Nikita Mohan Bhole 8.Akshata Sanjay Desai के नाम में उपर्युक्त संख्या और तारीख में कर लिया गया है।

Certified that the design of which a copy is annexed hereto has been registered as of the number and date given above in class **14-02** in respect of the application of such design to **VIRTUAL CONTROLLING SPECTACLES FOR LABORATORY EXPERIMENTS** in the name of 1.Prof. Sonali Anil Deshmukh 2. Prof Ashok Vitthal Kamble 3.Lt.(Ncc)Dr. K H. Nagare 4.Abhisek Jalinder Asawale 5.Abhishek Manoj Waghmare 6.Aditya Rajesh Bhosale 7.Nikita Mohan Bhole 8.Akshata Sanjay Desai.

डिजाइन अधिनियम, 2000 तथा डिजाइन नियम, 2001 के अध्यधीन प्रावधानों के अनुसरण में।
In pursuance of and subject to the provisions of the Designs Act, 2000 and the Designs Rules, 2001.

INTELLECTUAL PROPERTY INDIA
PATENTS | DESIGNS | TRADE MARKS
GEOGRAPHICAL INDICATIONS

Date of Issue : 12/04/2023

Controller General of Patents, Designs and Trade Marks

*The reciprocity date (if any) which has been allowed and the name of the country. Copyright in the design will subsist for ten years from the date of Registration, and may under the terms of the Act and Rules, be extended for a further period of five years. This Certificate is not for use in legal proceedings or for obtaining registration abroad.





# *Department of Physical Education*

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सलग्न पुणे शहर विभागीय क्रीडा समितीच्या वतीने आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार दिनांक 21 एप्रिल 2023 रोजी चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, गुलटेकडी या ठिकाणी पार पडला.

आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत *प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगरने सर्वाधिक क्रीडा प्रकारामध्ये याही वर्षी विजेतेपद मिळवल्याबद्दल पारितोषक देवून महाविद्यालयास गौरविण्यात आले*. क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन, नेटबॉल, लॉन टेनिस, खो-खो, बेसबॉल, सॉफ्टबॉल, हँडबॉल, अॅथलेटिक्स, फुटबॉल, रोलबॉल, बॉल बॅडमिंटन, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस या क्रीडा प्रकारामध्ये आठ संघानी विजेतेपद, सहा संघानी उपविजेपद व सहा संघानी तृतीय क्रमांक मिळवला.

महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उत्तम कामगिरीत खेळाडू व त्यांचे पालक यांचा मोलाचा वाटा आहे. त्या सर्व खेळाडूंचे सातत्यपूर्ण कामगिरीसाठी हार्दिक अभिनंदन!














# *Congratulations Prof. Dr. Amruta Oke, Vice-Principal, Head, Department of Psychology*

Hearty Congratulations Dr.Amruta Oke, Vice-Principal, for authoring a book a as first author.
It is important to write the books and/or book chapters from NAAC SSR Metric 3.4.4 ( " Number of books and chapters in edited volumes / books published per teacher during the last five years" ) point of view.
Hearty Congratulations.











# *Congratulations Dr. Shantashree Sengupta, Librarian*

## HSNC University, Mumbai

HSNC UNIVERSITY MUMBAI

**Ref. No.: HSNCU/Appt/LIB/Apr/270-I of 2023** 20th April 2023

Dr. Shantashree Sameeerkumar Sengupta,
Librarian, Progressive Education Society's
Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Pune

**Nomination as Member for Ad-hoc Board of Studies**

Dear Dr. Shantashree Sameeerkumar Sengupta,

We are pleased to inform you that as per the recommendation of Dean (Ag.), Faculty of Interdisciplinary Studies and at the meeting held of Board of Deans, you have been duly nominated as Member of Ad-hoc Board of Studies in the subject of Library & Information Science under the Faculty of Interdisciplinary Studies in the HSNC University, Mumbai.

Your appointment shall be governed by HSNC University, Mumbai's Notification असाधारण क्रमांक ३९१ dated ३० ऑक्टोबर २०१९. Further, you shall fulfil all the duties of Board of studies as enclosed herewith.

We request you to kindly send us your acceptance and confirmation at earliest.

We wish you All the Best.

Dr. Bhagwan Balani
Registrar (Ag.)

HSNC UNIVERSITY, MUMBAI
A State Cluster University
D. M. Harish Building, 47, Dr. R. G. Thadani Marg, Worli, Mumbai 400 018
T: +91 22 2493 5281, 2497 1506 | E: office@hsncu.edu.in | W: www.hsncu.edu.in








# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING APRIL 2023*

| Author | Title |
|---|---|
| TADAKHE SHANKAR | SWARAJYA TE SWATANTRYA SAMATA |
| AMBEDKAR BABASAHEB | BABASAHEB AMBEDKAR LEKHAN AANI BHASHANE VOL 21 डॉ. बाबासाहेब आंबेडकरलेखन आणि भाषणे खंड 21 |
| AMBEDKAR BABASAHEB | DR. BABASAHEB AMBEDKAR LEKHAN AANI BHASHANE डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणी भाषण |
| THAKUR RAVINDRA | DASTURKHUDD दस्तुरखुद्द |

# *News Paper Clippings : April 2023*



Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous*** **.**



## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

पुढारी

# मॉडर्न महाविद्यालयात आर्थिक साक्षरता केंद्र

**बाणेर : पुढारी वृत्तसेवा**

गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाला रिझर्व्ह बँकेने आर्थिक साक्षरता केंद्र म्हणून अधिकृत मान्यता दिली आहे. दर तीन महिन्यांनी आर्थिक साक्षरतेसाठी मिळणारे अनुदान जाहीर झालेले हे एकमेव महाविद्यालय आहे.

**रिझर्व्ह बँकेकडून अनुदान जाहीर**

गणेशखिंडमधील वाणिज्य विभागाच्या फ्युचर्स बँकर्स फोरमने आर्थिक साक्षरतेसाठी वेगवेगळे कार्यक्रम समाजासाठी घेतले आहेत. फ्युचर बँकेच्या 'बँक मित्र' या उपक्रमाद्वारे समाजासाठी अनेक उपक्रम राबवल? जातात. यामध्ये प्रधानमंत्री जनधन खाते उघडण्यासाठी मदत करणे, जनसुरक्षा योजनेची जनजागृती व असंघटित विभागासाठी बँक खाते उघडण्यासह या योजनेत सामील करून घेण्यासाठी मदत करणे, वेगवेगळ्या लोकांसाठी समन्वयक म्हणून काम करणे आदी कामे हा फोरम करत आहे. तसेच ११ ऑगस्टला रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर सी. डी.देशमुख यांच्या स्मरणार्थ बँकिंग दिवस साजरा केला जातो. १४ फेब्रुवारीला 'माय नेशन माय प्राईड' साजरा करणे, नवीन वर्ष आजी- आजोबांबरोबर साजरे करणे, त्यांना बँक व्यवहारासाठी मदत करणे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी बँक, विमा गुंतवणूक कनेक्ट हा कार्यक्रम, पॅन कार्डचा कार्यक्रम असे आर्थिक साक्षरतेचे विविध कार्यक्रम बँकिंग फ्युचर्स फोरम गेली १० वर्षे घेत आहे.

महाविद्यालयाने २००९ पासून विद्यार्थ्यांना बँकेत जाऊन प्रशिक्षण घेणे सक्तीचे केले असून, यासाठी विद्या सहकारी बँकेशी २००८ ते पासून जोडले गेले आहे. तसेच २०२१ पासून बँक ऑफ महाराष्ट्र, कॉसमॉस बँक महाविद्यालयाने जोडलेले आहेत.या कार्याची दखल घेऊन डिपॉझिटरी एज्युकेशन अवेअरनेस फंड (DEAF) अंतर्गत आर्थिक साक्षरता केंद्र म्हणून रिझर्व्ह बँकेने मान्यता दिली. यापुढेही या कार्यक्रमासाठी सातत्याने आर्थिक पाठबळ लाभणार आहे.

My Pune Edition
Apr 12, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in



विद्यार्थिनींनी व प्राध्यापकांनी जमा केलेले कपडे, खाऊ व अन्नशिधा 'गुडविल इंडिया' या एनजीओकडे सोपविण्यात आला.

# 'बीएड' महाविद्यालयात कपडेदान, अन्नदान उपक्रम

पुणे : 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या बीएड महाविद्यालयात कपडेदान व अन्नदान उपक्रम राबविण्यात आला. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

महाविद्यालयात विद्यार्थिनींनी व प्राध्यापकांनी जमा केलेले कपडे, खाऊ व अन्नशिधा 'गुडविल इंडिया' या एनजीओकडे सोपविण्यात आला. 'समाजाचा आपण एक महत्त्वपूर्ण भाग असून, सामाजिक उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थी शिक्षकांमध्ये सामाजिक कर्तव्याची भावना निर्माण होते. गरीब लोकांसाठी आपण कशाप्रकारे मदत करू शकतो, ही जाणीव जागृती करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला,' असे प्राचार्य डॉ. सीमा दामले यांनी सांगितले. या वेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. तृप्ती भालेराव व सामाजिक उपक्रम विभागप्रमुख डॉ. मदुरा पवार यांनी मार्गदर्शन केले.

Maharashtra Times 13.4.2023

*News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# एकाच संस्थेच्या दोन स्वायत्त महाविद्यालयांचे विलीनीकरण शक्य

## सुधारित नियमावली प्रसिद्ध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशभरातील संलग्नित महाविद्यालयांना आता स्वायत्त दर्जासाठी संबंधित विद्यापीठाकडे अर्ज करण्याची गरज नाही. महाविद्यालयांना थेट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) संकेतस्थळावर अर्ज करता येणार असून, एकाच संस्थेची दोन स्वायत्त महाविद्यालये असल्यास विद्यापीठाच्या मान्यतेने त्या महाविद्यालयांचे विलीनीकरण करता येणार आहे.

यूजीसीने महाविद्यायांना स्वायत्तता देण्याच्या नियमावलीत बदल करून त्याचा मसुदा ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध केला होता. तसेच त्या मसुद्यावर हरकती-सूचना मागवण्यात आल्या होत्या. त्यानंतर अंतिम केलेल्या नियमावलीचे राजपत्र प्रसिद्ध यूजीसीकडून नुकतेच प्रसिद्ध करण्यात आले. त्यानुसार स्वायत्ततेसंदर्भातील नियमांमध्ये काही बदल आणि स्वायत्ततेला प्रोत्साहन देण्यासाठी काही प्रमाणात शिथिलता देण्यात आल्याचे दिसून येत आहे.

या पूर्वी २०१८ च्या नियमावलीनुसार महाविद्यालयाला 'स्वायत्ततेचा दर्जा मिळावा' यासाठी विद्यापीठाकडे अर्ज करावा लागत होता. विद्यापीठाकडून अर्ज यूजीसीला सादर केला जात होता. मात्र नव्या नियमावलीनुसार स्वायत्ततेच्या निकषांची पूर्तता करणाऱ्या आणि स्वायत्त दर्जा घेऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयाला यूजीसीच्या संकेतस्थळावर स्वायत्ततेसाठी कधीही अर्ज करता येईल. त्यानंतर संबंधित पालक विद्यापीठाला महाविद्यालयाचा अर्ज आल्यानंतर तीस दिवसांत त्या अर्जाची पडताळणी करून शिफारशी सादर कराव्या लागतील.

> यूजीसीने नव्या नियमावलीत काही महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. एकाच संस्थेच्या दोन स्वायत महाविद्यालयांच्या विलीनीकरणाची तरतूद अतिशय चांगली आहे. या तरतुदीमुळे बहुशाखीय महाविद्यालय करणे शक्य होईल.
>
> --डॉ. गजानन एकबोटे,
> कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

तीस दिवसांत शिफारशी न कळवल्यास पालक विद्यापीठाला आक्षेप नसल्याचे गृहित धरले जाईल. स्वायत्ततेसाठी महाविद्यालयाला किमान दहा वर्षे झालेली असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेची (नॅक) किमान 'अ'श्रेणी, किमान तीन अभ्यासक्रमांचे किमान ६७५ गुणांसह राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून (नॅब) मूल्यांकन झालेले असणे आवश्यक आहे. मात्र विशेष शिक्षण, भारतीय ज्ञान प्रणाली, योग, सामरिक अभ्यास, भारतीय सांस्कृतिक वारसा, पर्यावरण संवर्धन, कौशल्य विकास, भाषा, क्रीडा अशा क्षेत्रात काम करणाऱ्या महाविद्यालयांना दहा वर्षे, नॅक आणि एनबीए मूल्यांकनातून सूट देण्याचा निर्णय यूजीसी घेऊ शकते, असे नमूद करण्यात आले आहे.

एकाच संस्थेच्या दोन महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा मिळालेला असल्यास त्या महाविद्यालयांचे पालक विद्यापीठाच्या मान्यतेने विलीनीकरण करता येईल. स्वायत्तता संपण्यापूर्वी नूतनीकरणासाठी एक वर्ष आधी अर्ज न केल्यास स्वायत्तता संपुष्टात येईल, असेही नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 18 April 2023
https://epaper.loksatta.com/c

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# परिवर्तनाचे पाईक होण्याची संधी

अमित रुके



सिनेट सदस्यांच्या सत्कारप्रसंगी (डावीकडून) अॅड. एस. के. जैन, रवींद्र देव, डॉ. संजीव सोनवणे, प्रा. अनिरुद्ध देशपांडे, रवींद्र शिंगणापूरकर, डॉ. प्रफुल्ल पवार, राजीव सहस्रबुद्धे आणि डॉ. शरद कुंटे उपस्थित होते.

## प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांचे सिनेट सदस्यांना आवाहन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'समाजातील लोकांनी सिनेट सदस्य म्हणून निवडून देऊन, तुमच्यावर सामाजिक प्रतिनिधित्वाची जबाबदारी टाकली आहे. त्यामुळे राजकारण न करता विद्यापीठाच्या विकासासाठी काम केले पाहिजे. पुढील पाच वर्षे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे काम करून, परिवर्तनाचे पाईक होण्याची संधी तुमच्याकडे आहे,' अशी अपेक्षा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांनी सोमवारी व्यक्त केली. गेली काही वर्षे आपला देश राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशिवाय पुढे जात होता, ही फार गंभीर बाब होती, असेही प्रा. देशपांडे यांनी स्पष्ट केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था या चार संस्थांच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेटमधील नवनिर्वाचित सदस्यांच्या सोमवारी आयोजित सत्कार समारंभात प्रा. देशपांडे बोलत होते.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, संस्थांचे प्रतिनिधी डॉ. शरद कुंटे, अॅड. एस.के. जैन, राजीव सहस्रबुद्धे, रवींद्र देव आदी मान्यवर उपस्थित होते.

'शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टांचा समाजात प्रसार करण्यासाठी अधिसभा सदस्यांनी आपल्या वलयाचा वापर करावा. विद्यार्थीकेंद्री शिक्षण, स्त्रीकेंद्री परिवार, मनुष्यकेंद्री विकास आणि गरीबकेंद्री अर्थव्यवस्था अशी चतुःसुत्री डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी मांडली होती. याच आधारावर राष्ट्रीयतेचे भरणपोषण करणारे नवीन शैक्षणिक धोरण विद्यापीठात यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी,' असे आवाहनही प्रा. देशपांडे यांनी केले. डॉ. कुंटे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुधीर गाडे यांनी केले. डॉ. किशोर देसरडा यांनी आभार मानले.

> **"विद्यापीठ अनुदान आयोगाने पहिली ते पीएचडीपर्यंतच्या शिक्षणाचे टप्पे श्रेयांकांमध्ये मांडण्याचे महत्त्वपूर्ण काम देशाच्या इतिहासात प्रथमच झाले आहे. या परिस्थितीत सिनेट सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळणे ही मोठी बाब आहे. त्या दृष्टीने विद्यापीठातील बदलांद्वारे समाजात बदल घडवून आणण्यासाठी आपण स्वतःला सिद्ध करणे हे सर्वांचे दायित्व आहे.**
>
> \- डॉ. संजीव सोनवणे, प्र- कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### 'मतदानाची टक्केवारी कमीच'

'चार संस्थांनी मिळून सिनेट सदस्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन केले ही चांगली बाब आहे. मात्र, अधिसभेच्या निवडणुकीत मतांची संख्या कमी होती. पुढील वेळी अधिसभेच्या निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीत चांगली कामगिरी होईल,' अशी अपेक्षा शिंगणापूरकर यांनी व्यक्त केली.

Maharashtra Times 18.4.2023

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# मॉडर्न गर्ल्स हायस्कूलचे यश



**मुंबई :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनच्या मॉडर्न गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देताना शिक्षण मंत्री दिपक केसरकर.

**पुणे, दि. २७ -** राज्य शासनातर्फे लेटस चेंज स्वच्छता मॉनिटर उपक्रम राबविण्यात आला. लेटस चेंज उपक्रमात राज्यातील शाळांपैकी सर्वोत्तम ४० शाळांमध्ये प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न गर्ल्स हायस्कूल, पुणे-५ या शाळेचीही निवड झाली. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या निवडक विद्यार्थ्यांना 'स्वच्छता मॉनिटर'ने सन्मानित करण्यात आले. प्रशासकीय अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग डॉ. मिनाक्षी राऊत, जिल्हा समन्वयक सुनिल ताकवले, मुख्याध्यापिका माया नाईक, समन्वयक पुनम सोमवंशी तसेच विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यासाठी मंत्रालयामध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. उपक्रमातील यशाबद्दल प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. एकबोटे सर, कार्यवाह देशमुख सर, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे मॅडम, शाळा समिती अध्यक्ष पल्लवी जाधव व विजिटर खरे सर यांनी या कौतुक केले.

प्रभात PuneCity, 28 Apr 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

लोकमत



# मॉडर्न गर्ल्सच्या विद्यार्थिनी बनल्या स्वच्छतादूत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'लेट्स चेंज स्वच्छता मॉनिटर' या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या मॉडर्न गर्ल्स स्कूलच्या मुलींचा सत्कार शिक्षणमंत्री केसरकर यांनी सत्कार केला.

या उपक्रमासाठी राज्यातील पन्नास शाळांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये पुण्यातील चार शाळांचा समावेश असून त्यामध्ये मॉडर्न गर्ल्स स्कूलची निवड झाली होती. यानिमित्त पुणे महापालिकेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. मीनाक्षी राऊत, जिल्हा समन्वयक सुनील ताकवले, मुख्याध्यापिका माया नाईक, प्रकल्प समन्वयक पूनम सोमवंशी यांचाही शिक्षण विभागाच्या वतीने गौरव करण्यात आला. त्याबद्दल प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह शामकांत देशमुख, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, पल्लवी जाधव, उद्धव खरे यांनी साऱ्यांचे अभिनंदन केले.

Hello Pune
Page No. 5 Apr 30, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची घाई नको!

**पुढारी विशेष**

गणेश खळदकर
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी येत्या वर्षापासून करण्यासाठी शासनस्तरावर पावले उचलण्यात येत आहेत. परंतु, संबंधित धोरण अद्यापही शिक्षण क्षेत्रातील पालक, विद्यार्थी, संस्थाचालक, मुख्याध्यापक, प्राचार्य यांना पूर्णपणे समजलेले नाही. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्याची घाई करू नये. धोरणाची अंमलबजावणी चुकल्यास गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असल्याचे मत शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.**




तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पूर्वप्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणात अनेक बदल करण्यात येणार आहेत. एकाच वेळी दोन पदव्या, क्रेडिट बँक, मल्टिपल एन्ट्री आणि मल्टिपल एक्झिट, कौशल्य शिक्षण, मातृभाषेला प्राधान्य, बहुशाखीय शिक्षणासह अन्य काही गोष्टींचा समावेश आहे. वरवर पाहता हे धोरण फार चांगले वाटत असले, तरी याची अंमलबजावणी करणे तेवढेच किचकट आहे. धोरणात कनिष्ठ महाविद्यालयांच्या विलगीकरणावर भर आहे. परंतु, ही प्रक्रिया किचकट आहे. नवीन अभ्यासक्रम अनुदानित की विनाअनुदानित याचे स्पष्टीकरण नाही. पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी वाढल्यामुळे पदवीचे शिक्षण महागणार आहे.

भारतातील गरजा बघून शैक्षणिक धोरण न तयार करता पाश्चात्त्य देशांचे अनुकरण करणारे धोरण असल्याची चर्चा आहे. मल्टिपल एन्ट्री आणि मल्टिपल एक्झिटसाठी विद्यार्थ्यांचे रे?ॉर्ड ठेवणारे पोर्टल तयार करावे लागणार आहे. प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती नसल्यामुळे शिक्षण क्षेत्रातील यंत्रणा डबघाईला आली आहे. त्याच यंत्रणेला राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आव्हान आहे, असे स्पष्ट मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

> धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी तीन समित्या नेमण्यात आल्या आहेत. यामध्ये टास्क फोर्स, सुकाणू समिती आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत मंत्र्याची समिती अशा समित्या आहेत. या समित्यांनी धोरणाची अंमलबजावणी कशी होणार, त्याचा विद्यार्थ्यांना काय फायदा होणार, हे सोदाहरण स्पष्ट करणे गरजेचे आहे. त्यासाठी अंमलबजावणीची कोणतीही घाई करू नये. धोरण प्रत्येक घटकाला समजावून ते राबविण्यात जो फायदा होणार आहे तो फायदा धोरण मोघमपणे राबविण्यात होणार नाही.
>
> **- डॉ. अरुण अडसूळ,** माजी कुलगुरू

> शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना कौशल्यविकास, क्षमताविकास यावर भर द्यावा लागणार आहे. धोरणातील बदलाचा शासन निर्णय एक ते दीड महिना अगोदर मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी सुटीच्या कालावधीत शिक्षकांना एकत्र येणे गरजेचे आहे. परंतु, शैक्षणिक धोरण लोकांपर्यंत पोहचले असल्यामुळे अंमलबजावणीस अडचण नाही.
>
> **- डॉ. राजेंद्र झुंजारराव,** प्राचार्य, मॉडर्न कॉलेज

Pune Edition
Apr 17, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

सकाळ

### विद्यार्थ्यांसाठी आता 'ई-समाधान' पोर्टल

**पुणे :** देशभरातील उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांना रॅगिंग यासह विविध समस्या, शैक्षणिक-अशैक्षणिक समस्या, विद्यापीठ किंवा महाविद्यालयातील अन्य तक्रारी असतील, तर आता एक खिडकी पद्धतीने 'ई-समाधान' पोर्टलद्वारे सोडविल्या जाणार आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने हे नवे पोर्टल कार्यान्वित केले आहे.

विद्यार्थ्यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी यापूर्वी वापरली जाणारी तक्रार निवारण प्रणाली बंद करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. तसेच 'ई-समाधान' या नव्या पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण होणार असून प्रलंबित तक्रारीही सोडविल्या जाणार असल्याचे आयोगाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. यापूर्वीची तक्रार निवारण प्रणालीचे संकेतस्थळ संवादात्मक होते. त्याद्वारे विद्यार्थ्यांना तक्रार दाखल केल्यानंतर पुढे झालेल्या कार्यवाहीची माहिती ऑनलाइन मिळत होती. दाखल केलेली तक्रार उच्च शिक्षण संस्था, यूजीसीचे प्रादेशिक कार्यालय आणि यूजीसी मुख्यालय अशा तीन स्तरांत ठराविक मुदतीत सोडवली जात होती. आता या प्रणालीचा वापर थांबविला असून 'ई-समाधान' हे नवे संकेतस्थळ सुरू केले आहे.

Pune, Pune-Today
01/04/2023 Page No. 1

पुढारी

### तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्याच्या कला संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय कला महाविद्यालयांमधील तासिका तत्त्वावरील शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. मात्र, संबंधित शिक्षकांना महाविद्यालयात रुजू होण्यापूर्वी शंभर रुपयांच्या मुद्रांकावर 'भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी करता येणार नाही, तसेच नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही' असे हमीपत्र शिक्षकांना लिहून द्यावे लागणार आहे.

**कायमस्वरूपीचा हक्क न सांगणारे हमीपत्र घेऊनच नियुक्ती**

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. तासिका तत्त्वावरील उमेदवाराला एका महिन्यात त्यांच्या दर्जाला लागू वेतनश्रेणीतील सुरुवातीच्या वेतनश्रेणीच्या रकमेपेक्षा अधिक मानधन दिले जाणार नाही, याची दक्षता संबंधित शासकीय कला महाविद्यालयाचे अधिष्ठाता आणि कला संचालकांनी घ्यावी. स्थानिक निवड समितीमार्फत अध्यापकांची निवड करावी. निवड समितीमध्ये संबंधित महाविद्यालयाचे अधिष्ठाता किंवा प्राचार्य, विभागप्रमुख, एक बाह्य विषयतज्ज्ञ असावा, असे नमूद करण्यात आले आहे. तासिका तत्त्वावरील मानधन प्रदान, याबाबत काही अनियमितता आढळल्यास त्याची जबाबदारी प्राचार्य किंवा अधिष्ठाता यांची राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. सुधारित दर १ एप्रिलपासून लागू केले जाणार आहेत.

कला, वाणिज्य, विज्ञान पदवी अभ्यासक्रमाला सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिकांसाठी अनुक्रमे ६२५ आणि २५० रुपये देण्यात येत होते. त्यात वाढ करून आता नऊशे रुपये आणि साडेतीनशे रुपये प्रतितास या दराने दिले जातील. पदव्युत्तर पदवीसाठी सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिकांसाठी साडेसातशे रुपये आणि तीनशे रुपये दिले जात होते. आता त्यासाठी एक हजार रुपये आणि साडेचारशे रुपये प्रतितास दिले जातील. शारीरिक शिक्षणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमात सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिकांसाठी अनुक्रमे साडेसातशे आणि तीनशे रुपयांऐवजी एक हजार रुपये आणि साडेचारशे रुपये देण्यात येतील. विधी पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिकांसाठी साडेसातशे रुपये आणि तीनशे रुपयांऐवजी एक हजार रुपये आणि साडेचारशे रुपये प्रतितास दिले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**उच्च शिक्षणातील प्राध्यापकांनाही लाभ**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय आणि अनुदानित महाविद्यालयांतील तासिका तत्त्वावरील शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. सुधारित दर १ एप्रिलपासून लागू होणार असून, नऊ तासिकांची मोजणी करणे सोयीचे होण्यासाठी तासिका कालावधी ४८-५० मिनिटांवरून साठ मिनिटे करण्यासही मान्यता देण्यात आली.

My Pune Edition
Apr 1, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# विद्यापीठाचे नवे कुलगुरू कोण?

## अनेक इच्छुकांची ‘राजकारण’ आणि ‘समाजकारणा’च्या माध्यमातून फिल्डिंग

**म. टा. प्रतिनिधी**, पुणे

शैक्षणिक गुणवत्तेत राज्यात पहिल्या क्रमांकावर असणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूपदी आपली निवड व्हावी, यासाठी देशभरातील साधारण १००च्या जवळपास प्राध्यापकांनी निवड समितीकडे अर्ज केले आहेत. यातून विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलातून अर्ज केलेल्या प्राध्यापकांची संख्या सर्वाधिक आहे. पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची माळ आपल्याच गळ्यात पडावी, यासाठी आतुर झालेल्या काहींनी 'राजकारण' आणि 'समाजकारणा'च्या माध्यमातून फिल्डिंग लावायला सुरुवात केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर १८ मे २०२२ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर प्रभारी कुलगुरुपदाची धुरा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, तर प्र-कुलगुरू म्हणून डॉ. संजीव सोनवणे सांभाळत आहेत. यापूर्वी, स्थापन करण्यात आलेल्या कुलगुरू निवड समितीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) प्रतिनिधीचा समावेश नसल्याने, ती रद्द करण्यात आली होती. त्यामुळे काही काळ समिती नव्हती. त्यानंतर 'नॅक'चे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरू निवड समितीची स्थापना करण्यात आली. या समितीत डॉ. अभय करंदीकर, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर; तसेच कर्नाटक राज्य महिला विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मीना चंदावरकर यांचा समावेश आहे.

या समितीने ३० मार्चपर्यंत इच्छुक व्यक्तींकडून अर्ज मागविले होते. त्यानुसार देशभरातून साधारण १००च्या आसपास प्राध्यापकांनी अर्ज केल्याची माहिती मिळत आहे. त्यामध्ये पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलातून किमान दहा प्राध्यापकांनी अर्ज केल्याची माहिती पुढे येत आहे.

पुढील पंधरा दिवसांत आलेल्या अर्जांची पडताळणी करण्यात येईल. त्यानंतर पात्र व्यक्तींची यादी जाहीर करण्यात येईल. या यादीतून निवडलेल्या अर्जांवर चर्चा करून, त्यांच्या मुलाखती होतील. यातून निवडलेल्या पाच नावांमधून राज्यपाल कार्यालयाकडून एका व्यक्तीची कुलगुरू म्हणून निवड जाहीर करण्यात येईल. त्यामुळे या सर्व प्रक्रियेला किमान एका महिन्याचा कालावधी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर एप्रिलच्या अखेरीस किंवा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कुलगुरूंची निवड जाहीर होण्याची शक्यता आहे.



**“ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू निवडीला आधीच भरपूर उशीर झाल्याने, गरजेचे शैक्षणिक निर्णय होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे राज्यपाल कार्यालयाने महाराष्ट्र दिनी कुलगुरूंचे नाव घोषित केल्यास योग्य ठरेल. ही डेडलाइन पाळली जाणार नसेल, तर डॉ. नितीन करमळकर निवृत्त होण्याला एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळायलाच हवेत.**

– धनंजय कुलकर्णी, माजी सिनेट सदस्य

### यांच्या अर्जांची चर्चा...

डॉ. संजीव सोनवणे, डॉ. प्रफुल्ल पवार, डॉ. विजय खरे, डॉ. अंजली कुरणे, डॉ. संजय ढोले, डॉ. विलास खरात, डॉ. सुरेश गोसावी, डॉ. अविनाश कुंभार, डॉ. राजेश गच्छे यांच्यासह १६ उमेदवारांनी कुलगुरुपदासाठी अर्ज केल्याची जोरदार चर्चा आहे. याव्यतिरिक्त जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील प्राध्यापकांसोबतच राज्यातील विविध विद्यापीठांमधील चर्चेतील प्राध्यापकांनी अर्ज केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### ‘कुलगुरू चारित्र्यसंपन्न हवेत’

'निवड समितीने कुलगुरूंची निवड करताना, ती व्यक्ती उच्चविद्याविभूषित असण्यासोबतच चारित्र्यसंपन्न हवी, याची काळजी घेतली पाहिजे. सेवेच्या कार्यकाळात त्यांच्यावर कोणताही आरोप झालेला किंवा कारकीर्द वादग्रस्त नाही, याची तपासणी करणे आवश्यक आहे. कुलगुरूंची निवड झाल्यावर आरोप-प्रत्यारोप योग्य राहत नाही. त्यामुळे कुलगुरू निवडीची प्रक्रिया निष्पक्ष होऊन, पुणे विद्यापीठाचा कारभार यशस्वीपणे चालविण्याचा आत्मविश्वास असणाऱ्याची कुलगुरुपदी निवड झाल्यास ती सार्थ ठरेल,' असे अभ्यासक डॉ. ए. पी. कुलकर्णी यांनी सांगितले.

Maharashtra Times 1.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# इंटर्नशिपचा मार्ग मोकळा

## पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात संधी; सुकाणू समितीचे प्रयत्न

मटा विशेष

आदित्य तानवडे
Aditya.Tanawade@timesgroup.com

**पुणे :** नव्या शैक्षणिक धोरणामध्ये पुढील वर्षापासून अनेक पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचे होणार आहेत. या अभ्यासक्रमांच्या शेवटच्या वर्षात विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिपसाठी स्थापन केलेल्या सुकाणू समितीने पुढाकार घेतला आहे. सुकाणू समितीमार्फत राज्य सरकारद्वारे राज्यातील सर्व उद्योजकांशी संबंधित शिखर संस्थांशी करार करण्यात येणार असून, या कराराद्वारे राज्याच्या सर्व भागांमधील उद्योजक कंपन्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप देणार आहेत.

या संदर्भात सुकाणू समितीकडून राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्रालयाकडे प्रस्ताव देण्यात आला असून, याबाबत पुढील काही दिवसांत उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला शैक्षणिक धोरणासंदर्भात कार्यरत सुकाणू समिती, उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाचे सचिव, मराठा चेंबर ऑफ कॉमर्ससारख्या उद्योग विश्वातील शिखर संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीतून राज्यात ज्या भागांमध्ये उद्योग आहेत, अशा परिसरात शिकणाऱ्या राज्यातील सर्व विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप प्रोग्राममध्ये सहभागी होता येणार आहे.

'नव्या शैक्षणिक धोरणानुसार चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना शेवटच्या वर्षात संपूर्ण वर्ष प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेण्याची अट घालण्यात आली आहे. यात त्यांना कंपन्यांमध्ये जाऊन प्रत्यक्ष काम करावे लागणार आहे. विद्यार्थ्यांना चौथ्या वर्षात इंटर्नशिपसाठी भटकंती करावी लागू नये, या उद्देशाने सुकाणू समितीने हा प्रस्ताव दाखल केला आहे. राज्यातील कंपन्यांबरोबर करार झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्याशी संबंधित विद्याशाखांमध्ये इंटर्नशिप करण्याची संधी मिळणार आहे. उद्योगांनाही या प्रकल्पाद्वारे तरुण मनुष्यबळ मिळणार असून, विद्यार्थ्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांना त्याच कंपन्यांमध्ये नोकरी करण्याची संधीही मिळू शकेल,' असे सुकाणू समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.



**"या प्रकल्पामध्ये राज्य सरकार आणि राज्यातील उद्योग क्षेत्र केंद्रस्थानी असणार आहे. सरकारद्वारे उद्योगांच्या शिखर संस्थांशी करार केला जाईल. त्यातून विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिपचा मार्ग मोकळा होईल. या इंटर्नशिप दरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम शिकण्याबरोबरच नव्या कौशल्यांचेही प्रशिक्षण मिळत राहील. यातून नोकरी मिळण्यात अडचणी येणार नाहीत.**

\- प्रा. डॉ. नितीन करमळकर, अध्यक्ष, सुकाणू समिती

### ...असा असेल प्रकल्प

- राज्य सरकारद्वारे करार करून राज्यातील बहुतांश उद्योजक कंपन्या जोडल्या जाणार.
- या कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयानुसार इंटर्नशिप करण्याची संधी मिळणार.
- एक वर्षाच्या या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणार आहे.
- विद्यार्थ्यांचे काम समाधानकारक असल्यास त्याच कंपनीत नोकरीला सुरुवात करून करिअर करण्याची संधी मिळणार.
- राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना या प्रकल्पाद्वारे कामाचा अनुभव घेता येईल.

Maharashtra Times 1.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

पुढारी

# शिष्यवृत्तीला कॉलेजकडूनच खोडा!

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तींसाठी पुणे विभागातील २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ या वर्षातील ६ हजार ७९ विद्यार्थ्यांचे अर्ज त्याचबरोबर दुसऱ्या हप्त्यासाठी ५ हजार ५८३ विद्यार्थ्यांचे अर्ज असे एकूण ११ हजार ६६२ अर्ज संस्थांस्तरावरच अडकून पडले आहेत. त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्यास महाविद्यालय/ विद्यापीठाला जबाबदार धरले जाईल, असा इशारा उच्च शिक्षण संचालनालयाने दिला आहे.

विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात. त्यासाठी उच्च शिक्षण संचालनालयातर्फे महाविद्यालये व विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १४ शिष्यवृत्ती सुरू आहेत. शिष्यवृत्ती वाटपात घोळ होत असल्याने शासनाने थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा करण्यासाठी 'डीबीटी' पद्धत सुरू केली. विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर लिपिक व प्राचार्यांच्यास्तरावर अर्जांची पडताळणी करून त्यांना अंतिम मान्यता दिली जाते. परंतु महाविद्यालयस्तरावर सध्या शिष्यवृत्ती अर्जांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ.किरणकुमार बोंदर यांनी अर्जांची पडताळणी करण्यासंदर्भात विद्यापीठांचे कुलसचिव तसेच महाविद्यालयांच्या प्राचार्यांना स्पष्ट शब्दात सूचना दिल्या आहेत. त्यानुसार शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरून पडताळणी करणे आवश्यक आहे. प्रत्येक महाविद्यालयात २०२०-२१, २०२१-२२ करिता १ ते १० ऑनलाइन ॲप्लिकेशन छाननीअभावी प्रलंबित आहेत. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्तीकरिता ऑनलाइन अर्ज करता येत नाहीत.

**अकरा हजारांवर विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित**

कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय, संस्था, विद्यापीठाच्या स्तरावर विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच पडताळणी प्रलंबित राहिलेल्या अर्जाबाबत भविष्यामध्ये उद्‌भवणाऱ्या प्रश्नास संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव आणि महाविद्यालयातील प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, अशी ताकीद बोंदर यांनी दिली आहे.

Pune Edition
Apr 2, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

पुढारी

# महाविद्यालयांमध्ये तीन महिने कमवा शिका योजना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयां मध्ये मार्च ते मे असे तीन महिने विशेष बाब म्हणून 'कमवा व शिका योजना' राबविता येणार आहे. त्यासाठी ऑनलाईन प्रस्ताव आज दि.३ एप्रिल रोजी पाठवावेत, असे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाने स्पष्ट केले आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणास साहाय्य - भूत ठरणारी कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना मार्च, एप्रिल व मे २०२३ या कालावधीत विशेष बाब म्हणून सुरू ठेवण्यास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी मान्यता दिली आहे.

कोरोना नियमांचे पालन करत संबंधित योजना राबवावी. त्याचबरोबर कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या नियमावलीनुसार या योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना त्यांचे मानधन प्रत्येक महिन्याच्या समाप्तीनंतर तत्काळ त्यांच्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य आहे. असे न झाल्यास त्या त्या महिन्याचे देण्यात आलेले मानधन लेखापरीक्षणातून वगळले जाईल आणि विद्यापीठाकडून अशा विलंब केलेल्या मानधनाचे अनुदान मिळणार नाही. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील कमवा व शिका योजनेंतर्गत नियमित प्रस्ताव जून २०२३ मध्ये मागवले जातील. त्यासंदर्भातील परिपत्रक जून २०२३ मध्ये जाहीर केले जाईल. त्या परिपत्रकानुसार सध्याच्या मार्च ते मे २०२३ या व्यतिरिक्त शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या संपूर्ण वर्षभराची परवानगी घेण्याकरिता नव्याने प्रस्ताव पाठवणे बंधनकारक असल्याचे विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. संतोष परचुरे यांनी स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Apr 3, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

पुढारी

# नवीन शैक्षणिक धोरणात दहावी, बारावी बोर्ड कायम

## डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांची माहिती; नॅकसाठी प्रस्ताव पाठवावेत

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**



### ...तर सर्व रँकिंग भारतालाच मिळाली असती

जगातील शंभर उत्कृष्ट विद्यापीठाच्या यादीत भारतातील एकही विद्यापीठ नाही. रँकिंग पद्धतीत ७० गुण आपल्या विरोधात आहेत. इ.स. पूर्व ६०० वर्षांपूर्वी देशात तक्षशीला व नालंदा विद्यापीठासह इतर राज्यातही विद्यापीठे होती. तसेच मसाल्याच्या व्यापारामुळे अमेरिका, चीनच्या एक तृतीयांश भारताचा जीडीपी त्याकाळी होता. म्हणूनच भारत शिक्षण व जीडीपीमध्ये जगात अव्वल होता, त्यामुळे सर्व रँकिंग देशालाच मिळाली असती, असे डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण केंद्र सरकारने लागू केले असून यामध्ये दहावी, बारावीचे बोर्ड कायम राहील. त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही, असे मत नॅकचे चेअरमन व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समितीचे सल्लागार डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी 'पुढारी'शी बोलताना सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मानव संसाधन विकास मंत्रालयाचे नाव शिक्षा मंत्रालय केले आहे. प्रत्येक राज्य, विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थांनी नवीन शैक्षणिक धोरण राबविताना चांगल्या गोष्टी करण्यास सुरुवात केल्याचे डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाले.

धोरणाच्या अंमबलबजावणीत कर्नाटक, उत्तर प्रदेश, उत्तराखंड राज्ये पुढे असल्याचे सांगून डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी महाराष्ट्राने नवीन शैक्षणिक धोरण अंमलबाजवणी समिती स्थापन केली आहे. हे धोरण राबविण्यासाठी १५ वर्षांचा कालावधी ठरविला आहे. आता दोन वर्षे पूर्ण झाली असून पुढील काळात नवीन बदल होत राहतील. **पान ८ वर ▸**

Pune Edition
Apr 3, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# नवीन शैक्षणिक धोरणात दहावी, बारावी बोर्ड कायम

**पान १ वरून...**

**मुदतवाढीचा निर्णय सरकार घेईल**

राज्यातील ६० टक्के महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झाले नसल्याबाबत विचारता ते म्हणाले, नॅकसाठी महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठविले पाहिजेत. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता व इतर गोष्टींच्या उत्कृष्टतेनुसार त्यांना नॅक मानांकन मिळेल. या मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मुदतवाढ देण्याचे धोरण राज्य सरकार ठरवेल, असेही डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाले.

Pune Edition
Apr 3, 2023 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

THE TIMES OF INDIA, NEW DELHI
MONDAY, APRIL 3, 2023

TIMES NATION

# 'India needs a stronger NAAC with transparent, error-free functions'

*We need to reinforce NAAC instead of discrediting it. UGC chairperson* **M Jagadesh Kumar** *tells* **TOI's Manash Gohain**. *Excerpts from the interview:*

**There are some serious allegations against the functioning of NAAC?**

■ Accreditation and ranking are complex tasks requiring continual upgradation... do not consider aberrations as a norm. Having said this, I am mindful that the qualitative and quantitative methods used by NAAC need careful examination and improvements. We need to reinforce NAAC instead of discrediting it to stimulate our educational institutions to recast themselves to provide high-quality education. UGC and the education ministry are pursuing the issues raised about NAAC and will demonstrate robust education reforms in the coming time.

**A former chairperson of NAAC who stepped down recently alleged vested interest, malpractices, and nexus in the grading process...**

■ NAAC is an autonomous body funded by UGC. Its executive committee evolves policies collectively for assessment and accreditation. In case of possible malpractices and nexus in the grading process, the committee has full autonomy to set up a panel and work out solutions to avoid undesirable practices eroding the system's transparency. As a first measure, UGC has recently appointed a new chairman and is in the process of selecting a new director. They will examine every aspect of NAAC's functioning and mend the fault lines.

**An inquiry committee has red flagged several irregularities, including that the council's IT system was found to be compromised... assessors barely visited sites... and individuals without authority were provided full access to NAAC's internal system.**

■ NAAC's accreditation process has two steps — quantitative analysis based on data provided by the institutions and qualitative study based on a visit by an expert committee to the institution. The former has 70% weightage and the latter 30%. Recently, NAAC has brought in several changes in its online portal to simplify data uploading by institutions. For data validation and verification (DVV) of the qualitative analysis, NAAC has also roped in institutions of national importance, such as IITs, to strengthen the process. During expert visits to the institutions, if there are any complaints, such experts are debarred from participating in future visits. NAAC's internal processes and the software that handles expert selection for physical visits are continuously being improved. With the increasing number of institutions participating in accreditation, the internal processes must be further strengthened using the technology, and NAAC is working on it.



TOI INTERVIEW

> NAAC is an autonomous body funded by UGC. Its executive committee evolves policies collectively. In case of possible malpractices and nexus in the grading process, the committee has full autonomy to set up a panel and work out solutions to avoid undesirable practices eroding transparency

**CAG also found discrepancies in the inspections being carried out by NAAC which resulted in awarding inaccurate grades to several institutions?**

■ The mechanism under NAAC takes any such feedback seriously and tries to tighten loose ends to safeguard the internal processes of NAAC. We need a stronger NAAC with transparent, objective and error-free functions. Finding a solid correlation between NAAC accreditation and NIRF ranking may not be possible in some cases since both systems have different parameters and processes. We observe this even in world university rankings. But there is no doubt that NAAC must continually improve its processes. NAAC is determined to do everything possible to strengthen and improvise the assessment and accreditation process of higher education institutions (HEIs) in the country.

**Is the government planning to overhaul the accreditation process?**

■ The ministry of education has already constituted a committee under the chairmanship of K Radhakrishnan, former chairman of Isro, to strengthen the accreditation process. UGC also formed a committee headed by Surinder Prasad, former director of IIT-Delhi, and another committee headed by M K Sridhar, member of the EC of NAAC. UGC has provided the recommendations of these committees to Radhakrishnan's committee. We will consider all these recommendations to prepare the final measures to strengthen NAAC further.

The Times of India 3.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# Need transparency in NAAC: UGC chairman

*A stronger NAAC with error-free functioning is the need of the hour, said UGC chairperson* **M Jagadesh Kumar** *in an interview to* **TOI's Manash Gohain**. *Excerpts from interview:*



TOI INTERVIEW

**There are serious allegations against NAAC functioning? What is your view on it?**

Accreditation and ranking are complex tasks requiring continual upgradation... do not consider aberrations as a norm. Having said this, I am mindful that the qualitative and quantitative methods used by NAAC need careful examination and improvements. We need to reinforce NAAC instead of discrediting it to stimulate our educational institutions to recast themselves to provide high-quality education. UGC and the education ministry are pursuing the issues raised about NAAC and will demonstrate robust education reforms in the coming time

**Former NAAC chief stepped down recently alleging vested interest, malpractices, and nexus among the grading process?**

NAAC is an autonomous body funded by UGC. Its executive committee evolves policies collectively for assessment and accreditation. In case of possible malpractices and nexus in the grading process, the committee has full autonomy to set up a panel and work out solutions to avoid undesirable practices eroding the system's transparency. As a first measure, UGC has recently appointed a new chairman and is in the process of selecting a new director. They will examine and mend every aspect of NAAC's functioning and mend the fault lines.

**An inquiry committee has red flagged several irregularities including that the council's IT system was found to be compromised, assessors barely visited sites, and individuals without authority were provided full access to NAAC's internal system.**

NAAC's accreditation process has two steps—quantitative analysis based on data provided by the institutions and qualitative study based on a visit by an expert committee to the institution. The former has 70% weightage and the latter 30%. Recently, NAAC has brought in several changes in its online portal to simplify data uploading by institutions. For data validation and verification (DVV) of the qualitative analysis, NAAC has also roped in institutions of national importance, such as IITs, to strengthen the process. During expert visits to the institutions, if there are any complaints, such experts are debarred from participating in future visits. NAAC's internal processes and the software that handles expert selection for physical visits are continuously being improved. With the increasing number of institutions participating in accreditation, the internal processes must be further strengthened using the technology, and NAAC is working on it.

**CAG also found discrepancies in the inspections being carried out by NAAC which resulted in awarding inaccurate grades to several many institutions?**

The mechanism under NAAC takes any such feedback seriously, and tries to tighten loose ends, to safeguard the internal processes of NAAC. We need a stronger NAAC with transparent, objective and error-free functions. Finding a solid correlation between the NAAC accreditation and NIRF ranking may not be possible in some cases since both the systems have different parameters and processes. We observe this even in world university rankings. But there is no doubt that NAAC must continually improve its processes. NAAC is determined to do everything possible to strengthen and improvise the assessment and accreditation process of higher education institutions (HEIs) in the country.

**Is the government planning to overhaul the accreditation process?**

The ministry of education has already constituted a committee under the chairmanship of K Radhakrishnan, former chairman of Isro, to strengthen the accreditation process. UGC also formed two committees headed by Surinder Prasad, former director of IIT-Delhi, and another committee headed by M K Sridhar, member of the EC of NAAC. UGC has provided the recommendations of these committees to Radhakrishnan's committee. We will consider all these recommendations to prepare the final measures to strengthen NAAC further.

The Times of India 3.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

सकाळ SakalNews @SakalMediaNews www.esakal.com

# भारतीय शोधनिबंध आणि प्रभाव

**भाष्य**



**शुभदा नगरकर**

**संशोधनासंबंधीच्या एका पाहणीत भारतातील शोधनिबंधांची संख्या चांगली असली तरी सायटेशनच्या बाबतीत भारत अद्याप मागे असल्याचे आढळले. 'सायटेशन' म्हणजे काय, त्याला एवढे महत्त्व का दिले जाते आणि आपण यात मागे का आहोत, या प्रश्नांचा मागोवा.**

संशोधनाच्या क्षेत्रात भारताचे स्थान नेमके कुठे आहे, याचे आपल्याला औत्सुक्य असते. वेगवेगळ्या पाहण्यांमधून त्याचा ढोबळ अंदाज येऊ शकतो. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार भारत संशोधनाच्या क्षेत्रात चौथ्या क्रमांकावर असून, सायटेशनच्या (उद्धरण) क्रमवारीत नवव्या स्थानावर आहे. हा फरक कशामुळे आहे?

'क्यू एस' कंपनीच्या अभ्यासावरून प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार भारताने २०१७ ते २०२२ दरम्यान १३ लाख, चीनने ४५ लाख, अमेरिकेने ४४ लाख, तर ब्रिटनने १४ लाख शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. आपण लवकरच ब्रिटनला मागे टाकू, असा अंदाज आहे. परंतु सायटेशनच्या क्रमवारीत भारतीय संशोधन कमी पडते आहे.

सायटेशन म्हणजे संशोधनाचा प्रभाव मोजण्याची संख्यात्मक पद्धती. आधी प्रकाशित झालेल्या निबंधातील आशयाशी संबंधित संदर्भ जेव्हा दुसरा संशोधक आपल्या निबंधात देतो, तेव्हा ते त्याला मिळालेले एक 'सायटेशन'. साठीच्या दशकात युजिन गारफिल्ड या अमेरिकी भाषाशास्त्रज्ञाने त्याच्या शोधनिबंधात दिलेल्या संदर्भ यादीचा उपयोग करून 'सायटेशन इंडेक्स' बनवला. जितके जास्त संदर्भ तितका त्या निबंधाचा प्रभाव जास्त अशी समजूत आहे. गारफिल्ड यांच्या मते फक्त अशा संख्यात्मक मोजणीवरून एखाद्या संशोधकाची, संस्थेची अथवा देशाची संशोधनाची क्षमता ठरवणे योग्य नाही. याचे कारण प्रत्येकाचा अभ्यास वेगळा असतो. त्यांनी संशोधनात संदर्भ कधी दिला जातो, यावर १५ मुद्दे दिले आहेत. सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एखाद्या विषयातील मूळ प्रकाशने ओळखणे. ज्यात मूळ संकल्पनेवर चर्चा केलेली असते. संदर्भ योग्य असणे महत्त्वाचे.

गारफिल्ड यांनी संदर्भ मोजता यावेत यासाठी तीन डेटाबेस आधी छापील आणि नंतर ई-माध्यमात प्रसिद्ध केले. 'वेब ऑफ नॉलेज' या नावाने क्लॅरिव्हेट अनॉलिटिक्स कंपनी प्रसिद्ध करते. यामध्ये सुमारे ११ हजार ते १४ हजार नियतकालिकांचा समावेश आहे. असाच दुसरा डेटाबेस 'स्कोपस' या नावाने 'एल्सीव्हीअर' कंपनी प्रसिद्ध करते. दोन्हीही डेटाबेसमध्ये मिळून जगभरातील सुमारे ३० ते ४० हजार नियतकालिके समाविष्ट आहेत. आजमितीला सुमारे तीन लाख नियतकालिके प्रसिद्ध होतात. परंतु या दोन डेटाबेसेसमध्ये समाविष्ट असलेल्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधांवरुन आणि त्यांना मिळालेल्या संदर्भावरून जगभरातील संशोधक, संस्था आणि देशांची संशोधनक्षमतेची क्रमवारी लावण्यात येते. तसेच या दोन्ही डेटाबेसेसमध्ये जास्तीत जास्त इंग्रजी भाषेतील नियतकालिके समाविष्ट केलेली आहेत.

## भाषावैविध्यामुळे मर्यादा

भारत संशोधनात संख्यात्मकदृष्ट्या अग्रेसर असला तरी सायटेशनमध्ये मागे आहे, याची बरीच कारणे आहेत. नावीन्यपूर्ण संशोधन करण्यात भारतीय संशोधक कमी



पडतात. अनेक संशोधन प्रकल्प राबवले जातात. बहुतेक वेळा ते कमी कालावधीचे असतात. त्यावर एक किंवा दोन निबंध प्रसिद्ध केले जातात. त्या प्रकल्पाचा पाठपुरावा केला जात नाही. त्यानंतर नवीन प्रकल्प हाती घेतले जातात. त्यामुळे संशोधक अनेक विषयांत निबंध लिहितात. एकाच विषयात संशोधनासाठी दीर्घ काळ व्यतीत केला जात नाही. बऱ्याचवेळा निधीचा अभाव असणे, ग्रंथालयामध्ये पुरेसे संदर्भग्रंथ आणि नियतकालिके उपलब्ध नसणे, इंटरनेटवरून माहिती शोधण्याचे तंत्र माहीत नसणे इत्यादी. या सर्वांमुळे उत्तम कल्पना असूनही त्या प्रत्यक्षात येत नाहीत, असेही घडते.

भारतातील ज्या संशोधनाचे संदर्भ उद्‌धृत केले जातात, ते प्रामुख्याने इंग्रजी भाषेत लिहिलेले असतात. त्यामुळे आपोआपच त्या संख्येला एक मर्यादा येते. शिवाय जे संशोधन होते, त्यातदेखील नावीन्यपूर्णतेचे प्रमाण कमी आहे. आधी प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधांचा आधार घेऊन नवे लिहिले जातात. यावर अनेक जणांनी भाष्य केले आहे. त्यामुळे निबंधांची संख्या वाढवण्यासाठी आधी प्रसिद्ध झालेल्या संशोधन पद्धतीचा नवीन डेटा वापरून संशोधन केले जाते. त्यात नावीन्यपूर्ण काहीच नसते.

ज्याची नोंद घेतली पाहिजे, असा मुद्दा म्हणजे भारतातील भाषांमधील विविधता. भारतातून इंग्रजीपेक्षा भारतीय भाषांमधून नियतकालिके प्रसिद्ध होतात. विशेषतः कला, भाषा आणि सामाजिक शास्त्र या विषयातील संशोधन स्थानिक भाषांमधून प्रसिद्ध होते. जगभरातूनदेखील भारतीय भाषांवर संशोधन चालते. अशी नियतकालिके 'आंतरराष्ट्रीय डेटाबेसेस'मध्ये समाविष्ट नसतात, याचे कारण इंग्रजीमध्ये त्यातील लेखांचे भाषांतर केले जात नाही. इतर भाषांमधील नियतकालिके या डेटाबेसेसमध्ये समाविष्ट करण्यासाठी निबंधांचा गोषवारा इंग्रजीत देतात. तशी सोय आपल्याकडे नाही किंवा तसे करणे खूप कष्टाचे आहे. याचे कारण स्थानिक प्रकाशकांकडे तसा निधी नसतो आणि तसे भाषांतरकारही नसतात. विद्यापीठ अनुदान आयोगाने विविध भाषेतील उत्तम नियतकालिकांची संदर्भयादी बनवण्याचे काम आता हाती घेतले आहे.

## अनैतिक प्रकार वाढले

अलीकडील काळात संशोधनाचा संबंध पदोन्नतीसाठी लावला गेल्यामुळे संशोधन आणि प्रकाशने यामध्ये अनेक अनैतिक प्रकार वाढले. निबंध फक्त त्यासाठीच 'लिहिले' जाऊ लागले. याचे कारण उत्तम प्रतीच्या नियतकालिकात निबंध प्रसिद्ध करण्यासाठी संशोधन उत्तम, नावीन्यपूर्ण असावे लागतेच. ते प्रकाशित करण्यासाठी बराच काळ लागतो. यासाठी जिद्द, चिकाटी, सचोटी असावी लागते. संदर्भसंपन्नतेला अनन्यसाधारण महत्त्व देऊन प्रथितयश प्रकाशकांनी त्याचे व्यापारीकरण केलेले आहे. 'संदर्भ' मिळवण्यासाठी अनैतिक प्रकारही घडताना दिसतात. जसे गारफिल्ड यांच्या मते 'सायटेशन्स सर्कल/रिंग' तयार होतात. यामध्ये एका संशोधकांचा गट दुसऱ्या गटाच्या निबंधांचे सतत संदर्भ देतात. त्यामुळे त्याची संदर्भसंख्या मुद्दाम फुगवलेली असते. संशोधकांनी एकमेकांचे शोधनिबंध बादरायण संबंध लावून संदर्भ यादीत द्यायला सुरुवात केली. काही संपादकीय मंडळे त्यांच्या निबंधांचे संदर्भ उद्धृत करावेत, त्यांना सायटेशन द्यावे, असा आग्रह धरतात. त्याशिवाय ते निबंध स्वीकारत नाहीत. काही प्रकाशक विद्यार्थ्यांना पैसे देऊन 'संदर्भ' वाढवण्याचा प्रयत्न करतात.

शोधनिबंध लिहिताना संदर्भ कोणता कधी वापरायचा हे पूर्णतः मानवी वर्तणुकीवर अवलंबून असते. त्यामुळे फक्त संदर्भांच्या संख्येवरून संशोधनाची गुणवत्ता ठरवली जाऊ नये. पण हे जरी खरे असले तरीही सद्यःस्थितीत जगभरात उच्च शिक्षणाच्या नियामक संस्था संशोधनाची गुणवत्ता संदर्भांवर ठरवत आहेत. त्याकरता मात्र भारतात याबाबत जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. विद्यापीठे, संशोधनसंस्था, तसेच महाविद्यालयांमध्ये नवीन दीर्घ कालावधीचे संशोधन प्रकल्प राबवले गेले पाहिजेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने 'संशोधन आणि प्रकाशन नीतिसंहिता' (रिसर्च आणि पब्लिकेशन एथिक्स) हा दोन क्रेडिट कोर्स डॉक्टरेट करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य केला आहे. या अभ्यासक्रमात संशोधनाची गुणवत्ता तसेच शोधनिबंध लिहिण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. आगामी काळात याचे उत्तम परिणाम दिसतीलच.

भारतात पारंपरिक ज्ञानाला खूप महत्त्व आहे. ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. परंतु असे ज्ञा प्रकाशित होत नाही. भारतीय भाषांना नवीन शैक्षणिव धोरणात खूप महत्त्व दिले आहे. त्यामुळे या बाबतीतह विशेष लक्ष देऊन त्याला प्रोत्साहन देण्याची गरज आहे भारतातील संशोधनासाठी निधी देणाऱ्या संस्थांनी उत्तम, दर्जेदार संशोधन नियतकालिके प्रकाशित करण्यासाठी विद्यापीठांना निधी पुरवला आणि प्रशिक्षणही दिले पाहिजे. बनावट नियतकालिकांचे उच्चाटन झाले पाहिजे. तरच भारत जगातील संशोधनाचे उत्तम केंद्र बनेल, यात शंका नाही.

**(लेखिका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ग्रंथालयशास्त्र विभाग आणि 'सेंटर फॉर पब्लिकेशन एथिक्स' येथे कार्यरत आहेत.)**

Sakaal 4.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# विद्यापीठाला अखेर जाग

## शैक्षणिक वर्ष सुरळीत करण्यासाठी उत्तरपत्रिकांचे ई-मूल्यांकन



म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सत्र परीक्षांचा निकाल वेगवान पद्धतीने जाहीर होण्यासाठी, आगामी परीक्षांतील उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन प्रथमच ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यांत विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलातील आणि संलग्न महाविद्यालयांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या (पीजी) परीक्षेच्या उत्तरपत्रिका स्कॅन करून, त्या प्राध्यापकांना कम्प्युटर किंवा लॅपटॉपच्या स्क्रीनवर ऑनलाइन पद्धतीने तपासण्यासाठी देण्यात येतील. आगामी (२०२३-२४) शैक्षणिक वर्ष एक ऑगस्टपासून सुरू करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे आणि प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी सोमवारी याबाबत माहिती दिली.

राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन ऑनलाइन पद्धतीने करण्यात येते. त्यामुळे विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेचा निकाल महिन्यात जाहीर होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे प्रादेशिक केंद्र पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलात असून, तेथे ऑनलाइन मूल्यांकन पद्धतीने निकाल तयार करण्याचे काम करण्यात येत आहे, असेही डॉ. काळे यांनी स्पष्ट केले.

### निविदा प्रक्रिया राबवणार

करोनाच्या प्रादुर्भावामुळे विस्कळित झालेले शैक्षणिक वर्ष अजूनही सुरळीत झालेले नाही. ही परिस्थिती असतानाच, जूनपासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे नियोजन उच्च व तंत्रशिक्षण विभागाने केले आहे. त्यामुळे धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, शैक्षणिक वर्ष सुरळीत होणे गरजेचे आहे. त्यासाठी परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन ऑनस्क्रीन करून निकाल जलदगतीने जाहीर करण्यासाठी पावले उचलली आहेत. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून, तांत्रिक मदत करणाऱ्या खासगी कंपन्यांची निवड करण्यात येईल. विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांना सहा जूनपासून सुरुवात होणार आहे.



### मूल्यांकनाची प्रक्रिया काय?

- अभ्यासक्रमाचा पेपर झाल्यानंतर, संबंधित विषयाच्या उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करण्यात येईल.
- स्कॅनिंग पूर्ण झाल्यावर, संबंधित उत्तरपत्रिका प्राध्यापकाच्या लॉग इनवर पाठविण्यात येईल.
- प्राध्यापकाने लॉग इन आयडीचा वापर करून पेपर ऑनस्क्रीन तपासायचा आहे.
- तपासून झाल्यानंतर, ऑनलाइन पद्धतीने एकूण गुणांची माहिती उपलब्ध होईल. ही माहिती पुन्हा विद्यापीठाकडे परत येईल.
- अशा पद्धतीने इतर विषयांचे गुण आल्यानंतर, ऑनलाइन गुणपत्रिका प्रसिद्ध करण्यात येईल.
- त्यानंतर गुणपत्रिकांची छपाई करून विद्यार्थ्यांना सोपवली जाईल.
- त्यामुळे विद्यार्थ्यांचा शेवटच्या विषयाची परीक्षा झाल्यानंतर, काही दिवसांतच निकाल प्राप्त होईल.



### पहिला टप्पा ६४ हजारांचा

विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाने ऑनलाइन पद्धतीने यशस्वी मूल्यमापन केले आहे. त्यानुसार हा पुढचा टप्पा हाती घेण्यात आला आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलात साधारण चार हजार आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये ६० हजार विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेतात. पहिल्या टप्प्यात या सर्व विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे ऑनलाइन पद्धतीने मूल्यांकन करण्यात येईल. त्यानंतरच्या टप्प्यात इतर अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे ऑनलाइन पद्धतीने मूल्यांकन करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे डॉ. सोनवणे यांनी सांगितले.

### ऑनलाइन मूल्यांकन कसे करणार?

- ऑनलाइन मूल्यांकनासाठी निविदा प्रक्रिया राबवून, कंपनीची निवड करण्यात येईल.
- कंपनीद्वारे सर्व उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग होईल. सुरक्षेच्या दृष्टीने ही प्रक्रिया प्रामुख्याने विद्यापीठे आणि केंद्रात अधिकाऱ्यांच्या देखरेखीत होईल. उत्तरपत्रिका प्राध्यापकांच्या लॉग इनला पाठविण्यात येतील.
- प्रणालीत प्रश्न, गुण, चूक, बरोबर आदींची माहिती असेल. उत्तरपत्रिका तपासतांना, गुणांवर क्लिक करावे लागेल.
- तपासणीनंतर, आपोआप एकूण गुण दर्शविण्यात येईल. हे गुण पुन्हा विद्यापीठाच्या प्रणालीत जमा होऊन, निकाल जाहीर होईल.

**“ विद्यापीठाच्या परीक्षांचा निकाल वेळेत जाहीर करण्यासाठी प्राध्यापक, कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी एकत्रित काम करायला हवे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ऑनलाइन मूल्यांकन पद्धतीची सुरुवात करण्यात येत आहे.**

- डॉ. महेश काकडे,
संचालक, परीक्षा व
मूल्यामापन मंडळ

### फडणवीसांच्या इशाऱ्यामुळे हालचाल

सत्र परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर होऊन, आगामी शैक्षणिक वर्ष निर्धारित तारखेला सुरू करण्यासाठी तातडीने उपाययोजना आखाव्यात, याबाबत विद्यापीठाने कोणतीही कार्यवाही न केल्यास सिनेट सदस्यांसह उपोषणाला बसू, असा धमकीवजा इशारा सिनेट सदस्य आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे चुलतबंधू प्रसेनजित फडणवीस यांनी सोमवारी दिला. त्यानंतर विद्यापीठ प्रशासन खडबडून जागे झाले आणि परीक्षेच्या नियोजनाला सुरुवात केली, अशी माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली.

Maharashtra Times 4.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

### विद्यार्थी, पालकांसाठी विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा वर्ग

**पुणे, ता. ३** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात पालक आणि विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांसोबत पालक आणि विद्यार्थी देखील महत्त्वाचा घटक आहेत. त्यांच्यापर्यंत या बदलांची माहिती प्रभावीपणे पोहोचावी यासाठी गुरूवारी (ता. ६) हा वर्ग आयोजित केल्याचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.कारभारी काळे यांनी सांगितले.

विद्यापीठात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी प्र- कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, व्यवस्थापन परिषद सदस्य व कार्यक्रमाचे संयोजक रविंद्र शिंगणापूरकर, अंतर्गत गुणवत्ता आणि सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले आदी उपस्थित होते. शिंगणापूरकर म्हणाले, "दुपारी ३ ते ५ या वेळेत विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील संत ज्ञानेश्वर सभागृहात हा कार्यक्रम होईल. विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर, मुंबई विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. डॉ.आर. डी. कुलकर्णी तसेच जळगावच्या एम. जे. महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. अनिल राव आदी उपस्थित असतील. गुगल लिंकवर अर्ज करत पालक व विद्यार्थी यात सहभागी होऊ शकता." ऑनलाइन पद्धतीनेही यात सहभाग नोंदविता येणार आहे.

सहभागासाठी सोबतचा क्युआर कोड स्कॅन करा

Sakaal 4.4.2023

पुढारी
www.pudhari.com

### डी. एड., बी.एड.च्या उमेदवारांचे भवितव्य धोक्यात

**पुढारी विशेष**

गणेश खळदकर
पुढारी प्रतिनिधी

- एमबीए, एमसीए, फार्मसीच्या उमेदवारांना प्राथमिक शिक्षक होण्याची संधी
- गुजरातमध्ये शिक्षक पात्रतेत झाला बदल

**पुणे** : गुजरात राज्यात एमबीए, एमसीए, फार्मसीच्या उमेदवारांना प्राथमिक शिक्षक होण्याची संधी देण्यात आली आहे. त्यासाठी शिक्षक पात्रतेत बदल करण्यात आला आहे. तसाच बदल महाराष्ट्रात झाल्यास शिक्षक होण्यासाठीची स्पर्धा तीव्र होणार असून पारंपरिक पदवी घेऊन डी. एड., बी.एड. केलेल्या उमेदवारांचे भवितव्य धोक्यात येणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

गुजरात राज्यसरकारने केलेल्या बदलांनुसार प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी तंत्रशिक्षण आणि व्यवस्थापन विषयात पदवी घेतलेल्या उमेदवारांना प्राथमिक शिक्षक म्हणून सामावून घेण्यात येणार आहे. यामध्ये बी.ई. आणि बी.टेक. पदवी घेतलेले उमेदवार सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गणित विषय शिकवतील. तर बीबीए, बीसीए तसेच बीए समाजशास्त्र पदवी घेतलेले उमेदवार समाजशास्त्र विषय शिकवण्यास पात्र असतील असा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रात बारावीनंतर डी.एड. आणि पारंपरिक कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे पदवी शिक्षण घेऊन त्यानंतर बी.एड. झालेले उमेदवार शिक्षक होण्यास पात्र होतात. परंतु शिक्षक म्हणून कामाला लागण्यासाठी त्यांना शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी आणि अभियोग्यता व बुद्धिमापन चाचणी उत्तीर्ण व्हावे लागते. सध्या राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. जवळपास ६ लाखांच्या आसपास उमेदवार शिक्षक भरतीसाठी इच्छुक आहेत. परंतु शिक्षक होण्यासाठीची पात्रता बदलण्यात आली तर मात्र संबंधित उमेदवारांना अन्य उमेदवारांबरोबर स्पर्धा करावी लागणार आहे. त्यातून शिक्षक होण्यासाठी जीवघेणी स्पर्धा निर्माण होण्याची शक्यता आहे.

> "गुजरात राज्यात १७ मार्च रोजी प्रसिद्ध केलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये बदल करण्यात आला आहे. तसा बदल आपल्या राज्यातही झाल्यास अशी शैक्षणिक पात्रता ज्या नोकरी अथवा व्यवसायासाठी घेतली त्याऐवजी शिक्षक म्हणून किती जण तयार होतील हा प्रश्न आहे . शिवाय महाराष्ट्रात अनेक वर्षे भरती प्रक्रिया नाही. त्यामुळे अगोदरच आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि टीईटी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन अनेक जण भरती प्रक्रियेची वाट पाहात आहेत. त्यात स्पर्धा वाढण्याची शक्यता आहे. मुख्य म्हणजे शालेय शिक्षणामध्ये जे नियमित विषय शिकवले जातात, त्यामध्ये या अन्य उच्च शैक्षणिक पात्रतेचा कितपत वापर होईल हा मूळ प्रश्न आहे.
>
> **- महेंद्र गणपुले**, राज्य प्रवक्ता, मुख्याध्यापक महामंडळ.

Pune Edition
Apr 4, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2023

## Section: Education

पुढारी

# विद्यापीठाच्या प्रश्नपत्रिकांचे ऑनलाइन मूल्यांकन

## निकाल लवकर जाहीर होण्यास मदत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या येत्या सत्र परीक्षेचा निकाल लवकर जाहीर व्हावा, यासाठी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलातील आणि संलग्न महाविद्यालयांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका स्कॅन करून त्या प्राध्यापकांना संगणक किंवा लॅपटॉपच्या स्क्रीनवर ऑनलाइन पद्धतीने तपासता येणार आहेत.

पुणे विद्यापीठाने आयोजित पत्रकार परिषदेत कुलगुरू डॉ. कारभारी काळे आणि प्र-कुलगुरू



डॉ. संजीव सोनवणे यांनी ही माहिती दिली. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विस्कळीत झालेले शैक्षणिक वर्ष अजूनही सुरळीत झालेले नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जून महिन्यापासून करण्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नियोजन केले आहे. त्यामुळे धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष सुरळीत होणे गरजेचे असून, त्यासाठी परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाने उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन ऑनस्क्रीन करून निकाल जलदगतीने जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यापीठाचे विस्कळीत झालेले शैक्षणिक वर्ष सुरळीत करून आगामी २०२३-२४ शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

### ऑनस्क्रीन मूल्यमापनामुळे लवकर निकाल

विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा ६ जूनपासून सुरू होणार आहेत. अभ्यासक्रमाच्या विषयाचा पेपर झाल्यानंतर संबंधित विषयाच्या उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करण्यात येणार आहे. हे स्कॅनिंग पूर्ण झाल्यावर संबंधित उत्तरपत्रिका प्राध्यापकाच्या लॉगिनवर पाठविण्यात येईल. प्राध्यापकाने त्याला दिलेल्या लॉगिन आयडीचा वापर करून तो ऑनस्क्रीन तपासायचा आहे. पेपर तपासून झाल्यानंतर ऑनलाइन पद्धतीने त्याच्या एकूण गुणांची माहिती उपलब्ध होईल. ही माहिती त्याचवेळी पुन्हा विद्यापीठाकडे परत येईल. त्यानंतर विद्यापीठाकडून गुणपत्रिकांची छपाई करून विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची शेवटच्या विषयाची परीक्षा झाल्यानंतर काही दिवसांत निकाल प्रसिद्ध होईल, असे डॉ. काळे यांनी सांगितले.

Pune Edition
Apr 4, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : अंमलबजावणीचे मोठे आव्हान

# जलद निकालासाठी 'ऑनस्क्रीन इव्हॅल्युएशन'

**पुणे, ता. ३ :** नवे शैक्षणिक वर्ष तरी नियोजित वेळेत सुरू व्हावे, म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कंबर कसली आहे. परीक्षांच्या जलद निकालासाठी 'ऑनस्क्रीन इव्हॅल्युएशन करण्यात येणार आहे. मात्र, यासंबंधीची यंत्रणा निकोप पद्धतीने राबविण्याचे मोठे आव्हान विद्यापीठासमोर आहे.

सोमवारी आयोजित एका पत्रकार परिषदेमध्ये कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी यासंबंधीची माहिती दिली. विद्यापीठाचे शैक्षणिक वेळापत्रक पूर्णतः कोलमडले असून, संलग्न महाविद्यालयांतील उन्हाळी सत्र तब्बल अडीच ते तीन महिने उशिराने सुरू झाले आहे. यावर उपाय म्हणून यंदाच्या उन्हाळी सत्राच्या परीक्षांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी 'ऑनस्क्रीन इव्हॅल्युएशन पद्धतीने उत्तरपत्रिका तपासण्यात येतील. तसेच ही पद्धत यशस्वी ठरल्यास पुढील सत्रापासून सर्व अभ्यासक्रमांबरोबरच अधिक अद्ययावत प्रणाली राबविण्यात येईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी या वेळी दिली.

### काय आहे 'ऑनस्क्रीन इव्हॅल्युएशन?

तपासणीसाला थेट संगणकाच्या स्क्रीनवर उत्तरपत्रिका उपलब्ध होणार आहे. परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिका स्कॅनिंग करून एका सॉफ्टवेअरवर अपलोड करण्यात येतील. त्या तपासणी करणाऱ्या शिक्षकाबरोबरच पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्यालाही प्राप्त होतील. ही प्रक्रिया अतिशय जलद गतीने होऊन, गुणदान आणि गुणपत्रिका एका क्लिकवर उपलब्ध होईल. यासाठी लवकरच एका कंपनीची नेमणूक करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

### ऑनस्क्रीनची आव्हाने...

- उत्तरपत्रिका अपलोड करण्यापासून ते तपासण्यापर्यंत संबंधितांना प्रशिक्षणाची गरज
- उत्तरपत्रिकांची गोपनीयता आणि निकोप तपासणीसाठी सुसज्ज यंत्रणा हवी
- अंमलबजावणीतील चुका दुरुस्त करण्यासाठी विद्यापीठाकडे पुरेसा वेळ नाही

### शैक्षणिक वेळापत्रक पूर्ववत होईल?

दोन वर्षांच्या प्रयत्नानंतरही शैक्षणिक वेळापत्रक तीन महिने उशिराने चालू आहे. ऐनवेळी येणारे कार्यक्रम, विद्यार्थी संघटनांच्या मागण्या, प्राध्यापकांची आंदोलने आदींमुळे परीक्षांचे वेळापत्रक वेळोवेळी बदलावे लागते. महाविद्यालये आणि विद्यापीठ प्रशासनातील समन्वय, तसेच धोरणात्मक निर्णयाच्या अभावामुळे लांबत चाललेले सत्र केवळ ऑनस्क्रीन इव्हॅल्युशनमुळे पूर्ववत होईल का? हा मोठा प्रश्न आहे.

"विद्यापीठाचे शैक्षणिक वेळापत्रक पूर्ववत करण्यासाठी आम्ही सुक्ष्म नियोजन केले आहे. पुढील शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून सुरू होईल, असा आमचा विश्वास आहे.

**— डॉ. कारभारी काळे,**
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

"शैक्षणिक सत्र पूर्ततेनंतरच उन्हाळी सत्राच्या परीक्षा घेण्यात येतील. परीक्षेनंतर सहा दिवसांच्या आतच उत्तरपत्रिका तपासल्या जाव्यात. आणि जलद निकाल लागावा म्हणून, पहिल्या टप्प्यात आम्ही पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ऑनस्क्रीन इव्हॅल्युएशन करत आहोत. यामुळे परीक्षा विभागावरील अतिरिक्त ताण कमी होऊन, पदवीच्या निकाल प्रक्रियेला गती मिळेल.

**— डॉ. संजीव सोनवणे,**
प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
04/04/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

नवभारत

# शिक्षक बनने के लिए सिर्फ बीएड जरूरी

## नई राष्ट्रीय शिक्षा नीति के मुताबिक डीएड का महत्व खत्म

■ **सोलापुर** (सं). वर्तमान प्रचलित शिक्षा व्यवस्था में जिला परिषद स्कूलों (प्राथमिक) में शिक्षक बनने के लिए 12वीं के बाद दो वर्ष का डीएड करना होता है. जबकि माध्यमिक और उच्चतर माध्यमिक विद्यालयों में शिक्षकों के लिए 'बीएड' अनिवार्य है. लेकिन नई राष्ट्रीय शिक्षा नीति के मुताबिक छात्रों को 12वीं के बाद 4 वर्षीय डिग्री कोर्स के रूप में शिक्षा लेकर 'बीएड' करना होगा. इसमें स्पेशलाइजेशन होगा. राज्य सरकार ने केंद्र सरकार की नई राष्ट्रीय शिक्षा नीति को लागू करने की मंजूरी दे दी है. इसके अनुसार जून 2023-24 से राज्य के सभी गैर कृषि विश्वविद्यालयों में नई राष्ट्रीय शिक्षा नीति लागू की जाएगी. चार साल के डिग्री कोर्स को पूरा करते हुए अंतिम सेमेस्टर के दौरान छात्रों को अपनी रुचि के क्षेत्र में 6 महीनों की इंटर्नशिप करनी होगी. इसके बाद वह नौकरी या व्यवसाय कर सकता है.



वर्तमान में सभी गैर कृषि विश्वविद्यालयों ने पाठ्यक्रम का ढांचा तैयार कर लिया है. एकेडमिक काउंसिल ने भी इसे मंजूरी दे दी है और प्रोफेसरों का प्रशिक्षण भी पूरा हो चुका है. पुण्यश्लोक अहिल्या देवी होलकर सोलापुर विश्वविद्यालय की बैठक 5 अप्रैल को होगी. जिसमें नई शिक्षा नीति पर मुहर लगेगी. राष्ट्रीय शिक्षा नीति का पैटर्न 12वीं के बाद नई डिग्री में प्रवेश लेने वाले छात्रों पर ही लागू होगा.

### डिग्री के लिए 5 वर्ष

- वर्तमान शिक्षा नीति के अनुसार तीन वर्षीय डिग्री पूरी करने की समय सीमा पांच वर्ष है.
- लेकिन, नई राष्ट्रीय शिक्षा नीति के मुताबिक छात्रों को डिग्री कोर्स पूरा करने के लिए सात साल का समय दिया गया है.
- वहीं, 'पीजी' कर चुके छात्र एक साल में बीएड कर सकते हैं. जबकि डिग्री धारकों को 12वीं के बाद बीएड के लिए साल की शिक्षा लेने की जरूरत होगी. नई नीति में कोई 'डीएड' नहीं है. प्राथमिक और माध्यमिक शिक्षक बनने के लिए बीएड करना होगा.
- लेकिन, विषय का चुनाव करते समय जो शिक्षक बनना चाहता है, उससे विषय लिया जा सकता है.

Pune Edition
04-april-2023 Page No. 7
epaper.enavabharat.com

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# NEP panel looks at regular courses with credits in skills

## Talks On With Amazon, Universities For Blend

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The steering committee for the implementation of National Education Policy 2020 is in talks with regulatory bodies and professional universities to check if students in traditional courses can take up some programmes in professional colleges for credits.

The committee, set up by the state government, is also in talks with Amazon to check the feasibility of its online credit courses.

Approval from the respective regulatory bodies is needed for professional courses— for example, law courses have to be whetted by Bar Council of India.

The committee will speak to University Grants Commission and other regulatory bodies in the country to allow certain courses in their domain for students with a minimum set of required credits from conventional courses.

Nitin Karmalkar, chairman of the steering committee, said it will help students as it will increase their knowledge in the applied areas of the course.

"I have met vice-chancellor of Maharashtra University of Health Sciences along with officials from Sancheti Hospital. When I was in-charge of MUHS, I had thought of creating some general courses for students in traditional science programmes, like a course in the area of molecular diagnostics or in the area of biomedical instrumentation. These are all skill-based which can get the students more opportunities to get employed as a technician or some such job," he added.

Hospital representatives must also be involved in the process of making such courses because students need hands-on training or internships and colleges must have courses which will benefit hospitals, Karmalkar said.

Talks are on with Amazon for skill-based courses in cloud computing and automation, and with Gokhale Institute of Politics and Economics, Deccan College Post-Graduate and Research Institute, and Bhandarkar Oriental Research Institute to collaborate and offer Indian knowledge courses.

The committee is also looking at the idea to create something similar to MahaSwayam, a single window online platform that can display all the approved online courses offered by various universities, autonomous colleges and agencies for students to choose and help in easy credit transfer.

### RECOMMENDATIONS FOR IMPLEMENTATION OF POLICY

**In the first phase of implementation, AY 2023-24, all universities will offer only single major degree in the 4-year undergraduate programme**

- **4-year UG course** containing the research component Bachelor (Research) will be permitted only in affiliated colleges where a research centre already exists
- **4-year Bachelor (honours) course** will be permitted only in colleges already offering postgraduate courses
- The fourth year of the UG course will not be granted to any such college as **'natural growth'**. The affiliated colleges conducting a **3-year UG degree course** can seek permission to commence a **4th year PG programme** as extension
- Student can earn some credits from colleges other than the parent college, where she seeks admission
- Students enrolled in the four-year UG programme may avail other elective credits from two different colleges from within the same university and / or online courses available on other government portals









# Lecture to clear doubts on Thursday

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune**: Savitribai Phule Pune University will organize an awareness programme on National Education Policy 2020 so that parents and students know more about it and can clear doubts about its implementation.

The lecture will be held in a hybrid mode on April 6 between 3pm and 5pm. Nitin Karmalkar, chairman of the steering committee for implementation of NEP 2020, R D Kulkarni, pro-vice-chancellor, University of Mumbai, and Anil Rao, retired principal of MJ College Jalgaon will answer the people's queries.

Attendees must register on https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSeMs3hOn3KIOqt0Wb4OzETiew Kl8D6W6c9nt6SFWXmLtUO32w/viewform.

About 150 people can be accommodated on the campus for the offline session, officials said. Ravindra Shinganapurkar, member of the management committee of SPPU, said that the session will be help parents and students who have just appeared for Std XII examinations and will enter senior college from the academic year 2023-24. Detailed information about the lecture is available on SPPU's official website.

Times of India 4.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# Varsity to evaluate exam papers online



SPPU's decision will help getting results ahead of schedule. HT

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** Savitribai Phule Pune University (SPPU), for the first time, will carry out "onscreen evaluation" of answer sheets from the forthcoming examinations. The technology-based system will be used for post-graduate courses of affiliated colleges and departments within campus in first phase.

"The tender for the project will be floated in the coming week. Over 6,000 students on SPPU campus and 60,000 post-graduate students across the affiliated colleges will be covered by the new technology," said SPPU vice-chancellor Prof Karbhari Kale.

Over 0.7 million students study under SPPU and the technology-based checking of answer sheets in a step towards timely declaration of results.

**Need of the hour**

Kale said, "Onscreen evaluation has become the need of the hour. Some universities across Maharashtra like Babasaheb Ambedkar Technical University have already adapted the technology. Through the process, moderators and teachers get an online login ID. It provides answer sheets for onscreen evaluation and marks obtained by students are automatically generated and mark sheets prepared. That leaves only the task of printing the mark sheet."

Hindustan Times 4.4.2023

पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका ऑनलाइन तपासण्याचा पुणे विद्यापीठाचा निर्णय

# निकाल वेळेत; शैक्षणिक सत्र ऑगस्टपासून

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** करोनामुळे विस्कळीत झालेले शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू होण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यापीठ संकुलातील आणि संलग्न महाविद्यालयांतील फक्त पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेची उत्तरपत्रिका ऑनलाइन पद्धतीने तपासण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे निकाल वेळेत जाहीर होऊन दि. १ ऑगस्टपासून शैक्षणिक सत्र सुरू करणे शक्य होणार आहे.



विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे आणि प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी ही माहिती दिली. करोनाच्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक वर्ष अजूनही सुरळीत झालेले नाही. विद्यापीठ आणि महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक साधारण पाच ते सहा महिन्यांनी मागे पडले आहे. त्यातच नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू होणे आवश्यक आहे. त्यासाठी निकाल वेळेत जाहीर होणे महत्त्वाचे आहे. या सर्व विद्यापीठाने उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्व प्रक्रियेसाठी टेंडर प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. दरम्यान, विद्यापीठाच्या परीक्षा ६ जूनपासून सुरू होणार आहेत.

### अशी असेल निकालाची प्रक्रिया

- प्रत्येक पेपर झाल्यानंतर उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करून ते प्राध्यापकाच्या लॉग-इनवर पाठवणार
- प्राध्यापकाने उत्तरपत्रिका तपासणी ऑनस्क्रीन करायची.
- ऑनलाइन पद्धतीनेएकूण गुणांची माहिती अपलोड करणे
- इतर विषयांचे गुण विद्यापीठाकडे आल्यानंतर ऑनलाइन गुणपत्रिका प्रसिद्ध होईल.
- गुणपत्रिकांची छपाई करून विद्यार्थ्यांना मिळणार.

" विद्यापीठात शिक्षणशास्त्र विभागाने ऑनलाइन यशस्वी उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन केले आहे. त्याच पद्धतीने सर्व पदव्युत्तर विभागांतील सुमारे चार हजार, तर संलग्न महाविद्यालयांमध्ये ६० हजार विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका ऑनलाइन पद्धतीने मूल्यांकन होईल. त्यानंतरच्या पुढच्या टप्प्यात इतर परीक्षांचे असेच मूल्यांकन होईल.

**डॉ. संजीव सोनवणे**
प्र-कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रभात PuneCity, 04 Apr 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

### शैक्षणिक धोरणाच्या जागृतीसाठी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ४** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू आहे. मात्र या धोरणाबाबत विद्यार्थी, पालकच अनभिज्ञ आहेत. नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती प्रभावीपणे सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणजे विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी व पालकांसाठी मार्गदर्शनाचा पहिला कार्यक्रम ६ एप्रिल रोजी मुख्य इमारतीतील संत ज्ञानेश्वर सभागृहात दुपारी ३ ते ५ या वेळेत कार्यक्रम होणार आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे आणि व्यवस्थापन परिषद सदस्य रविंद्र शिंगणापूरकर, अंतर्गत गुणवत्ता आणि सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले आदी उपस्थित होते. डॉ. सोनवणे म्हणाले, शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी ही सर्वसमावेशक पद्धतीने प्रत्येक घटकाची बाजू, म्हणणे लक्षात घेऊन करण्यात यावी या उद्देशाने हा अभिनव प्रयोग विद्यापीठ करत आहे.

प्रभात PuneCity, 05 Apr 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

---

पुढारी

### पीएच.डी. शिष्यवृत्ती अधांतरी!

#### उपयोगितेवरच प्रश्नचिन्ह; समाजाला नेमका उपयोग किती?

पुढारी विशेष

**गणेश खळदकर**
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : उच्च शिक्षणातील संशोधनासाठी अनेक विद्यार्थी पीएच. डी. करतात. या विद्यार्थ्यांना विविध संस्थांमार्फत अधिछात्रवृत्ती देण्यात येते. परंतु, पीएचडीचा संबंधित विद्यार्थी किंवा समाजाला नेमका उपयोग होतो का? असा प्रश्न निर्माण करीत पीएचडी शिष्यवृत्तीच्या उपयोगितेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले आहेत. त्यामुळे येत्या काळात पीएचडी शिष्यवृत्तीवर टांगती तलवार राहणार आहे.**

महाज्योती संस्थेमार्फत पीएचडी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या निधीसंदर्भात इतर मागास बहुजन कल्याण विभागाला प्रस्ताव सादर केला होता. परंतु, संबंधित विभागाने हा प्रस्ताव फेटाळला असून, काही आक्षेप देखील नोंदविले आहेत. ज्यामुळे पीएचडीच्या शिष्यवृत्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



इतर मागास बहुजन कल्याण विभागाने नोंदविलेल्या आक्षेपांनुसार शासनाकडून आतापर्यंत पीएच. डी.च्या शिष्यवृत्तीसाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. या निधीतून करण्यात आलेल्या पीएच. डी.च्या उपयोगितेबाबत एक आढावा घेणे उचित राहील, असे त्यामध्ये म्हटले आहे.

शासनाकडून उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती घेऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम होणाऱ्या उमेदवारांकडून शासनाकडे शिष्यवृत्तीची रक्कम परत जमा करण्याबाबत काही तरतुदी करता येणे शक्य आहे का? याचा आढावा घेण्यात येत आहे. एका विद्यार्थ्यामागे शासनावर पीएच. डी.च्या ५ वर्षांसाठी रु. २५ रूपये इतका भार लाख ८७ हजार पडतो.

**आवश्यकतेविषयीचे आक्षेप**

- पीएच. डी.धारकांच्या आवश्यकतेबाबत वस्तु:स्थितीदर्शक माहिती उपलब्ध आहे का?
- उच्चविभूषित मनुष्यबळाचा उपयोग करण्यामागे काही नियोजन आहे का?
- पीएच. डी.धारकांची आवश्यकता असलेल्या रोजगारविषयक संधी किती उपलब्ध आहेत?
- उमेदवारांमध्ये कोणत्या प्रकारचे विशिष्ट क्षमता/कौशल्य आवश्यक आहे?
- त्यातून समाजाची, राष्ट्राची कोणती गरज पूर्ण होणार आहे?
- एक हजार उमेदवारांचे सर्वेक्षण करून उमेदवार सद्य:स्थितीत काय करीत आहेत?
- पीएच. डी. पदवीचा व्यक्तिगत, सामाजिक जीवनात काय उपयोग झाला?

My Pune Edition
Apr 5, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

सकाळ

# नवीन राष्ट्रीय धोरणातील निकष : कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ

# प्राध्यापकांची नियुक्ती पाच वर्षांसाठी!

▸सकाळ वृत्तसेवा

**सोलापूर, ता. ४ : सध्या एखादा उमेदवार नोकरीला लागला की सेवानिवृत्त (६० वर्षे) होईपर्यंत, त्याला कोणीच हटवू शकत नाही, अशी कार्यपद्धत आहे. पण, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च महाविद्यालयांसह विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांची नियुक्ती पहिल्यांदा पाच वर्षांसाठीच असणार आहे. त्यानंतर पाच वर्षांतील त्यांच्या कामाचा लेखाजोखा घेऊनच त्यांना पुढे प्रमोशन, ग्रेडेशन मिळणार आहे. सुमार कामगिरी असलेल्यांना पाच वर्षांनंतर बदलतादेखील येणार आहे.**

केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या वर्षीपासून महाराष्ट्रातील १३ अकृषिक विद्यापीठांसह संलग्नित तीन हजार ३४१ उच्च महाविद्यालयांमध्ये लागू केले जाणार आहे. त्यानुसार तीन वर्षांची पदवी आणि दोन वर्षांची पदव्युत्तर पदवीची प्रचलित पद्धत बंद करण्यात आली आहे. इयत्ता बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आता सुरवातीला चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. त्यानंतर एक वर्षाचा पदव्युत्तर पदवी



अभ्यासक्रम असेल. तत्पूर्वी, पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेताना कला, विज्ञान व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यास दुसऱ्या शाखेतील काही विषय देखील घेण्याची मुभा आहे. तसेच चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर थेट पीएच.डी करता येणार आहे. दरम्यान, आता प्राध्यापकाची भरती नेट-सेटवरून होणार आहे. यापुढील प्राध्यापक नियुक्ती सेवानिवृत्तीच्या ६० वर्षांपर्यंत नसणार आहे. प्रत्येक पाच-पाच वर्षांच्या टप्प्यावर त्यांचे मूल्यमापन होईल. त्यानुसार त्यांची नियुक्ती पुढील काळासाठी असणार की नाही, हे ठरणार आहे.

### नेट-सेट झालेल्यांनाही प्राध्यापकाची संधी

■ सध्याच्या प्रचलित निकषांनुसार महाविद्यालयांवर नियमित सहायक प्राध्यापक होण्यासाठी नेट, सेट होऊनही 'पीएच.डी' आवश्यकच आहे. पण, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च महाविद्यालय किंवा विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या अध्यापनासाठी नेट व सेट परीक्षा उत्तीर्ण केलेल्यांनाही प्राध्यापक होण्याची संधी मिळणार आहे. त्यानंतर पुढील पदोन्नतीसाठी तो उमेदवार पीएच.डी करू शकणार आहे.

“ नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आता प्राध्यापकांची नेमणूक पाच वर्षांसाठीच असेल. त्यानंतर उत्पादन आधारित (प्रॉडक्ट बेस्ड) पदोन्नती मिळेल. तत्पूर्वी, पाच वर्षांतील त्यांचे संशोधन, अध्यापन, वर्गाचा निकाल, नोकरी व व्यवसायातील मुलांचे यश, अशा बाबींचा विचार होईल. त्यावरून त्यांचे प्रमोशन की डिमोशन ठरणार आहे.

**- डॉ. शिवकुमार गणपूर,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

### अकृषिक विद्यापीठांची स्थिती

**१३** अकृषिक विद्यापीठे

**३,३४१** उच्च महाविद्यालये

**२५,६००** एकूण प्राध्यापक

**१५,५००** अंदाजे रिक्त पदे

Pune, Main
05/04/2023 Page No. 4

# पुण्यात वाचनालयांची कमतरता : वाचनसंस्कृतीपासून मुले होताहेत दूर

# वस्त्यांमध्ये वाढावी ग्रंथालयांची चळवळ

सकाळ EXCLUSIVE

▸**पांडुरंग सरोदे :** सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ४ :** श्रावणची (नाव बदललेले आहे) शाळा सुरू होती, तेव्हा त्याचा अर्धा दिवस शाळेत, त्यानंतर घरी अभ्यास व खेळण्यात निघून जात होता. आता त्याची दहावीची परीक्षा झाली असून तो काही टवाळखोर मुलांबरोबर फिरतोय. घरी तक्रारी येतात, किती समजावू त्याला. वस्तीत एखादे ग्रंथालय असते, तर तो तिथे चार पुस्तके वाचत बसला असता. पण आमच्याकडे असल्या चांगल्या सोई नाहीत....! अल्पशिक्षित व घरकाम करणारी शकुंतला तिच्या पोराच्या भविष्याची काळजी पोटतिडकीने मांडत होती.

शहरात वस्त्यांची संख्या वाढली, ठिकठिकाणी समाजमंदिरे, सार्वजनिक मंडळे उभी राहिली; पण आजही मुलांवर संस्कार करणारी, त्यांच्या ज्ञानात भर पाडणारी चांगली ग्रंथालये औषधालाही सापडत नसल्याचे वास्तव दिसत आहे. पुणे शहरातील जनता वसाहत, आंबेडकरनगर, मातोश्री रमाबाई आंबेडकर रस्ता वसाहत (ताडीवाला रस्ता), येरवडा, रामटेकडी, वारजे माळवाडी अशा वेगवेगळ्या भागात झोपडपट्ट्यांचे जाळे पसरलेले आहे. मात्र झोपडपट्ट्यांमध्ये ग्रंथालये, अभ्यासिका, वाचनालये या स्वरूपाचे पूरक वातावरण अद्यापही तयार झालेले नाही. वस्त्यांमध्ये ग्रंथालयांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असूनही ते उपलब्ध नसल्याची सद्यःस्थिती आहे.

### ग्रंथालयांमुळे होणारे बदल

- मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होऊन संस्कारक्षम होण्यास मदत
- ग्रंथालयांमुळे पुस्तके व शालेय अभ्यास करण्यासही संधी
- स्पर्धेच्या युगात सामान्यज्ञानात भर पडेल
- किशोरवयीन मुलांमधील भांडणांचे प्रमाण कमी होईल
- मोबाईल, व्यसने, गुन्हेगारीपासून परावृत्त होण्यास मदत होऊ शकते
- शाळांमधून गळती व नापास होणाऱ्यांचे प्रमाण घटेल
- पैशांची बचत, आई-वडिलांच्या कष्टाची किंमत कळू शकेल

“ महापालिका, राज्य सरकार वस्त्यांमध्ये ग्रंथालयांच्या सुविधा उभारू शकेल. मात्र ही ग्रंथालये टिकविणे गरजेचे आहे. तेथे पुस्तके हाताळण्यासाठी अभ्यासू व्यक्ती, पुस्तकांसंबंधी कार्यक्रम, कथा, कविता, नाटक, अभिनयासारखे वैविध्यपूर्ण उपक्रम राबवून सातत्य टिकविले तर ग्रंथालये खऱ्या अर्थाने सुरू झाले, असे म्हणता येईल.

**- डॉ. संजय दाभाडे,** सामाजिक कार्यकर्ते

“ वस्त्यांमध्ये ग्रंथालयांची खरीच गरज आहे. शाळेनंतर काय? या प्रश्नाचे उत्तर ग्रंथालये देऊ शकतील. महापालिकेने त्यासाठी पुढाकार घ्यावा. वस्त्यांमध्ये ग्रंथालये तयार करून तेथे वयोगटानुसार चांगली पुस्तके उपलब्ध करून दिल्यास मुलांना, तरुणांना त्याचा फायदा होईल. अशा ग्रंथालयांची जबाबदारी स्थानिक महिला बचत गटांवर दिल्यास आणखी उपयोग होईल.

**- संध्या बोमण्णा,** जनता वसाहत

**वस्त्यांमध्ये ग्रंथालये का हवीत?**

आई-वडील कामासाठी सकाळी घराबाहेर पडतात, रात्री उशिरा येतात. शाळेतून घरी आल्यानंतर, दहावी-बारावीच्या परीक्षा संपल्यानंतर मुले घराऐवजी बाहेरच जास्त वेळ फिरत असल्याचे चित्र दिसून येते. अशा मुलांना पुस्तके, वर्तमानपत्रे वाचण्यास उपलब्ध करून दिल्यास त्यांचा बराचसा वेळ वाचनात जाऊ शकतो. त्यामुळे मुलांच्या, तरुणांच्या ज्ञानामध्ये भर पडू शकते, मात्र अशा स्वरूपाची ग्रंथालये, वाचनालयांची वस्त्यांमध्ये अक्षरशः वानवा असल्याचे वास्तव आहे.



### खासगी ग्रंथालये न परवडणारी

■ शहरातील काही वस्त्यांमध्य खासगी संस्था किंवा राजकीय व्यक्तींकडून ग्रंथालये तयार करण्यात आली आहेत. मात्र तेथे मर्यादित पुस्तके, त्यातही दरमहा ३०० ते ५०० रुपये वर्गणी आकारली जाते. तेवढेही पैसे देणे मुलांना किंवा त्यांच्या कष्टकरी आई-वडिलांना शक्य होत नाही. त्यामुळे अशी ग्रंथालये असूनही त्यांचा उपयोग करून घेणे मुलांना परवडत नाही. परिणामी अशा ग्रंथालयांमधील पुस्तके सध्या धुळखात पडल्याची उदाहरणे दिसून येत आहेत.

Sakaal 5.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

### महाविद्यालयांच्या मूल्यांकनासाठी 'परीसस्पर्श' योजना

**१३ कोटी ५० लाख रुपयांच्या खर्चास मान्यता**

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी नॅक (नॅशनल असेसमेंट ॲण्ड ॲक्रिडिशन कौन्सिल) आणि एनबीए (नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिशन) या संस्थांमार्फत करण्यात येणाऱ्या महाविद्यालयांच्या मूल्यांकनाकरिता 'परीसस्पर्श' ही योजना सुरू केली आहे. राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी त्यास मान्यता दिली.

राज्यात सध्या ३ हजार ३४६ महाविद्यालयांपैकी १ हजार ३६८ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झाले आहे. सद्य:स्थितीत १ हजार ९७८ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झालेले नाही. तसेच ७०४ तंत्रशिक्षण महाविद्यालयांचे एनबीए मूल्यांकन झालेले नाही. या संदर्भात मुंबई विद्यापीठामध्ये आयोजित एका कार्यशाळेमध्ये महाविद्यालयांना मूल्यांकनासाठी मार्गदर्शनाची गरज असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. त्यानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परामर्ष ( PARAMARSH) योजनेच्या धर्तीवर राज्यात 'परीसस्पर्श' योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेसाठी १३ कोटी ५० लाख रुपये खर्चास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

लोकसत्ता Thu, 06 April 2023 https://epaper.loksatta.com/c/

---

पुढारी

### उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी 'परीसस्पर्श' योजना

**राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय**

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने नॅक, एनबीए मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मार्गदर्शन व्हावे याकरिता 'परीसस्पर्श' योजना सुरु करण्याचा निर्णय बुधवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

राज्यात सध्या ३ हजार ३४६ महाविद्यालयांपैकी १ हजार ३६८ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झाले आहे. सद्य:स्थितीत १ हजार ९७८ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झालेले नाही. तसेच ७०४ तंत्रशिक्षण महाविद्यालयांचे एनबीए मूल्यांकन झालेले नाही. या योजनेचा कालावधी तीन वर्षांचा राहील. या योजनेसाठी येणाऱ्या १३ कोटी ५० लाख रुपये खर्चासही मान्यता देण्यात आली.

**अकृषी विद्यापीठातील शिक्षक समकक्ष पदांना सहावा, सातवा वेतन आयोग**

अकृषी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील संचालक, सहायक संचालक व प्रकल्प अधिकारी या शिक्षक समकक्ष पदांना सहावा व सातव्या वेतन आयोगाची वेतन संरचना लागू करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

**अतिविशेषोपचार विषयातील विद्यार्थी संख्येत वाढ करणार**

अतिविशेषोपचार विषयातील पदव्युत्तर पदवी विद्यार्थी संख्येत वाढ करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. या करिता अध्यापकीय पदांची युनिटनिहाय पुनर्रचना करुन सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक संवर्गातील १४ पदे नव्याने निर्माण करण्यात येतील. सध्या या संवर्गात १३८ पदे मंजूर आहेत आणि संस्थानिहाय कमाल विद्यार्थी संख्या १३७ आहे.

या निर्णयामुळे मंजूर विद्यार्थी पद संख्या १३७ वरून २०९ इतकी होणार आहे. ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सर जे. जे. समूह रुग्णालय, बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर या संस्थांमध्ये ही पदे निर्माण करण्यात येतील.

**मंत्रिमंडळाचे अन्य निर्णय**

- नागपूर मेट्रो रेल टप्पा-२ प्रकल्पास सुधारित मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत ४३.८० किलोमीटरचा मेट्रो मार्ग उभारण्यात येणार आहे.
- मुंबईतील देवनार डम्पिंग मैदानावर कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती प्रकल्पाच्या आरक्षणात फेरबदल.
- सेलर इन्स्टिट्यूट सागर भारतीय नौदल, मुंबई या संस्थेस नाममात्र दराने भाडेपट्टा नूतनीकरण.

**महावितरण घेणार २९ हजार कोटींचे कर्ज**

मुंबई : वीज बिलांची वसुली होत नसल्याने सध्या आर्थिक अडचणीत सापडलेली महावितरण कंपनी आता थकीत देणी देण्यासाठी २९ हजार २३० कोटी रुपयांचे कर्ज काढणार आहे. या कर्जाला शासन हमी देण्यास बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महावितरण कंपनीकडे महानिर्मिती व महापारेषण कंपन्यांची २९ हजार २३० कोटी इतकी थकीत देणी आहेत. यामध्ये मुद्दल १७ हजार २५२ कोटी आणि व्याज ११ हजार ९७८ कोटी इतके आहे. महावितरण कंपनीने विविध वित्तीय संस्थांकडून स्पर्धात्मक व्याज दर मागवून कमीत कमी व्याज दर असलेला प्रस्ताव स्वीकारावा या अटीवर ही शासन हमी देण्यात आली आहे.

Pune Edition
Apr 6, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

लोकमत

# साडेसात हजार विद्यार्थ्यांना विद्यापीठ देणार शिष्यवृत्ती

## पाच प्रकारच्या शिष्यवृत्त्यांसाठी ४ कोटी ९५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थ्यांना पाच प्रकारच्या शिष्यवृत्ती देण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी ७ हजार ४०२ विद्यार्थ्यांना एकूण ४ कोटी ९५ लाख ६२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीची रक्कम बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना, महात्मा जोतिराव फुले गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना आणि स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना या पाच शिष्यवृत्तींसाठी गतवर्षी विद्यापीठातील विभाग आणि संलग्न महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एकूण १४ हजार ८४७ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. छाननीअंती पदवी अभ्यासक्रमासाठी ४ हजार ७११ व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी २ हजार ६९१ असे एकूण ७ हजार ४०२ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. विद्यापीठाच्या वतीने या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. शिष्यवृत्तींबाबत नियम, अटीची माहिती विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावरील 'विद्यापीठ विविध शिष्यवृत्ती २०२२-२३' या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.



### शिष्यवृत्तींची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार

विद्यापीठाची सामाजिक जबाबदारी म्हणून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांस विद्यापीठाच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात येतात. दरवर्षी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवून घेतले जातात आणि त्यातून पात्र विद्यार्थ्यांची निवड केली जाते. शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होते, अशी माहिती प्र-कुलगुरु डॉ. संजीव सोनवणे यांनी दिली.

### इतक्या विद्यार्थ्यांना मिळणार शिष्यवृत्ती

| | शिष्यवृत्तीचा प्रकार | विद्यार्थी | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना | १४९५ | ७४ लाख ७५ हजार |
| २. | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य | १४९२ | ४४ लाख ७६ हजार |
| ३. | राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना | २१७६ | १ कोटी ८९ लाख ८६ हजार |
| ४. | महात्मा जोतिराव फुले गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना | २०९० | १ कोटी ८४ लाख ७६ हजार |
| ५. | स्वामी विवेकानंद विद्यार्थी सहाय्य योजना | १४९ | १ लाख ४९ हजार |

Pune Main
Page No. 2 Apr 06, 2023
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# Graded colleges to help five others with accreditation

**Yogita Rao & Vaibhav Ganjapure | TNN**

**Mumbai:** Colleges with good grades from the National Assessment and Accreditation Council (NAAC) and the National Board of Accreditation (NBA) will each mentor five non-accredited colleges in their vicinity and hand-hold them through the accreditation process.




TOI

**MENTORING EXERCISE**

This will be under the Paras Sparsh scheme, launched by the state higher and technical education department on the lines of the Centre's Paramarsh, a mentorship programme to improve the quality of education in NAAC-aspirant institutions. The department's proposal was passed on Wednesday in the state's cabinet, which also approved a budget of Rs 13.5 crore for the scheme.

Close to 60% colleges in the state have never been accredited.

Under the three-year project, the top accredited colleges will get funding from the government for training, workshops, hand-holding and offering support to mentee colleges to go for accreditation, said a government official. A total of 225 colleges, including those offering traditional and technical courses, are likely to be selected for the funding.

Higher and technical education minister Chandrakant Patil mentioned the scheme would help with both NAAC and NBA accreditation. While NAAC accredits the institution, NBA accredits technical courses.

Dinesh Punjwani, secretary, HSNC University, said it is a good scheme and needs proper implementation with the guiding institutions made accountable. More emphasis should be on appropriate understanding of the quantitative matrices in the benchmarking document, he said.

Of the 3,346 colleges in the state, only 1,368 have been assessed by NAAC and 1,978 have never gone for accreditation. Among technical colleges, 704 have never been assessed.

The Time of India 6.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

[ 10 SR PROFESSORS IN RACE ]

# SPPU may get new V-C by April-end

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** After almost a year of the post of vice-chancellor (VC) of the Savitribai Phule Pune University (SPPU) lying vacant, the process of selection of the new V-C has finally speeded-up with over 100 professors (the highest number) from across the country sending their applications to the 'selection committee' constituted for the purpose by the state government.

*The applications of senior professors of the SPPU, too, are among these applications for the coveted post.*

The former V-C of the SPPU – which ranks first in the state of Maharashtra in terms of academic quality – professor Nitin Karmalkar, retired on May 18, 2022 after which temporary charge of the post was given to professor Karbhari Kale, VC, Dr Babasaheb Ambedkar University of Technology while temporary charge of the post of pro-VC was given to professor Sanjeev Sonawane.

The committee formed earlier for the selection of VC of the SPPU was dissolved as it did not have a representative of the University Grants Commission (UGC) which is mandatory.

Finally, the present selection committee was constituted under the chairmanship of Anil Sahastrabuddhe; comprising IIT Kanpur director Dr Abhay Karandikar; additional chief secretary, water resources department, Deepak Kapoor; and former chancellor, Karnataka State Women's University and UGC representative, Dr Meena Chandavarkar.

The committee invited applications from interested persons till March 30 and more than 100 professors from all over the country applied for the post of VC of the SPPU.

Of the over 100 applications, 10 are from senior professors of the SPPU including professor Sanjeev Sonawane; registrar Prafull Pawar; dean Vijay Khare; Dr Anjali Kurane; professor Sanjay Dole; professor Vilas Kharat; professor Suresh Gosavi; and professor Avinas Kumhar. Professors from the Jawaharlal Nehru University and others, too, are among those who have applied.

The applications will be verified over the next 15 days after which, a list of eligible candidates will be announced.

These eligible candidates will be called for an interview and five out of them will be selected. Of the five names, the governor's office will announce the selection of one name as VC of SPPU.

The entire process will take at least one month and most probably by the end of this month, the SPPU will get its new VC.

A senior professor of the SPPU who has applied said on condition of anonymity, "I have applied for the post of VC and am preparing for the interview if my application is shortlisted. The VC should be appointed from the university campus itself as he/she knows the university issues and concerns well and can work effectively once selected."



**Former SPPU V-C prof Nitin Karmalkar, retired in May 2022 and temporary charge was given to prof Karbhari Kale.** HT

**LENGTHY PROCESS**

The process will take at least one month and most probably by the end of this month, the SPPU will get its new V-C.

The committee formed for selection of V-C of the SPPU was dissolved as it did lacked representative of the University Grants Commission (UGC).As there was no selection committee for a while, the selection process was delayed.

# 7.4k students receive SPPU scholarships worth ₹4.9 cr

**Dheeraj Bengrut**
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has awarded as many as 7,402 students in five different types of scholarships worth a total of ₹4.95 crore, which was distributed during this academic year 2022-23.

As per the information given by SPPU, Krantijyoti Savitribai Phule Economic Assistance Scheme, Lokshahir Annabhau Sathe Financially Weak Students Help Scheme, Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Scholarship Scheme, Mahatma Jotirao Phule Meritorious Student Scholarship Scheme and Swami Vivekananda Student Assistance are the schemes which students can avail of.

A total of 14,847 applications were received for the five scholarships and after detailed scrutiny 4,711 students for undergraduate and 2,691 students for postgraduate courses were chosen for the academic year 2022-23. The SPPU is in the process of depositing funds into the bank accounts of the respective recipients.

**Detailed information**

The official website www.unipune.ac contains detailed information, rules, and conditions for all of the university's scholarships.

"Considering the students in every element as the social responsibility of the university, we at SPPU have started these scholarship schemes."SPPU's Pro-Vice Chancellor, Prof Sanjeev Sonawane, said in a statement.

He went on to inform that the scrutiny process is held in a transparent manner.

"Every year, the administration calls for applications from students, and the university carries out the prescribed security in a transparent manner. The scholarship amount is directly credited to the student's account," SPPU's Pro-Vice Chancellor," Sonawane, said.

Hindustan Times 6.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# College submits fake papers but NAAC lets it off

Hemali.Chhapia
@timesgroup.com


Anil Sahasrabudhe said they are looking to bring in rules to check such malpractices

**Mumbai:** The scrutiny of college records for assessment and accreditation by the national council has been found to be selective in recent instances. An institute which submitted fake information was allowed to withdraw from the process rather than be blacklisted. In another case, a whistleblower's identity was compromised and the college went on to get its rating. These discrepancies have come to light at a time when NAAC's processes are increasingly under question.

A whistleblower had alerted the National Assessment and Accreditation Council (NAAC) that a minority institute from Indore submitted forged documents for its rating. A probe found the allegation to be genuine. Yet, instead of blacklisting the college, it was permitted to pull out of the assessment process.

The Indore college had claimed that it had membership of Inflibnet, a library network system which is a vertical of the University Grants Commission. "After receiving the complaint, when a NAAC assessor wrote to Inflibnet to verify the membership, it was informed that the details submitted on the government of India letterhead were false and so was the letterhead," said a source.

The informant, who had identified himself, also urged NAAC to look at claims made regarding grants received from corporates and NGOs. He alleged the bank statements, too, were forged.

In another case, the identity of an informant, who raised an alarm against allegedly false information being submitted by an Ulhasnagar-based college, was revealed to the college management. The case is now with the Central Vigilance Commission (CVC).

Reacting to questions about NAAC's uneven approach, executive committee chairman Anil Sahasrabudhe said, "When we get information on fake data with proof, we should look into it and not allow the institutes to be accredited for a few years. We are looking at bringing in tough regulations to check such practices where colleges give fake data."

---

लोकमत

# 'एनईपी'त सर्वांगीण विकासावर भर

## नितीन करमळकर; पालक, विद्यार्थ्यांशी साधला संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शैक्षणिक संस्थांमध्ये दिले जाणारे शिक्षण आणि समाजातील समस्या कशा सोडवायच्या यातील दरी कमी करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणात प्रयत्न केले जाणार आहेत. शिक्षण घेतानाच प्रत्यक्षात प्रकल्प, इंटर्नशीप दिली जाईल. विद्यार्थ्यांना समाजाभिमुख बनविण्यासह सर्वांगीण विकासावर भर दिला जाणार असल्याचे एनईपी सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० जनजागृतीपर व्याख्यानात डॉ. करमळकर यांनी विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला. यावेळी कुलगुरू डॉ. कारभारी काळे, सुकाणू समिती सदस्य प्राचार्य अनिल राव, मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. आर. डी. कुलकर्णी उपस्थित होते.

डॉ. करमळकर म्हणाले, भारतीय ज्ञान परंपरा अकराव्या शतकापर्यंत अस्तित्वात होती. परकीय आक्रमणामुळे आपण आपले स्वत्व विसरून गेलो. वेदिक मॅथेमॅटिक, आर्यभट्ट, कौटिल्याचे अर्थशास्त्र, व्यवस्थापनाचे प्रयोग यातील जुन्या चांगल्या गोष्टी आणि नव्याची सांगड घालून अभ्यासक्रमाची रचना केली जाणार आहे. उद्योगाला पाहिजे असलेले मनुष्यबळ निर्मितीवर भर असेल. तसेच प्रोफेसर ऑफ प्रक्टीसनसार विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या तज्ज्ञांना शिकविण्याची संधी देण्यात येणार आहे.

नवीन धोरणात ४ वर्षांची पदवी असणार आहे. मात्र, विद्यार्थ्यांनी पदवी प्रवेश घेतला आणि त्याला आर्थिक अडचण आली तर एक वर्षानंतर सर्टिफिकेट घेऊन नोकरी करता येईल.

सात वर्षांत पदवी पूर्ण करावी लागेल. क्रेडिटवर आधारित शुल्करचना असेल मेजर विषयासाठीचे ५० टक्के क्रेडिटचे शुल्क कॉलेजला मिळणार आहे.

### विद्यार्थ्यांना मिळणार विषय निवडीचे स्वातंत्र्य

- विद्यार्थ्यांना यापूर्वी कधीच विषय निवडीचे स्वातंत्र्य दिले नाही. बारावीनंतर त्याची आवड विकसित होते. विषय आवडला नाही तर दुसऱ्या वर्षी तो बदलता येईल.
- पदवीच्या तीन वर्षासाठी १२० ते १३२ क्रेडिटस असतील त्यातील निम्मे क्रेडिटस हे मेजर विषयाचे असतील. त्यामुळे उर्वरित पन्नास टक्के क्रेडिटसमध्ये त्याला विविध कौशल्यावर आधारित कोर्सेस करता येतील.



Hello Pune
Page No. 4 Apr 07, 2023
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

पुढारी

# बारावीची परीक्षा दोनदा; सेमिस्टर पद्धतीची शिफारस

## नवीन शैक्षणिक धोरणातील बदलाचा परिणाम होणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणारी बारावीची परीक्षा वर्णनात्मक आणि वैकल्पिक अशी वर्षातून दोनदा होण्याची शक्यता आहे. नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क तयार करणाऱ्या तज्ज्ञ समितीने बारावी परीक्षेसंदर्भात शिफारशी मांडल्या आहेत. जर समितीने केलेल्या शिफारशीनुसार निर्णय झाला तर बारावी परीक्षेचे स्वरूप बदलणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नव्या फ्रेमवर्कनुसार, सेमिस्टर पद्धतीने बारावी बोर्ड परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्यात येईल. त्याचबरोबर कला, वाणिज्य, विज्ञान या अभ्यासक्रमात शिकवल्या **पान ८ वर ▸**



“ बारावीची परीक्षा वर्षातून दोनदा घेण्यासंदर्भात राज्य शासनाची कोणतेही धोरण ठरलेले नाही. परीक्षा घेण्यासंदर्भात राज्य शासन अगोदर धोरण ठरवेल आणि राज्य शासनाने एकदा धोरण निश्चित केले की, त्याची अंमलबजावणी राज्य मंडळ करणार आहे.

- **शरद गोसावी,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

Pune Edition
Apr 7, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# बारावीची परीक्षा दोनदा; सेमिस्टर पद्धतीची शिफारस

**(पान १ वरून)** जाणाऱ्या विषयांची परीक्षा विद्यार्थ्यांना देण्याची मर्यादा नसेल. विद्यार्थ्याला बारावी बोर्ड परीक्षा देताना १६ विविध अभ्यासक्रमांचे कोर्स उपलब्ध होतील. त्यातून विद्यार्थी आपल्या आवडीचे अभ्यासक्रम निवडून बोर्ड परीक्षेला सामोरे जातील. यासाठी अकरावी- बारावी अभ्यासक्रमाच्या रचनेत आणि पाठ्यपुस्तकांमध्ये बदल केला जाईल, असे देखील तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

यासंदर्भात राज्य मंडळातील एक अधिकारी म्हणाले, बारावीची परीक्षा वर्षातून दोनदा घ्यायची असेल तर तसा अभ्यासक्रम विद्या प्राधिकरणाला तयार करावा लागणार आहे. त्यानंतर संबंधित अभ्यासक्रमाला राज्य शासनाकडून मंजुरी घ्यावी लागणार आहे. त्यानंतर परीक्षा नेमकी कशी घ्यायची यासंदर्भात राज्य शासन धोरण ठरवून राज्य मंडळाला तसे आदेश देईल. नवीन शैक्षणिक धोरणात बारावीच्या दोन परीक्षा घेत असताना एक परीक्षा एमसीक्यू बेस्ड आणि दुसरी परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्यासंदर्भात नमूद करण्यात आले आहे.

नवीन शैक्षणिक धोरणातील सर्वच घटकांची अंमलबजावणी करणे कोणत्याही राज्य सरकारवर बंधनकारक नाही. त्यामुळे बारावीच्या वर्षातून दोन परीक्षांच्या निर्णयाची अंमलबजावणी करायची का, नाही याचा निर्णय राज्य सरकारच घेणार आहे.

Pune Edition
Apr 7, 2023 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

# शैक्षणिक धोरणामुळे होणाऱ्या बदलांकडे संधी म्हणून पाहणे आवश्यक

## डॉ. नितीन करमळकर यांचा सल्ला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सरसकट चार वर्षाची पदवी न होता विद्यार्थ्याला प्रत्येक टप्प्यावर अभ्यासक्रम पूर्ण करत बाहेर पडण्याची संधी आहे. पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी धोरणानुसार होणाऱ्या बदलांमुळे गोंधळून, घाबरून न जाता याकडे संधी म्हणून पाहावे, असा सल्ला राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर यांनी गुरुवारी दिला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या धोरणाच्या अनुषंगाने शिक्षणात होणाऱ्या बदलांची विद्यार्थी, पालकांना माहिती देण्यासाठीचा कार्यक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झाला. त्या वेळी डॉ. करमळकर बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, सुकाणू समिती सदस्य प्रा. अनिल राव, डॉ. आर. डी. कुलकर्णी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र शिंगणापूरकर, बागेश्री मंठाळकर, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले, डॉ. वैभव जाधव आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. करमळकर यांनी विस्ताराने धोरणाविषयी माहिती दिली. सर्व सार्वजनिक विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये, सर्व अभिमत विद्यापीठांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्याची शिक्षण पद्धती, त्यात बदलांची आवश्यकता, नवीन शैक्षणिक धोरणाचा उद्देश धोरणाची अंमलबजावणी या बाब मार्गदर्शन केले. तर डॉ. कुलकर्णी यांनी पदवी अभ्यासक्रमातील बदल, श्रेयांक पद्धती बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय शिक्षण, श्रेयांक बँक, मल्टिपल एन्ट्री-मल्टिपल एक्झिट, विद्यार्थ्यांची विषय निवड भाषा, कौशल्य आदींचा समावेश याबाबत माहिती दिली. विद्यार्थी पालकांनी विचारलेल्या प्रश्नांना य वेळी उत्तरे देण्यात आली.

लोकसत्ता Fri, 07 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72112009

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

पुढारी

# बीए, बीकॉम, बीएसस्सीसाठी नवे धोरण चालू वर्षापासून

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सार्वजनिक विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये, सर्व अभिमत महाविद्यालयांत येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात केली जाणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी पालक-विद्यार्थी सवांदादरम्यान ही माहिती दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या धोरणाच्या अनुषंगाने शिक्षणात होणाऱ्या बदलांची माहिती देण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



डॉ. करमळकर

त्यावेळी डॉ. करमळकर बोलत होते. या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार आदी उपस्थित होते.

**सुकाणू समितीच्या अध्यक्षांची माहिती**

डॉ. करमळकर म्हणाले, 'पालकांनी, विद्यार्थ्यांनी धोरणानुसार होणाऱ्या बदलांनी गोंधळून, घाबरून न जाता याकडे संधी म्हणून पाहावे.' डॉ. काळे यांनी या शैक्षणिक धोरणाची संकल्पना समजून घ्यावी, असे आवाहन विद्यार्थी व पालकांना केले. तसेच राज्य सरकार, उच्च शिक्षण विभागाचेही आभार मानले.

या वेळी डॉ. राव यांनी सध्याची शिक्षण पद्धती कशी सुरू आहे, त्यात का बदल करणे आवश्यक आहेत, नवीन शैक्षणिक धोरण कशासाठी आणले आहे, त्याची अंमबजावणी कशी होणार आहे, आदी बाबी सोप्या भाषेत समजावून सांगितल्या. तर डॉ. आर. डी. कुलकर्णी यांनी पदवी अभ्यासक्रम कसा बदलणार आहे, क्रेडिट सिस्टीम कशी लागू होणार, बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय म्हणजे काय, क्रेडिट बँक, मल्टिपल एन्ट्री, मल्टिपल एक्झिट, तसेच विद्यार्थी त्यांचे विषय कसे निवडतील, भाषा कौशल्य आदींचा समावेश याबाबत सविस्तर सांगितले. डॉ. वैभव जाधव यांनी आभार मानले.

My Pune Edition
Apr 7, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

पुणे । शुक्रवार, ७ एप्रिल २०२३ । पाने १८ (पुणे प्लससह) । शहर आवृत्ती । ₹ ६.०० वर्ष : ९३ अंक : ८१

मटामध्ये जाहिरात देण्यासाठी 18001205474 वर कॉल करा. 'महाराष्ट्र टाइम्स'चा अंक मिळविण्यासाठी readercontact@timesgroup.com वर ईमेल करा किंवा subscribe.timesgroup.com इथे जा.

# शिक्षणातील बदलांची नांदी

## बारावीची परीक्षा वर्षातून दोनदा?

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार राष्ट्रीय अभ्यासक्रम संरचना संस्थेने (एनसीएफ) बारावीच्या बोर्ड परीक्षा वैकल्पिक आणि वर्णनात्मक अशा पद्धतीत वर्षातून दोन वेळा घेण्याची शिफारस केली आहे.

दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित केले असून, विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मूल्यांकनावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार दहावी व बारावीच्या अंतिम निकालात त्यापूर्वीच्या म्हणजेच अनुक्रमे नववी व अकरावीतील गुणांचाही विचार व्हावा, अशी आखणी करण्यास सांगण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून या शिफारशी स्वीकारल्यास राज्यातील परीक्षांचे स्वरूपही बदलणार आहे.

### नवी संरचना

सन २००५नंतर प्रथमच देशातील अभ्यासक्रमासाठी नवी संरचना तयार करण्यात येत आहे. यामध्ये नववी ते बारावीच्या परीक्षांबाबतच्या दूरगामी परिणामकारक शिफारशी करण्यात आल्या आहेत. या शिफारशी लवकरच



सार्वजनिक मंचावर ठेवण्यात येतील व नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येतील.

### सन २०२४ पासून लागू होणार?

परीक्षा रचना आणि अभ्यासक्रम अंतिम झाल्यावर शैक्षणिक वर्ष २०२४पासून ही नवीन पद्धती लागू करण्याचा विचार सुरू आहे. 'एनसीएफ'च्या आराखड्यानुसार बारावीची परीक्षा दोन वेळा घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सध्याच्या पद्धतीत दहावी आणि बारावीच्या अंतिम परीक्षेतील गुणांच्या दृष्टीनेच विचार केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांवर ताण पडतो. तसेच अकरावी आणि बारावीमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांमधील विद्यार्थ्यांना आपल्याच विद्याशाखेतील विषय निवडण्याचे बंधन असते. मात्र, नव्या अभ्यासक्रमात याविषयी लवचीकता असेल.

## पदवी अभ्यासक्रमांचे स्वरूप बदलणार

टीम मटा, पुणे/मुंबई

**नव्या शिक्षण धोरणानुसार राष्ट्रीय अभ्यासक्रम संरचना संस्थेने दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षांमध्ये बदलांच्या शिफारशी केल्या असून, बारावीच्या बोर्ड परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्यात याव्यात, असे सांगण्यात आले आहे. दुसरीकडे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी म्हणून राज्यातील सर्व विद्यापीठांच्या पदवी अभ्यासक्रमांचे स्वरूप जून २०२३ पासून बदलण्यात येणार आहे. हे दोन्ही निर्णय शिक्षण क्षेत्रातील बदलांची नांदी ठरणार आहेत.**

### १६ अभ्यासक्रमांची निवड

'एनसीएफ'ने अभ्यासक्रमांच्या निवडीबाबतही शिफारशी केल्या आहेत. विद्यार्थ्याला अकरावी आणि बारावी या दोन वर्षांत बोर्ड परीक्षा देताना वेगवेगळ्या १६ अभ्यासक्रमांची निवड करता येईल. चार टप्प्यांमध्ये विद्यार्थ्यांना हे अभ्यासक्रम निवडावे लागतील. त्यामध्ये समाजशास्त्र शाखेसाठी इतिहास विषयाची निवड केल्यास विद्यार्थ्याला इतिहास विषयाचे चार अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील. त्यानंतर विद्यार्थ्याने विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र विषय निवडल्यास भौतिकशास्त्रातील चार अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून, त्याचा पहिला टप्पा म्हणून राज्यातील सर्व विद्यापीठांच्या पदवी अभ्यासक्रमांचे स्वरूप जून २०२३ पासून बदलण्यात येणार आहे.

### काय आहे बदल?

नव्या शैक्षणिक धोरणानुसार 'क्रेडिट फ्रेमवर्क'मध्ये 'मेजर', 'मायनर', 'इलेक्टिव्ह', 'स्किल कोर्सेस', 'अॅबिलिटी एनहान्समेंट' अशा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांना विषयांची निवड



करता येणार आहे. यामुळे आता पुढील शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थी पदवी अभ्यासक्रमात ५० टक्के अभ्यासक्रम हा 'मेजर' विषयात शिकवला जाणार असून, उर्वरित ५० टक्के अभ्यासक्रम वेगवेगळे विषय, कला, कौशल्ये शिकून पूर्ण करता येणार आहे.

### शैक्षणिक धोरणानुसार बदल

'नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'च्या अंमलबजावणीबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये गुरुवारी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने नेमलेल्या सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर, सदस्य प्राचार्य डॉ. अनिल राव व प्रा. आर. डी. कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे, डॉ. प्रफुल्ल पवार, रवींद्र शिंगणापूरकर आदी उपस्थित होते.

### 'राज्यात सर्वत्र होणार बदल'

'जून २०२३ मध्ये राज्यातील सर्व सरकारी, खासगी, स्वायत्त महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये पदवी अभ्यासक्रमांचे स्वरूप बदलेल. विद्यार्थ्यांनी एक मेजर विषय निवडल्यानंतर त्यांना 'मायनर', 'इलेक्टिव्ह', 'स्किल कोर्सेस' निवडता येतील. हे विषय कला, वाणिज्य, विज्ञान या विद्याशाखेशी संबंधित असतील,' असे डॉ. अनिल राव यांनी सांगितले.

### अशी असणार क्रेडिट व्यवस्था

एखाद्या विद्यार्थ्याने बी. एससी (फिजिक्स) असा अभ्यासक्रम निवडला, तर त्याचा 'फिजिक्स' हा 'मेजर' विषय असेल. ५० टक्के 'क्रेडिट' विद्यार्थ्याला 'फिजिक्स'शी संबंधित विषय शिकून मिळेल. उर्वरित ५० टक्के क्रेडिट विद्यार्थी कला, वाणिज्य, विज्ञान, वेगवेगळी कौशल्ये यापैकी कोणतेही विषय निवडून घेऊ शकतो. पदवी अभ्यासक्रमासाठी एकूण १२० ते १३२ क्रेडिट असतील, अशी माहिती डॉ. डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

Maharashtra Times 7.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# पदवी अभ्यासक्रमासाठी येत्या वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

पुणे : सर्व सार्वजनिक विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये, सर्व अभिमत महाविद्यालयामध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात केली जाणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या धोरणाच्या अनुषंगाने शिक्षणात होणाऱ्या बदलांची माहिती देण्यासाठी पालक विद्यार्थी संवाद आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी डॉ. करमळकर बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.कारभारी काळे, प्र- कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ.प्रफुल्ल पवार, सुकाणू समिती सदस्य व तज्ज्ञ मार्गदर्शक प्राचार्य अनिल राव, समिती सदस्य व मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. आर. डी. कुलकर्णी, व्यवस्थापन परिषद



सदस्य व कार्यक्रमाचे संयोजक डॉ. रविंद्र शिंगणापूरकर, बागेश्री मंठाळकर, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ.संजय ढोले आदी उपस्थित होते.

डॉ. करमळकर धोरणाबाबत म्हणाले, सरसकट चार वर्षाची पदवी न होता विद्यार्थ्याला प्रत्येक टप्प्यावर अभ्यासक्रम पूर्ण करत बाहेर पडण्याची संधी आहे. पालकांनी विद्यार्थ्यांनी धोरणानुसार होणाऱ्या बदलांनी गोंधळून, घाबरून न जाता याकडे संधी म्हणून पाहावे. डॉ.कारभारी काळे यांनी या शैक्षणिक धोरणाची संकल्पना समजून घ्यावी, असे आवाहन विद्यार्थी व पालकांना केले. तसेच राज्य सरकार, उच्च शिक्षण विभागाचेही आभार मानले.

डॉ. राव यांनी सध्याची शिक्षण पद्धती कशी सुरू आहे, त्यात का बदल करणे आवश्यक आहेत, नवीन शैक्षणिक धोरण कशासाठी आणले आहे, त्याची अंमबजावणी कशी होणार आहे, आदी बाबी सोप्या भाषेत समजावून सांगितल्या.

डॉ. आर. डी. कुलकर्णी पदवी अभ्यासक्रम कसा बदलणार आहे, क्रेडिट सिस्टीम कशी लागू होणार, बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय म्हणजे काय, क्रेडिट बँक, मल्टिपल एन्ट्री, मल्टिपल एक्झिट, तसेच विद्यार्थी त्यांचे विषय कसे निवडतील, भाषा, कौशल्य आदींचा समावेश याबाबत सविस्तर सांगितले.

रविंद्र शिंगणापूरला म्हणाले, पालक, विद्यार्थी आणि समिती सदस्य यांचा संवाद घडवून आणण्याचा हा पहिला अभिनव उपक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने केला आहे. यातून अनेक पालकांच्या मनातील अनेक शंका दूर झाल्या असतील अशी आशा आहे. ऑनलाइनच्या माध्यमातून तीन हजारांहून अधिकजण उपस्थित होते. कार्यक्रमात अनेक विद्यार्थी व पालकांनी आपल्या शंकांचे निरसन केले. डॉ. वैभव जाधव यांनी आभार मानले.

Kesari 7.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

सकाळ

# चार वर्षांच्या पदवीकडे संधी म्हणून पाहा

## नव्या शैक्षणिक धोरणाबद्दल राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. करमळकरांचे आवाहन

**पुणे, ता. ७ :** 'सर्व सार्वजनिक विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये, सर्व अभिमत महाविद्यालयांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होत आहे. सरसकट चार वर्षांची पदवी न होता, विद्यार्थ्याला प्रत्येक टप्प्यावर अभ्यासक्रम पूर्ण करत बाहेर पडण्याची संधी आहे. त्यामुळे पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी नव्या बदलांनी गोंधळून किंवा घाबरून न जाता संधी म्हणून पाहावे,' असे मत राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर यांनी पालक-विद्यार्थी संवादादरम्यान व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'च्या अनुषंगाने शिक्षणात होणाऱ्या बदलांची माहिती देण्यासाठी जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र- कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, सुकाणू समिती सदस्य प्राचार्य अनिल राव, समिती सदस्य व मुंबई विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. आर. डी. कुलकर्णी, व्यवस्थापन परिषद सदस्य व कार्यक्रमाचे संयोजक डॉ. रवींद्र शिंगणापूरकर, बागेश्री मंठाळकर, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. राव यांनी सध्याची शिक्षण पद्धती कशी सुरू आहे, त्यात का बदल करणे आवश्यक आहेत, नवीन शैक्षणिक धोरण कशासाठी आणले आहे, त्याची अंमलबजावणी कशी होणार आहे, आदी बाबी सोप्या भाषेत समजावून सांगितल्या, तर डॉ. आर. डी. कुलकर्णी पदवी अभ्यासक्रम कसा बदलणार आहे, क्रेडिट सिस्टीम कशी लागू होणार, बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय म्हणजे काय, क्रेडिट बँक, मल्टिपल एन्ट्री, मल्टिपल एक्झिट, तसेच विद्यार्थी त्यांचे विषय कसे निवडतील, भाषा, कौशल्य आदींचा समावेश याबाबत सविस्तर सांगितले.

ऑनलाइन माध्यमातून तीन हजारांहून अधिक जणांनी यात सहभाग घेतला. संपूर्ण कार्यक्रम विद्यापीठाच्या 'सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी (ecdlic)' या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध आहे. आभार डॉ. वैभव जाधव यांनी मानले.

Pune, Pune-Today
08/04/2023 Page No. 6

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : नव्या कुलगुरूंकडून विद्यार्थ्यांची अपेक्षा

# 'बेरोजगारांच्या फौजा' रोखायला हव्यात

**सम्राट कदम** : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ७ : "एवढ्या जागतिक दर्जाच्या सुविधा आहेत, पण त्यांना चालविण्यासाठी साधा माणूस नाही. एवढंच काय, विद्यापीठात कॅम्पस भरतीसाठी एक कंपनीही येत नाही. शिकणे आणि शिकविणे सोडून केवळ प्रशासकीय अडथळे दूर करण्यात वेळ जातो. त्यामुळे दरवर्षी विद्यापीठ कॅम्पस आणि महाविद्यालयांतून तयार होणाऱ्या बेरोजगारांच्या फौजा थांबविणारे कुलगुरू हवेत," अशी प्रतिक्रिया सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एका विद्यार्थ्याने व्यक्त दिली.**

वर्षभरापासून रिक्त असलेल्या कुलगुरूपदासाठीच्या अर्जाची मुदत नुकतीच संपली. विद्यापीठ कॅम्पसमधून १६ उमेदवार इच्छुक आहेत. प्रक्रिया वेळेत झाल्यास एप्रिलअखेर किंवा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळतील.

सहाजिकच नव्या कुलगुरूंकडून विद्यार्थ्यांसह प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्याही काही अपेक्षा आहेत. त्याचा आढावा 'सकाळ'ने घेतला. एकेकाळी ऑक्सफर्ड ऑफ ईस्ट म्हणून नावलौकीक असलेल्या विद्यापीठाचा दरारा हळूहळू कमी होत आहे. प्रशासकीय कामकाजातून विद्यार्थी आणि प्राध्यापक हद्दपार होतो की काय? अशी सद्यःस्थिती आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाला शैक्षणिक नेतृत्व देणाऱ्या कुलगुरूंची गरज आहे. नव्या कुलगुरूंकडून सर्वसमावेश नेतृत्वाची आणि विद्यार्थी केंद्रित धोरणाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### विद्यापीठासमोरील आव्हाने....

- कोरोनानंतरचे शैक्षणिक वेळापत्रक पूर्ववत करणे
- दिवसेंदिवस किचकट होणाऱ्या प्रशासकीय कामकाजात सहजता आणणे
- विद्यापीठ कॅम्पसवर जास्तीत जास्त उद्योगांना आकर्षित करणे
- संशोधनासाठी उद्योगांचा सहभाग वाढविणे

### संशोधक विद्यार्थ्यांच्या अपेक्षा...

- बंद पडलेली पोस्ट डॉक्टरल फेलोशिप, विद्यापीठाची फेलोशिप सुरू करावी
- संशोधनासाठी अधिकाधिक सामंजस्य करार करावेत
- नियमितपणे पीएच.डी च्या जाहिराती याव्यात
- वसतिगृहांची संख्या वाढवावी
- आंतरराष्ट्रीय परिषदांसाठीचा प्रवास खर्चाची योजना पुन्हा सुरू करावी



### प्राध्यापकांच्या अपेक्षा..

- प्रशासकीय अडथळ्यातून मुक्त करत अध्यापन अन् संशोधनासाठी मोकळीक द्यावी
- रिक्त पदांच्या भरतीसाठी प्रयत्न करावेत
- विद्यार्थी केंद्रित धोरणांची अंमलबजावणी करावी
- प्राध्यापकांना विश्वासात घेऊन अन् चर्चेनंतर नवे धोरण आणावे

### व्यावसायिक अभ्यासक्रम खिशाला परवडावेत

आजच्या काळाशी सुसंगत आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम विद्यापीठाकडून मागील काही वर्षांत सुरू झाले आहेत. पण, स्वयंअनुदानित असलेले हे अभ्यासक्रम सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या खिशाला परवडणारे नाहीत. त्यामुळे सार्वजनिक विद्यापीठ असूनही विद्यार्थी अशा अभ्यासक्रमांना मुकत आहे. त्यांचे शुल्क कमी करण्याचे मोठे आव्हान नव्या कुलगुरूंसमोर आहे.

" विद्यार्थी केंद्रबिंदू मानत प्रशासकीय निर्णय घेणारे नवे कुलगुरू हवेत. सध्या शिक्षवे कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्या आणि आवश्यक प्रशासकीय बदलांना त्यांनी प्राधान्य द्यायला हवे.

**- डॉ. सुनील धिवार**, अध्यक्ष, विद्यापीठ कर्मचारी संघ

" सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नावलौकिकाला साजेसे आणि काम पुढे नेणारे नवे कुलगुरू हवेत. बिघडलेली शैक्षणिक घडी पूर्ववत करत, सर्वांना सोबत घेत विद्यार्थी केंद्रित धोरणे आखणाऱ्या कुलगुरूंची विद्यापीठाला सध्या आवश्यकता आहे.

**- डॉ. के. एल. गिरमकर,** अध्यक्ष, एसफक्टो

Sakaal 8.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

सकाळ

# नवीन शैक्षणिक धोरणात पदवी अभ्यासक्रमात होणार बदल

# दहावी-बारावीला आधीच्या वर्षाचेही गुण

**मुंबई, ता. ७ : दहावी आणि बारावीच्या वार्षिक परीक्षेच्या मिळालेल्या गुणांमध्ये आता आधीच्या वर्षाचे गुण मिळवले जाणार आहेत. तसेच सीबीएसईसारख्या केंद्रीय मंडळाच्या परीक्षा पद्धतीत समन्वय साधून बारावीची परीक्षा दोन वेळा घेण्याचे नियोजन केले जाणार आहे. त्यासाठी राज्यात नवीन शिक्षण धोरणाच्या अनुसार राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम मसुदा हा सरकारने तयार केला आहे.**

मसुद्यात अनेक प्रकारच्या नवीन शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार नवीन मूल्यांकन पद्धती विकसित केल्या जाणार आहेत तर पदवीच्या अभ्यासक्रमांतही आमूलाग्र बदल केले जाणार असून नवीन त्यामध्ये श्रेयांक पद्धतीत विद्यार्थ्यांना विषय निवडण्याची मुभा मिळणार आहे. या नव्या शिफारशींमध्ये देशभरात वर्ष २०२३-२४ च्या दहावी, बारावीच्या परीक्षेपासून सीबीएसई मंडळाच्या परीक्षा मूल्यांकन पद्धतीत बदल केले जाणार आहेत. यात क्षमतेवर आधारित प्रश्न विचारण्यात येतील. प्रश्नपत्रिकेतील लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रश्नांचे महत्त्वही कमी केले जाणार असून सुमारे ५० टक्के प्रश्नपत्रिका ही बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित असणार आहे.



दुसरीकडे राज्यातही बारावी परीक्षा मंडळाच्या परीक्षा या वर्णनात्मक व वैकल्पिक अशा दोन पद्धतीने होऊ शकतील सरकार त्यावर येत्या काळात निर्णय घेईल. राज्यातील शिक्षण क्षेत्रातील आणि विविध क्षेत्रातील जनतेकडून त्याच्यावर सूचना मागण्यात येतील आणि मग त्यावर अंतिम निर्णय सरकार घेणार आहे. राज्यात तब्बल १७ वर्षांनी राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रमाचा आराखडा प्रस्तुत करण्यात आलेला आहे.

### नवीन शिफारशींनुसार प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

- दहावीमध्ये एकूण प्रश्नांपैकी ५० टक्के प्रश्न हे बहुपर्यायी असतील
- एखाद्या घटनेवर किंवा इतर कोणत्याही समस्येवर आधारित प्रश्न विचारले जातील
- वस्तुनिष्ठ प्रश्नांचा भाग केवळ २० टक्केच
- लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रश्न यंदा ३० टक्क्यांपर्यंत कमी केले
- दुसरीकडे बारावीमध्ये ४० टक्के प्रश्न बहुपर्यायी प्रकारचे असतील
- एकात्मिक स्वरूपाचे व केस स्टडीवर आधारित प्रश्न विचारले जातील
- लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारच्या प्रश्नांचे मागील वर्षाचे ५० टक्के प्रमाण यंदा ४० टक्क्यांवर आणले आहे.

### नववी आणि अकरावीतही बदल

येत्या शैक्षणिक वर्षात दहावी आणि बारावीबरोबरच सीबीएसई मंडळाने नववी आणि अकरावीच्या परीक्षेतही बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. नववी आणि अकरावीच्या परीक्षेतही विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर आधारित प्रश्न विचारण्यात येणार असून लघु आणि दीर्घ प्रकारच्या प्रश्नांचे महत्त्व कमी करण्यात येणार आहे. लघु आणि दीर्घ उत्तरांच्या एकत्रित प्रश्नांना ५० ऐवजी ४० टक्के गुण असतील, असे सीबीएसई मंडळाने म्हटले आहे.

### पदवी अभ्यासक्रमात होणार बदल

- एखादा विद्यार्थी जो अभ्यासक्रम निवडेल त्यामध्ये ५० टक्के अभ्यासक्रम हा मुख्य विषय असेल
- उर्वरित विषय ५० टक्के अभ्यासक्रम म्हणून शिकवले जातील
- श्रेयांक पद्धतीतमध्ये मेजर, मायनर, इलेक्टिव्ह आदी विषय निवडण्याची मुभा मिळणार आहे.

"एकविसाव्या शतकातील आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता आणि वैचारिक क्षमता वाढविण्यावर भर दिला आहे. त्यासाठीच परीक्षा पद्धतीत बदल करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर आधारित मूल्यांकन लागू करण्यात येणार आहे.
**- जोसेफ इमॅन्युअल,** संचालक, सीबीएसई मंडळ

"नवीन शैक्षणिक धोरणासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा जाहीर केला आहे; परंतु राज्यस्तरावरील राज्य शैक्षणिक आराखडा अजून जाहीर होणे बाकी आहे. त्यावेळी राज्यात बारावीच्या परीक्षा दोन वेळा घ्यायच्या किंवा त्यात कोणते बदल करायचे, मागील परीक्षांचे गुण किती द्यायचे हे ठरवले जाणार आहे. आपल्याकडे दहावी आणि बारावीच्या मुख्य आणि पुरवणी अशा दोन परीक्षा होतात; मात्र राज्य शैक्षणिक आराखडा तयार झाल्यानंतर यावर विषय संरचना बदलणे, तसेच विद्यार्थ्यांना विविध विषय निवडण्याची मुभा धोरणात असल्याने त्यासाठी आम्हाला अनेक विषयांचे गट करावे लागतील. त्यासाठी राज्य शैक्षणिक आराखडा जाहीर झाल्यानंतर हे बदल निश्चित करून धोरण ठरवले जाईल.
**- शरद गोसावी,** प्राथमिक शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय

Pune, Main
08/04/2023 Page No. 102

---

विश्लेषण

चिन्मय पाटणकर

# नव्या आराखड्यामुळे दहावी-बारावीच्या परीक्षांचे काय होणार?

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकताच शालेय शिक्षणाच्या राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्याचा मसुदा प्रसिद्ध केला असून त्यावर पालक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक यांच्याकडून हरकती, सूचना मागवण्यात आल्या आहेत. या आराखड्यात ३ ते १८ वयोगटाच्या विद्यार्थ्यांच्या गरजा, अध्ययन-अध्यापन पद्धती, शैक्षणिक साहित्य, शिक्षणाचे विविध टप्पे यांचा समावेश आहे. आराखड्यावरील हरकती सूचना ncf.ncert@ciet.nic.in वर पाठवता येतील.

**नवा शैक्षणिक आराखडा कशासाठी?**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार देशाच्या शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल होणार असून पूर्वप्राथमिक शिक्षणापासून पदवीपर्यंतची रचना ५ -३ -३ -४ अशी होणार आहे. त्यानुसार अभ्यासक्रम तयार करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला. त्यासाठी शिक्षण मंत्रालयाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली १२ तज्ज्ञांची समिती नेमली होती. मूल्यांवर भर देण्यात आलेल्या या आराखड्यात ज्ञानविषयक दृष्टिकोन ठेवून आशय, भाषा शिक्षण, अध्यापनात साधने, स्रोतांचा उपयोग आणि तत्त्वज्ञानाचा आधार दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पूर्वी २००५ मध्ये काँग्रेस सत्तेत असताना अभ्यासक्रम आराखडा बदलण्यात आला होता.

**आराखडा निर्मितीची प्रक्रिया कशी झाली?**

आराखड्याचा मसुदा तयार करण्यापूर्वी देशभरातील ५०० जिल्हास्तरीय बैठका झाल्या. मंत्रालये, धार्मिक गट, वेगवेगळ्या संस्था, स्वयंसेवी संघटना, विद्यापीठे आदींबरोबर ५० हून अधिक बैठका झाल्या. यात आठ हजारहून अधिक लोकांचा समावेश होता. तसेच मोबाइल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून केलेल्या डिजिटल सर्वेक्षणात १२ लाख लोकांनी भाग घेतला.

**अभ्यासक्रम आराखड्याचा केंद्रबिंदू काय?**

प्राचीन भारतातील तत्त्वज्ञानाची बैठक हा विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा खरा स्रोत असल्याचे नमूद करून प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, अर्थनिष्पत्ती, अनुपलब्धी आणि शब्द या सहा प्रमाणांवर अभ्यासक्रमात भर देण्यात आला आहे. तसेच पंचकोश विकासाच्या माध्यमातून मुलांच्या मनोविकासालाही महत्त्व देण्यात आले आहे. पंचकोष या प्राचीन संकल्पनेत मानवी अनुभव आणि आकलनासाठी शरीर आणि मन यातील संबंध महत्त्वाचा मानला गेला आहे. त्यामुळे चौकस आहार, पारंपरिक खेळ, योगासने, गाणी, खेळ, कविता, सांस्कृतिक नाते तयार होण्यासाठी प्रार्थना यातून मुलांचा मनोविकास करण्याची शिफारस करण्यात आली आहे. देशातील समृद्ध, सांस्कृतिक वारसा आणि परंपरांच्या माध्यमातून भारतीयत्व समजून घेण्यावर, आयुर्वेद आणि योग शिकण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच ब्रिटिश सत्तेच्या विरोधातील लढ्याचे विविध टप्पे, त्यात गांधी आणि संबंधितांच्या चळवळी, माध्यमिक शिक्षणातील इतिहासाच्या अभ्यासक्रमात ग्रीक आणि मगध साम्राज्य, बुद्ध, जैन, वैदिक आणि कन्फ्युशियन तत्त्वज्ञान शिकण्याची शिफारस आहे.

**दहावी- बारावीच्या परीक्षांचे काय होणार?**

नव्या आराखड्यात दहावी आणि बारावीच्या सध्याच्या शिक्षण, परीक्षा पद्धतीमध्ये बदल प्रस्तावित आहेत. नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना मानव्यता, गणित आणि संगणन, व्यावसायिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, कला शिक्षण, समाजशास्त्र, विज्ञान आणि आंतरविद्याशाखा या शाखांमध्ये विषय उपलब्ध होतील. प्रत्येक वर्षी आठ या प्रमाणे १६ विषय पूर्ण करून उत्तीर्ण व्हावे लागेल. सध्या दहावीच्या विद्यार्थ्यांना किमान पाच विषयांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागते. दहावीच्या वार्षिक परीक्षेसाठी तीच पद्धत कायम ठेवली जाईल. अकरावी -बारावीसाठी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखा ही पारंपरिक रचना मोडीत काढण्याची शिफारस करण्यात आली आहे. अकरावी - बारावीमध्ये विद्यार्थ्यांना मानव्यता, गणित आणि संगणन, व्यावसायिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, कला शिक्षण, समाजशास्त्र, विज्ञान आणि आंतरविद्याशाखा यांतून त्यांच्या आवडीनुसार तीन शाखांतील एकूण १६ विषयांची निवड करता येईल. सध्याच्या परीक्षा पद्धतीनुसार अकरावी आणि बारावीची परीक्षा एकदाच घेतली जाते. मात्र नव्या आराखड्यात वर्षातून दोनवेळा, सत्र पद्धतीने परीक्षा घेण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यामुळे या दोन परीक्षांचा मिळून एकत्रित निकाल जाहीर केला जाईल. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मधील तरतुदीनुसार टप्प्याटप्प्याने 'मागणीनुसार परीक्षा' पद्धतीकडे जाण्याबाबतही आराखड्यात नमूद करण्यात आले आहे. त्याशिवाय शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातील विद्यार्थ्यांनी आधीच्या वर्षी शिकलेल्या संकल्पनांची उजळणी होण्यासाठी महिन्याभराचा 'ब्रिज कोर्स' प्रस्तावित करण्यात आला आहे. नवा आराखडा २०२४-२५ पासून लागू करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

chinmay.patankar@expressindia.com

epaper.loksatta.com

लोकसत्ता Sat, 08 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72122382

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

### राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात शिफारस

# दहावी, बारावीसाठी सत्र परीक्षा?

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे स्तोम कमी करण्याची शिफारस राष्ट्रीय शिक्षण धोरण मसुद्यात करण्यात आल्यानंतर आता राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या मसुद्यात परीक्षांचे नवे स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. दहावी आणि बारावी या महत्त्वाच्या टप्प्यांवरील मूल्यमापन हे फक्त वार्षिक परीक्षेच्या आधारे न करता सत्र पद्धत लागू करावी, तसेच बारावीच्या अंतिम निकालात अकरावीचे गुण विचारात घेण्यात यावेत, अशी शिफारस आराखड्यात करण्यात आली आहे.



## बदल कधीपासून?

अभ्यासक्रम आराखड्याचा अंतरिम मसुदा जाहीर करण्यात आला आहे. इस्रोचे प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासक्रम आराखडा समिती नेमण्यात आली होती. या समितीने जाहीर केलेल्या या आराखड्यावर सूचना, शिफारसी मागवण्यात आल्या आहेत. आलेल्या सूचनांचा विचार करून आनुषंगिक बदल करून अंतिम आराखडा जाहीर करण्यात येईल. त्यानंतर पुढील शैक्षणिक वर्षापासून म्हणजे २०२४ पासून बदल लागू करण्याचे नियोजन आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचा अंतरिम मसुदा गुरुवारी जाहीर केला. त्यामध्ये अभ्यासक्रमांतील बदलांबरोबरच अध्यापन पद्धती, मूल्यमापन पद्धतीतील बदलांचाही समावेश करण्यात आला आहे. दहावी म्हणजे माध्यमिक शालान्त परीक्षा आणि बारावी म्हणजेच उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा या दोन टप्प्यांवर पुढील प्रवेश, विद्याशाखेची निवड अशा अनेक बाबी अवलंबून आहेत. त्यामुळे या परीक्षांना अनन्यसाधारण महत्व आहे. सध्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळासह (सीबीएसई) विविध राज्य मंडळांमध्ये दहावी आणि बारावीची परीक्षा वर्षाअखेरीस घेण्यात येते आणि त्या एकाच परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या कामगिरीनुसार अंतिम निकाल जाहीर करण्यात येतो.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार करण्यात आलेल्या अभ्यासक्रम आराखड्यात या परीक्षा पद्धतीत बदल सुचवण्यात आला आहे. नववी ते बारावी असा एकत्रित शैक्षणिक टप्पा विचारात घेण्यात येणार आहे.

लोकसत्ता Sat, 08 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72122491

# 'लवचिकता' हे नव्या शैक्षणिक धोरणाचे वैशिष्ट्य : डॉ. करमळकर



पुणे, दि. ७ - नव्या शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्याला प्रत्येक टप्प्यावर अभ्यासक्रम पूर्ण करत बाहेर पडण्याची संधी आहे. आवडीच्या विषयातील अभ्यासक्रमही निवडण्याची मुभा आहे. 'लवचिकता' हे नव्या शैक्षणिक धोरणाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नव्या शैक्षणिक धोरणानुसार होणाऱ्या बदलांनी गोंधळून, घाबरून न जाता याकडे संधी म्हणून पाहावे, असे विचार माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले आहे.

**■ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात व्याख्यान**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या धोरणाच्या अनुषंगाने शिक्षणात होणाऱ्या बदलांची माहिती देण्यासाठी जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र- कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ.प्रफुल्ल पवार, तज्ज्ञ मार्गदर्शक प्राचार्य अनिल राव, मुंबई विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. आर.डी.कुलकर्णी, व्यवस्थापन परिषद सदस्य व कार्यक्रमाचे संयोजक डॉ.रविंद्र शिंगणापूरकर, बागेश्री मंठाळकर, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ.संजय ढोले आदी उपस्थित होते.

डॉ. करमळकर यांनी विस्ताराने धोरणाविषयी माहिती दिली. राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये, सर्व अभिमत महाविद्यालयात येत्या शैक्षणिक वर्षापासून पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला टप्प्याटप्प्याने सुरुवात केली जाणार असल्याचे डॉ. करमळकर यांनी पालक विद्यार्थी सवांदादरम्यान सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक धोरणात सरसकट चार वर्षाची पदवी अनिवार्य नसेल, असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ.कारभारी काळे यांनी या शैक्षणिक धोरणाची संकल्पना समजून घ्यावी असे आवाहन विद्यार्थी व पालकांना केले. यावेळी डॉ. राव यांनी सध्याची शिक्षण पद्धती कशी सुरू आहे, त्यात का बदल करणे आवश्यक आहेत, नवीन शैक्षणिक धोरण कशासाठी आणले आहे, त्याची अंमबजावणी कशी होणार आहे आदी बाबी सोप्या भाषेत समजावून सांगितल्या.

तर डॉ.आर.डी.कुलकर्णी पदवी अभ्यासक्रम कसा बदलणार आहे, क्रेडिट सिस्टीम कशी लागू होणार, बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय म्हणजे काय, क्रेडिट बँक, मल्टिपल एन्ट्री, मल्टिपल एक्झिट, तसेच विद्यार्थी त्यांचे विषय कसे निवडतील, भाषा, कौशल्य आदींचा समावेश याबाबत सविस्तर सांगितले. डॉ. वैभव जाधव यांनी मानले.

प्रभात PuneCity, 08 Apr 2023, Page:010
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

## बारावीची परीक्षा दोन पद्धतींत, अकरावीच्या गुणांचाही विचार

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ७ -** राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार राष्ट्रीय अभ्यासक्रम संरचना संस्थेने (एनसीएफ) बारावीच्या बोर्ड परीक्षा वैकल्पिक आणि वर्णनात्मक अशा पद्धतीत वर्षातून दोन वेळा घेण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार बारावीची परीक्षा वर्षातून दोन टप्प्यांत घेण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे या परीक्षेच्या पॅटर्नमध्ये बदल होण्याची चिन्हे आहेत.

तब्बल १८ वर्षांनंतर देशभरात शालेय शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी नवी संरचना तयार करण्यात येत आहे. यात नववी ते बारावीच्या परीक्षांबाबतच्या दूरगामी परिणामकारक शिफारशी करण्यात आल्या आहेत. या लवकरच सार्वजनिक करण्यात येतील. त्यावर नागरिकांकडून हरकती व सूचना मागवण्यात येतील. त्यानंतर अंतिम परीक्षा रचना करण्यात येणार आहे. परीक्षा रचना आणि अभ्यासक्रम अंतिम झाल्यावर शैक्षणिक वर्ष २०२४ पासून ही नवीन पद्धती लागू करण्याचा सरकारचा विचार सुरू आहे. त्याप्रमाणे दहावी व बारावीच्या अंतिम निकालात त्यापूर्वीच्या म्हणजेच अनुक्रमे नववी व अकरावीतील गुणांचाही विचार व्हावा, अशी शिफारशी करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्याला अकरावी आणि बारावीची परीक्षा देताना वेगवेगळ्या अभ्यासक्रमांची निवड करता येणार असल्याचे अहवालात म्हटले आहे.

**नवीन शिक्षण धोरण : 'एनसीएफ'ची शिफारस**

**■ अभ्यासक्रम निवडीचे स्वातंत्र्य**

अकरावी आणि बारावीमध्ये विद्यार्थ्यांना आपल्याच विद्याशाखेतील विषय निवडण्याचे बंधन असते. मात्र नव्या अभ्यासक्रमात याविषयी लवचिकता असेल. इयत्ता नववीनंतर आवडत्या विषयांची निवड करता येणार आहे. त्यातून विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट होणार आहेत.

प्रभात PuneCity, 08 Apr 2023, Page:
https://epaper.dainikprabhat.c

सामना

## येत्या वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू होणार!

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) - सर्व सार्वजनिक विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये, सर्व अभिमत महाविद्यालये यांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून (२०२३-२४) पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात केली जाणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी पालक विद्यार्थी संवादादरम्यान दिली.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या धोरणाच्या अनुषंगाने शिक्षणात होणाऱ्या बदलांची माहिती देण्यासाठी जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. त्यावेळी डॉ. करमळकर बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, सुकाणू समिती सदस्य व तज्ज्ञ मार्गदर्शक प्राचार्य अनिल राव, समिती सदस्य व मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. आर. डी. कुलकर्णी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र शिंगणापूरकर, बागेश्री मंठाळकर, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. करमळकर यांनी विस्ताराने धोरणाविषयी माहिती दिली. सरसकट चार वर्षांची पदवी न होता विद्यार्थ्याला प्रत्येक टप्प्यावर अभ्यासक्रम पूर्ण करत बाहेर पडण्याची संधी आहे असे सांगत असताना ते म्हणाले, पालकांनी विद्यार्थ्यांनी धोरणानुसार होणाऱ्या बदलांनी गोंधळून, घाबरून न जाता याकडे संधी म्हणून पाहावे.

डॉ. कारभारी काळे यांनी या शैक्षणिक धोरणाची संकल्पना समजून घ्यावी, असे आवाहन विद्यार्थी व पालकांना केले.

डॉ. आर. डी. कुलकर्णी पदवी अभ्यासक्रम कसा बदलणार आहे, क्रेडिट सिस्टीम कशी लागू होणार, बहुविद्याशाखीय, आंतरविद्याशाखीय म्हणजे काय, क्रेडिट बँक, मल्टिपल एन्ट्री, एक्झिट तसेच विद्यार्थी त्यांचे विषय कसे निवडतील, भाषा, कौशल्य आदींचा समावेश याबाबत सविस्तर सांगितले.

रवींद्र शिंगणापूरकर म्हणाले, पालक विद्यार्थी आणि समिती सदस्य यांचा संवाद घडवून आणण्याचा हा पहिला अभिनव उपक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने केला आहे. यातून अनेक पालकांच्या मनातील अनेक शंका दूर झाल्या असतील, अशी आशा आहे.

Pune Edition
Apr 8, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची

**पुणे** : जागतिक पातळीवरील भारतीय लाटेत उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये यासाठी मोठ्या प्रमाणावर बदल केले आहेत, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान मंडळाचे सचिव मनीष जोशी यांनी व्यक्त केले..

शैक्षणिक धोरणात होत असणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मनीष जोशी यांच्याशी संवादाचे तसेच त्यांची माजी विद्यार्थी संघाच्या मानद सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या सन्मानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आपल्या सादरीकरणादरम्यान ते बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या अंमलबजावणीसाठी नेमण्यात आलेल्या राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष व विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विद्यापीठ सल्लागार समिती सदस्य आणि माजी विद्यार्थी संघाचे संचालक राजेश पांडे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले, व्यवस्थापन परिषद सदस्य रविंद्र शिंगणापूरकर, प्रसेनजीत फडणवीस, बागेश्री मंठाळकर, अधिसभा सदस्य राहुल पाखरे, मुकुंद पांडे, तसेच विविध शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी मनीष जोशी यांनी भारत जागतिक पातळीवर स्टार्टअप, संशोधन, इनोव्हेशनमध्ये कुठे आहे याची माहिती दिली. गेल्या काही वर्षात ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये भारत ८१व्या स्थानावरून ४१व्या स्थानावर आला आहे. भारतातील ४९ टक्के स्टार्ट अप हे टायर २ आणि टायर ३ च्या शहरातून आले आहेत. रिसर्च अँड डेव्हलमेंटवरचा खर्च हा तिप्पट झाला आहे असे अनेक दाखले त्यांनी यावेळी दिले.

जोशी म्हणाले, आफ्रिका या देशाचे मनुष्यबळ हे काही वर्षात भारतापेक्षाही अधिक असेल मात्र ते कौशल्यधारीत असेलच असे नाही. याउलट आपले मनुष्यबळ अधिक कौशल्यपूर्ण करण्याची या शैक्षणिक धोरणाने ही संधी दिली आहे. यासाठी उच्च शिक्षणात कौशल्य, पायाभूत सुविधा, नवीन तंत्रज्ञान, शाळांचे आधुनिकीकरण, जागतिक शिक्षणाची उपलब्धता आदी बाबी आपण करत आहोत. तसेच महिला सक्षमीकरण, ऑनलाईन शिक्षण, डिजिटल विद्यापीठ, उच्च शिक्षणातील विद्यार्थी संख्या वाढविणे आदी बाबींवर भर देण्यात येत आहे. देशात १५ लाख उच्च शिक्षणातील शिक्षक आहेत तर चार कोटींहून अधिक विद्यार्थी आहे. या सगळ्यांसाठी आपल्याला काम करायचे आहे असेही जोशी यावेळी म्हणाले.

यावेळी उपस्थितांच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, त्याची अंमलबजावणी याविषयी शंकांचे निरसन जोशी यांनी केले.

Kesari 10.4.2023

# Changes the NCF 2023 draft proposes in the school education system

**SOURAV ROY BARMAN**
NEW DELHI, APRIL 9

THE SCHOOL education system in India may undergo a major restructuring, with an expert committee appointed by the Union government recommending board examinations twice a year, a semester system for Class 12, and the freedom to students to pursue a mix of science, humanities, and commerce subjects.

On Thursday, the Ministry of Education released the pre-draft of the National Curriculum Framework (NCF) for school education for feedback from the public. Following this exercise, the draft will be finalised after further discussions involving the national steering committee led by former ISRO chairperson K Kasturirangan.

**What is the NCF?**

The NCF, which was last revised in 2005, is a key document based on which school textbooks are prepared. So the current set of NCERT textbooks, barring the changes made over the last few years, are all based on the NCF 2005. The latest round of revisions in the NCF has been underway since September 2021.

Besides Dr Kasturirangan, the 12-member steering committee includes Fields Medal recipient Manjul Bhargava, the author of *The Lost River: On The Trail of Saraswati*, Michel Danino, Jamia Millia Islamia University Vice-Chancellor Najma Akhtar, and Central Tribal University of Andhra Pradesh Vice-Chancellor T V Kattimani.

**What are the proposed changes?**

Among the most significant recommendations in the draft NCF are those on the choice of subjects and exams in Classes 9-12. Over two years, in Classes 9 and 10, students will study 16 courses categorised under eight curricular areas. The suggested curricular areas are Humanities (including languages), Mathematics & Computing, Vocational Education, Physical Education, Arts, Social Science, Science and Inter-disciplinary Areas. Students will have to clear eight board exams, each of which will assess their grasp of the courses they learnt in Classes 9 and 10.

**EXPLAINED**
**EDUCATION**

Under the current system, there are no links of this kind between Classes 9 and 10, and students under most boards have to pass at least five subjects to clear Class 10.

The committee has recommended more changes at the level of Classes 11 and 12, including the introduction of a semester system in Class 12. In terms of subjects, students can pick 16 courses of their choice from eight curricular areas.

Currently, in Class 12, CBSE students appear for the board exam in at least five, and a maximum of six, subjects, and there is little scope for them to pursue multidisciplinary education. But under the proposed system, that will be possible as the National Education Policy (NEP), 2020 envisages "no hard separation" among arts, humanities, and sciences.

**And what about younger students?**

At the foundational level, for children aged 3-8 enrolled in grades between pre-school and Class 2, a play-based pedagogical approach has been suggested. The draft says textbooks are to be used from Class 1, and that most of the content should comprise toys, puzzles, and manipulatives.

For Classes 3, 4, and 5, children are to be introduced to textbooks on languages and mathematics, while also retaining the activity and discovery-based approach. In the middle stage (Classes 6, 7, 8), natural as well as social sciences will be introduced.

**What are the proposed changes in specific subjects?**

The NCF pre-draft does not have much about specific changes in textbooks, instead it has observations and suggestions. For instance, it says that stressing on a lone piece of evidence instead of exposing children to multiple contrasting pieces of evidence throws up a "lopsided or inadequate picture" of a topic in social science textbooks. On maths, it says that many students have developed a "real fear" of the subject. The solution, the committee says, is a shift towards play, activity, discovery and discussion-based learning.

**When will the changes come into effect?**

The government recently announced that textbooks based on the revised NCF will be taught in schools starting from the 2024-25 session. But a specific timeline on the implementation of the changes on exams, assessment and subject design has not been made available yet.

Feedback can be given on the email address ncf.ncert@ciet.nic.in

**LONGER VERSION**
**INDIANEXPRESS.COM/EXPLAINED**

Indian Express 10.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# देशाच्या उत्कर्षात उच्च शिक्षणाची भूमिका महत्त्वाची : मनीष जोशी

### शैक्षणिक धोरणांतील बदलांबाबत विद्यापीठात संवाद

**पुणे, ता. ९ :** जागतिक पातळीवरील भारताच्या उत्कर्षात उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये यासाठी मोठे बदल केले आहेत, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) सचिव मनीष जोशी यांनी व्यक्त केले. शैक्षणिक धोरणात होत असणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने विद्यापीठात मनीष जोशी यांच्याशी संवादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच त्यांची माजी विद्यार्थी संघाच्या मानद सदस्यपदी निवड करण्यात आली.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी नेमण्यात आलेल्या राज्य सुकाणू समितीचे अध्यक्ष व विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र- कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विद्यापीठ सल्लागार समिती सदस्य आणि माजी विद्यार्थी संघाचे संचालक राजेश पांडे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. संजय ढोले, व्यवस्थापन परिषद सदस्य रविंद्र शिंगणापूरकर, प्रसेनजीत फडणवीस, बागेश्री मंठाळकर, अधिसभा सदस्य राहुल पाखरे, मुकुंद पांडे आदी या वेळी उपस्थित होते.

जोशी पुढे म्हणाले, "आफ्रिकाचे मनुष्यबळ हे काही वर्षात भारतापेक्षाही अधिक असेल. मात्र, ते कौशल्यधारीत असेलच असे नाही. याउलट आपले मनुष्यबळ अधिक कौशल्यपूर्ण करण्याची या शैक्षणिक धोरणाने ही संधी दिली आहे. यासाठी उच्च शिक्षणात कौशल्य, पायाभूत सुविधा, नवीन तंत्रज्ञान, शाळांचे आधुनिकीकरण, जागतिक शिक्षणाची उपलब्धता आदी बाबी आपण करत आहोत. तसेच महिला सक्षमीकरण, ऑनलाइन शिक्षण, डिजिटल विद्यापीठ, उच्च शिक्षणातील विद्यार्थी संख्या वाढविणे आदी बाबींवर भर देण्यात येत आहे."

### शंकांचे निरसन

- देशात १५ लाख उच्च शिक्षणातील शिक्षक आहेत, तर चार कोटींहून अधिक विद्यार्थी आहेत. या सगळ्यांसाठी आपल्याला काम करायचे आहे, असेही जोशी म्हणाले. उपस्थितांच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, त्याची अंमलबजावणी याविषयी शंकांचे निरसन जोशी यांनी या वेळी केले.

Sakaal 10.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

### एकाच वेळी अनेक विषयांचे शिक्षण, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यातील शिफारस

# कला, विज्ञान, वाणिज्य शाखा लवकरच मोडीत

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** दहावीनंतर नेमका कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा, हा विद्यार्थी आणि पालकांना सतावणारा सनातन प्रश्न येत्या काळात हद्दपार होणार आहे. सध्या ढोबळपणे विज्ञान, वाणिज्य, कला, व्यवसाय शिक्षण अशा शाखांमध्ये विभागलेले शिक्षण अकरावीपासूनच मोडीत काढण्याची सूचना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना कोणत्याही एका शाखेत प्रवेश घेण्याऐवजी आठ विद्याशाखांतील हवे ते विषय एकाच वेळी शिकण्याची मुभा देण्याची शिफारस आराखड्यात करण्यात आली आहे.



राष्ट्रीय शिक्षण धोरणात विद्याशाखानिहाय शिक्षणाची चौकट मोडण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार अभ्यासक्रम आराखड्यात सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे यानंतर विद्यार्थ्यांना अकरावीच्या प्रवेशासाठी कोणतीही विशिष्ट शाखा निवडावी लागणार नाही. मानव्यविज्ञान, गणित आणि संगणकशास्त्र, व्यवसाय शिक्षण, शारीरिक शिक्षण, सामाजिक शास्त्र, कला आणि शिक्षणशास्त्र, विज्ञान आणि इतर अशा आठ विद्याशाखांमध्ये विषय विभागणी करण्यात आली आहे. त्यातील किमान तीन विद्याशाखांतील विषय विद्यार्थ्यांना निवडता येतील. एकूण १६ विषय विद्यार्थ्यांना निवडता येतील, मात्र त्यातील किमान चार विषय हे एकाच विद्याशाखेतील असणे आवश्यक आहे. अकरावी आणि बारावीचे वर्ष आणि परीक्षा या सत्र पद्धतीनुसार घेण्यात येतील, अशीही सूचना करण्यात आली आहे.

### थोडक्यात...

- अकरावी प्रवेशावेळी कोणतीही विशिष्ट शाखा निवडण्याची गरज नाही.
- आठ विद्याशाखांमध्ये विषयांची विभागणी, किमान तीन विद्याशाखांतील विषय निवडण्याची संधी.
- एकूण १६ विषय निवडण्याची मुभा, मात्र किमान चार विषय एकाच विद्याशाखेतील असणे अनिवार्य.

### नववी ते १२वी एकसंध?

या नव्या शिक्षणाचा पाया नववी, दहावीच्या वर्गापासूनच तयार करण्याच्या सूचना आहेत. नववी आणि दहावीसाठीही विद्यार्थ्यांना विविध विषयांतील पर्याय निवडण्याची मुभा मिळेल. सध्याचे नववी आणि दहावी हा माध्यमिक तसेच अकरावी आणि बारावी हा उच्च माध्यमिक हे दोन्ही टप्पे मोडीत काढून नववी ते बारावीचा एकसंध विचार करण्याची शिफारस राष्ट्रीय शिक्षण धोरणात करण्यात आली आहे.

लोकसत्ता Mon, 10 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72136415

# पदवी द्वितीय वर्षाची परीक्षाही महाविद्यालयस्तरावर

## निकाल वेळेतच लावण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १० -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा वेळेत पूर्ण होण्यासाठी आणि त्याचा निकालही तातडीने लागण्यासाठी आता बी.ए. आणि बी.एस्सी. अभ्यासक्रमांच्या पदवीच्या प्रथम वर्षाप्रमाणेही द्वितीय वर्षाची परीक्षाही त्या-त्या महाविद्यालयस्तरावर घेण्यात येणार आहे. येत्या बुधवारी होणाऱ्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब होणार असून, हा निर्णय केवळ याच परीक्षापुरता असेल.



करोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अन्य विद्यापीठांनी ऑनलाइन परीक्षा घेऊन शैक्षणिक सत्र पूर्वपदावर आणले आहे. त्यामुळे तेथे नेहमीप्रमाणे जुलैमध्ये शैक्षणिक सत्र सुरू होत आहे. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला शैक्षणिक सत्र वेळेत सुरू करण्यासाठी अजूनही भरपूर प्रकारे प्रयत्न करावे लागत आहेत. त्यानंतरही ऑगस्टमध्ये शैक्षणिक सत्र सुरू होईल, याविषयी सांशकता आहे.

या पार्श्वभूमीवर आगामी सत्र परीक्षांचे नियोजन वेळेत करण्यासाठी अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर आणि डॉ. विजय खरे यांची समिती स्थापन करण्यात आली. त्यांच्याकडून पदवीच्या द्वितीय वर्षाची परीक्षा महाविद्यालयस्तरावर घेण्याची चाचपणी सुरू आहे. त्यामुळे परीक्षाही लवकर होतील आणि निकालही वेळेत लागेल.

सध्या बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. पदवीच्या प्रथम वर्षाची परीक्षा त्या त्या महाविद्यालयस्तर होतात. परीक्षाची तपासणीही व निकाल संबंधित महाविद्यालयाकडून जाहीर केला जातो. त्यामुळे ही सर्व प्रक्रिया वेळेत होते. त्याचपद्धतीने आता ही परीक्षा घेण्यात येणार आहे. मात्र, पदवीच्या अंतिम वर्षाची परीक्षा मात्र प्रचलित पद्धतीने होईल.

### कसे असेल द्वितीय वर्षाचे नियोजन

शैक्षणिक वर्ष सुरळीत करण्यासाठी बी.ए. आणि बी.एस्सी. पदवी द्वितीय वर्षाच्या प्रश्नपत्रिका पुणे विद्यापीठाकडून तयार करून, संबंधित महाविद्यालयास पाठविण्यात येतील. परीक्षेचे वेळापत्रकही महाविद्यालयाकडून प्रसिद्ध होईल. लेखी परीक्षांचे संपूर्ण नियोजन महाविद्यायलस्तरावर होईल. उत्तरपत्रिकांची तपासणीही महाविद्यालयात होऊन गुण विद्यापीठाला पाठविण्यात येईल. शेवटी विद्यापीठाकडून निकाल प्रसिद्ध होईल.

प्रभात PuneCity, 11 Apr 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# पुणे विद्यापीठाची शैक्षणिक घडी अद्याप विस्कटलेलीच

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १०** - अबालवृद्धांबरोबरच सर्वच क्षेत्रे करोनातून सावरली असताना, जगभरात डंका असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या महामारीच्या संकटातून अद्यापही सावरले नाही. विद्यापीठातील शैक्षणिक सत्रांबरोबरच अन्य कामकाजांचेही वेळापत्रक अद्याप पूर्वपदावर येऊ शकलेले नाही. त्यामुळे याचा विद्यार्थ्यांच्या परीक्षा आणि निकालांवर परिणाम होत आहे. दरम्यान, विस्कटलेली घडी पुन्हा बसविण्यासाठी समिती नेमन्यात आली आहे.



करोनाच्या प्रादुर्भावामुळे विस्कळीत झालेले वेळापत्रक पूर्वपदावर आणण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने येत्या १ ऑगस्टपासून शैक्षणिक सत्र सुरू करण्याचे नियोजन केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाने सोमवारी समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे. त्याद्वारे शैक्षणिक वेळापत्रक निश्चित केले जाणार आहे. विद्यापीठाची सोमवारी व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. त्यात करोना

## करोना काळात विस्कळलेले वेळापत्रक पूर्वपदावर आणण्यासाठी समिती

संसर्गाच्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक सत्र जून-जुलैमध्ये सुरु होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. कारण विद्यापीठाच्या द्वितीय सत्राची परीक्षा जूनपासून सुरू होणार आहेत. त्यानंतर ऑगस्ट-नोव्हेंबरमध्ये शैक्षणिक सत्र सुरू होण्याची शक्यता आहे. यापूर्वीच निकालाला विलंब होऊ नये, यासाठी विद्यापीठाने पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका ऑनलाइन तपासण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर आता विद्यापीठाने यंदाचे शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून सुरू करण्याच्या नियोजनासाठी प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. त्यामुळे शैक्षणिक सत्र ऑगस्टमध्ये सुरु होण्याची चिन्हे आहेत.

मार्च महिन्यात झालेल्या अधिसभेत परीक्षेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. त्यावेळी परीक्षा विषयक कामकाजाचा निपटारा होण्याच्या दृष्टीने डॉ. राजेंद्र विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. यांच्याकडून नव्याने स्थापन करण्यात आलेल्या समितीला सूचना करण्यात आल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली. महाविद्यालयीन स्तरावर विविध कारणांनी भेटी देणाऱ्या विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीमध्ये पात्र असणाऱ्या सर्व घटकांचा सहभाग करण्याकरीता धोरण राबविण्यासाठी प्राचार्य डॉ. घोरपडे नितीन लक्ष्मण यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सव आयोजन करण्यासाठी आणि 'जी २०' परिषदेच्या अनुशंगाने विद्यापीठात कार्यक्रम आयोजन करण्याकरीता समिती नेमण्यात आली, अशी माहिती कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिली.

प्रभात PuneCity, 11 Apr 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

# नव्या अभ्यासक्रमांसाठी सूचना करा; पुणे विद्यापीठाचे आवाहन

**पुणे, दि. १०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत् आराखडा तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. यावर विद्यार्थी, पालक, शिक्षक, संस्थाचालक, लोकप्रतिनिधींनी सूचना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या शैक्षणिक संलग्नता कक्षातर्फे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियममधील तरतुदींनुसार विद्यापीठाचा २०२४-२५ ते २०२९-३० या पंचवार्षिक बृहत् आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. आराखडा तयार करत असताना प्रत्येक प्रदेशानुसार सामाजिक व आर्थिक गरजांचा, नोकरीच्या उपलब्ध संधींचा व उद्योगांच्या आवश्यकतांचा अभ्यास करून नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम व विद्याशाखा यांचा समावेश करण्याच्या अनुषंगाने सर्व घटकांकडून सूचना मागविण्यात येत आहेत. यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सर्व्हे अर्ज तयार करण्यात आला आहे. सूचनांचा आराखड्यात समावेश करण्यात येईल, असेही विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे.

प्रभात PuneCity, 11 Apr 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# शाळा जुनीच; पण शिक्षण नवे!

### नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जूनपासून

**पुणे, दि. १०** - नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षात जूनपासून करण्यात येणार आहे, असे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी स्पष्ट केले आहे. केसरकर यांनी पुणे दौऱ्यावर आले असताना सोमवारी दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवादही साधला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली आहे. या धोरणाच्या माध्यमातून शिक्षण पध्दतीत आमूलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. शैक्षणिक धोरण सहजासहजी लक्षात येत नसल्याने त्याच्या जनजागृतीबाबत कार्यशाळा, सेमिनार, बैठका घेण्यालाही प्राधान्य देण्यात येवू लागले आहे.

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लवकर मदत मिळालीच पाहिजे अशी भावना आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येणार आहे. सॅटेलाईटद्वारे पंचनामे करण्याचा विषय कॅबिनेट पुढे आला आहे. मात्र, यावरुन राजकारण करणे योग्य नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### मातृभाषेतील शिक्षण महत्त्वाचे

केसरकर यांनी नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत शासनाची भूमिका स्पष्ट केली. शैक्षणिक धोरण जूनपासून लागू करण्यात येणार आहे. अभियांत्रिकी, तांत्रिक शिक्षणही विद्यार्थ्यांना मराठी भाषेतून देण्यात येणार आहे. याबरोबरच वैद्यकीय शिक्षणही मराठीतून देण्यात येणार आहे. मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या देशामध्ये सर्वाधिक शास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते आहेत, असेही त्यांनी सांगितले.

प्रभात PuneCity, 11 Apr 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

सकाळ

### कुलसचिव डॉ. पवार यांची माहिती : व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठरली नियोजनाची दिशा

# शैक्षणिक वर्ष एक ऑगस्टपासून होणार सुरू

**पुणे, ता. १०** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पुढील शैक्षणिक वर्ष एक ऑगस्टपासून सुरू करणार आहे. त्यादृष्टीने नियोजन करण्यासाठी प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या समितीमार्फत शैक्षणिक वेळापत्रक निश्चित करून नियोजन करण्यात येईल," अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिली.



विद्यापीठाच्या नव्याने स्थापन झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या नवनियुक्त सदस्यांची ही पहिलीच सभा झाली. सर्व सदस्यांबरोबर विद्यापीठातील संविधानिक अधिकारी, प्रशासकीय विभागप्रमुख, शाखाप्रमुख यांच्यासमवेत परिचय आणि संवाद झाला. त्यानंतर व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली.

नुकत्याच झालेल्या अधिसभेत यापूर्वी स्थापन केलेल्या डॉ. राजेंद्र विखे- पाटील समितीसमवेत सहयोगाने विद्यापीठाच्या परिक्षा विषयक कामकाज वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याबाबत समितीला सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कोरोनाच्या संकटामुळे शैक्षणिक वर्षात आलेली अनियमितता पुन्हा सुरळीत करण्यासाठी विद्यापीठाचे हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरणार आहे.तसेच विद्यापीठाच्या अमृत महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. 'जी २०' परिषदेच्या अनुषंगाने विद्यापीठात कार्यक्रम आयोजन करण्यासाठी रवींद्र शिंगणापूरकर अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे, असे डॉ. पवार यांनी सांगितले.

### सर्व घटकांच्या सहभागासाठी धोरण राबविणार

■ याशिवाय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठाच्या नगर आणि नाशिक येथील उपकेंद्र विकास व समन्वय समितीचे स्थापन करण्यात आले आहे. यात डॉ. विखे-पाटील, सागर वैद्य यांची निमंत्रक म्हणून नियुक्ती केली आहे. या समितीमध्ये विद्यापीठाचे संबंधित जिल्ह्यातील व्यवस्थापन परिषद आणि अधिसभा सदस्यांचा समावेश असणार आहे, तसेच महाविद्यालयीन स्तरावर विविध कारणांनी भेटी देणाऱ्या विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीमध्ये पात्र असणाऱ्या सर्व घटकांचा सहभाग सुनिश्चित करण्याचे धोरण राबविण्यासाठी प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती केली आहे.

Pune, Main
11/04/2023 Page No. 5

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

सकाळ

# सांख्यिकीशास्त्रज्ञ राव यांना आंतरराष्ट्रीय सन्मान

**वॉशिंग्टन, ता. १० (पीटीआय):** भारतीय अमेरिकी गणितज्ज्ञ कल्यामपुडी राधाकृष्ण राव यांना सांख्यिकीमधील 'इंटरनॅशनल प्राइज इन स्टॅटिस्टिक्स' हा प्रतिष्ठेचा सन्मान जाहीर केला आहे. हा पुरस्कार नोबेल सन्मानाच्या समकक्ष मानला जातो. अभ्यासातून आणि संशोधन कार्यातून सांख्यिकी शास्त्रात ७५ वर्षांपूर्वी क्रांतिकारी बदल घडवून आणल्याच्या सन्मानार्थ सी. आर. राव यांचा गौरविण्यात येत आहे.

स्टॅटिस्टिक्स फाउंडेशनने निवेदनात म्हटले, की ७५ वर्षांपूर्वी राव यांनी केलेल्या कार्याने सांख्यिकीशास्त्रावर आमूलाग्र बदल झाला आहे. राव आता १०२ वर्षांचे आहेत. येत्या जुलै महिन्यात त्यांना कॅनडातील ओटावा येथे जागतिक सांख्यिकी परिषदेत त्यांना गौरविण्यात येणार असून पुरस्काराचे स्वरूप ८० हजार अमेरिकी डॉलर एवढे आहे. 'इंटरनॅशनल प्राइज इन स्टॅटिस्टिक्स फाउंडेशन'चे गाय नेसन म्हणाले, की हा सन्मान त्यांच्या कार्याचा आहे.

Pune, Main
11/04/2023 Page No. 8

सकाळ

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जूनपासून

## शिक्षणमंत्री केसरकर यांची माहिती

**पुणे, ता. १० :** ''बहुप्रतीक्षित असणारे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्यात येत्या जूनपासून लागू होणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी जूनपासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षापासून केली जाईल,'' असे सूतोवाच शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केले.



पुणे दौऱ्यावर असताना सोमवारी केसरकर यांनी ही माहिती दिली. दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या कुटुंबीयांची केसरकर यांनी भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबद्दल सांगितले. पान ८ वर >

### मुंबईवर हक्क सांगणाऱ्यांनी अडीच वर्षांत काय केले?

■ "आज आम्ही भाजपसमवेत युतीत आहोत आणि आमचे चांगले संबंध आहेत. मुंबईतील मराठी माणसाला न्याय द्यायचा आहे. शुद्ध हवा हा येथील प्राधान्यक्रमावरील विषय आहे. मुंबईवर हक्क सांगतात, त्यांनी अडीच वर्षांत पर्यावरणावर काहीच काम केले नाही. त्यांनी केलेल्या चुका आम्ही सुधारत आहोत," असे केसरकर यांनी सांगितले. 'मुंबईचा महापौर कोण असेल' या चर्चेबाबत ते म्हणाले, "मैत्रीमध्ये पदाची चर्चा असता कामा नये, तर जनतेला काय द्यावचे हे महत्त्वाचे आहे. मुंबईला आंतरराष्ट्रीय शहर बनविण्याचा आमचा निर्धार आहे."

Pune, Main
11/04/2023 Page No. 1

सकाळ

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जूनपासून

> पान १ वरून

ते म्हणाले, ''अभियांत्रिकी, तांत्रिक शिक्षण हे मराठीतून देण्यात येणार आहे. त्याप्रमाणे लवकरच वैद्यकीय शिक्षणही मराठीतून दिले जाणार आहे. मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या देशांमध्ये सर्वाधिक शास्त्रज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते आहेत. आता भारतातही मातृभाषेतील शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जाईल.''

शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत केसरकर म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येतील. सॅटेलाईटद्वारे पंचनामे करण्याचा विषय कॅबिनेटमध्ये आला आहे.''

Pune, Main
11/04/2023 Page No. 8

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

पुढारी

# विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाचे पुढील शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून सुरू करायचे असून, त्याचे नियोजन करण्याकरिता डॉ. देविदास भीमराव वायदंडे यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक वेळापत्रक निश्चित करून त्याचे नियोजन करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे.



**व्यवस्थापन परिषदेच्या पहिल्याच बैठकीत निर्णय**

व्यवस्थापन परिषदेचे नव्याने गठन झाल्यानंतर नवनियुक्त सदस्यांची पहिलीच सभा असल्यामुळे सर्व सदस्यांबरोबर विद्यापीठातील संविधानिक अधिकारी तसेच प्रशासकीय विभागप्रमुख व शाखाप्रमुख यांच्याबरोबर परिचय व संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासह अन्य विषयांबाबत निर्णय घेण्यात आले.

विद्यापीठाच्या परीक्षाविषयक कामकाजाचा वेळेत निपटारा होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याबाबतदेखील सूचना करण्यात आल्या. अहमदनगर व नाशिक उपकेंद्र विकास व समन्वय समितीचे गठन करण्यात आले असून, अनुक्रमे डॉ. राजेंद्र एकनाथराव विखेपाटील व सागर अनिल वैद्य यांची निमंत्रक म्हणून नियुक्ती करण्यात आली. समितीमध्ये संबंधित जिल्ह्यातील व्यवस्थापन परिषद व अधिसभा सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. महाविद्यालयीन स्तरावर विविध कारणांनी भेटी देणाऱ्या विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीमध्ये पात्र असणाऱ्या सर्व घटकांचा सहभाग निश्चित करण्याकरिता धोरण राबविण्यासाठी डॉ. घोरपडे नितीन लक्ष्मण यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अमृत महोत्सवाचे आयोजन करण्याकरिता डॉ. राजेंद्र एकनाथराव विखेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. तसेच जी २० परिषदेच्या निमित्ताने विद्यापीठात कार्यक्रम आयोजन करण्याकरिता शिंगणापूरकर रवींद्र यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

My Pune Edition
Apr 11, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# शैक्षणिक वेळापत्रक पूर्वपदावर आणण्यासाठी समितीची स्थापना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोनाच्या प्रार्दुभावामुळे विस्कळीत झालेले विद्यापीठाचे वेळापत्रक पूर्वपदावर आणण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने येत्या १ ऑगस्टपासून पुढील वर्षाचे शैक्षणिक सत्र सुरू करण्याचे नियोजन केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून समिती नियुक्त करण्यात आली असून, समितीच्या माध्यमातून शैक्षणिक वेळापत्रक निश्चित केले जाणार आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सोमवारी झालेल्या बैठकीत शैक्षणिक वेळापत्रक, परीक्षा याबाबत चर्चा करून समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाचे शैक्षणिक वेळापत्रक विस्कळीत झाल्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२३च्या दुसऱ्या सत्राच्या परीक्षा जूनपासून सुरू होणार आहेत. त्यानंतर निकाल जाहीर होऊन पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. निकालाची प्रक्रिया वेगवान करण्यासाठी उत्तरपत्रिका तपासणी ऑनलाइन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच १ ऑगस्टपासून शैक्षणिक वर्ष सुरू करण्याचे नियोजन आहे. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष आणि शैक्षणिक वेळापत्रकासाठी प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली.

विद्यापीठाच्या मार्चमध्ये झालेल्या अधिसभेत परीक्षांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. त्या वेळी परीक्षांच्या कामकाजासाठी डॉ. राजेंद्र विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. डॉ. वायदंडे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने डॉ. विखे पाटील समितीच्या सहयोगाने नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

महाविद्यालयीन स्तरावर विविध कारणांनी भेट देणाऱ्या विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीमध्ये पात्र असणाऱ्या सर्व घटकांचा सहभाग सुनिश्चित करण्याकरिता धोरण राबवण्यासाठी प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. अहमदनगर, नाशिक उपकेंद्र विकास आणि समन्वय समिती स्थापन करण्यात आली. त्यात डॉ. राजेंद्र विखे पाटील आणि सागर वैद्य यांचा समावेश आहे.

## अमृत महोत्सव, जी-२०साठीही समिती

विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू झाले आहे. त्यामुळे अमृतमहोत्सवी वर्षातील कार्यक्रमांचे आयोजन, जी २० परिषदेच्या अनुषंगाने विद्यापीठात कार्यक्रम आयोजन करण्यासाठीही समिती नेमण्यात आल्याची माहिती कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी दिली.

लोकसत्ता Tue, 11 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72145111

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर?

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : आगामी २०२३-२४ शैक्षणिक वर्ष १ ऑगस्टपासून सुरू करण्यासाठी बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष वगळता प्रथम वर्षाप्रमाणेच द्वितीय वर्षाच्या परीक्षाही महाविद्यालय स्तरावर देण्याची तयारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. याबाबतचा अंतिम निर्णय येत्या काही दिवसांत विद्यापीठाकडून जाहीर होण्याची शक्यता असून, रेंगाळणाऱ्या परीक्षा ठरावीक मुदतीत पूर्ण करून निकाल तातडीने जाहीर करण्याचेही नियोजन सुरू आहे.

विद्यापीठाच्या कला, वाणिज्य, विज्ञान या बिगरव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा सध्या महाविद्यालयात होतात. मात्र, इतर वर्षांच्या परीक्षा विद्यापीठाकडून घेतल्या जातात. त्यामुळे परीक्षांचे नियोजन आणि परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिका तपासणीत मोठा कालावधी जातो. त्यामुळे निकालांना उशीर होतो. विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासाठी परीक्षा वेळेत होऊन निकाल कमी कालावधीत जाहीर होण्याची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर आगामी सत्र परीक्षांच्या नियोजनासाठी अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर आणि डॉ. विजय खरे यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यानुसार या समितीकडून बिगरव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर देण्याबाबत चाचपणी करण्यात येत आहे.

सध्याच्या प्रथम वर्षाला जोडूनच द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्याबाबत उपाययोजना आखण्यात येत आहे. विविध अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा दीड ते दोन महिने सुरू असतात. या परीक्षांमध्ये मोठा कालावधी जातो. त्यानंतर निकालाची प्रक्रिया होते. त्यामुळे परीक्षांबाबत नेमलेल्या समितीकडून या परीक्षांचा कालावधी एक महिन्यांवर आणण्याचा प्रयत्न केला जाईल. विद्यापीठाकडून प्रश्नपत्रिका आणि वेळापत्रक तयार करून महाविद्यालयांना दिले जाईल. त्यानंतर लेखी परीक्षा, उत्तरपत्रिकांची तपासणीही महाविद्यालयातच होऊन गुण विद्यापीठाला पाठवण्यात येईल. विद्यापीठाकडून कमी कालावधीत निकाल प्रसिद्ध करण्यात येईल. केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षाच विद्यापीठाकडून होतील. याबाबतचा अहवाल येत्या काही दिवसांत समितीकडून विद्यापीठाला देण्यात येणार आहे. त्यानंतर परीक्षा मंडळाच्या बैठकीत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

लोकसत्ता Tue, 11 April 2023 https://epaper.loksatta.com/c/7

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# परीक्षांचे नियोजन कॉलेजांकडे

## नवे वर्ष एक ऑगस्टपासून सुरू करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची तयारी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आगामी २०२३-२४ शैक्षणिक वर्ष एक ऑगस्टपासून सुरू करण्यासाठी बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष वगळता प्रथम आणि द्वितीय वर्षांच्या परीक्षांचे नियोजन कॉलेजस्तरावर देण्याची तयारी केली आहे. याबाबतचा अंतिम निर्णय येत्या काही दिवसांत पुणे विद्यापीठाकडून जाहीर होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे रेंगाळणाऱ्या परीक्षा ठरावीक मुदतीत पूर्ण करून, त्यांना निकाल तातडीने जाहीर करण्याचे नियोजनही करण्यात येत आहे.



**"शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यासाठी पुणे विद्यापीठाने बिगरव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे नियोजन कॉलेजस्तरावर देण्याची चाचपणी सुरू केली आहे. यासाठी नेमलेल्या समितीकडून अहवाल आल्यावर, कार्यवाही करण्यात येईल. पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासोबतच द्वितीय वर्षाच्या परीक्षा कॉलेजस्तरावर झाल्या, तर परीक्षा आणि निकाल प्रक्रियेसाठी लागणारा भरपूर वेळ वाचणार आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांबाबत सध्या कोणतीही अडचण नाही.**

\- डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### निकालांना होतो उशीर

पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य अशा बिगरव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षांच्या परीक्षा सध्या कॉलेजस्तरावर होतात. मात्र, इतर वर्षांच्या परीक्षांचा जबाबदारी पुणे विद्यापीठावर आहे. त्यामुळे परीक्षांचे नियोजन आणि परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिका तपासणीत मोठा कालावधी जातो. त्यामुळे निकालांना उशीर होतो. त्यातच करोनामुळे शैक्षणिक वर्ष पाच महिन्यांनी मागे पडले आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून शक्य नाही. त्यामुळे विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासाठी परीक्षा वेळेत पूर्ण होऊन, निकालही कमी कालावधीत जाहीर होण्याची आवश्यकता आहे.

### समिती स्थापन

आगामी सत्र परीक्षांचे नियोजन वेळेत करण्यासाठी अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर आणि डॉ. विजय खरे यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यानुसार या समितीकडून बिगरव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा कॉलेजस्तरावर देण्याबाबत चाचपणी करण्यात येत आहे. सध्याच्या प्रथम वर्षाला जोडूनच द्वितीय वर्षाच्या परीक्षा कॉलेज स्तरावर घेण्याबाबत उपाययोजना आखण्यात येत आहे. केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षाच पुणे विद्यापीठाकडून होतील. याबाबतचा अहवाल येत्या काही दिवसांत समितीकडून विद्यापीठाला देण्यात येणार आहे. त्यानंतर परीक्षा मंडळाच्या बैठकीत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. डॉ. चासकर आणि डॉ. खरे यांच्या कामाची पद्धत जलद आणि पारदर्शी आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष सुरळीत करण्यासाठी या दोघांकडूनही निर्णय तातडीने घेण्यात येईल, अशी अपेक्षा अभ्यासकांडून व्यक्त करण्यात येत आहे.

### कॉलेज स्तरावर परीक्षांचे नियोजन म्हणजे काय?

- पुणे विद्यापीठाकडून प्रश्नपत्रिका तयार करून, त्या कॉलेजला पाठविण्यात येतील.
- वेळापत्रक कॉलेजच्या सोयीनुसार विद्यापीठ प्रसिद्ध करील.
- त्यानंतर लेखी परीक्षांचे संपूर्ण नियोजन कॉलेजच्याच स्तरावर होईल.
- उत्तरपत्रिकांची तपासणीही कॉलेजमध्ये होऊन गुण विद्यापीठाला पाठविण्यात येईल.
- पुणे विद्यापीठाकडून निकाल प्रसिद्ध करण्यात येईल

### रेंगाळणाऱ्या परीक्षा द्वितीय वर्षांच्या

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा दीड ते दोन महिने सुरू असतात. त्यामुळे या परीक्षांमध्ये मोठा कालावधी जातो. त्यानंतर निकालाची प्रक्रिया होते. त्यामुळे परीक्षांबाबत नेमलेल्या समितीकडून या परीक्षांचा कालावधी एक महिन्यांवर आणण्यात येईल. त्यानंतर निकाल प्रसिद्ध करण्यात येणार आहे, असे विद्यापीठाकडून सांगण्यात आले.

Maharashtra Times 11.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# Math 'Nobel Prize' for Indian-American mathematician

PRESS TRUST OF INDIA
WASHINGTON, APRIL 10

CALYAMPUDI RADHAKRISHNA Rao, a prominent Indian-American mathematician and statistician, will receive the 2023 International Prize in Statistics, the equivalent to the Nobel Prize in the field, for his monumental work 75 years ago that revolutionised statistical thinking.

Rao, who is now 102, will receive the prize, which comes with a $80,000 award, this July at the biennial International Statistical Institute World Statistics Congress in Ottawa, Ontario, Canada.



CR Rao will get International Prize in Statistics, equivalent to the Nobel Prize in the field.

In his remarkable 1945 paper published in the Bulletin of the Calcutta Mathematical Society, Rao demonstrated three fundamental results that paved the way for the modern field of statistics and provided statistical tools heavily used in science today, the Foundation said in a statement on April 1.

The first, now known as the Cramer-Rao lower bound, provides a means for knowing when a method for estimating a quantity is as good as any method can be, it said.

The second result, named the Rao-Blackwell Theorem (because it was discovered independently by eminent statistician David Blackwell), provides a means for transforming an estimate into a better—in fact, an optimal—estimate. Together, these results form a foundation on which much of statistics is built, the statement said.

And the third result provided insights that pioneered a new interdisciplinary field that has flourished as "information geometry." Combined, these results help scientists more efficiently extract information from data, the statement added.

Rao was awarded the title of Padma Bhushan (1968) and Padma Vibhushan in 2001.

The Indian Express 11.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

The Hindu, Bangalore edition newspaper, dated 10th April, 2023. Our prominent and Distinguished Mathematician and Statistician from Indian Statistical Institute, Professor C. R. Rao, awarded Noble Prize equivalent in Statistics at the age 102. Heartiest congratulations to our Great Indian Statistical Institute Professor C. R. Rao, his family members, colleagues, friends, all Indians, and all workers from all branches of our Indian Statistical Institute.



Indian-American C.R. Rao wins Nobel Prize equivalent in statistics at the age of 102

Atanu Biswas

The Indian-American statistician Calyampudi Radhakrishna Rao has been awarded the 2023 International Prize in Statistics – *the equivalent of the Nobel Prize for statistics. It is awarded once every two years to an individual or team "for major achievements using statistics to advance science, technology and human welfare".*

*The work of Professor Rao, 102, has influenced, in the words of the American Statistical Association, "not just statistics" but also "economics, genetics, anthropology, geology, national planning, demography, biometry and medicine".*

The citation for his new award calls him "a professor whose work more than 75 years ago continues to exert a profound influence on science".

Professor Rao's groundbreaking paper, "Information and accuracy attainable in the estimation of statistical parameters", was published in 1945. It was an impressive achievement since he was only 25 at the time. He would go on to do his Ph.D. in 1946-1948 at King's College, Cambridge University, under the supervision of Ronald Fisher, regarded as the father of modern statistics.

C.R. Rao

The 1945 paper boosted the development of modern statistics and its application in research.

**Rao score test**

One of Professor Rao's papers in 1948 offered a novel generic approach to testing hypotheses, now widely known as the "Rao score test". This and two other tests, developed by Jerzy Neyman, E.S. Pearson and Abraham Wald, are sometimes called "the holy trinity" of this branch of statistics.

Professor Rao also contributed to orthogonal arrays, a concept in combinatorics used to design experiments whose results are qualitatively good, as early as 1949.

A 19-year-old Rao could not secure a scholarship at Andhra University for administrative reasons. He was also rejected for a job at an Army survey unit. When he was staying in Calcutta, a chance meeting led him to enroll at the Indian Statistical Institute, where he spent the next four decades. After his retirement in 1979, he settled in the U.S.

The first half of the 20th century was the golden period of statistical theory in general, and Rao is one of the reasons for this. As the renowned statistician Erich Lehmann wrote, Rao was "the person who did the most to continue [P.C.] Mahalanobis's work as a leader of statistics in India."

*Atanu Biswas is Professor of statistics, Indian Statistical Institute, Kolkata.*

The Hindu Bangalore edition 10.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

लोकमत

# भारतात जगातील सर्वाधिक ज्ञानमंदिरे



**लोकमत न्यूज नेटवर्क :**
भारतात प्राचीन काळापासून अनेक विद्यापीठे अस्तित्वात होती. तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, नागार्जुन, काशी, प्रतिष्ठान, उज्जयिनी, वल्लभी, कांची, मदुरा, अयोध्या या विद्यापीठांचा एकेकाळी दबदबा होता.
तक्षशिला विद्यापीठ कालक्रमानुसार सर्वात प्राचीन विद्यापीठ मानले जाते. तक्षशिला हे शहर सध्याच्या पाकिस्तानातील रावळपिंडी शहरापासून पश्चिमेला २० मैलांवर होते. तर नालंदा विद्यापीठ बिहारमधील राजगीरच्या उत्तरेला होते. त्याची स्थापना इ. स. पाचव्या शतकाच्या सुरुवातीला झाली असावी. जगातील सर्वाधिक विद्यापीठे आजच्या घडीला भारतातच आहेत.

### सर्वात जुने विद्यापीठ मोरोक्कोत

जगभर ख्याती असलेली ही विद्यापीठे आज अस्तित्वात नाहीत. जगातील सर्वात जुन्या व अजूनही कार्यरत असलेल्या विद्यापीठाचा मान मोरोक्कोतील अल कुआरोयुईन विद्यापीठाकडे जातो. विद्यापीठ ११५७ वर्षे जुने आहे.





▲ तक्षशिला विद्यापीठ




## एकूण विद्यापीठे

लोकमत इन्फोग्राफिक्स

Pune Main
Page No. 8 Apr 11, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

सामना

संदीप वाकचौरे

# डी.एड.बंदी : परिणाम आणि नवे प्रश्न

**नव्या शैक्षणिक धोरणानुसार बी. एड. अभ्यासक्रम एकात्मिक सुरू होत असल्याने सध्याचा बारावीनंतरचा दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम ( डी. एड. ) बंद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसे झाल्यास पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना सध्याच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये नोकरीची संधी मिळणार आहे का? हा खरा प्रश्न आहे. तसेच राज्यात ग्रामीण क्षेत्रातील आणि आर्थिकदृष्ट्या मागास असणाऱ्या गटातील विद्यार्थिनींमध्ये डी.एड. अभ्यासक्रम निवडण्याचे प्रमाण अधिक आहे, पण येणाऱ्या काळात या मुलींना चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे.**



केंद्र सरकारने नवीन 'शैक्षणिक धोरण जाहीर केले. त्या धोरणाने अनेक प्रकारचे मूलभूत बदल सुचविले आहेत. त्यातून देशात नव्याने काही संस्था उभ्या राहणार आहेत. अभ्यासक्रम, शिक्षक भरती, पात्रता, बढती, मूल्यमापन यांसारख्या अनेक गोष्टीत बदल सूचित केले आहेत. खरे तर कोणतेही धोरण येते तेव्हा ते धोरण देश व समाजासमोर असलेली नवीन आव्हाने पेलणारे आणि गुणवत्ता उंचावण्याच्या दृष्टीने टाकलेले पाऊल असते. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी होत असताना शिक्षण क्षेत्राच्या आमूलाग्र बदलाच्या दृष्टीने विविध स्तरांवर भूमिका घेण्यात आलेल्या आहेत. या धोरणात बऱ्याच गोष्टी नव्याने सूचित केल्या आहेत. अनेक भूमिका स्वागतार्ह आहेत. शिक्षण धोरणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणशास्त्र पदविका (डी. एड.) अभ्यासक्रम बंद करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या धोरणात बी. एड. अभ्यासक्रम एकात्मिक स्वरूपात असणार असल्याचे सूचित केले आहे. पारंपरिक अभ्यासक्रम पदवी चार वर्षांची असणार आहे. ती घेताना एखादा विद्यार्थी पदवी पूर्ण न करता मध्येच प्रवाहातून बाहेर पडला तर त्याला प्रत्येक टप्प्यावर एक प्रमाणपत्र दिले जाणार आहे. जेथे विद्यार्थ्याचे शिक्षण थांबेल त्यानुसार प्रमाणपत्र, पदविका प्रमाणपत्र, पदवी मिळणार आहे. त्यामुळे स्वतंत्र अध्यापक विद्यालये बंद होणार असली तरी नव्याने प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्रे प्राप्त होतील. मात्र पदविका प्रमाणपत्र हाती मिळाले तरी त्यांना नोकरीच्या संधी प्राप्त होतील का? असा प्रश्न निर्माण होतो.

सध्या प्रचलित असलेला बी. एड. अभ्यासक्रम हा कोणत्याही शाखेची पदवी धारण केल्यानंतरचा दोन वर्षांचा आहे. नव्या धोरणानुसार बारावीनंतर विद्यार्थी एकात्मिक शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतील. विद्यार्थी पारंपरिक अभ्यासक्रम बी. ए., बी. कॉम, बी. एस्सी यांसारख्या विविध शाखांना प्रवेश घेऊन पदवी प्राप्त करतात. त्यानंतर काही विद्यार्थी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची निवड करतात. मात्र धोरणानुसार एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षण क्षेत्रातच अभिरुची असेल, त्याला त्या क्षेत्रात स्वतःला सिद्ध करायचे असेल तर तो विद्यार्थी एकात्मिक बी. एड. अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकणार आहे. त्यामुळे पदवीच्या पहिल्या वर्षापासूनच शिक्षणशास्त्राचा परिचय होण्यास मदत होईल. विद्यार्थी आपल्या पारंपरिक पदवी अभ्यासक्रमासोबत शिक्षणशास्त्राचे विषय शिकेल असे मानले जात आहे. त्यामुळे विद्यार्थी चौथ्या वर्षी पारंपरिक शाखेच्या अभ्यासक्रमाच्या पदवीबरोबर बी.एड. पदवी प्राप्त करेल. विद्यार्थ्याने पारंपरिक अभ्यासक्रमाची पदवी तीन वर्षांत पूर्ण केली तर संबंधित विद्यार्थ्याला दोन वर्षांच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची संधी असेल. चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर किंवा पदव्युत्तर पदवी धारण केली असेल तर संबंधित विद्यार्थ्यांना एक वर्षाचा बी. एड. अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. ही पदवी प्राप्त करताना अध्यापनशास्त्रातील नव्या तंत्रज्ञानाचा व नवसंशोधनाचा समावेश अभ्यासक्रमात असणार आहे. त्याच वेळी या विद्यार्थ्यांना आंतरवासिता कालावधी असणार आहे. बी. एड. अभ्यासक्रम एकात्मिक सुरू होत असल्याने सध्याचा बारावीनंतरचा दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम (डी. एड.) बंद होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सध्या या अभ्यासक्रमाचे भविष्य फार उज्ज्वल असल्याचे चित्र नाही.

सध्या शिक्षणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी बारावीनंतर दोन वर्षे कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. राज्यात दशकभरापूर्वी अध्यापक विद्यालयांची संख्या वेगाने उंचावली होती. दरवर्षी साधारणपणे एक लाख विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता राज्यात अस्तित्वात होती. मात्र गेली काही वर्षे राज्यात शिक्षण क्षेत्रातील नोकरीच्या संधी दिवसेंदिवस कमी होत चालल्या आहेत. भरती प्रक्रिया अधिक कठीण होत आहे. अशा वेळी विद्यार्थ्यांचा पदविका अभ्यासक्रमाकडे असलेला ओढा आटत चालला आहे. राज्यात अनेक पदविका अध्यापक विद्यालयांना कुलूप लावण्यात आले आहे. शासकीय अध्यापक विद्यालये विद्यार्थी उपलब्ध होत नसल्याने पूर्वीच बंद केली आहेत. खासगी संस्थांनादेखील पसंती नाही. विद्यार्थ्यांनीदेखील या अभ्यासक्रमाकडे काणाडोळा केला आहे. त्यामुळे पूर्ण क्षमतेने प्रवेश घेतलेली अध्यापक विद्यालये बोटांवर मोजावी एवढीच आहेत.

देशात प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्ती देताना डी. एड.बरोबर बी. एड. उमेदवार चालणार असेल तर कोणीही संस्थाचालक डी. एड. पदविकेला प्राधान्य देण्याची शक्यता नाही. नोकरी मिळत नाही म्हणून डी. एड. अभ्यासक्रमास प्रवेश नाही असे चक्र सुरू राहते. त्यामुळे स्वतंत्र डी. एड. अभ्यासक्रम विद्यार्थ्यांअभावी बंद झाले तर नवल वाटायला नको.

शिक्षणक्षेत्रात होणारे परिवर्तन, शिक्षणाशी संबंधित विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर होणारी संशोधने, नवतंत्रज्ञानाचा वाढता उपयोग लक्षात घेता उच्च पदवी धारण केलेल्या शिक्षकांची अपेक्षा चुकीची नाही. जितके अधिक शिकलेले उमेदवार शिक्षणक्षेत्रात येतील तितकी गुणवत्ता उंचावेल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे सध्या खासगी शाळा व्यवस्थापनदेखील डी. एड. उमेदवारांना प्राधान्य देताना दिसत नाही. अर्थात हे अभ्यासक्रम बंद झाले तरी खरी अडचण पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना सध्याच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये नोकरीची संधी मिळणार आहे का? जर प्राथमिक स्तरावर बी. एड. पदवीधारक उमेदवारच पात्र ठरणार असतील तर डी. एडच्या उमेदवारांचे बेकारीचे प्रमाण वाढणार आहे.

शिक्षणक्षेत्रात पदविकापात्र उमेदवार नाकारले गेले तर सर्वात मोठा परिणाम ग्रामीण, आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थिनींच्या शिक्षणावर होणार आहे. राज्यात डी. एड. अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनी या ग्रामीण क्षेत्रातील आहेत. यामध्ये आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थिनींचे प्रमाण अधिक आहे. केवळ दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून नोकरीची हमी मिळत असल्याने अनेकदा विद्यार्थिनींचे पालक या अभ्यासक्रमाला पसंती देतात. विद्यार्थिनीच्या हाती पदविका प्रमाणपत्र दिले की, तिचे जीवन स्थिर होण्यास मदत होईल, ती स्वावलंबी होईल यादृष्टीने पदविका अभ्यासक्रमाकडे पाहिले जात होते. त्याचा परिणाम म्हणून राज्यातील शिक्षणक्षेत्रात सुमारे ४३ टक्के महिला शिक्षक कार्यरत आहेत. आता नोकरी हवी असेल तर विद्यार्थिनींना पदवी घ्यावी लागेल. पदवी प्राप्त करण्यासाठी कालावधी वाढणार आहे. त्यातून शिक्षणाचा खर्चही वाढेल. शिक्षणासाठी विद्यार्थिनींचे वय आणि खर्च वाढल्यास अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनींचे प्रमाण कमी होण्याचा धोकाही आहे. विद्यार्थिनींसाठी हा अभ्यासक्रम आणि नोकरी अधिक सुरक्षित मानली जात होती; पण आता पदवी, पदविका, शिक्षक पात्रता परीक्षा, अभियोग्यता आणि पुन्हा पोर्टलव्दारे होणारी भरती हे सारे आव्हानात्मक बनले आहे. सध्या स्वतंत्र अध्यापक विद्यालये बंद होणार असली तरी त्याचा परिणाम विद्यार्थिनींच्या शिक्षणावर होण्याची शक्यता आहे. या सामाजिक परिणामांचा विचारदेखील करावा लागणार आहे. प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावर बी. एड. पात्रता आहे. येत्या काळात बी. एड. अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांची संख्या उंचावेल. मात्र सध्याचा चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करताना पहिल्या वर्षात महाविद्यालय सोडल्यास प्रमाणपत्र प्राप्त होईल. दोन वर्षे पूर्ण केल्यास पदविका प्रमाणपत्र, तीन वर्षे पूर्ण केल्यास पदवी आणि चौथे वर्ष पूर्ण केल्यास रिसर्च पोस्ट पदवी प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे याप्रमाणे एकात्मिक अभ्यासक्रमातही पदविका प्रमाणपत्र मिळेल का? येत्या काळात नेमके काय आणि कसे बदल होत आहेत हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

*(लेखक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आहेत.)*

Mumbai Edition
Apr 11, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# कौशल्य अभ्यासक्रमांचे सूत्र ठरले

## '४० टक्के लेखी, तर ६० टक्के प्रॅक्टिकल'

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ११ -** पदवी अभ्यासक्रमामध्ये कौशल्य शिक्षणाचा समाविष्ट करण्यासाठी ४० टक्के अभ्यासक्रम लेखी, तर ६० टक्के अभ्यासक्रम कौशल्यांवर आधारित म्हणजेच प्रात्यक्षिके, इंटर्नशिपचा समावेश असणे गरजेचे आहे, असे सूत्र विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) निश्चित केले आहे. त्यानुसारच कौशल्य शिक्षण अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करणे शिक्षण संस्थांना अनिवार्य आहे.

'यूजीसी'ने नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क प्रसिद्ध केले. या फ्रेमवर्कची अंमलबजावणी करण्याची सूचना यूजीसीने शैक्षणिक संस्थांना दिल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी या फ्रेमवर्कची निर्मिती करण्यात आली आहे. त्यासाठी केंद्र सरकारने डॉ. निर्मलजीत सिंग कलसी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना केली होती. त्यात यूजीसी, एआयसीटीई, सीबीएसई, एनआयओएस, शिक्षण मंत्रालय, एनसीईआरटी, अशा देशातील शिखर संस्थांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन मसुदा तयार केला होता. या मसुद्यावर हरकती आणि सूचना आल्यानंतर, आता अंतिम फ्रेमवर्क जाहीर करण्यात आले आहे.

यात ४० टक्के अभ्यासक्रमात थेअरी स्वरुपात असून, त्यात सॉफ्ट स्किल्स, डिजिटल स्किल्स, कम्युनिकेशन स्किल्स, क्रिटिकल थिंकिंग अशा घटकांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे कौशल्य शिक्षणाच्या ७० टक्के अभ्यासक्रमात प्रात्यक्षिके, इंटर्नशिप, हॅन्डस् ऑन ट्रेनिंगचा समावेश आहे.

प्रभात PuneCity, 12 Apr 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# १८ विद्या, ६४ कलांना आता श्रेयांक देण्याची मुभा

## राष्ट्रीय श्रेयांक आराखड्याचा अंतिम मसुदा प्रसिद्ध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** भारतीय ज्ञान प्रणालीत समावेश असलेल्या चार वेदांसह १८ विद्या आणि ६४ कलांसाठी आता श्रेयांक देता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच कला, क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना श्रेयांक देण्याची मुभा मिळाली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) राष्ट्रीय श्रेयांक आराखड्याचा अंतिम मसुदा नुकताच प्रसिद्ध केला. या आराखडयात शालेय शिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत श्रेयांक पद्धतीचा समावेश करण्यासह मुख्य प्रवाहातील शिक्षण व्यावसायिक कौशल्याशी जोडण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच या आराखड्याची अंमलबजावणीसाठीच्या आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश यूजीसीने शिक्षण संस्थांना दिले. ऑक्टोबरमध्ये जाहीर करण्यात आलेल्या मसुद्यात भारतीय ज्ञान प्रणालीचा समावेश नव्हता. तो अंतिम मसुद्यात करण्यात आल्याचे दिसून येते.

राष्ट्रीय शैक्षणिक आराखडयाअंतर्गत पूर्वप्राथमिक स्तरापासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांना श्रेयांक प्राप्त करता येतील. आठशे तासांसाठी २७ श्रेयांक, एक हजार तासांसाठी ३३ श्रेयांक या पद्धतीने श्रेयांकांची रचना करण्यात आली आहे. उदाहरणार्थ पूर्वप्राथमिक ते दुसरीच्या विद्यार्थ्यांना आठशे तास पूर्ण केल्यावर २७ श्रेयांक, तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना एक हजार तास पूर्ण केल्यावर ३३ श्रेयांक, तर सहावी ते पीएच.डी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात बाराशे तास पूर्ण केल्यावर चाळीस श्रेयांक मिळतील. शालेय पातळीवर पाचवी ते बारावीसाठी प्रत्येक विषयाला २४० तास स्वअध्ययनासाठी असतील. वर्गातील मूल्यमापन, प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिके, प्रकल्प, गृहपाठ यांसाठी

मिळवलेल्या श्रेयांकांवरून एकू
अध्ययनाचे तास मोजले जातील. वर्गातील
अध्ययनाच्या पलीकडे क्रीडा, योग
शारीरिक उपक्रम, सादरीकरण, हस्तकल
आदींचा मूल्यमापन आराखड्यात
समावेश असेल. विद्यार्थ्यांनी मिळवलेले
श्रेयांक 'श्रेयांक बँकेत' साठवले जातील
साठवलेल्या या श्रेयांकाचा वाप
विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमांच्य
प्रवेशासाठी करता येईल. ऑनलाइन
डिजिटल आणि मिश्र शिक्षणासाठीह
श्रेयांक दिले जातील. श्रेयांक
मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन
बंधनकारक आहे. या आराखड्याद्वा
विज्ञान, सामाजिक शास्त्र, वाणिज्य, कल
यातील भेदभाव खोडला जाईल
अभ्यासक्रम, पात्रतेला समकक्षता देऊन
शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करत
येईल, असे अहवालात स्पष्ट करण्यात
आले आहे.

कला, क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय आणि
आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगिरी केलेल्य
विद्यार्थ्यांना श्रेयांक देण्याची मुभा देण्यात
आली आहे. तसेच भारतीय ज्ञान
परंपरेतील १८ विद्या आणि ६४ कलांमध्ये
समावेश असलेल्या अन्य घटकांना आत
श्रेयांक देता येतील. १८ विद्यांमध्ये चा
वेदांसह आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद
शिल्प, न्याय, मिमांसा, धर्मशास्त्र, वेदांग
खगोलशास्त्र, व्याकरण आदींचा समावेश
होतो असे नमूद करण्यात आले आहे.

### प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचे मूल्यमापन

प्रज्ञावंत (गिफ्टेड) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांचा विचारही या आराखड्यात करण्यात आला आहे. त्या दृष्टीने परखसह सीबीएसई, एनआयओएस, राज्य मंडळे, यूजीसी, एआयसीटीई, एनसीव्हीटीई आदींनी प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मूल्यमापनाच्या विशेष पद्धती विकसित कराव्यात, असेही नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, 12 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72153782

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

सकाळ

## आयुक्त सूरज मांढरे : अधिकारी, विषयतज्ज्ञ यांच्या बैठकांचे सत्र सुरू

# नव्या शैक्षणिक धोरणावर काम सुरू

**पुणे, ता. ११ :** "सध्याच्या शैक्षणिक व्यवस्थेची सुसंगत असणाऱ्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील सर्व बदल येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करणे शक्य आहे. त्यादृष्टीने शिक्षण विभागाने काम सुरू केले आहे," असे राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी स्पष्ट केले.

'राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण येत्या जूनपासून लागू होणार', अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी पुण्यात केली. त्यानंतर या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शिक्षण विभागाने गतीने पावले उचलण्यास सुरुवात केली असून त्यादृष्टीने हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर लवकरच राज्यात विविध पातळ्यांवर बैठका, कार्यशाळा यांचा वेग वाढण्याची चिन्हे आहेत. यातील एक भाग म्हणून शिक्षण विभागातील उच्चस्तरीय अधिकारी, संचालक, शिक्षणाधिकारी, विषयतज्ज्ञ यांच्या बैठकांचे सत्र सुरू झाले आहे.

> नवीन शैक्षणिक धोरणात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची परीक्षा दोन सत्रांत घेण्याबाबत सांगितले आहे. त्यानुसार दोन सत्रांत परीक्षा घ्यायची असल्यास, बोर्डाची तशी तयारी आहे का, त्यादृष्टीने येत्या वर्षात बदल करणे शक्य आहे का, याबाबत विचारविनिमय सुरू आहे. तसेच पूर्व प्राथमिक शिक्षणाचा 'आकार' हा आराखडा तयार केला आहे. शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी टप्प्या-टप्प्याने होईल, त्यावर विविध पातळ्यांवर विचारमंथन सुरू आहे.
> **- सूरज मांढरे,** राज्य शिक्षण आयुक्त

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य व केंद्रशासित प्रदेशांना सहाय्य करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून 'सार्थक' (स्टुडंट्स अँण्ड टीचर्स होलिस्टिक अँडव्हान्समेंट क्वालिटी एज्युकेशन) ही योजना देशपातळीवर लागू केली आहे. या योजनेतंर्गत शिक्षण विभागाला २९७ टास्क दिले आहेत. या टास्कची आढावा बैठक शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्या उपस्थितीत मंगळवारी झाली.

यामध्ये टास्कचा आढावा घेण्याबरोबरच येत्या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्याच्यादृष्टीने चर्चा झाली. तसेच नुकत्याच जाहीर झालेल्या 'शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा'च्या अनुषंगानेही शिक्षण आयुक्तांनी स्वतंत्र बैठक घेतली.

सूरज मांढरे म्हणाले, "येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीची परीक्षा दोन सत्रात घेता येईल का, यावर विचार सुरू आहे. तसेच पहिल्या टप्प्यातील पूर्व प्राथमिक (तीन वर्षांचा) शिक्षणाचा आराखडा लागू करणे, तसेच शिक्षणातील '५+३+३+४' हा पॅटर्न लागू करणे, याशिवाय उच्च माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षणाचा समावेश करणे, यादृष्टीने पावले उचलण्यात येत आहेत."

# नीट परीक्षेसाठी अर्ज करण्याची अजून एक संधी

**पुणे, ता. ११ :** नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) 'नीट'साठी ऑनलाइन अर्ज करण्याची संधी पुन्हा एकदा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता येत्या गुरुवारी (ता. १३) रात्री ११ वाजून ३० मिनिटांपर्यंत अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

या परीक्षेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया मागील आठवड्यात संपली होती. तर अर्जात दुरुस्ती करण्यासाठी १० एप्रिलपर्यंत मुदत दिली होती. परंतु 'नीट'चा अर्ज भरण्याची प्रक्रिया अपूर्ण राहिल्याने ती पुन्हा खुली करून द्यावी, अशी मागणी देशभरातील विद्यार्थी-पालकांनी लावून धरली.

या मागणीची दखल घेऊन 'एनटीए'ने 'नीट'चा अर्ज भरण्यासाठीची लिंक पुन्हा एकदा खुली केली आहे.

**महत्त्वाच्या तारखा**

- ऑनलाइन अर्ज स्वीकारणे : १३ एप्रिल (रात्री ११ वाजून ३० मिनिटांपर्यंत)
- परीक्षा शुल्क ऑनलाइन भरणे : १३ एप्रिल (रात्री ११ वाजून ५९ मिनिटांपर्यंत)

यासाठीची अधिक माहिती www.nta.ac.in, https://neet.nta.nic.in/ या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.परीक्षेसाठी अर्ज करण्याची ही शेवटची संधी असणार आहे. यापुढे विद्यार्थ्यांना अर्जात बदल करण्यासाठी किंवा नव्याने अर्ज करण्यासाठी कोणतीही संधी दिली जाणार नाही, असे 'एनटीए'ने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

Pune, Main
12/04/2023 Page No. 2

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

बुधवार, १२ एप्रिल २०२३ WWW.LOKSATTA.COM

# शिक्षणाच्या मापात पाप?

### पाठ्यपुस्तकं नेमकं किती ज्ञान देतात हा निराळा विषय; पण जेवढं देत होती, तेवढं तरी हवं की नको?

श्रद्धा कुंभोजकर

'' **-हे पाहा,** आपल्याला जर शूर, निडर आणि आज्ञाधारक नागरिक घडवायचे असतील, तर त्यांच्या अभ्यासामधून या मूल्यांच्या विरोधात जाणारा भाग वगळावा लागणं अपरिहार्य आहे.

- अहो, पण होमरसारख्या प्रसिद्ध कवींनीही या मूल्यांच्या विरोधात जाणाऱ्या, भीती, विद्रोहाचं चित्रण करणाऱ्या रचना केल्या आहेत आणि त्या लोकांना माहीत आहेत, त्याचं काय करायचं?

- अशा स्थितीत सत्ताधीशांनी अशा लेखकांवर वचक ठेवून त्यांना विनम्रतेनं हे सांगायला हवं, की 'तुमच्या लिखाणामुळे पुढच्या पिढ्यांचं नुकसान होतंय. हे असलं खोटं लिखाण तुम्ही थांबवा.'

- शिवाय गरज पडली तर आपल्या मूल्यांच्या विरोधात जाणारे भाग आणि पात्रं आपण गाळून टाकायची. वाटलं तर नव्या विचारांची गाणी रचून ती शिकवायची. झालं तर मग.''

हा संवाद प्लेटोच्या 'पोलितिया' (इंग्रजीत रिपब्लिक) या ग्रंथाच्या तिसऱ्या अध्यायावर आधारित आहे, हे आज अडीच हजार वर्षांनंतर सांगणं अत्यावश्यक आहे. राजसत्तेला जे आदर्श आणि मूल्यं जनमानसात रुजवायची असतात, त्यांचा विचार राज्य स्थापन होण्याच्या आधीपासून विचारवंत करत असतात हा यातला विचार अफलातून. (हे प्लेटोच्याच नावाचं अरबी रूप आहे.) पुढच्या पिढ्यांपर्यंत जे विचार, कौशल्य, मूल्यभान पोहोचावं असं आपल्याला वाटतं, ते ते आपण शिक्षण या नावानं त्यांना शिकवायचे प्रयत्न करतो. त्या त्या वयात मुलांना काय समजेल, कशाचे अनुभव ती घेऊ शकतील, याचा विचार करून मुलांना काय शिकवायचं हे शिक्षणव्यवस्थेचे नियंत्रक ठरवत असतात. समाजाला ज्या कौशल्यांची गरज आहे, ती कौशल्यं अभ्यासक्रमात घेतली जातात.

**'पुस्तकचाकोरी'बाहेरच्या वाटा**

अभ्यासक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवताना ठरावीक वाटांनी ठरावीक तपशील आणि कौशल्यं शिकवण्यासाठी पाठ्यपुस्तकांचा उपयोग केला जातो. अत्यावश्यक गोष्टी विद्यार्थ्यांपर्यंत खात्रीशीरपणे पोहोचाव्यात यासाठीची ती एक मळलेली वाट. तरीही अभ्यासक्रमातले घटक शिकण्यासाठी चाकोरीच्या बाहेरच्या अनेक वाटा असतातच. गुरुत्वाकर्षणासारखी संकल्पना पाठ्यपुस्तकातून व्याख्या शिकून तर समजेलच; पण मनोऱ्यावरून खाली पडणाऱ्या चेंडूमुळेही ती समजू शकते. त्यामुळे शिक्षणशास्त्रीय दृष्टीनं पाहिलं तर पाठ्यपुस्तक ही अनेक वाटांपैकी एक मळलेली वाट आहे इतकंच. प्रस्तुत लेखिकेनं भारतात इंटरनेट क्रांतीपूर्वी म्हणजे टीव्हीयुगात केलेल्या एका संशोधन प्रकल्पात असं आढळलं की पाठ्यपुस्तकांमध्ये शिकवलेल्या मूल्यांपेक्षा समाजातून आणि विविध माध्यमांमधून शिकलेली मूल्यं विद्यार्थ्यांवर अधिक प्रभाव टाकतात.

**नियंत्रणाची सवय जुनीच**

तरीही पाठ्यपुस्तकांमध्ये काय असावं, काय वगळावं यावर नियंत्रण ठेवण्याची इच्छा राज्यकर्त्यांमध्ये (अडीच हजार वर्षांपासून तरी) राहतेच. पाठ्यपुस्तकांचा वापर कसा केला जातो याविषयी अनेक अभ्यास झाले आहेत. तथ्यविरोधी कथनांवर वाचकांचा विश्वास बसावा यासाठी पाठ्यपुस्तकं जाणीवपूर्वक फसवणूक करतात, हे जेम्स लोएवीन यांनी 'लाइज् माय टीचर टोल्ड मी : एव्हरीथिंग युअर अमेरिकन टेक्स्टबुक गॉट रॉंग' (१९९५) या ग्रंथात मांडलं आहे. 'सर्वसाधारण समज' (कॉमन सेन्स) घडवण्यामध्ये इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांची भूमिका कोणती असते, याविषयी कृष्ण कुमार यांनी विस्तृत लेखन केलं आहे. त्यांच्या 'प्रेज्युडिस अँड प्राइड' (२००१) या ग्रंथात भारत व पाकिस्तान यांच्या पाठ्यपुस्तकांची तुलना आहे. 'शाळांमधून व सरकारी माध्यमांमधून पसरवण्यात आलेली भूतकाळाविषयीची मांडणी मानसिक नकाशांसारखी काम करते, आणि वर्तमानकाळातील परिस्थितीला प्रतिसाद देताना बहुसंख्य लोकांना या नकाशांद्वारे मार्गदर्शन होत असतं,' असं कुमार यांनी स्पष्ट केलं आहे.

वर्तमान परिस्थितीला प्रतिसाद कसा द्यावा याचं मार्गदर्शन अभ्यासक्रमातून घडणाऱ्या जाणीव-नेणिवा करत असतात. भावी नागरिकांची भविष्यातली वागणूक निश्चित करायला पाठ्यपुस्तकं हा खासा उपाय ठरतो. त्यामुळे शासनकर्त्यांची ध्येयधोरणं जसजशी सुनिश्चित होतात, तसतसे पाठ्यपुस्तकांमध्ये आणि त्यामागच्या अभ्यासक्रमांमध्ये बदल होणं यात काहीही नवं नाही. किंबहुना हीच प्रक्रिया पालटून पाठ्यपुस्तकांमधल्या बदलांनुसार अभ्यासक्रमातले व सरकारी ध्येयधोरणांमधले बदल समजून घेणं शक्य असतं.

**विज्ञानाचेही धडे वगळले**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेला (एनसीईआरटी) अभ्यासक्रमांची त्यांच्याच शब्दांत रॅशनलाइझेशन म्हणजे तर्कसुसंगत पुनर्रचना करावीशी वाटण्यामागे काय धोरण असेल याचा विचार करायला गेलं तर काय दिसतं? सुदैवानं संस्थेच्या वेबसाइटवर सहावी ते बारावीच्या पुस्तकातून काय काय वगळलंय याच्या याद्याच दिलेल्या आहेत. फसफसत्या पेयांच्या बाटल्यांवर जसं यात कोणत्याही फळाचा गर अथवा रस नाही हे आधीच सांगितलेलं असतं, तशीच ही पारदर्शकता! केवळ बारावीच्या पुस्तकांपुरतं पाहिलं तरी जीवशास्त्राच्या पुस्तकातून सजीवांच्या पुनरुत्पादनाचा धडा वगळला आहे. रसायनशास्त्रात दैनंदिन जीवनातील रसायनशास्त्र हा धडा वगळला आहे. भूगोलाच्या पुस्तकातून क्षेत्रीय सर्वेक्षण आणि नकाशे बनवायला संगणकाचा वापर हे दोनही धडे अनावश्यक ठरलेत. भारताचे लोक आणि अर्थव्यवस्था यातून स्थलांतर, मानवी विकास आणि वस्तू उत्पादनाचे कारखाने वगळले आहेत. मानवी भूगोलातून लोकसंख्येचे घटक वगळलेत. ना-नफा तत्त्वावरील संस्थांसाठी जमाखर्च या नावाच्या विषयातून त्याच नावाचा धडा जमेत घेऊ नये असं ठरलं आहे. संगणकीय जमाखर्चाच्या विषयातून डेटाबेस मॅनेजमेंट म्हणजे मूळ आकडेवारी कशी जतन करायची हा घटक गायब होणार आहे. बिझिनेस स्टडीज्मधून शासकीय धोरणांचे व्यवसायांवरील परिणाम, चांगल्या नेत्याची गुणवैशिष्ट्ये आणि वित्तीय बाजार यांच्या अभ्यासाचं ओझं आता विद्यार्थ्यांवर पडणार नाही. विसाव्या शतकाच्या राजकारणातून शीतयुद्ध, अमेरिकेची एकाधिकारशाही आणि स्वतंत्र भारतातल्या लोकचळवळी अदृश्य होणार आहेत. आणि इतिहास या विषयातून मुघलांना, आणि भारताच्या फाळणीला रजा दिलेली आहे. याखेरीज एनसीईआरटी अध्यक्षांच्या मते नजरचुकीनं ज्यांची नोंद करायची राहिली, असे वगळलेले गांधीहत्येसारखे तपशील तर वेगळेच.

प्लेटोला जसं शूर, निडर आणि आज्ञाधारक नागरिक घडवायचे होते, तसं या अभ्यासक्रमातून कसे नागरिक घडतील? आधुनिक नकाशे न कळणारे भूगोलतज्ज्ञ, कारखान्याबद्दल आणि स्थलांतराबद्दल माहिती नसणारे अर्थशास्त्रज्ञ, चांगल्या नेत्यामध्ये काय गुण असावेत याचं प्रारूप न अभ्यासलेले व्यावसायिक आणि छत्रपती शिवाजी महाराजांसह दख्खनच्या प्रादेशिक ओळखीसाठी लढणाऱ्या असंख्य मावळ्यांनी नक्की कोणाविरुद्ध लढा दिला याची थोरवी न समजणारे इतिहासकार.

**'स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशः'**

कोविडकाळापुरतं मुलांच्या मनावरचं ओझं कमी करण्याचा हेतू एनसीईआरटीने धोरण म्हणून जाहीर केला आहे. शिक्षणतज्ज्ञ आणि त्या त्या विषयतज्ज्ञांच्या अनेक वर्षांच्या मेहनतीनं ही पाठ्यपुस्तकं तयार होत असतात. त्यामागचे का
लक्षात न घेता आता २०२३ मध्ये ठरावीक घटक
वगळण्याचं कारण वेबसाइटवरच्या धोरणातू
पुरेसं स्पष्ट होत नाही. पण इतिहासापुरतं बोलायच
तर 'स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशः' हे गीतावचन लक्षा
घ्यायला हवं. फाळणी असो वा मुघल शासकांच्
उत्तर भारतातल्या सत्तेचा इतिहास - त्यांची स्मृ
अचानक पुसल्यामुळे एकूणच फाळणीचं आव्हा
आणि त्यानंतरही टिकून बहरलेल्या भारती
लोकशाहीचं महत्त्व किंवा मुघल सत्ता आणि
भारतातल्या संमिश्र संस्कृतीचा सहसंबंध या गोष्
विद्यार्थ्यांना कळणार नाहीत. प्लेटोच्याच आगेमा
लिहिणाऱ्या कौटिल्यानं म्हटलं आहे, की ''ज्य
सत्ताधीशांचं शास्त्राचं ज्ञान डळमळीत असतं,
आपल्या हट्टीपणापायी राज्याचा आणि स्वतःचाह
नाश ओढवून आणतात.'' (८.२.१२) अर्धव
आणि विखंडित स्वरूपातलं शिक्षण घेणारी ह
पिढी जेव्हा समाजाची सूत्रं हाती घेईल तेव्हा ह
विचार करायला वेळ राहिलेला नसेल.

कोविडनंतरच्या भारतात बेरोजगारीच्
समस्येचा कधीही कडेलोट होईल ही स्थित
असताना तरुणांना असं अज्ञानी ठेवल्यामुळे का
होईल? तर बारावी शिकलेल्या विद्यार्थिनीला ज्य
दहा गोष्टी माहीत असायला हव्यात त्या आल्य
नाहीत, की ती बारावीनंतर खासगी संस्थांमध्
तिला 'रोजगारक्षम करणारी कौशल्यं' शिकवणा
लहान अभ्यासक्रम पूर्ण करण्यात वेळ आणि पैस
खर्च करेल. तोवर कडेलोटाची घटका थोडी पु
ढकलली जाईल. शिवाय ही कौशल्यं शिकवू
देशाची सेवा करणाऱ्या खासगी संस्थांना सरका
साहाय्य देऊन सार्वजनिक-खासगी-सहभागाच
नवा अध्याय रचला जातो ते वेगळंच.

शिक्षण ही दिवसेंदिवस महागडी गोष्ट हो
चाललेली असताना निव्वळ ग्राहक म्हणून विचा
केला तरीही आपण भरलेली फी कमी न होता, त्य
फीतून आजवर मुलांना दहा गोष्टी शिकवल्या जा
असत, आता आठच शिकवल्या जाणार या
नुकसान कुणाचं आहे हे स्पष्ट आहे. समाजाल
मुक्तिदायी दिशा देणारी अनन्य गोष्ट म्हणजे शिक्ष
असा विचार मांडणाऱ्या जोतिराव फुले आणि
बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मदिवस आपण
साजरे करत आहोत. या दोघांनी शिक्षणाच्या वाट
बंद करणाऱ्या प्रत्येक घटकाविरुद्ध लढा दिला
आज भावी नागरिकांच्या वाटणीचं, हक्काच
शिक्षण देताना मापात पाप केलं जातंय. त्याच
टोचणी जरी कुणाला जाणवली तरी खूप झालं.

लेखिका उच्चशिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे
shraddhakumbhojkar@gmail.com

लोकसत्ता Wed, 12 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72156338

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

पुढारी

# प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा आता कॉलेजस्तरावरच

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष वगळता प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षांचे नियोजन कॉलेजस्तरावरच करण्यात येणार आहे. यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यासाठी बुधवारी (दि.१२) बैठक घेण्यात येणार असून परीक्षांसंदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान अशा बिगरव्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा सध्या कॉलेजस्तरावर होतात. मात्र, इतर वर्षांच्या परीक्षांची जबाबदारी विद्यापीठावर आहे. त्यामुळे परीक्षांचे नियोजन आणि परीक्षा झाल्यानंतर उत्तरपत्रिका तपासणीत मोठा कालावधी जातो, त्यामुळे निकालांना उशीर होतो. त्यातच कोरोनामुळे शैक्षणिक वर्ष पाच महिन्यांनी मागे पडले आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून करणे शक्य नाही.

या पार्श्वभूमीवर आगामी सत्र परीक्षांचे नियोजन वेळेत करण्यासाठी अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर आणि डॉ. विजय खरे यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीकडून प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा कॉलेजस्तरावर देण्याबाबत चाचपणी करण्यात येत आहे. त्यामुळे केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षाच विद्यापीठाकडून होतील. याबाबतचा अहवाल समितीकडून विद्यापीठाला देण्यात येणार आहे. त्यानंतर परीक्षा मंडळाच्या बैठकीत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. विद्यापीठाकडून प्रश्नपत्रिका तयार करून, त्या कॉलेजला पाठविण्यात येतील. लेखी परीक्षांचे संपूर्ण नियोजन कॉलेजस्तरावर होईल. उत्तरपत्रिकांची तपासणीही कॉलेजमध्ये होऊन गुण विद्यापीठाला पाठविण्यात येतील. त्यानंतर विद्यापीठाकडून निकाल प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

**परीक्षांसंदर्भात अंतिम निर्णय घेण्यासाठी आज बैठक**

> परीक्षांचे नियोजन कॉलेजस्तरावरच करण्यासंदर्भात दोन समित्या नेमण्यात आल्या आहेत. त्यांची बुधवारी बैठक होणार आहे. त्या वेळी त्यांना परीक्षांसंदर्भातील सद्य:स्थिती सांगण्यात येईल. शैक्षणिक वर्ष जर १ ऑगस्टला सुरू करायचे असेल आणि निकाल वेळेवर लावयचे असतील तर परीक्षांचे विकेंद्रीकरण करून प्रथम आणि व्दितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांकडेच सोपविणे योग्य होणार आहे.
>
> - **डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Edition
Apr 12, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# आता नववी ते बारावी चार वर्गांचे 'क्लस्टर'

## तब्बल आठ विद्या शाखा, सोळा विषयांचे पर्याय; चार विषय मात्र एका शाखेचे बंधनकारक

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

**इयत्ता नववी ते बारावी असे चार वर्गांचे क्लस्टर तयार करताना नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात तब्बल आठ विद्या शाखा निर्माण करण्यात आल्या असून अकरावी आणि बारावीला प्रत्येकी आठ विषय निवडता येतील. अकरावीला निवडलेले विषय बारावीला कायम राहतील. यात विषय निवडीचे स्वातंत्र्य मिळाल्याने कला, विज्ञान आणि वाणिज्य या प्रचलित शाखा मोडीत निघाल्याचे चित्र निर्माण झाले असले तरी वस्तुस्थिती वेगळी आहे. अकरावी-बारावीला निवडण्यात येणाऱ्या आठपैकी चार विषय हे एकाच विद्या शाखेचे निवडणे बंधनकारक असेल आणि त्यावरच त्या विद्यार्थ्याचा पुढील प्रवास निश्चित होईल, असे जाणकार सांगतात.**

पुढारी क्लासरुम

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार राष्ट्रीय अभ्यासक्रम संरचना संस्थेने (एनसीएफ) हे बदल सुचवले आहेत. देशातील अभ्यासक्रमांसाठी प्रथमच नवी रचना तयार करण्यात येत आहे. नववी ते बारावीच्या परीक्षांबाबतच्या दूरगामी परिणामकारक शिफारशी या आराखड्यात आहेत. या शिफारशी लवकरच सार्वजनिक करण्यात येतील. नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येतील. त्यावर विचार करून नव्या परीक्षा रचना आणि अभ्यासक्रमावर शिक्कामोर्तब होईल आणि २०२४ पासून ही नवीन शैक्षणिक पद्धती लागू करण्याचा विचार केंद्र सरकारचा आहे.

पुढारी प्रतिनिधीने यासंदर्भात उच्च शिक्षण विभागातील जाणकारांशी चर्चा करून येऊ घातलेली नवी शिक्षणपद्धती जाणून घेतली व विद्यार्थी-पालकांत निर्माण झालेले अनेक संभ्रम दूर होतील, अशी उत्तरे मिळवली.

**शाखा असणार की नसणार?**

कला, विज्ञान, वाणिज्य या शाखा मोडीत निघाल्याची चर्चा आहे. दहावीनंतर कोणत्या शाखेला जायचे ही दरवर्षी घराघरांत होणारी चर्चा आता बंद होईल. नव्या धोरणानुसार कला, वाणिज्य आणि विज्ञान ही विशिष्ट शाखा निवडण्याची गरज नाही. नव्या धोरणात आठ विद्या शाखांमध्ये विषयांची विभागणी करण्यात आली असून विद्यार्थ्यांसमोर आठ विषय निवडण्यासाठी १६ विषयांचे पर्याय असतील. निवडलेल्या आठ विषयांत किमान ४ विषय एकाच विद्या शाखेतले निवडणे बंधनकारक असेल. हे एका विद्या शाखेतील चार विषय त्या विद्यार्थ्याचा पुढील शैक्षणिक प्रवास निश्चित करतील आणि त्याचे करिअरही हेच विषय कदाचित ठरवू शकतील.

**आव्हाने काय असतील...**

१. परीक्षा देताना १६ विविध विषय निवडण्याची मुभा असल्याने त्यातून विद्यार्थी आपल्या आवडीचे अभ्यासक्रम निवडून परीक्षेला सामोरे जातील, नवी पद्धत आणण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची गरज असेल.
२. अकरावी, बारावी अभ्यासक्रमाच्या रचनेत आणि पाठ्यपुस्तकांमध्ये बदल करावा लागणार आहे. त्याचबरोबर त्याप्रमाणे शैक्षणिक वर्षाचे नियोजन करावे लागणार, त्यासाठी कालावधी लागेल.
३. परीक्षा पद्धतीचा आराखडा तयार करून त्यासंदर्भात शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांचे अभिप्राय घ्यावे लागतील. त्यावर निर्णय अपेक्षित आहे.
४. राज्यातील शिक्षण पद्धतीत कशा पद्धतीने बदल केले जातील, बोर्ड संरचना बदलावी लागणे यासाठी वेळ द्यावा लागणार.

**सध्याची पद्धत काय?**

सध्याच्या पारंपरिक शिक्षण पद्धतीत विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या दृष्टीने गुण मिळविण्यासाठी शाखेचा पर्याय व आवड याला महत्त्व देत तीन पैकी एका शाखेला प्रवेश घेतात. यामध्ये दहावीत अंतिम वर्षाचा तसेच बारावीच्या विविध शाखांच्या अंतिम परीक्षेतील गुणांवर आधारित पुढील वर्गाचे प्रवेश यंत्रणा राबविली जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणांची स्पर्धा होते आणि प्रवेशाची चुरस होते. त्यामुळे विद्यार्थ्यांवर ताण राहतो. शाखांतून विद्यार्थ्यांना केवळ मर्यादित शाखेचे अभ्यासक्रम शिकण्याची मुभा असल्याने विद्यार्थ्यांवर त्या शिक्षणाव्यतिरिक्त पर्याय उभा राहात नाही.

**विषय कसे निवडणार?**

विद्यार्थ्याला अकरावी आणि बारावी या दोन वर्षांत बोर्ड परीक्षा देताना वेगवेगळ्या १६ अभ्यासक्रमांचे पर्याय असतील. चार टप्प्यांत विद्यार्थ्यांना हे अभ्यासक्रम निवडावे लागतील. उदाहरणार्थ, समाजशास्त्र शाखा निवडल्यास त्यात एक अभ्यासक्रम निवडावा लागेल. इतिहास विषय निवडल्यास विद्यार्थ्याला त्या विषयाचे चार अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील. विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र विषय निवडल्यास भौतिकशास्त्राचे चार अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील. गणित शाखा निवडल्यास त्यातील चार अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील. चौथा विषय या तीन विद्या शाखांपैकी किंवा पूर्णपणे वेगळे विषय निवडता येतील.

**बहुविद्याशाखीय शिक्षण**

नव्या अभ्यासक्रमात बहुविद्याशाखीय आणि सर्वांगीण शिक्षणावर भर दिला जाणार असून अकरावी व बारावीच्या वर्गांची केवळ कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांमध्ये विभागणी केली जाणार नाही. वेगवेगळ्या विद्या शाखांचे ज्ञान एकत्रित घेता यावे म्हणून कला किंवा मानव्यविद्या, विज्ञान, वाणिज्य आणि क्रीडा या विद्या शाखांचा समावेश असलेला बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम तयार केला जाणार आहे.

**परीक्षा दोन वेळा...**

अकरावी आणि बारावीचे वर्ष आणि परीक्षा सत्र पद्धतीनुसार घेण्यात येतील. दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षांचे महत्त्व पूर्वीसारखे राहणार नाही. नववी ते बारावीचे शिक्षण एकसंध असण्यावर भर देण्यात आला आहे. परीक्षा दोन भागात घेतल्या जातील. एक परीक्षा बहुपर्यायी प्रश्नांची तर दुसरी वर्णनात्मक प्रश्नांची असेल. सत्र पद्धतीने बारावी बोर्ड परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्यात येतील. विद्यार्थी आवडीचे अभ्यासक्रम निवडून बोर्ड परीक्षेला सामोरे जातील. अंतिम निकालात त्यापूर्वीच्या म्हणजेच अनुक्रमे नववी व अकरावीतील गुणांचाही विचार केला जाणार आहे.

Pune Edition
Apr 12, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

सामना

### शिक्षणमंत्र्यांची घाई नडणार

# दोन महिने उरले, शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी अशक्य

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी) – येत्या जूनपासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणार असल्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी नुकतेच जाहीर केले. मात्र कोणत्याही पूर्वतयारीशिवाय शैक्षणिक बदलाची घाई शिक्षणमंत्र्यांनी सुरू केली आहे, अशी टीका शिक्षण वर्तुळातून केली जात आहे. जूनपासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी अभ्यासक्रम, मूल्यमापन पद्धतीत होणारा बदल, सुधारित धोरणानुसार पाठ्यपुस्तक निर्मिती, शिक्षणाचे बहुशाखीय एकत्रिकीकरण, त्यासाठी आवश्यक भौतिक सुविधा, शिक्षक प्रशिक्षण, साधनसामग्रीची उपलब्धता या गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे. याशिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे अशक्य असल्याचे मत शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

राज्यात शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी मंत्रालय स्तरावर हालचाली सुरू झाल्या आहेत. मात्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, प्राथमिक शिक्षण परिषद, बालभारती या संबंधित संस्थांपर्यंत यासंदर्भात कोणत्याही सूचना पोहोचलेल्या नाहीत. बालभारतीनेदेखील नुकतीच राज्यभरातून पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदविण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कोणतीही पूर्वतयारी नसल्यामुळे दोन महिन्यांत पूर्वप्राथमिक ते बारावीपर्यंत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविणे कठीण आहे. राज्यात शैक्षणिक बदल करण्यासाठी प्रशासन अद्याप ढिम्म असून सध्याचे चित्र पाहता दहावी, बारावीच्या परीक्षा पारंपरिक पद्धतीने होण्याची दाट शक्यता आहे.

### *जूनपर्यंत अंगणवाडी, बालवाड्यांसाठी अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके*

*राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने होणार आहे. येत्या जूनपर्यंत अंगणवाडी आणि बालवाड्यांसाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके लागू होण्याची शक्यता आहे. याविषयी मंत्रालय स्तरावर हालचाली सुरू असून अंतिम निर्णय झाल्यास जूनपासून राज्यातील प्ले-ग्रुप, नर्सरी, बालवाडी आणि अंगणवाड्या शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत येतील, अशी माहिती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक कैलास पगारे यांनी दिली.*



**शैक्षणिक धोरण राबवण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी दोन महिन्यांत पूर्ण होणार का?**

**सध्याचे चित्र पाहता दहावी, बारावीच्या परीक्षा पारंपरिक पद्धतीने होण्याची शक्यता आहे.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्यात राबविताना शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थी, पालक, शिक्षक व संस्थाचालक यांना विश्वासात घेऊन सध्या निर्माण झालेल्या विविध शंकांचे निरसन करावे, अशी मागणी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते कादंबरीकार आणि प्राध्यापक प्रवीण बांदेकर यांनी केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसंदर्भात त्यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत ते असे...

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी दोन महिन्यांत पूर्ण होणार का?

नवीन अभ्यासक्रम आराखड्यानुसार नवीन पुस्तकांची छपाई पूर्ण होणार का?

आठवी ते बारावी वर्गांना शिकवणारे शिक्षक कोण असतील? नव्या धोरणाला अनुसरून त्यांचे प्रशिक्षण होणार आहे का, व ते कधी होणार आहे?

आठवी ते बारावीपर्यंतचे विषय पारंपरिकच असणार आहेत (उदा. विज्ञान, इतिहास इ.) की त्यात कालनिहाय काही नवे विषय (उदा. फलज्योतिष, गोमूत्र चिकित्सा इ.) अंतर्भूत होणार आहेत?

५+३+३+४ या पूर्वप्राथमिक ते बारावीपर्यंतच्या नव्या पॅटर्नप्रमाणे माध्यमिक शाळा फक्त दहावीपर्यंतच आहेत व जे उच्च माध्यमिकचे वर्ग सीनियर कॉलेजला जोडलेले आहेत, तिथे नवा पॅटर्न कसा राबवला जाणार आहे?

Mumbai Edition
Apr 12, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १८ विद्या ६४ कलांची दखल

## कला, क्रीडा क्षेत्रातील कामगिरीसाठीही आता श्रेयांक

**पुणे, दि. १२** - कला, क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना श्रेयांक देण्यात येणार आहे. भारतीय ज्ञान प्रणालीत १८ विद्या व ६४ कलांमध्ये समावेश असलेल्या घटकांसाठी श्रेयांक देण्याची तरतूद विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रसिध्द केलेल्या राष्ट्रीय श्रेयांक आराखड्याच्या अंतिम मसुद्यात करण्यात आलेला आहे.

शालेय शिक्षणापासून ते विद्यापीठाच्या शिक्षणापर्यंत श्रेयांक पध्दत लागू करण्यात आलेली आहे. मुख्य प्रवाहातील शिक्षण व्यावसायिक कौशल्याशी जोडण्यालाही प्राधान्य देण्यात आले आहे. आराखड्याच्या अंमलबजावणीच्या आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश यूजीसीने शैक्षणिक संस्थांना दिले आहे. ऑक्टोबरमध्ये जाहीर करण्यात आलेल्या मसूद्यात भारतीय ज्ञानप्रणालीचा समावेश नव्हता. अंतिम मनूद्यात समावेश करण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्याच्या माध्यमातून पूर्वप्राथमिक स्तरापासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांना श्रेयांक मिळविता येणार आहेत. ८०० तासांसाठी २७ श्रेयांक, १००० हजार तासांसाठी ३३ श्रेयांक यानुसार श्रेयांकाची रचना करण्यात आली आहे. पूर्वप्राथमिक ते दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना आठशे तास पूर्ण केल्यानंतर २७ श्रेयांक, तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना एक हजार तास पूर्ण केल्यावर ३३ श्रेयांक, सहावी ते पीएच.डी च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात बाराशे तास पूर्ण केल्यावर चाळीस श्रेयांक मिळणार आहेत.

इयत्ता पाचवी ते बारावीसाठीच्या प्रत्येक विषयाला २४० तास स्वअध्ययनासाठी असणार आहेत. वर्गातील मूल्यमापन, प्रात्यक्षिके, प्रकल्प, गृहपाठ याला मिळालेल्या श्रेयांकावरुन एकूण अध्ययनाचे तास मोजण्यात येणार आहे. अध्ययनाव्यतिरिक्त क्रीडा, योग, शारीरिक उपक्रम, सादरीकरण, हस्तकला यांचाही समावेश असणार आहे.

प्रभात PuneCity, 13 Apr 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

लोकमत

# यूजीसीकडून नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे 'नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क' प्रसिद्ध करण्यात आले आहे. शालेय शिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत क्रेडिट पद्धतीचा समावेश करण्यात येणार आहे. शालेय शिक्षणापासून ते पीएच.डी.पर्यंतच्या शिक्षणासाठी ८ ते ३२० क्रेडिटची विभागणी केली आहे. चार वर्षांची पदवी पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना २४० क्रेडिट घ्यावे लागतील, तर पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी २८० क्रेडिटचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क तयार करण्यासाठी एक उच्चस्तरीय समितीची स्थापना केली होती. त्यामध्ये भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नॅशनल कौन्सिल फॉर व्होकेशनल एज्युकेशन अँन्ड ट्रेनिंग, नॅशनल कौन्सिल फॉर एज्युकेशनल रिसर्च अँन्ड ट्रेनिंग, शिक्षण मंत्रालयातील शालेय शिक्षण व साक्षरता विभाग आणि उच्च शिक्षण विभाग, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग आणि प्रशिक्षण महासंचालनालय या संस्थांचा समावेश होता.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी या फ्रेमवर्कची निर्मिती केली आहे. नियमित शिक्षणाला व्यावसायिक कौशल्य शिक्षणाची जोड देण्यात येणार आहे.

### १८ विद्या, ६४ कलांनाही मिळणार क्रेडिट्स

क्रेडिट फ्रेमवर्कमध्ये भारतीय ज्ञान प्रणालीचा समावेश असलेल्या चार वेदांसह १८ विद्या आणि ६४ कलांसाठी आता क्रेडिट्स देता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच कला क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना क्रेडिट्स देण्याची मुभा मिळाली आहे.

| शैक्षणिक पात्रता | क्रेडिट्स |
|---|---|
| नववी | १०० |
| दहावी | १२० |
| अकरावी | १४० |
| बारावी | १६० |
| तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम | २२० |
| चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम | २४० |
| पदव्युत्तर पदवी | २८० |
| पीएचडी अभ्यासक्रम | ३२० |

वर्गातील मूल्यमापन, प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिके, प्रकल्प, गृहपाठ यांसाठी मिळविलेल्या क्रेडिटवरून एकूण अध्ययनाचे तास मोजले जातील. वर्गातील अध्ययनाच्या पलीकडे क्रीडा, योग, शारीरिक उपक्रम, सादरीकरण, हस्तकला आदींचा मूल्यमापनाचा समावेश केला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेले क्रेडिट हे क्रेडिट बँकेत साठविले जातील. या क्रेडिट्सचा वापर विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमांच्या पुढील प्रवेशासाठी करता येईल.

Pune Main
Page No. 2 Apr 13, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# नवीन शैक्षणिक धोरणातून शिक्षणक्रांती

**मुंबई : डॉ. माधव सूर्यवंशी**

केंद्रीय मंत्रिमंडळाने २९ जुलै २०२० रोजी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली. स्वातंत्र्योत्तर काळातील हे तिसरे, तर १९८६ च्या धोरणानंतर तब्बल ३४ वर्षांनंतरचे हे पहिले धोरण आहे. दरम्यानच्या कालखंडात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक संदर्भ बदलले आहेत. या संदर्भास अनुसरून सर्वांना सहज शिक्षण, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण, उत्तरदायित्व या पाच मुख्य स्तंभांवर आधारित या नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणक्रांती येऊ घातली आहे.

### शाळा समूह योजना



शाळा समूह योजना (School complexes) म्हणजे एक मध्यवर्ती माध्यमिक, प्राथमिक शाळा आणि तिच्या परिसरात असणाऱ्या इतर शाळांचा समूह होय. भौतिक सुविधा, तज्ज्ञ मनुष्यबळ, विचार, कल्पना यांचे आदानप्रदान करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीस पूरक वातावरण तयार करणे हा यामागील उद्देश होय. शालेय शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी लोकसहभागाची तसेच खासगी क्षेत्रातील सक्रिय सहभागाची आवश्यकता नवीन शैक्षणिक धोरणात स्पष्ट केली. या कार्यक्रमांतर्गत अनिवासी भारतीय, ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, सेवानिवृत्त कर्मचारी, सेवानिवृत्त वैज्ञानिक, देशातील कोणतीही साक्षर व्यक्ती यात पूर्वपरवानगीने सेवा प्रदान करू शकेल या अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना मिळेल.

या नवीन धोरणाने ५+३+३+४ या कृती आराखड्यास मंजुरी दिली आहे. पहिल्या पाच वर्षांत पूर्व प्राथमिक शिक्षणाची तीन आणि इयत्ता पहिली व दुसरीची दोन अशा पाच वर्षांचा समावेश आहे. खेळ, कृती, शोध यावर आधारित कृतीप्रवण शिक्षणास या स्तरावर महत्त्व दिले आहे. इयत्ता तिसरी ते पाचवी या स्तरावर समजपूर्वक वाचन, लेखन यावर भर देण्यात आला आहे. स्थानिक भाषा, खेळ यावर आधारित आनंददायी अभ्यासक्रमाची रचना या स्तरावर करण्यात येत आहे. इयत्ता सहावी ते आठवी या स्तरावर कृतीवर आधारित प्रायोगिक अभ्यासक्रमाची आखणी करण्यात येत आहे. व्यावसायिक हस्तकला व कौशल्यविकास करण्याच्या दृष्टीने शिक्षण देण्यात येणार आहे. इयत्ता नववी ते बारावी या चार वर्षांत चाळीस वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना विषय निवडण्याची मुभा मिळणार आहे. अर्थात, त्या विषयाचे शिक्षक संबंधित शाळेत उपलब्ध असले पाहिजेत.

इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेचे अवास्तव महत्त्व कमी करण्यात येईल. याचा अर्थ परीक्षा राहणार नाहीत, असे नाही. उच्च माध्यमिक वर्गात कला, वाणिज्य, विज्ञान असे शाखाभेद न ठेवता आवडीचे विषय निवडता येतील. यापुढे पदवी पातळीवरही आवडीचे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना दिल्याने मुक्त शिक्षण देण्याचा प्रयत्न या धोरणात दिसतो.

नवीन शैक्षणिक धोरणात पूर्व प्राथमिक वर्गांना शाळेशी जोडल्याने प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन होईल. अंगणवाडी सेविकांना या संदर्भात प्रशिक्षण देण्याची तरतूद यात आहे. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना शालेय वातावरणाशी जुळवून घेणे सहजसुलभ व्हावे, त्यांच्या वयानुरूप आणि विकासाच्या दृष्टीने योग्य प्रारंभिक शिक्षण अनुभव देण्यासाठी विविध खेळ, कृती, उपक्रमाचे आयोजन शाळेत करण्याची शिफारस या धोरणात आहे. त्यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासालाही चालना मिळेल.

**मूल्यांकन बदलले**

विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनामधील गुणांचे महत्त्व कमी करून बहुआयामी मूल्यांकनाचा स्वीकार नवीन शैक्षणिक धोरणाने केला आहे. ज्यात स्वंयमूल्यांकन, सहाध्यायी मूल्यांकन, शिक्षण मूल्यांकनासोबत विद्यार्थ्यांचे भावात्मक, सामाजिक, बोधात्मक, क्रियात्मक प्रगतीच्या आधारे सातत्यपूर्ण मूल्यांकन करण्यात येणार आहे. संशोधन, आकलन, उपयोजनावर भर, गणिती, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशील, चिंतनशील विचार, सहसंबंधात्मक अध्ययन, संवाद कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात येणार असल्याने आनंददायी शिक्षणावर भर आहे.

**शिक्षक प्रशिक्षण सक्तीचे**

प्रत्येक शैक्षणिक वर्षात शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक प्रशिक्षक यांच्यासाठी पन्नास तासांचे व्यावसायिक विकास प्रशिक्षण नवीन शैक्षणिक धोरणानुसार सक्तीने झाले आहे. या प्रशिक्षणाची जबाबदारी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे देण्यात आली आहे. या धोरणात कौशल्य व व्यावसायिक शिक्षणाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार कौशल्यविकास व व्यावसायिक शिक्षणातील विषयाची निवड करण्यास प्रोत्साहन देण्यात येणार असल्याने याचा फायदा नक्कीच विद्यार्थ्यांना होईल.

**(लेखक खार एज्युकेशन सोसायटीत अध्यापक व शिक्षणशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

## ५+३+३+४

**असा नवा पॅटर्न राबवणारे नवे शैक्षणिक धोरण येऊ घातले आहे. बालवाडीपासून ते पदवीपर्यंतचे शिक्षण घेण्याची तऱ्हा त्यामुळे पूर्ण बदलेल. हे नवे धोरण साधक की बाधक या संदर्भात दोन तज्ज्ञांनी मांडलेले हे दोन दृष्टिकोन**

## [आमने सामने]

# नव्या धोरणाबद्दल नवे शैक्षणिक संभ्रम

**पुणे : डॉ. अ. ल. देशमुख**

महाराष्ट्रात पन्नास टक्के शाळा उच्च माध्यमिक विभाग म्हणजेच अकरावी, बारावी या महाविद्यालयाला जोडलेल्या आहेत. उर्वरित पन्नास टक्के शाळांनाच जोडलेल्या आहेत. लोकांच्या मनामध्ये हा संभ्रम आहे की, पायाभूत सुविधांचा विचार केल्यास, नववी ते बारावी संपूर्ण शाळांकडे राहणार की महाविद्यालयांकडे. शाळांना अकरावी, बारावी संपूर्ण जोडायची म्हटले तर शाळांकडे पायाभूत सुविधा नाहीत आणि नववी, दहावी महाविद्यालयांना जोडायचे म्हटले तर वयोगटानुरूप ते योग्य ठरणार नाही.

### विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने घातक?



सध्या बारावीनंतर जेईई, नीट, सीईटी या परीक्षा वैद्यकीय, अभियांत्रिकीसाठी घेतल्या जातात. त्या जशाच्या तशा घेतल्या जातील, असे धोरणामध्ये व्यक्त करण्यात आले आहे. त्यामुळे या स्पर्धा परीक्षांमध्ये नेमके कोणते विषय असणार आहेत. बारावीला किती गुण मिळालेला विद्यार्थी या स्पर्धा परीक्षेला बसू शकतो किंवा ज्यांना फक्त विज्ञान विषय घेयचा आहे ते तसेच राहणार का, हे कितपत योग्य आहे. याबाबतीतही महाराष्ट्रातील शिक्षणतज्ज्ञांनी बोलले पाहिजे. आताच बोलण्याची वेळ आहे. आता जर सगळे गप्प बसले, तर जे याचे सकारात्मक, नकारात्मक परिणाम होतील, ते विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने घातक असतील का? असा एक प्रश्न निर्माण होत असल्याचे देशमुख म्हणाले.

नववी ते बारावीचा अभ्यासक्रम आणि मूल्यमापन पद्धती नेमकी कशी असणार, याविषयी सर्वत्र चर्चा आहे. केंद्राने याबाबतीत दिलेले स्पष्टीकरण सीबीएसई शाळांपुरते मर्यादित आहे की, महाराष्ट्रातील सर्व शाळांनाही लागू आहे, याचा अंदाज येत नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करणाऱ्या सदस्यांपैकी वसुधा कामत यांनी त्यांच्या एका भाषणामध्ये, 'नववी ते बारावी एकूण चाळीस विषय असतील. त्यापैकी सोळा विषय ग्रेडचे असतील, तर चोवीस विषय पूर्ण करावे लागतील. या चारही वर्षांमध्ये सत्र पद्धत असेल, असे सांगितले आहे. प्रत्येक वर्षी दोन सत्र असतील. या आठ सत्रांमध्ये नववी ते बारावीचे मूल्यमापन पद्धती करणार आहोत, असे संभाव्य धोरण त्यांनी सांगितले. तसेच नववीला पहिल्या सत्रात तीन विषय असतील त्याची परीक्षा बोर्डकडून होईल, असेही त्या म्हणतात.

**शाळांची स्थिती संभ्रमाचीच**

अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना लवचिकता दिलेली आहे. नववीमध्ये समजा मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान, समाजशास्त्र असे विषय घेतले आणि जर दहावीमध्ये मला वाटलं मला गणित अवघड जाते तर गणित सोडून फॅशन डिझायनिंग, तत्त्वज्ञान कुठलाही विषय घेऊ शकतो.

विषय बदलल्यामुळे पहिल्या वर्षी जे विषय घेतले होते, त्याला मिळालेले गुण असतील ते गुण दहावीमध्ये जमा होतील. त्यामुळे मुलांचे कुठलेही नुकसान होणार नाही; पण राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी काही दिवसांपूर्वीच्या मुलाखतीमध्ये स्पष्ट म्हटले आहे की, राज्य सरकारने आम्हाला योग्य सूचना दिल्याशिवाय आम्ही बोर्डाचे कुठलेही धोरण जाहीर करणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये राज्य सरकारच्या ज्या शाळा आहेत, त्या सर्व शाळांमध्ये गोंधळाची, संभ्रमाची स्थिती निर्माण झालेली आहे.

धोरणातील चोवीस विषयांचा विचार केला, तर दहावीला बोर्डाची परीक्षा होणार की नाही, की फक्त बारावीला बोर्डाची परीक्षा होणार, याचा अंदाज लागत नाही. दहावीला बोर्डाची परीक्षा घेतली, तर नववीचे गुण दहावीत मिसळणार का किंवा फक्त बारावीची बोर्डाची परीक्षा घेतली तर नववी, दहावी, अकरावीला मिळालेले गुण हे बारावीच्या निकालात दाखवणार का, हे नेमके काय करणार आहेत, त्याचा थांगपत्ता लागत नाही. प्रत्येक विद्यार्थ्याला वाटले की, मी चोवीस विषयात पारंगत व्हावे, हे शक्य आहे का? नाही तर 'एक ना धड भाराभर चिंध्या' याप्रमाणे त्या विद्यार्थ्याची अवस्था होऊ नये.

**धोरण कुणासाठी आहे?**

या चोवीस विषयांचा अभ्यास करताना विद्यार्थी गोंधळून जातील की काय, याचाही विचार केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनाचे मानसशास्त्र नेमके काय आहे, विद्यार्थ्यांना नेमके काय हवे आहे, याचा विचार करणे गरजेचे आहे. धोरण विद्यार्थ्यांसाठी आहे की देशासाठी आहे? परदेशातील शैक्षणिक प्रक्रियांचा समावेश केला आहे; पण आपल्या विद्यार्थ्यांना हे पेलेल का? हे धोरण यशस्वीपणे आपल्याला कार्यान्वित करता येईल? आतापर्यंत उत्तम शैक्षणिक धोरणे आली; पण कार्यवाहीच्या पातळीवर यशस्वी होऊ शकली नाहीत. म्हणून ती चुकीची होती, असे म्हणता येणार नाही. ही सगळी धोरणे उत्तमच होती; मग हा बदल का केला जात आहे, याचाही उलगडा व्हायला हवा.

**(लेखक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ म्हणून परिचित आहेत.)**

Pune Edition
Apr 13, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

Pune Edition
Apr 13, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# गुणांऐवजी क्रेडिटची भाषा

■ हर्ष दुधे

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचा पूर्वमसुदा प्रसिद्ध करून सूचना आणि हरकती मागविल्या आहेत. पाठोपाठ विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'राष्ट्रीय श्रेयांक आराखडा' (नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क - एनसीएफ) जाहीर केला आहे. क्रेडिट फ्रेमवर्कची शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षक, अभ्यासक आणि सरकारमधील अधिकाऱ्यांकडून विविध पातळींवर अभ्यास सुरू झाला आहे.

### ■ क्रेडिट आराखडा काय आहे?

श्रेयांक आराखड्यासाठी केंद्र सरकारने डॉ. निर्मलजित सिंग कलसी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमली होती. पूर्वप्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत विविध टप्प्यावर ०.१ ते ८ अशी राष्ट्रीय श्रेयांक पातळी (क्रेडिट लेव्हल) जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार शालेय शिक्षणापासून ते पीएचडीपर्यंत ८ ते ३२० क्रेडिटची विभागणी केली आहे. चार वर्षांची पदवी पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांला २४० क्रेडिटचा, तर पदव्युत्तर पदवीसाठी २६० क्रेडिटचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल. हे क्रेडिट घेण्यासाठी विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षात साधारण १२०० तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार असून, त्याला 'नोशनल लर्निंग अवर्स' असे संबोधले जाईल.

### ■ शालेय शिक्षणात क्रेडिट कसे?

पूर्वप्राथमिक स्तरापासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांना क्रेडिट प्राप्त करता येतील. साधारण आठशे तासांसाठी २७ क्रेडिट, एक हजार तासांसाठी ३३ क्रेडिट या पद्धतीची रचना आहे. पूर्वप्राथमिक ते दुसरीच्या विद्यार्थ्यांना आठशे तास पूर्ण केल्यावर २७ क्रेडिट, तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना एक हजार तास पूर्ण केल्यावर ३३ क्रेडिट, तर सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात १२०० तास पूर्ण केल्यावर २० क्रेडिट मिळणार आहेत. पाचवी ते बारावीसाठी प्रत्येक विषयाला २४० तास स्वअध्ययनासाठी असतील. वर्गातील मूल्यमापन, प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिके, प्रकल्प, गृहपाठ, शैक्षणिक उपक्रम यांसाठी मिळवलेल्या क्रेडिटवरून एकूण अभ्यासाचे तास मोजले जातील. शैक्षणिक उपक्रमांमध्ये क्रीडा, योग, शारीरिक उपक्रम, सादरीकरण, हस्तकला आदींचे मूल्यमापन होईल.

### ■ कौशल्य शिक्षणावर भर का?

पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांत कौशल्ये आणि रोजगाराभिमुख शिक्षणाला महत्त्व आहे. त्यानुसार ३० ते ४० टक्के अभ्यासक्रम थिअरी स्वरूपाचा असून, त्यात विद्यार्थ्यांचे संभाषण, विश्लेषणात्मक विचार, तसेच डिजिटल तंत्रकौशल्ये आदी विकसित करणाऱ्या घटकांचा समावेश अनिवार्य आहे. बदलत्या काळात कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी पारंपरिक शिक्षणाला छेद दिला आहे. त्याचप्रमाणे ६० ते ७० टक्क्यांपर्यंतचा अभ्यासक्रम संपूर्णपणे कौशल्यांवर आधारित असेल. यामध्ये प्रात्यक्षिके, इंटर्नशिप, प्रशिक्षण, कार्यशाळा यांचा समावेश असेल. त्यामुळे विद्यार्थ्यांना इंटर्नशिपमध्येही क्रेडिट मिळतील. क्रीडा आणि कला क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरीसाठीही क्रेडिट मिळणार आहे. त्यासोबतच सामाजिक, नावीन्यपूर्ण संशोधन, स्टार्टअप क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांनाही क्रेडिट देण्याची शिफारस आहे.

### ■ क्रेडिटचा वापर कसा होणार?

विद्यार्थ्यांसाठी 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स' पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. त्यावर महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थ्यांनी स्वतंत्र नोंदणी केल्यानंतर, विद्यार्थ्यांचे क्रेडिट अपलोड करता येणार आहे. विद्यार्थ्यांना हव्या त्या शैक्षणिक संस्थेत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी संबंधित क्रेडिटचा वापर करता येईल. त्यासाठी देशातील सर्व शैक्षणिक संस्थांना पोर्टलवर नोंदणी गरजेची असेल. शालेय आणि उच्च शिक्षणात क्रेडिट सिस्टीमचा वापर करण्यासाठी मूल्यमापन पद्धतीत बदल करावे लागतील. शैक्षणिक संस्थेला विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करण्याशिवाय पर्याय उरणार नाही. संस्थांना अभ्यासक्रमात नवे विषय समाविष्ट करावे लागणार असून, त्याचे शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची नेमणूक करून त्यांना प्रशिक्षण द्यावे लागेल. संस्थांना पायाभूत आणि शैक्षणिक सुविधाही सुधाराव्या लागतील.

Harsh.Dudhe@timesgroup.com

Maharashtra Times 13.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# SPPU seeks suggestions for its five-year edu plan

Ardhra.Nair
@timesgroup.com

**Pune**: Savitribai Phule Pune University (SPPU) has sought suggestions from students, parents, industrialists, experts and others on courses and other aspects of university education that can be incorporated into its five-year plan starting from the academic year 2024-25.

SPPU has jurisdiction over institutes in Pune, Nashik and Ahmednagar districts.

The needs of students of each area may be different in terms of the availability of colleges, availability of courses and infrastructure, university officials said.

The recommendations and suggestions can be sent online via a link on SPPU's official website.

Sanjeev Sonawane, pro-vice-chancellor of the university, said, "The purpose of this survey is to gauge what society needs from a university today. It is no more a top-down approach where the officials decide and students have to obey. People nowadays want different courses such as those related to artificial intelligence, analytics, machine learning, etc. In arts, there are digital humanities courses, in commerce, there is financial risk management."

He added, "There are many upcoming courses that people want but may not be offered by the affiliated colleges or university. We want to change this and incorporate their demands."

Sonawane said that people can also demand from the university a course that exists but is not available in their nearby colleges, or a course that can give them job opportunities in the nearby industrial area or IT park.

"All this will be incorporated in the five-year plan we make for the university and will be sent to the government for approval," he added.

## HOW WILL THIS HELP?

SPPU has jurisdiction over Nashik, Pune and Ahmednagar, and students in each place have different requirements

- By doing a survey, SPPU officials can find out what courses are in demand in which regions, and what more can be added
- It allows people to ask for a course that exists but is not available in nearby colleges
- They can even demand a course that can give them job opportunities in nearby industrial areas

"The purpose of this survey is to gauge what the society needs from a university today. It is no more a top-down approach where the officials decide and the students have to obey

— **Sanjeev Sonawane** | PRO-VICE CHANCELLOR, SPPU

**HOW TO SEND RECOMMENDATION** | They can be sent online via a link given on **SPPU's official website**

The Times of India 13.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

मंथन

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । सोमवार, १७ एप्रिल २०२३

# शैक्षणिक धोरण म्हणजे जादूची कांडी नव्हे

हर्ष दुधे
mtedit@timesgroup.com

**शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सर्व राज्यांनी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून करायची आहे. मात्र, त्यासाठी सोयीसुविधा, शिक्षकांचे प्रशिक्षण अशा अनेक बाबी पार पाडाव्या लागणार आहेत. हे लक्षात घेता दोन वर्षांत त्याची अंमलबजावणी करणे म्हणजे जादूची कांडी फिरवण्याइतके सोपे आहे का, असा प्रश्न विचारला जात आहे.**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) गेल्या आठवड्यात राष्ट्रीय शालेय शिक्षणाच्या आराखड्याचा मसुदा जाहीर केल्यानंतर, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या दिशेने एक पाऊल पुढे पडले. या मसुद्यानुसार शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सर्व राज्यांनी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून करायची आहे. त्यामुळे शिक्षक, पालक, अभ्यासक, संस्थाचालक अशा प्रमुख घटकांकडून मसुद्यावर सूचना आणि हरकती मागविण्यात आल्या आहेत. या सूचनांवर चर्चा होऊन अंतिम आराखडा प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मात्र, राज्यातील शालेय शिक्षणाची एकूणच परिस्थिती पाहता ही कालमर्यादा पाळणे शक्य नाही, असे जाणवते. आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी नव्याने अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके तयार करावी लागणार आहेत. परीक्षा पद्धतीतही आमूलाग्र बदल अपेक्षित आहेत. शाळांमधील उपलब्ध शैक्षणिक सोयीसुविधा, शिक्षकांची संख्या आणि त्यांचे प्रशिक्षण, नावीन्यपूर्ण विषयांसाठी नव्या सुविधा अशा सर्व बाबी लक्षात घेता शैक्षणिक आराखड्याची अंमलबजावणी तातडीने शक्य नाही. त्यासाठी वेळ द्यावा लागेल, अशी प्रतिक्रिया अभ्यासकांकडून उमटत आहे. त्यामुळे शैक्षणिक धोरणाची अंमलबाजवणी दोन वर्षांत करणे म्हणजे जादूची कांडी फिरवण्याइतके सोपे आहे का, अशी प्रतिक्रिया शिक्षण क्षेत्रात उमटते आहे.

### 'एससीईआरटी'ला जाग कधी येणार?

राष्ट्रीय शालेय शैक्षणिक आराखड्याची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) राज्यातील प्रस्तावित आराखडा प्रसिद्ध करणे गरजेचे आहे. त्यानंतरच विविध शैक्षणिक विभागांना धोरणाच्या अंमलबजावणीची पुरेशी कल्पना येऊ शकेल. मात्र, 'एससीईआरटी'ने याबाबत अद्याप कोणतीही माहिती नागरिकांसाठी उपलब्ध केलेली नाही. शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना साह्य करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून 'सार्थक' योजना देशपातळीवर लागू करण्यात आली आहे. त्या अंतर्गत शिक्षण विभागाला २९७ उपक्रम (टास्क) पूर्ण करायचे आहेत. हे उपक्रम सध्या कोणत्या टप्प्यावर आहेत, याबाबतची माहिती अजूनही गुलदस्त्यात आहे. अशा परिस्थितीत पुढील शैक्षणिक वर्षापासून राज्यात राष्ट्रीय शालेय शिक्षणाचा आराखडा कसा राबविणार, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

### पाठ्यपुस्तकांची निर्मिती आणि मूल्यमापनाचे काय?

अंमलजबावणीच्या दृष्टीने शैक्षणिक आराखड्याची अभ्यासक्रम निश्चिती करणे, पाठ्यपुस्तकांची रचना, विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासाठी योजना आखणे अशा प्रमुख मुद्द्यांवर पावले उचलावी लागणार आहेत. सध्या आपला अभ्यासक्रम प्रारंभ बिंदूला (पहिली, पाचवी, आठवीला) दर चार वर्षांनी बदलतो. त्यानंतर पुढील वर्षी इतर इयत्तांचा बदलतो. नव्या रचनेत ही अभ्यासक्रम बदलाची योजना सुरू राहणार की बंद होणार, याबाबत कोणतीही स्पष्टता नाही. शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी पाठ्यपुस्तकांमध्ये कोरी पाने जोडण्याचा निर्णय जाहीर केला असून, 'बालभारती'ने त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून (जून २०२३) विद्यार्थ्यांना सरावासाठी कोरी पाने असणारी पाठ्यपुस्तके मिळण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत नवा अभ्यासक्रम लागू करण्याची वेळ आली, तर या पुस्तकांचे काय होईल, अशीही विचारणा अभ्यासक आणि शिक्षक करीत आहेत. नव्याने अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यासाठी नवे अभ्यासमंडळ नेमावे लागेल. विद्यार्थ्यांचे योग्य मूल्यमापन होण्यासाठी पारंपरिक परीक्षा पद्धतीऐवजी मूल्यमापन पद्धतीत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यांकन पद्धत रूजवावी लागेल. याबाबत शिक्षक आणि मुख्याध्यापकांनाही माहिती नाही. या सर्वांसाठी 'एससीईआरटी' आणि 'बालभारती'ने एकत्रित बैठका घेऊन निर्णय घेऊन, त्याची माहिती विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना देणे गरजेचे आहे.

**प्रमुख अडचणी कोणत्या?**

- अभ्यासक्रम निर्मिती, पाठ्यपुस्तकांची रचना व बदल
- शाळांमध्ये उपलब्ध सोयीसुविधा
- सुसज्ज प्रयोगशाळा आणि ग्रंथालये
- शिक्षकांची संख्या; तसेच त्यांची विषयनिहाय उपलब्धता
- नव्या अभ्यासक्रमानुसार शिक्षकांचे प्रशिक्षण
- अकरावी-बारावीला विषयांची संख्या जादा असल्याने, ग्रामीण भागात अंमलबजावणी कशी होणार?

### परीक्षा पद्धतीमुळे विद्यार्थी-पालकांमध्ये संभ्रम

या आराखड्याची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून झाल्यास राज्य मंडळाच्या पारंपरिक परीक्षांचे काय होईल, असा प्रमुख प्रश्न पुढील शैक्षणिक वर्षात दहावी आणि बारावीच्या परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसमोर निर्माण झाला आहे. नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना मानव्यशास्त्र, गणित आणि संगणन, व्यावसायिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, कला शिक्षण, समाजशास्त्र, विज्ञान आणि आंतरविद्याशाखा या विद्याशाखांमधील आपल्या आवडीनुसार प्रत्येक वर्षी आठ या प्रमाणे १६ विषय घेऊन उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. तर, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना तीन विद्याशाखांतून १६ विषयांची निवड करून उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. त्यातही वार्षिक परीक्षेऐवजी दोनदा सत्र परीक्षा होणार आहे. त्यामुळे यंदा आठवी आणि दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. आपल्या पाल्यांवरच शिक्षण पद्धतींचे नावीन्यपूर्ण प्रयोग होण्याची भीती पालकांना सतावते आहे. त्यांना पाल्यांच्या भविष्याबाबत काळजी वाटत आहे. अशा वेळी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे समाधान करण्यासाठी राज्य मंडळाने भूमिका जाहीर करणे गरजेचे आहे. ऐन वेळी निर्णय जाहीर केल्यास, विद्यार्थी-पालकांमध्ये गोंधळ उडू शकतो.

### शैक्षणिक सुविधा, शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे काय?

शालेय शिक्षणाचा आराखडा विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून तयार केला असला, तरीही त्याची यशस्वी अंमलबाजवणी करण्याची प्रमुख जबाबदारी शिक्षकांच्या खांद्यावर आहे. या आराखड्यात अभ्यासक्रम, मूल्यमापन आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. त्यांची माहिती होण्यासाठी, सराव होण्यासाठी कार्यशाळांच्या माध्यमातून शिक्षकांचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. शिक्षकांना माहिती तंत्रज्ञानाच्या (आयटी) अनुषंगाने प्रशिक्षित केल्यानंतर आराखड्यातील तरतूदी पूर्णत्वास जातील. मात्र, सरकारकडून सध्या शिक्षकांना अशैक्षणिक कामांना जुंपण्यात आले आहेत. निवडणुकीसोबत सरकारी योजनांचा प्रचार-प्रसार करणे, आरोग्य विभागाची कामे करणे, महसूल विभागाच्या विविध योजनांमध्ये काम करणे अशा कामांमध्ये शिक्षकांचा वेळ जात आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षकांना धोरणाच्या अंमलबाजवणीसाठी कसे तयार करता येईल, याचाही विचार सरकारने करायला हवा. विद्यार्थ्यांना बहुशाखीय शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करण्यात येत आहे. अशा वेळी लहान शहरे आणि ग्रामीण भागांमध्ये प्रात्यक्षिकांसाठी सुविधा, विषयानुसार शिक्षकांची उपलब्धता, प्रयोगशाळा उपलब्ध आहेत का, याचा विचार केल्याचे दिसत नाही. त्याबाबत चर्चाही होताना दिसत नाही. राज्यातील निम्म्यापेक्षा अधिक शाळांमध्ये शिक्षकांची हजारो पदे रिक्त आहेत. शिक्षकच नसल्यास शिकवणार कोण, हा मूलभूत प्रश्न आहे.

Maharashtra Times 17.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध

# उच्च शिक्षणात 'भारतीय ज्ञानप्रणाली'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** उच्च शिक्षणात भारतीय ज्ञानप्रणालीचा समावेश करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचनांचा मसुदा विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रसिद्ध केला. पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना किमान पाच टक्के श्रेयांक भारतीय ज्ञान प्रणालीअंतर्गत अभ्यासक्रमांसाठी घेण्याबाबत प्रोत्साहन देण्याची सूचनाही यूजीसीकडून करण्यात आली आहे.

भारतीय ज्ञानप्रणाली सध्याच्या शिक्षण पद्धतीत स्वीकारल्यामुळे भारतीय ज्ञानप्रणालीचे जतन होऊन त्यात पुढील संशोधन आणि समाजात वापर करता येऊ शकेल. मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यापीठांनी अभ्यासक्रम तयार केल्यास प्राचीन भारतीय वारसा जपण्यास मदत होईल. दहा वर्षांचे उद्दिष्ट समोर ठेवून या मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या आहेत. आवश्यकतेनुसार पाच वर्षांनी त्यात बदल करता येईल, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे. या मार्गदर्शक सूचनांवर ३० एप्रिलपर्यंत हरकती-सूचना नोंदवता येणार आहेत.

भारतीय ज्ञानप्रणालीतील पायाभूत अभ्यासक्रमांमध्ये भारतीय सभ्यतेचे साहित्य, भारतीय स्थापत्य, भारतीय कला, भारतीय वस्त्र, भारतीय धातुकाम, भारतीय स्थापत्य आणि नगरनियोजन, भारतीय शिक्षण, संस्कृत आणि इतर भारतीय भाषांतील अभिजात साहित्य, भारतीय खगोलशास्त्र आदींचा समावेश आहे; तर वैदिक काळ, आधुनिक काळातील गणित या अंतर्गत वेद आणि सुल्व सूत्रांतील गणित, पाणिनीचे अष्टाध्यायी, भास्कराचार्यांचे लीलावती आणि बीजगणित, आधुनिक भारतातील गणित असे विषय समाविष्ट आहेत. भारतीय खगोलशास्त्रातील विषयही देण्यात आले आहेत. भारतीय ज्ञानप्रणालीचे अभ्यासक्रम साहित्य अस्सल साधनांवर आधारित असेल, याची काळजी घेण्याची सूचनाही करण्यात आली आहे.



### वैद्यकीय अभ्यासक्रमात आयुर्वेद

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पहिल्या वर्षी भारतीय ज्ञानप्रणालीतील वैद्यकीय अभ्यासक्रमाशी संबंधित आयुर्वेद, योग, नॅचरोपॅथी, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथीची ओळख हा श्रेयांक अभ्यासक्रम घेऊ शकतात, तर द्वितीय वर्षात भारतीय वैद्यक पद्धतीतील आयुर्वेद, सिद्ध, योग आदींचा दोन सत्रांचा थिअरी आणि प्रात्यक्षिकासाठीचा श्रेयांक अभ्यासक्रम घेऊ शकतात, असे नमूद करण्यात आले आहे.

### शिक्षकांसाठीही मार्गदर्शक सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये भारतीय भाषा, कला आणि संस्कृतीवर भर देण्यात आला आहे. त्यासाठी भारतीय ज्ञानप्रणालीचा समावेश शिक्षणाच्या सर्व स्तरांवर करण्यात आला आहे. पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विषयांची सांगड घालण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने भारतीय ज्ञानप्रणालीसाठी शिक्षक प्रशिक्षण मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. या मार्गदर्शक सूचना मालवीय मिशनचा भाग असून कॅस योजनेसाठीही ग्राह्य धरल्या जातील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 18 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72201764

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# विद्यापीठाची विधायकता जपण्यात अधिसभेची मोठी जबाबदारी

## ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** लोकतांत्रिक रचना असलेल्या विद्यापीठाची विधायकता जपली गेली पाहिजे. या दृष्टीने अधिसभेची जबाबदारी मोठी आहे. शैक्षणिक धोरणातील उद्दिष्टांचा समाजात प्रसार करण्यासाठी अधिसभा सदस्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या वलयाचा वापर करावा. राष्ट्रीयतेचे भरणपोषण करणारे नवीन शैक्षणिक धोरण विद्यापीठात यशस्वीरीत्या राबवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची गरज आहे, असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांनी सोमवारी मांडले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था या संस्थांतर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नवनिर्वाचित अधिसभा सदस्य, अधिष्ठात्यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी प्रा. देशपांडे बोलत होते. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, संस्थांचे प्रतिनिधी डॉ. शरद कुंटे, ॲड. एस. के. जैन, राजीव सहस्त्रबुद्धे, रवींद्र देव, सुधीर गाडे, डॉ. किशोर देसरडा आदी उपस्थित होते.

प्रा. देशपांडे म्हणाले, की अधिसभा सदस्य म्हणून समाजातील लोकांनी निवडून देऊन सामाजिक प्रतिनिधित्वाची जबाबदारी दिली आहे. कोणत्याही प्रकारचे राजकारण न करता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विकासासाठी काम केले पाहिजे. पुढील पाच वर्षे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे काम करून परिवर्तनाचे पाईक होण्याची संधी आहे.

लोकसत्ता Tue, 18 April 2023 https://epaper.loksatta.com/c/72

# एम.फिल.धारकांना 'नेट'मधून सवलत?

**पुणे, दि. १७ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत दि.१ जानेवारी १९९४ ते दि. ११ जुलै २००९ या कालावधीत एम. फिल अर्हता प्राप्त केलेल्या प्राध्यापकांना 'नेट'मधून सवलत मिळण्यासाठी प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्यात येणार आहे. प्राध्यापक पदासाठी 'नेट' 'सेट' उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. मात्र, निवड समितीच्या माध्यमातून नियुक्त प्राध्यापकांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे. या प्राध्यापकांनी सेवेत असताना एम. फिल. अर्हता प्राप्त केली आहे. अशा १५० प्राध्यापकांना 'नेट' नसतानाही विद्यापीठाने मान्यता दिली. परंतु काहींना ती मिळाली नाही.

प्रभात PuneCity, 1 https://epa

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना संगीतशिक्षणही

**शैक्षणिक धोरणासंदर्भात 'मटा'ची कार्यशाळा**

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

येत्या शैक्षणिक वर्षापासून जून २०२३पासून विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना संगीताचे शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. बीकॉम करणाऱ्या विद्यार्थ्यांना सगळेच विषय कॉमर्ससंबंधी घ्यायला हवेत असे नाही, तर त्यांना इतर शाखेतील विषयांच्या अभ्यासातून क्रेडिट मिळवता येईल. येत्या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्रातील ११ विद्यापीठात हा बदल लागू होईल आणि शिक्षणाची प्रक्रिया ही अधिक विद्यार्थी केंद्रीत होईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून होणाऱ्या बदलांसंदर्भात सोमवारी मुंबई विद्यापीठाच्या सर कावसजी जहांगीर दीक्षान्त सभागृहात महाराष्ट्र टाइम्स आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. सी. ए. अनिल राव यांनी शैक्षणिक धोरणाचे विद्यार्थीकेंद्री फायदे उलगडून सांगताना ही माहिती दिली. कला, वाणिज्य, विज्ञान शाखांच्या विद्यार्थ्यांना क्रीडा, संगीत; तसेच तांत्रिक कौशल्याच्या अभ्यासातूनही क्रेडिट मिळवण्याची सोय उपलब्ध होणार आहे. एनसीसी, एनएसएसमध्ये कार्यरत असणाऱ्यांना त्यांचे गुण मिळतील. राव यांच्यासोबत राज्याच्या अभ्यासक्रम आराखडा समितीचे अध्यक्ष आणि मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सुकाणू समितीचे अध्यक्ष आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'यापूर्वी ज्या महाविद्यालयात ज्या शाखेसाठी प्रवेश घेतला त्याच महाविद्यालयात त्या शाखेचे विषय शिकणे भाग होते. मात्र, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने अधिक लवचिकता मिळेल. एनसीसी, एनएसएस, क्रीडा; तसेच तांत्रिक शिक्षण यांच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांना क्रेडिट मिळेल. कला शाखेच्या विद्यार्थ्यांनाही तांत्रिक शिक्षणातून गुण मिळणे शक्य होईल. अशा प्रकारे औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणातून अपेक्षित गुण मिळत जातील. यातून कारकीर्द घडवू शकणारा युवावर्ग तयार होईल,' असे प्रा. राव यांनी स्पष्ट केले.

प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनीही या धोरणाच्या माध्यमातून हव्या त्या विषयांसह पदवीची संधी उपलब्ध होईल असे सांगताना ज्ञान प्रत्यक्ष यंत्रणेमध्ये कसे वापरले जाते ते शिकण्याची संधी मिळेल याबद्दल सांगितले. ज्ञानासोबत अपेक्षित असलेली व्यावसायिक कौशल्येही विद्यार्थ्यांना नव्या धोरणामुळे उपलब्ध होणार आहेत, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन आरेकर यांनी केले; तर आभार कुलसचिव प्रा. डॉ. सुनील भिरुड यांनी मानले.

**सुमारे बाराशे विद्यार्थ्यांची उपस्थिती**

या कार्यशाळेसाठी मुंबई, ठाणे, पालघर येथील सुमारे ८० महाविद्यालयांमधून १ हजार २०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी तज्ज्ञांना अनेक प्रश्न विचारून शंका निरसन करून घेतले. पदव्युत्तर पदवीच्या वेळी नव्याने उपलब्ध होणारी संधी, येत्या काळात दुहेरी पदवी, शुल्कपद्धती अशा विविध मुद्द्यांसंदर्भात या तिन्ही तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. शैक्षणिक धोरणाच्या खाचाखोचा समजण्यासाठी मार्गदर्शन आवश्यक असल्याचे 'महाराष्ट्र टाइम्स'च्या मुंबई आवृत्तीचे निवासी संपादक समीर कर्वे यांनी सांगितले.

"आतापर्यंत लागू असलेल्या उच्च शिक्षणासाठीच्या पर्यायांवर आधारित प्रणालीच्या पुढचे हे नवीन शैक्षणिक धोरणाचे पाऊल आहे. एखादा अभ्यासक्रम न आवडल्यास त्यातून बाहेर पडून नव्या अभ्यासक्रमाचा विचार करता येऊ शकेल.

- प्रा. नितीन करमळकर, अध्यक्ष, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सुकाणू समिती

Maharashtra Times 18.4.2023

# News Paper Clippings During April 2023

## Section: Education

# शिक्षण धोरण विद्यार्थीकेंद्री

## कारकीर्द, व्यावसायिक वाटचालीला चालना मिळण्याची आशा

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

नवीन शिक्षण धोरणामुळे विद्यार्थ्यांच्या कारकिर्दीला, व्यावसायिक वाटचालीला चालना मिळू शकेल. हे धोरण ज्ञानासोबतच व्यावसायिक कौशल्ये शिकवणारेही आहे. याचा विद्यार्थ्यांना कसा फायदा मिळू शकेल, त्यासाठी कसा प्रवेश घेता येईल, त्यातील तरतुदी यांबाबत तज्ज्ञांनी सोमवारी मुंबई विद्यापीठाच्या सर कावसजी जहांगीर दीक्षांत सभागृहात 'महाराष्ट्र टाइम्स' आणि 'मुंबई विद्यापीठ' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अनेक विद्यार्थ्यांनी आपले प्रश्न यावेळी मांडले. मुंबई आणि परिसरातील अनेक महाविद्यालयांचे प्राध्यापक या कार्यशाळेस उपस्थित होते.



नव्या वर्गाच्या
नव्या वाटा

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या माध्यमातून उच्च शिक्षण क्षेत्रात येऊ घातलेल्या या बदलांची माहिती विद्यार्थी, पालकांना व्हावी यासाठी 'महाराष्ट्र टाइम्स' आणि मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेला सोमवारी प्रचंड प्रतिसाद लाभला. मुंबई आणि परिसरातील ८० महाविद्यालयांतील एक हजार २००हून अधिक विद्यार्थ्यांनी यात सहभागी होत भविष्यात शिक्षण क्षेत्रातील होऊ घातलेले बदल जाणून घेतले.

शैलेश जाधव



### 'विद्यार्थ्यांना संधी देणारे धोरण व्हावे'



प्रा. सी. ए. डॉ. अनिल राव

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

आपण शिकतो काय, त्याची परीक्षा काय होते आणि अर्थार्जनासाठी त्याचा किती उपयोग होतो, हा विचार आवश्यक आहे. मात्र, अनेकदा विद्यार्थ्यांच्या आशा-आकांक्षा विचारात घेतल्या जात नाहीत. विद्यापीठ, महाविद्यालयांमध्ये शिकवले जाणारे काही विषय पुढील व्यावहारिक आयुष्यात काहीही उपयोगी पडत नाहीत, अशी विद्यार्थ्यांची तक्रार असते. यामध्ये आता नवीन शिक्षण धोरणामुळे बदल होणार आहे. शिक्षणाची व्यावहारिक जगाशी सांगड घालण्याचे अनेक पर्याय या धोरणात आहेत. त्यात लवचिकता असल्याने विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण हे अधिक उपयुक्त व बहुपर्यायी असेल.

'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' या माध्यमातून अमूलाग्र बदल होणार असून, सगळे विषय एकाच महाविद्यालयात शिकणे आता बंधनकारक नाही. राज्यातील ११ विद्यापीठांमध्ये हे शिक्षण धोरण लागू होणार आहे. मुंबई ते गोंडवाना अशा कोणत्याही भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थलकालानुरूप शिक्षण घेण्याची मुभा त्यात असेल. यातून विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना संगीत शिकता येईल, क्रीडा, एनसीसी, एनएसएस, सामाजिक संस्था येथे काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना, स्वयंरोजगार मिळवणाऱ्यांना क्रेडिट मिळेल. नवीन धोरणामध्ये प्राथमिक अभ्यास कशाचा, दुय्यम कशाचा, व्यावसायिक कौशल्य काय, याचा निर्णय घेण्याचा पर्याय विद्यार्थ्यांकडे असेल. येत्या काळात पदवी घेण्यासाठी कदाचित तीन वर्षे थांबण्याची गरजही पडणार नाही, एवढी लवचिकता या धोरणामुळे येईल. हे विद्यार्थीकेंद्री धोरण असेल.

आत्तापर्यंत अनेक धोरणे तयार झाली, मात्र आत्ताचे धोरण लागू करण्यासाठी विद्यार्थ्यांचा सकारात्मक दबाव आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी हे आमच्या उपयोगाचे आहे, असा दबाव निर्माण केला तर व्यवस्था बदलेल. प्रत्येक मंडळात अभ्यास मंडळे असतात. ती अभ्यासक्रम, परीक्षापद्धती ठरवतात. यामध्ये पदवीमध्ये त्या-त्या विषयात पहिल्या आलेल्या विद्यार्थ्यांना एका वर्षासाठी निमंत्रित विद्यार्थी म्हणून बोलावले जाते. त्यांनी परीक्षाबदलाबद्दल भाष्य करावे, अभ्यासक्रमातील बदलाची मागणी करावी. या विद्यार्थीकेंद्री भूमिकेतून शिक्षणाची सुवर्णपहाट होईल.

### 'व्यावसायिक कौशल्यांवर भर'



डॉ. रवींद्र कुलकर्णी

अभ्यासक्रम आराखडा समितीचे अध्यक्ष

चालू शिक्षण पद्धतीत विद्यार्थी एखादा विषय शिकतात, मात्र त्यांना त्यातील व्यावहारिक ज्ञान नसते. राष्ट्रीय शिक्षण धोरणात अभ्यासक्रमातील ज्ञानाबरोबरच व्यावसायिक कौशल्य देण्यावर भर देण्यात आला आहे. एखादा विद्यार्थी अर्थशास्त्रातून पदवीचे शिक्षण घेत असल्यास त्याला चौथ्या वर्षी संशोधनाचा भाग म्हणून अनुभव मिळविण्यासाठी एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अर्थसंकल्प निर्मितीचा अभ्यास करता येईल. या अनुभवाची जोड त्याच्या क्रेडिटमध्ये मिळू शकते. यात त्याला एखाद्या ग्रामपंचायतीचा अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया समजून घेता येणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्याने मागील तीन वर्षांत वर्गात शिकलेल्या ज्ञानाचा वापर या ग्रामपंचायतीचा अर्थसंकल्प अधिक चांगला करण्यात वापरता येणार आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंनी ज्ञानाची देवाणघेवाण करण्याच्या प्रक्रियेला यातून चालना मिळेल.

सध्याच्या शिक्षण पद्धतीत एखाद्या विद्यार्थ्याने बी. एसएससी केमिस्ट्रीला प्रवेश घेतल्यावर त्याला नेमून दिलेला अभ्यासक्रमच पूर्ण करावा लागतो. मात्र राष्ट्रीय शिक्षण धोरणात हे बंधन नसेल. विद्यार्थ्यांना अन्य विद्याशाखांचेही विषय निवडता येतील. एखाद्या विद्यार्थ्याला आवड म्हणून किंवा करिअरला साहाय्यक ज्ञान प्राप्त करण्यासाठी 'मायनर' विषय निवडता येतील. तसेच, या विषयात १८ ते २० क्रेडिट प्राप्त केल्यावर विद्यार्थ्याला 'मायनर' विषयाची पदवी दिली जाईल. पी. एचडीचे विद्यार्थी भविष्यात शिक्षकी पेशाकडे वळतात. त्यातून त्यांना शिकविण्याचे ज्ञान असावे म्हणून चार क्रेडिटचा अभ्यासक्रम पीएचडी करताना पूर्ण करावा लागेल.

### 'विद्यापीठांची उद्योगांशी सांगड'



डॉ. नितीन करमळकर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सुकाणू समितीचे अध्यक्ष

नव्या शिक्षण धोरणानुसार, पदवी अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाला विद्यार्थ्यांना संशोधन आणि इंटर्नशिप करण्याची संधी मिळणार आहे. त्यांना उद्योग, एनजीओ आणि विविध क्षेत्रांतील संस्थांमध्ये काम करता येणार आहे. त्यातूनच विद्यार्थ्यांना पुढे जाऊन या संस्थांमध्ये नोकरीची संधी उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांना या उद्योग आणि संस्थांमध्ये प्रशिक्षण घेता यावे यासाठी विद्यापीठांना त्यांच्याशी जोडून घ्यावे लागणार आहे. यापूर्वी विद्यापीठाची भूमिका त्यांचे विभाग, विद्याशाखा एवढ्यापुरतीच मर्यादित होती. आता मात्र विद्यापीठांना समाजातील इतर घटक, बाजारपेठ यांच्याशी जोडून घ्यावे लागेल. त्यासाठी या संस्थांबरोबर सामंजस्य करार करावे लागतील. बाजारपेठेची निकड, विद्यार्थ्यांची आवड या दोन्हींचा मेळ घालण्याचा प्रयत्न राष्ट्रीय शिक्षण धोरणात करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेतून शिक्षण घेताना संगीत, नाट्यशास्त्र हे 'मायनर' विषय म्हणून शिकता येणार आहेत. तसेच, त्यांना अन्य विद्याशाखांमधील विषयांची निवड करता येणार आहे.

शिक्षणाची सांगड उपजीविकेशी जोडली गेली आहे. त्यामुळे शिक्षण घेतल्यानंतर समाजात त्याला स्वीकारार्हता मिळाली पाहिजे. तसेच, शिक्षण थेट बाजारपेठेशी जोडलेले आहे. त्यामुळे बाजारपेठेला आवश्यक असलेले एआय, रोबोटिक्स, क्लाऊड कॉम्प्युटिंग, ड्रोन यांचा समावेश यात व्हायला हवा. शिक्षणात हे आणायचे असेल, तर संबंधित उद्योजकांना सोबत घेता आले पाहिजे. यातून उद्योगांना हवे ते आपल्या शिक्षणातून देता येईल.

नवीन धोरणात भारतीय ज्ञान प्रणालीवर आधारित दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम असेल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना काही विषय केवळ राज्यातील विद्यापीठेच नाही, तर परराज्यांतील विद्यापीठांतून शिकण्याची मुभा असेल. एखाद्या विद्यार्थ्याला काही कारणाने पुढील शिक्षण सुरु ठेवणे शक्य नसल्यास त्याला बाहेर पडता येईल. प्रथम वर्षाला बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याला पदवी प्रमाणपत्र दिले जाईल. यामुळे त्याला नोकरी मिळू शकेल. विद्यार्थ्याला तीन वर्षांची पदवी पूर्ण करण्यासाठी १२० ते १३२ क्रेडिट पूर्ण करावे लागतील. तर चार वर्षांच्या पदवीसाठी १६० ते १७६ क्रेडिट मिळवावे लागतील.

कार्यशाळेत सहभागी सर्वच तज्ज्ञांनी राज्याचे राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे त्यांनी केलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी बहुमूल्य होते. यातून विद्यार्थ्यांना येत्या काळात शिक्षण क्षेत्रात होणाऱ्या बदलांची माहिती मिळाली. नवे शिक्षण धोरण कसे असेल याबाबत विद्यार्थ्यांच्या मनातील शंका या कार्यशाळेतून दूर झाल्या. शिक्षण क्षेत्राबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे विविध उपक्रम यापुढेही 'महाराष्ट्र टाइम्स'च्या सोबतीने राबविले जातील. - डॉ. अजय भामरे, प्र-कुलगुरू मुंबई विद्यापीठ

आजच्या कार्यशाळेतून अतिशय चांगली माहिती मिळाली. येत्या वर्षात शिक्षण क्षेत्रात बरेच बदल होणार आहेत. यापूर्वी बंद शिक्षणात आवडीचे विषय शिकण्याची मुभा विद्यार्थ्यांना नव्हती. आता आवडीचे, त्यांना रूचेल ते शिक्षण घेता येणार आहे. तसेच शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात नव्या शिक्षणातून पूल निर्माण होणार आहे. - प्रा. कविता लघाटे, मुंबई विद्यापीठाच्या कॉमर्स आणि मॅनेजमेंट विभागाच्या अधिष्ठाता

राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे महत्त्व त्याच्याशी संबंधित प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' आणि मुंबई विद्यापीठाने या उपक्रमातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. हा उपक्रम स्तुत्य असून, तो गरजेचा होता. पालकांसाठी असा कार्यक्रम आयोजित केला जावा. - प्राचार्य डॉ. राजेंद्र शिंदे, सेंट झेवियर्स कॉलेज

ही कार्यशाळा उत्तमरित्या पार पडली. विद्यार्थ्यांना अतिशय महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेली मते या धोरणाच्या माध्यमातून लागू होणार आहेत. विद्यार्थ्यांच्या असलेल्या अपेक्षांची पूर्तता त्यातून होईल, हे जाणवले. - डॉ. माधव राजवाडे, प्राचार्य साठे महाविद्यालय



'महाराष्ट्र टाइम्स' आणि मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. यात नवीन शिक्षण धोरणाची माहिती मिळाली. यामुळे करिअरच्या दृष्टीने पुढे विचार करताना थोडी स्पष्टता आली. या धोरणात काय आहे, आम्हाला कसा उपयोग होईल, हे कळले. मला स्वतःला 'एनएसएस'मध्ये काम करण्यात रस आहे. यासंदर्भातील औपचारिकता पूर्ण केल्यावर याचेही क्रेडिट मला मिळेल, हे मला आता कळले. - अवनिश प्रजापती, बिर्ला नाइट महाविद्यालय, कल्याण

आम्ही विवा महाविद्यालयाचे विद्यार्थी नवीन शिक्षण धोरणाच्या कार्यशाळेसाठी आलो होतो. यामुळे मला काय संधी उपलब्ध आहेत, मी भविष्यात काय करू शकतो ते कळले. मी स्वतः चांगले नृत्य करतो. मला मी याचे शिक्षण घ्यावे असे वाटत होते. माझे वडील शिक्षक आहेत. त्यांना मी मरिन क्षेत्रामध्ये करिअर करावे असे वाटते. आता मला या निमित्ताने दोन्ही क्षेत्रांतील अभ्यास शक्य आहे असे वाटते. - मित भोईर, विवा महाविद्यालय, विरा

'महाराष्ट्र टाइम्स' आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत शिक्षण धोरणाबद्दल स्पष्टता आली. या कार्यशाळेमध्ये अधिक जागरुकता निर्माण झाली असे वाटत आहे. हे नवे शैक्षणिक धोरण काय आहे हे कळले. हे धोरण विद्यार्थीकेंद्री आहे. आम्हाला एकाच वेळी दोन विद्यापीठांमध्ये शिक्षण घेता येऊ शकेल. यामुळे साचेबंदपणा दूर झाला याचा अंदाज आला. - पूर्वा पाटील, कीर्ती महाविद्यालय, मुंबई

Maharashtra Times, Mumbai, 18.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

सकाळ

# गटबाजी नको, विद्यापीठाची विधायकता जपा

## प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे यांचे नवनिर्वाचित अधिसभा सदस्यांना आवाहन

**पुणे, ता. १७ :** जनमानसात विद्यापीठाला एक आदराचे स्थान आहे. त्यामुळे अधिसभेत भांडणे, उद्यामपणा आणि गटबाजी दूर राहायला हवी. विद्यापीठ ही एक लोकतांत्रिक रचना असून, त्यातील विधायकता जपली गेली पाहिजे, असा सल्ला ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे यांनी नवनिर्वाचित अधिसभा सदस्यांना दिला.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेतील नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. देशपांडे बोलत होते. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये हा समारंभ आयोजित केला होता.



**प्राचार्य देशपांडे**

या वेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे अध्यक्षस्थानी होते. तर कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष राजीव सहस्रबुद्धे, शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस.के. जैन, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष रवींद्र देव आणि संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. किशोर देसर्डा उपस्थित होते.

प्रा. देशपांडे म्हणाले, "प्राथमिक शिक्षणामध्ये अत्यंत चांगले बदल होऊ घातले आहेत. हे बदल समाजापर्यंत पोचण्यासाठी अधिसभा सदस्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या वलयाचा वापर करावा. छात्रकेंद्री शिक्षण, स्त्रीकेंद्री परिवार, मनुष्यकेंद्री विकास आणि गरीबकेंद्री अर्थव्यवस्था अशी चतु:सूत्री डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी मांडली होती, जी खरे तर या सहस्रकाची चतु:सूत्री आहे." राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रत्यक्ष राबविण्याचे काम करताना अधिसभा सदस्यांची भूमिका महत्त्वाची आहे, असे शिंगणापूरकर म्हणाले. सूत्रसंचालन प्रा. सुधीर गाडे यांनी केले तर डॉ. किशोर देसर्डा यांनी आभार मानले.

Pune, Main
18/04/2023 Page No. 2

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

पुढारी

# लोकपालद्वारे विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण !

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये आणि विविध संस्थांमध्ये राखीव आणि उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांच्या तक्रारींकडे होणारे दुर्लक्ष विचारात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसीने) विद्यार्थी तक्रार निवारण समितीत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार समितीकडून न्याय मिळाला नाही, तर लोकपालकडे दाद मागता येणार आहे. त्यामुळे आता उच्च शिक्षणात लोकपालद्वारे विद्यार्थ्यांचे तक्रारीचे निवारण ३० दिवसांच्या आत करणे अनिवार्य राहणार आहे.

यूजीसीने नुकतेच विद्यार्थी तक्रार निवारण समिती नियम २०२३ ची स्थापना केली आहे. त्यासाठी नव्याने नियमावलीही जाहीर केली असून, या समितीत ओबीसी आणि अनुसूचित जाती, जमातीच्या घटकातील महिलांना प्रतिनिधी म्हणून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देशही दिले आहेत.

विद्यार्थी तक्रार निवारण समितीमध्ये एक सदस्य किंवा समितीच्या अध्यक्षपदी महिला तसेच अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी प्रवर्गातील प्रतिनिधींना सदस्य किंवा अध्यक्ष करणे अनिवार्य केले आहे. समितीमध्ये अध्यक्ष म्हणून एक प्राध्यापक, इतर चार प्राध्यापक किंवा संस्थेचे वरिष्ठ प्राध्यापक सदस्य म्हणून नेमण्यात येतील. शैक्षणिक गुणवत्ता आणि अभ्यासेतर उपक्रमांमध्ये आघाडीवर असलेल्या विद्यार्थ्यांची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून नेमणूक करण्याच्या सूचनाही यूजीसीने दिल्या आहेत.

एखाद्या प्रकरणावरील अहवाल शिफारशींसह संस्थेच्या सक्षम अधिकाऱ्यांकडे समितीने पाठवावा. १५ दिवसांत अहवालाची प्रत तक्रारदार विद्यार्थ्याला मिळावी. विद्यार्थ्यांना १५ दिवसांच्या आत लोकपालाकडे अपील करता येईल.

### लोकपालसाठी पात्रता निकष...

लोकपाल म्हणून निवृत्त कुलगुरू किंवा सेवानिवृत्त प्राध्यापक (ज्यांनी डीन/एचओडी म्हणून काम केले आहे) आणि राज्य/केंद्रीय विद्यापीठे/राष्ट्रीय संस्थांमध्ये प्राध्यापक म्हणून १० वर्षांचा अनुभव असलेले किंवा माजी जिल्हा न्यायाधीश यांची नियुक्ती करता येईल.

My Pune Edition
Apr 18, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# मानसिक आरोग्यावरील अभ्यासक्रम तयार करा

## यूजीसीचे उच्च शिक्षण संस्थांना निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थी सेवा केंद्राची (एसएससी) स्थापना करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत. तसेच प्रगत वैद्यकीय मदतीसाठी एम्ससारख्या संस्थांशी सामंजस्य करार करण्यासह मानसिक आरोग्यावरील अभ्यासक्रम तयार करून त्यासाठी श्रेयांक लागू करण्याची सूचनाही करण्यात आली आहे.

देशातील उच्च शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांमध्ये तंदुरुस्ती, आरोग्य, मानसिक आणि भावनिक आरोग्याचा प्रचार करण्यासाठीच्या नव्या मार्गदर्शक सूचना यूजीसीने नुकत्याच प्रसिद्ध केल्या. तसेच या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थी सेवा केंद्राच्या माध्यमातून राबवलेल्या उपक्रमांची माहिती साठवून ठेवून त्याचा वापर राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद (नॅक), राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळ (एनबीए), राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखडा (एनआयआरएफ) मूल्यांकन श्रेणीसाठी करता येऊ शकतो.

विद्यार्थी सेवा केंद्राचे व्यवस्थापन संचालक किंवा अधिष्ठाता स्तरावरील प्राध्यापकांकडून करण्यात येईल.

संबंधित प्राध्यापक मानसशास्त्र, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा, समाजशास्त्र, समाजकार्य अशा शाखेतील असावेत. तसेच प्रगत वैद्यकीय उपचारांसाठी एम्स, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेण्टल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस (एनआयएमएचएएनएस) अशा संस्थांसह सामंजस्य करार करावा. विद्यार्थी सेवा केंद्राने अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती कक्ष, लिंग समानता केंद्र, विद्यार्थी कल्याण समिती यांच्याशी समन्वय साधावा. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि अन्य उपक्रमांचा विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी उपयोग करावा. विद्यार्थ्यांसाठी, विशेषतः विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षणांचे आयोजन करावे. विद्यार्थी वसतिगृहांमध्ये किमान सुविधा असणे आवश्यक आहे. तसेच उपक्रम राबवण्यासाठी क्रीडा अधिकारी किंवा शारीरिक तंदुरुस्ती मार्गदर्शकाची नियुक्ती करावी. तंदुरुस्ती उपक्रम श्रेयांक प्रणालीमध्ये समाविष्ट करून सत्र मूल्यांकनासाठी त्याचा वापर करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, 19 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72

पुढारी

# मानसिक आरोग्यावरील अभ्यासक्रम तयार करा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थी सेवा केंद्राची (एसएससी) स्थापना करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत. तसेच प्रगत वैद्यकीय मदतीसाठी एम्ससारख्या संस्थांशी सामंजस्य करार करण्यासह मानसिक आरोग्यावरील अभ्यासक्रम तयार करून त्यासाठी श्रेयांक लागू करण्याची सूचनाही केली आहे.

देशातील उच्च शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांमध्ये तंदुरुस्ती, आरोग्य, मानसिक आणि भावनिक आरोग्याचा प्रचार करण्यासाठीच्या नव्या मार्गदर्शक सूचना यूजीसीने नुकत्याच प्रसिद्ध केल्या. तसेच या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. सेवा केंद्राच्या माध्यमातून मूल्यांकन होईल.

My Pune Edition
Apr 19, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# विद्यापीठाला मेअखेरीपर्यंत नवे कुलगुरू मिळण्याची शक्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी आलेल्या ९० अर्जांतून पात्र उमेदवारांची यादी आठवडाभरात प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण होऊन मे महिन्यात नव्या कुलगुरूंची निवड होण्याची शक्यता आहे.

डॉ. नितीन करमळकर यांचा कुलगुरूपदाचा कार्यकाळ मे २०२२ मध्ये संपला. त्यानंतर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्याकडे सोपवण्यात आला. महाविकास आघाडी सरकारने विद्यापीठ कायद्यात केलेल्या बदलांना राज्यपालांनी मान्यता न दिल्याने कुलगुरू निवड प्रक्रिया रखडली होती. राज्यात जुलैमध्ये सत्तांतर झाल्यानंतर राज्य शासनाने विद्यापीठ कायद्यातील प्रस्तावित बदल रद्द केले. त्यानंतर कुलगुरू निवड शोध समिती नियुक्त करून निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली. अर्ज करण्यासाठीची अंतिम मुदत ३० मार्च होती.

कुलगुरू पदासाठी प्राप्त एकूण ९० अर्जांमध्ये विद्यापीठात कार्यरत प्राध्यापकांचाही समावेश आहे. आता या अर्जांची छाननी करून येत्या आठवड्याभरात पात्र उमेदवारांना ई-मेलद्वारे कळवण्यात येईल. त्यानंतर मुलाखतीची प्रक्रिया होऊन कुलगुरूंची निवड जाहीर केली जाईल. या प्रक्रियेला काही दिवस लागणार असल्याने मेच्या अखेरीस नवे कुलगुरू विद्यापीठाला मिळण्याची चिन्हे आहेत.

लोकसत्ता Wed, 19 April 2023
https://epaper.loksatta.com/c/

पुढारी

# परीक्षेतील उत्तरे स्थानिक भाषांत लिहिण्याची अनुमती देण्यात यावी

## 'यूजीसी'चे देशातील सगळ्या विद्यापीठांना पत्र

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांना परीक्षेतील उत्तरे स्थानिक भाषांमध्ये लिहिण्याची परवानगी दिली जावी, अशी विचारणा विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठांना केली आहे. एखादा अभ्यासक्रम इंग्रजीमधून शिकविला जात असला, तरी संबंधित विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील उत्तरे त्या-त्या भागांतील स्थानिक भाषांत लिहिण्याची परवानगी देणे गरजेचे आहे, असे 'यूजीसी'चे अध्यक्ष जगदीश कुमार यांनी सांगितले.

शिकण्या-शिकविण्याच्या प्रक्रियेत तसेच पुस्तके तयार करण्यात उच्च शिक्षण संस्था महत्त्वाची कामगिरी बजावतात. अशावेळ मातृभाषेतून ही प्रक्रिया झाली, त त्यामुळे मुलांचा शैक्षणिक पा मजबूत होण्यास मदत मिळेल, अ 'यूजीसी'चे म्हणणे आहे.

याआधी फेब्रुवा २०२३ मध्ये 'यूजीसी' सर्व राज्यांचे मुख्यमं आणि राज्यपालांना प लिहिले होते. उच शिक्षण संस्थांती शिक्षण स्थानिक भाषांतून दिले जा तसेच पाठ्यपुस्तके त्या-त भाषांमध्ये तयार करावीत, अश विनंती त्याद्वारे करण्यात आली होत भारतीय भाषांतून शिक्षण देणे राष्ट्रीय शिक्षण धोरणाती महत्त्वाचा मुद्दा आहे, असे 'यूजीसी'चे म्हणणे आहे.

Pune Edition
Apr 20, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# उच्च शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांच्या तक्रारींची 'लोकपाल'च्या माध्यमातून सोडवणूक

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये आणि विविध संस्थांमध्ये राखीव आणि उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांच्या तक्रारींकडे होणारे दुर्लक्ष विचारात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसीने) विद्यार्थी तक्रार निवारण समितीत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. समितीकडून न्याय न मिळाल्यास लोकपालकडे दाद मागता येणार असून, लोकपालांनी विद्यार्थ्यांचे तक्रारीचे निवारण तीस दिवसांत करणे अनिवार्य आहे.

यूजीसीने नुकतेच विद्यार्थी तक्रार निवारण समिती नियम २०२३ प्रसिद्ध केले. त्यानुसार लोकपाल म्हणून निवृत्त कुलगुरू किंवा अधिष्ठाता किंवा विभागप्रमुख म्हणून काम केलेले सेवानिवृत्त प्राध्यापक, राज्य/केंद्रीय विद्यापीठे/राष्ट्रीय संस्थांमध्ये प्राध्यापक म्हणून दहा वर्षांचा अनुभव असलेले किंवा माजी जिल्हा न्यायाधीश यांची नियुक्ती करता येईल. तर तक्रार निवारण समितीमध्ये इतर मागास वर्ग (ओबीसी) आणि अनुसूचित जाती, जमातीच्या घटकातील महिलांना प्रतिनिधी म्हणून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

विद्यार्थी तक्रार निवारण समितीमध्ये एक सदस्य किंवा समितीच्या अध्यक्षपदी महिला तसे
अनुसूचित जाती, जमाती आपि
ओबीसी प्रवर्गातील प्रतिनिधीं
सदस्य किंवा अध्यक्ष कर
अनिवार्य केले आहे. समितीमध
अध्यक्ष म्हणून एक प्राध्यापक, इत
चार प्राध्यापक किंवा संस्थेचे वरिष
प्राध्यापक सदस्यांची नियुक्ती करा
लागेल. शैक्षणिक गुणवत्ता आपि
अभ्यासेतर उपक्रमांमध्ये आघाडीव
असलेल्या विद्यार्थ्यांची विद्यार्थ
प्रतिनिधी म्हणून नेमणू
करण्याबाबतही स्पष्ट करण्यात आले
आहे.

तक्रार निवारणासाठी प्रत्येक उच
शिक्षण संस्थेला संकेतस्थळाच
निर्मिती करावी लागेल. य
संकेतस्थळाद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्य
तक्रारी दाखल करता येतील
विद्यार्थ्यांच्या तक्रारीबाबतच
अहवाल शिफारशींसह संस्थेच्य
सक्षम अधिकाऱ्यांकडे समिती
पाठवायचा आहे.

### नियमांचे पालन न झाल्यास कारवाई

यूजीसीच्या तक्रार निवारण प्रक्रियेचे पालन न केल्यास उच्च शिक्षण संस्थांवर कारवाई करण्यात येईल. त्यात अनुदान रोखणे, ऑनलाइन किंवा दूरस्थ अभ्यासक्रमांना प्रतिबंध, विद्यापीठाकडून संलग्नता रद्द करणे यांचा समवेश आहे.

### प्रत्येक संस्थेला माहिती जाहीर करण्याचे बंधन

प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेला शैक्षणिक वर्ष सुरू करण्यापूर्वी विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी सविस्तर माहिती संकेतस्थळावर प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. त्यात उपलब्ध अभ्यासक्रम, प्रवेशासाठीच्या जागा, अभ्यासक्रम प्रवेशासाठी कमाल आणि किमान वय, पात्रता, प्रवेश परीक्षा, शुल्क, अभ्यासक्रम सोडल्यास शुल्क परताव्याची टक्केवारी, शिक्षकांची नावे, पात्रता आणि अनुभव, वसतिगृह, ग्रंथालय आदी माहिती देणे अनिवार्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Thu, 20 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72219445

# उच्च शिक्षण-उत्तम आरोग्याचे धडे

### विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना

**पुणे, दि. १९ - उच्च शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांमध्ये तंदुरुस्ती, आरोग्य, मानसिक आणि भावनिक आरोग्याचा प्रचार करण्यासाठीच्या नव्या मार्गदर्शक सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नुकत्याच प्रसिद्ध केल्या. त्यानुसार 'एम्स'सारख्या संस्थांशी सामंजस्य करार करून मानसिक आरोग्यावर अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्दे श 'यूजीसी'ने संस्थांना दिले आहेत.**

या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थी सेवा केंद्राच्या माध्यमातून राबवलेल्या उपक्रमांची माहिती साठवून ठेवून त्याचा वापर राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद (नॅक), राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळ (एनबीए), राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखडा (एनआयआरएफ) मूल्यांकन श्रेणीसाठी करता येऊ शकतो. विद्यार्थी सेवा केंद्राचे व्यवस्थापन संचालक किंवा अधिष्ठाता स्तरावरील प्राध्यापकांकडून करण्यात येईल.

संबंधित प्राध्यापक मानसशास्त्र, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा, समाजशास्त्र, समाजकार्य अशा शाखेतील असावेत. तसेच प्रगत वैद्यकीय उपचारांसाठी एम्स, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेन्टल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस अशा संस्थांसह सामंजस्य करार करावा. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना उपक्रमांसह विशेषत: विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षणांचे आयोजन करावे. अभ्यासक्रमास क्रेडिट पद्धत लागू करण्यात येणार आहे.



प्रभात PuneCity, 20 Apr 2023, Page:003
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# स्वायत्त दर्जाचा अर्ज एका क्लिकवर

## 'यूजीसी'च्या वेबसाइटवर अर्ज उपलब्ध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

देशातील चांगल्या महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा मिळवणे सोपे झाले असून, विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांना आता स्वायत्त दर्जासाठी थेट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) वेबसाइटवर अर्ज करता येणार आहे.

'यूजीसी'ने महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याच्या नियमावलीत बदल करून त्याचा मसुदा ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध केला होता. त्या मसुद्यावर हरकती-सूचना मागवण्यात आल्या होत्या. त्यानंतर अंतिम केलेल्या नियमावलीचे राजपत्र 'यूजीसी'कडून नुकतेच प्रसिद्ध करण्यात आले. त्यानुसार स्वायत्ततेसंदर्भातील नियमांमध्ये काही बदल आणि स्वायत्ततेला प्रोत्साहन देण्यासाठी काही प्रमाणात शिथिलता देण्यात आल्याचे परिपत्रकात स्पष्ट होत आहे. या पूर्वी २०१८च्या नियमावलीनुसार महाविद्यालयाला 'स्वायत्ततेचा दर्जा मिळावा' यासाठी विद्यापीठाकडे अर्ज करावा लागत होता. विद्यापीठाकडून अर्ज 'यूजीसी'ला सादर केला जात होता. मात्र, आता स्वायत्ततेच्या निकषांची पूर्तता करणाऱ्या आणि स्वायत्त दर्जा घेऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयाला 'यूजीसी'च्या वेबसाइटवर स्वायत्ततेसाठी कधीही अर्ज करता येईल. त्यानंतर संबंधित पालक विद्यापीठाला महाविद्यालयाचा अर्ज आल्यानंतर तीस दिवसांत अर्जाची पडताळणी करून शिफारशी सादर कराव्या लागतील.



### बहुशाखीय शिक्षण मिळणार

एकाच संस्थेच्या दोन महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा असल्यास त्यांचे विद्यापीठाच्या मान्यतेने विलीनीकरण करता येईल. त्यामुळे नामवंत शैक्षणिक संस्थांना दोन महाविद्यालयांचे विलीनीकरण करण्याची चांगली संधी आहे. याद्वारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद केल्याप्रमाणे बहुशाखीय शिक्षणाला चालना मिळणार आहे. दरम्यान, स्वायत्तता संपण्यापूर्वी नूतनीकरणासाठी एक वर्ष आधी अर्ज न केल्यास स्वायत्तता संपुष्टात येईल, असेही नमूद करण्यात आले आहे.

### स्वायत्ततेसाठीचे निकष

- महाविद्यालयाला किमान दहा वर्षे झालेली असणे आवश्यक आहे.
- संबंधित महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेची (नॅक) किमान 'अ' श्रेणी आवश्यक.
- किमान तीन अभ्यासक्रमांचे किमान ६७५ गुणांसह राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून (नॅब) मूल्यांकन झालेले असणे आवश्यक आहे.
- विशेष शिक्षण, भारतीय ज्ञान प्रणाली, योग, सामरिक अभ्यास, भारतीय सांस्कृतिक वारसा, पर्यावरण संवर्धन, कौशल्य विकास, भाषा, क्रीडा आदी क्षेत्रातील महाविद्यालयांना दहा वर्षे, नॅक आणि एनबीए मूल्यांकनातून सवलत मिळू शकते.

Maharashtra Times 20.4.2023

# News Paper Clippings During April 2023

## Section: Education

WWW.INDIANEXPRESS.COM
THE INDIAN EXPRESS, THURSDAY, APRIL 20, 2023

# Pilot project running, state to set up more libraries, reading rooms at resorts

ANURADHA MASCARENHAS
PUNE, APRIL 19

IF IT isn't the water park that takes your fancy or a long trek in the lush environs of Mahabaleshwar, then the ideal place to catch a few quiet hours is at the newly set up library at the Maharashtra Tourism Development Corporation (MTDC) resort. The project has taken off on a pilot basis at two tourist spots – Mahabaleshwar and Chhatrapati Sambhajinagar -- and there are more libraries on the way.

"This is part of a new model that we are working on – mainly responsible tourism," Deepak Harane, regional manager, MTDC told The Indian Express. "We want our youngsters to not only visit forts, winding ghats and overflowing waterfalls but also be aware of our cultural heritage and traditions," he said. Officials say MTDC is keen on replicating the library project in 28 other resorts. Plans are also afoot to start reading rooms at Lonar in Buldhana district and at MTDC, Ajanta Fardapur village in Chhatrapati Sambhajinagar.



The library at the MTDC resort in Mahabaleshwar. *Express*

At the pilot model in Mahabaleshwar, the books available include Dr Sheshrao Pathade's ₹Tamasha - Loknatyatil Abhinay' on the traditional form of Marathi theatre, Prof Chandrakant Gaikwad's ₹Gadkillyancha Safarnama' on the ancient history of forts, Renuka Kad's 'Ekal Mahilanche Charcha Vishwa' to novels and religious texts like The Quran. For the expansion plan, officials said, books will be purchased as per the room strength at the resort. For instance, some locations like Mahabaleshwar Resort have more than 100 rooms while another one at Koynanagar has 24 rooms. An initiative of Mangal Prabhat Lodha, Minister, Tourism, Skill Development and Entrepreneurship, Women and Child Development, MTDC officials said they were told to make the visitors' stay an entertaining and memorable one.

"Plans were made to start a library not only to encourage tourists to read on varied topics but also to wean youngsters away from their mobile phones. Instead of staring at their mobile screens, they can wander through the library and pick up a book of their choice," Harane said. For those visiting Maharashtra for the first time, it can be fascinating to read about the culture of the place and different lifestyles, he said.

Apart from the focus on tourism in Maharashtra, and information about saints and revolutionaries, officials also plan to purchase books on science, fiction, and comics for children. These books are in Hindi/English and Marathi and at times most visitors also donate books. The MTDC manages 30 tourist resorts and has identified other operators to coordinate accommodation and food at 55 other locations in Maharashtra. These locations range from religious sites, historic forts, dense forests, and hill stations to pristine beaches. According to MTDC officials, bookings at their 30 tourist resorts are almost full till the end of April.

"Most tourists prefer weekend getaways and already an 85 per cent occupancy has been registered at our resorts for the month of May," Harane said. As part of the responsible tourism concept, MTDC officials are also promoting local food items in the canteens of the corporation and special dishes like pithale and usal, among many others from the local cuisine are being offered to tourists.

The Indian Express 20.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# शिक्षण आणि चॅट जीपीटी

■ डॉ. सतीश श्रीवास्तव

'चॅट जीपीटी'चा (जनरेटिव्ह प्री ट्रेंड ट्रान्सफॉर्मर) वापर ३० नोव्हेंबर २०२२ रोजी अधिकृतपणे सुरू झाला. 'चॅट जीपीटी' वापरणाऱ्यांची संख्या तेव्हापासून या वर्षीच्या जानेवारीपर्यंत १० कोटी झाली. याची निर्मिती करणाऱ्या 'ओपन ए वन' कंपनीच्या संकेतस्थळाला फेब्रुवारीत भेट देणाऱ्या लोकांची संख्या अडीच कोटी होती. जगात सर्वाधिक वेगाने वाढणारे हे माध्यम बनत चालले आहे. माहिती-तंत्रज्ञानात नवे वादळ आले आहे. गुगल हा महागुरू आहेच; पण 'चॅट जीपीटी' हे त्यापुढील तंत्रज्ञान आहे. हे तंत्रज्ञान प्रश्नांचे विश्लेषण करून रेडीमेड उत्तरे देते. हा स्वयंचलित संवाद साधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) आणि भाषाप्रणालीचा वापर केला जातो. सध्या फक्त इंग्रजीसह काही भाषांमध्येच उपलब्ध असलेली ही प्रणाली लवकरच जगभरात इतर भाषांमध्येही येईल. भारतात अनेक बँका, प्रवासी कंपन्या, ग्राहकोपयोगी वस्तू विकणाऱ्या उत्पादनसंस्थांच्या संकेतस्थळांवर 'चॅटबॉट' हा ग्राहकांचे प्रश्न व शंकांना उत्तरे देणारा स्वयंचलित उत्तरदाता (ऑटो रिप्लायर) असतो. 'चॅट जीपीटी'ची शिक्षणक्षेत्रातील उपयुक्तता आणि त्याच्या अनिष्ट परिणामांबद्दल जगभर चर्चा होत आहे. अमेरिकेतील काही शाळांमध्ये त्यावर बंदी आली आहे, तर दुसरीकडे ही बंदी कशी अयोग्य आहे, यावर चर्चा चालू आहे. एकूणच, 'चॅट जीपीटी'मुळे शिक्षणक्षेत्रात निर्माण झालेला गदारोळ नेमका काय आहे व यातून कोणती आव्हाने निर्माण झाली आहेत, हे पाहणे आवश्यक आहे.

'चॅट जीपीटी'ला आपण प्रश्न विचारू शकतो आणि तो लगेच उत्तरे देतो. विशिष्ट समस्या किंवा प्रश्न यांबाबतचे चॅट निर्माण करून, त्यासंबंधीची उत्तरे आपल्याला मिळू शकतात. विशिष्ट विषयांतील तज्ज्ञ व्यक्तीशी बोलण्यासारखे हे आहे; किंबहुना प्रचंड ज्ञानसाठा असलेल्या एखाद्या 'सुपर ह्युमन'शी बोलण्यासारखे आहे. मागणी करताच, तो कोणत्याही विषयावर निबंध वा प्रबंध, कविता, गोष्टी, ब्लॉग, गणिती प्रमेये, विज्ञानातील किंवा संगणकातील कूट संकल्पना क्षणार्धात सादर करू शकतो. 'चॅट जीपीटी'वर गणिताची कोडी सोडविता येतात. विषय दिल्यास, यमक जुळवून कविता तयार होते. (आता त्यामुळे कोणीही इंग्रजीतून कविता करू शकतो.) सॉफ्टवेअरचे कोडिंग मिळते. विज्ञान, रसायन, भाषा किंवा कुठल्याही विषयावर तयार उत्तरे मिळतात. गुगलवर संकेतस्थळे मिळतात. त्यानंतर त्या संकेतस्थळावर जाऊन, आवश्यक ती माहिती संकलित करावी लागते किंवा माहितीचे विश्लेषण करता येते. 'चॅट जीपीटी' थेट उत्तरेच 'टेक्स्ट' स्वरूपात देते. उत्तरांमध्ये बदल (रीजनरेट) करता येण्याची सोय आहे. शिक्षकांना त्या त्या पाठाच्या नोट काढता येतात. या तंत्रज्ञानामुळे विषय किंवा भाषा समजून न घेता 'कॉपी अँड पेस्ट' करण्याकडे कल वाढेल आणि नवोन्मेष किंवा नवनिर्मितीला खीळ बसेल, असा काहीसा टीकेचा सूर दिसून येतो. तथापि, 'चॅट जीपीटी'वर बंदी घालणे, हा मार्ग असू शकत नाही. शालेय वा महाविद्यालयांच्या संगणकावर 'चॅट जीपीटी'वर बंदी घातली, तरी लॅपटॉप, स्मार्ट मोबाइल, टॅबलेट या प्रकारे त्याचा वापर केला जाऊ शकतो. या तंत्रज्ञानाच्या काही मर्यादा आहेत. सन २०२१ नंतरचा डेटा यात नाही. काही प्रश्नांची उत्तरे अचूक असतीलच असेही नाही. 'चॅट जीपीटी'च्या मुख्य पृष्ठावर ही बाब नमूद केली आहे.



**आगामी पाच वर्षांत 'चॅट जीपीटी'सारख्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन होईल. या तंत्रज्ञानाचा आपण कसा वापर करतो आणि अध्ययन, अध्यापनात कसे बदल घडवतो, यावर तरुणांचे भविष्य अवलंबून आहे. हे आव्हान पेलण्याची सर्वार्थाने तयारी करायला हवी...**

इंटरनेट आणि संगणकातील क्रांतीमुळे अध्ययन व अध्यापन यांत आमूलाग्र बदल झाल्याचे आपण अनुभवत आहोत. या क्रांतीने शिक्षणाची सार्वत्रिकता वाढली आणि ज्ञानदानातील मक्तेदारी संपली. शाळा आणि महाविद्यालयातील शिक्षकांचे अध्ययनातील कार्यक्षेत्र विस्तारले. ज्ञान सतत अद्ययावत ठेवणे अनिवार्य झाले. शिक्षकाचे ज्ञान आणि माहिती तपासण्याची सोय विद्यार्थ्यांनाही उपलब्ध झाली. कोसळणाऱ्या प्रचंड माहितीचा उपयोग कसा करायचा, सकस निवडून निःसत्त्व कसे आणि का टाकून द्यायचे, हे शिकवणे शिक्षकांना क्रमप्राप्त आहे. म्हणजेच, एक प्रकारे प्रवर्तकाची (फॅसिलिटेटर) भूमिका शिक्षकाला करायची आहे.

विद्यार्थी आणि शिक्षक दोघांनाही आता तंत्रज्ञानावर अधिक विसंबून राहावे लागणार आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो, की सर्वच प्रश्न 'चॅट जीपीटी' सोडवत असेल, तर मग शिक्षकाची आवश्यकता काय? विद्यार्थ्यांना दिली जाणारी गृहकृत्ये (असाइनमेंट) अथवा विद्यार्थ्यांकडून वर्गात करून घेतला जाणारा अभ्यास, यांत 'चॅट जीपीटी'कडून सहजपणे उत्तरे मिळाल्यास अध्ययनाच्या आकलन व सर्जनशीलता या मूळ हेतूस बाधा येऊ शकते. शिक्षकाला पर्याय यंत्र असू शकत नाही; कारण अध्यापनाच्या असंख्य संभाव्यता अध्ययन प्रक्रियेत असतात. लॉकडाउनच्या काळात केवळ मोबाइल आणि लॅपटॉपवर शिकावे व शिकवावे लागल्याने मुलांच्या मानसिकतेत कसा बदल झाला, त्यातून अध्ययनाचा कसा बट्ट्याबोळ झाला, हे आपण अनुभवले आहे. उमलत्या वयातील मुलांचे अनेक भावनिक प्रश्न असतात. विद्यार्थी आणि शिक्षकाच्या निकोप संबंधातून या दोहोंच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. नावीन्याची प्रेरणा, सर्जनशीलता इत्यादी गुणांचा सहज परिपोष शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात होतो. यंत्राबरोबर हा शिक्षक नावाचा माणूस हवा. माणूस आणि मशीन यांत जोपर्यंत भेद आहे; तोपर्यंत शिक्षकाचे शिक्षण व्यवस्थेत स्थान राहीलच. 'चॅट जीपीटी'चा उत्तम शिक्षणपूरक साधन म्हणून कसा वापर करता येईल, याचा आत्तापासूनच शिक्षकांनी विचार केला पाहिजे. इंटरनेट आणि संगणक आज व्यवस्थेचा भाग बनले आहेत; तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता येत्या काही दिवसांत समाजाचा अपरिहार्य भाग बनणार आहे. शालेय आणि महाविद्यालयीन जीवन संपल्यावर, तरुणांना पुढील दिवसांत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जगातच वावरावे लागणार आहे. तेव्हा, या साधनाचे भलेबुरे उपयोग त्यांना कळले पाहिजेत. यासाठीही 'चॅट जीपीटी'चा अनुभव मिळणे, ही काळाची गरज बनली आहे. पुढच्या पाच वर्षांच्या काळात 'चॅट जीपीटी'सारख्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने, शिक्षणाच्या क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन होणार आहे. याचा आपण कसा वापर करून घेतो आणि अध्ययन-अध्यापनात कसे बदल घडवतो, यावर आपल्या देशातील कोट्यवधी तरुणांचे भविष्य कसे घडेल, ते परिस्थितीला कसे सामोरे जातील आहे, हे ठरणार आहे.

**(लेखक शैक्षणिक प्रश्नांचे अभ्यासक आहेत.)**

Maharashtra Times, 21.4.2023

# News Paper Clippings During April 2023

## Section: Education

THE TIMES OF INDIA, PUNE
FRIDAY, APRIL 21, 2023

# Four-year UG degree course in state from next academic year

### April 30 Deadline For Colleges To Set Up Cell

Yogita.Rao@timesgroup.com

**Mumbai:** The state's higher education department has finally set things in motion for the implementation of the four-year undergraduate degree programme with multiple entry-exit options, as recommended in the National Education Policy 2020 by issuing a government resolution (GR) late on Thursday.

The four-year programme with honours or honours with research will be implemented from 2023-24 to all undergraduate and postgraduate programmes other than those regulated by the AICTE, the Bar Council of India, and the National Council for Teacher's Education. The fourth year will be effective from 2026-27.

Pic for representational purpose



The fourth year will be effective from the 2026-27 session onwards

The state has set a deadline of April 30 for all autonomous colleges and universities to set up an NEP implementation cell and adopt government regulations. Colleges are to submit an action taken report within 10 days of the deadline.

In the guidelines issued, the department mentioned that permission to offer the fourth year will not be granted to any college as per natural growth and colleges will have to fulfil certain criteria (see box). It said that colleges running only three-year courses, and the ones not having a PG department or a research centre, cannot be given permission to run the four-year programme and that the universities will have to evolve mechanisms for students' admissions to other colleges.

The guidelines laid down the details of the credits students must accumulate for exiting the course after every level. For instance, a student exiting the four-year programme after the first year, with a UG certificate, must secure a minimum of 40 credits, including four credits in a vocational course or internship related to the major and six credits from skill-based courses. It also specified that students could re-enter the course within three years of their exit but must complete the entire programme within seven years.

The state asked universities and colleges to sensitise the stakeholders on the new curriculum framework before the new academic session commences.

Colleges are also expected to develop, statutorily adopt and release the implementation of faculty-wise baskets of all six verticals to be offered under the four-year programme, including major, minor, generic/elective courses, vocational and skill enhancement, ability enhancement/ Indian Knowledge System/ value education courses, file projects/internships/community engagement by May 31.

A college principal said the GR is silent on the fee structure and is a replication of the guidelines issued by the UGC.

The Times of India 21.4.2023

लोकमत

शैक्षणिक दर्जा वाढण्यासही होणार मदत

# 'परीस-स्पर्शा'तून होणार 'त्या' महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शैक्षणिक गुणवत्तावाढीच्या अनुषंगाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद 'नॅक'कडून महाविद्यालयांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. राज्यातील सुमारे दोन हजार महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झालेले नाही. त्यामुळे राज्य शासनातर्फे या महाविद्यालयांसाठी 'परीस- स्पर्श' योजना राबविण्यात येणार आहे.

नॅक मूल्यांकनात 'अ' श्रेणी मिळालेल्या महाविद्यालयांकडून



मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन करून घेण्याबाबत मार्गदर्शन, सहकार्य केले जाईल. यातून शैक्षणिक दर्जा वाढीस मदत होणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 'परामर्श' योजनेच्या धर्तीवर राज्यातील नॅक मूल्यांकन न झालेल्या महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकनासाठी राज्य सरकारकडून 'परीस-स्पर्श' योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेंर्तगत नॅक, एनबीए मूल्यांकन आणि प्रमाणिकरण असलेले व अनुकरणीय रेकॉर्ड असलेले महाविद्यालय हे मार्गदर्शक (मेंटॉर) म्हणून नियुक्त केले जाणार आहे.

उच्चशिक्षण महाविद्यालयांसाठी १५०, तर तंत्रशिक्षण महाविद्यालयांसाठी ७५ मेंटॉर महाविद्यालये अपेक्षित आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी प्रत्येकी ५ ते ७ मूल्यांकन न झालेले महाविद्यालये याप्रमाणे योजना कालावधीत (तीन वर्षात) प्रत्येकी १५ ते २० महाविद्यालयांचे नॅक/एनबीए मूल्यांकन करणे अपेक्षित आहे.

पुण्यातील महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमीतर्फे मेंटॉर म्हणून निश्चित केलेल्या महाविद्यालयांना प्रशिक्षण देण्यात येईल. या मेंटॉर संस्था मूल्यांकन व प्रमाणीकरण न झालेल्या महाविद्यालयांना मार्गदर्शन करतील, यामधून गुणवत्ता वाढीस लागेल.

### राज्य, विद्यापीठ, जिल्हास्तरीय समित्यांची स्थापना

परीस-स्पर्श योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य सल्लागार समिती, विद्यापीठस्तरीय समिती आणि विद्यापीठामार्फत ठरविल्याप्रमाणे जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात येईल. जिल्हा समितीला मेंटॉर संस्था, मूल्यांकन न झालेल्या कॉलेजची निवड, करारनामे, आढावा याबाबतची कामे करावी लागतील. तसेच अहवाल विद्यापीठस्तरीय समितीला सादर करावा लागणार आहे.

### दोन हजार महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन नाही

राज्यातील दहा विद्यापीठांतर्गत असलेल्या तीन हजार ३४६ महाविद्यालयांपैकी केवळ एक हजार ३६८ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन झालेले आहे. तसेच एक हजार ९७८ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन झालेले नाही. तसेच राज्यातील एकूण ७८६ तंत्रशिक्षण महाविद्यालयांपैकी ७०४ महाविद्यालयांचे नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडेशन (एनबीए) मूल्यांकन झाले नाही.

Hello Pune
Page No. 8 Apr 22, 2023
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# राज्यात यंदापासून नवे शैक्षणिक धोरण

## शासनाची मंजुरी : श्रेयांक व अभ्यासक्रम आराखडा निश्चित



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २४** - नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या सुकाणू समितीने श्रेयांक आणि अभ्यासक्रम आराखडा निश्चित केला होता. आता या आराखड्याला राज्य शासनाने मान्यता दिली आहे. यंदाच्या २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासूनच त्यांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्य व ज्ञानप्राप्ती आणि विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्रामधील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी, भारताला लोकसंख्येला गुणवत्तापूर्ण शिक्षण, नावीन्यपूर्ण शिक्षण व संशोधनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० **(पान २ पहा)** ▸▸

### असे बदल होणार

- विद्यार्थ्यांना आवडीचे अभ्यासक्रम निवडण्याची संधी मिळणार
- विद्यार्थ्याला एका शाखेतून दुसऱ्या शाखेत जाण्याची लवचिकता
- आंतरविद्याशाखेतील अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन आवडीचे विषय शिकण्याची संधी
- क्रेडिटनुसार पदवी प्रमाणपत्र, पदविका प्रमाणपत्र किंवा तीन वर्षांची पदवी मिळणार
- विद्यार्थ्यांना मल्टिपल एन्ट्री अणि मल्टिपल एक्झिटची संधी

प्रभात PuneCity, 25 Apr 2023, Page:001
https://epaper.dainikprabhat.com

### राज्यात यंदापासून नवे शैक्षणिक धोरण

लागू केले आहे. यामध्ये सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षण प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे. राज्य शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने अहवालाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम श्रेयांक आराखडा संदर्भात निर्देश जारी करण्यात आले होते. या अहवालावर दि.१९ व २० एप्रिल २०२३ रोजी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील चर्चासत्रामध्ये चर्चा झाली. अहवालाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्याची राज्यात एकसमान प्रमाणात अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, समूह विद्यापीठे आणि सर्व शैक्षणिक संस्थांना देण्यात आले. या बाबतचा अध्यादेश उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने नुकताच जारी करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी हा सुधारित अभ्यासक्रम आराखडा व श्रेयांक पद्धत राबविण्यात येणार आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संबंधित एआयसीटीई, पीसीआय, बीसीआय, सीओए, एनसीटीई या नियामक संस्थांची मान्यता आवश्यक असलेले अभ्यासक्रम वगळून या आराखड्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

प्रभात PuneCity, 25 Apr 2023, Page:002
https://epaper.dainikprabhat.com

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

सकाळ

## यूजीसी : वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी पुढाकार

# 'कमवा अन् शिकवा'मधून पंखांना बळ

**पुणे, ता. २४ : अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक, आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणात सर्वसमावेशक समान संधी प्राप्त व्हाव्यात, यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मार्गदर्शक सूचनांचा मसुदा जाहीर केला आहे. यात जोड अभ्यासक्रम, कमवा आणि शिका योजना असे उपाय प्रस्तावित आहेत.**

आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेत समान संधी कक्षाची स्थापना करण्यात यावी. यात विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव होणार नाही, त्यांच्या घटनात्मक अधिकारांचे रक्षण होईल, याची दक्षता घेतली जाईल. सध्या अस्तित्वात असलेले अनुसूचित जाती-जमाती कक्ष, इतर मागास वर्ग कक्ष आदी या समान संधी कक्षाअंतर्गत काम करतील. उच्च शिक्षण संस्थेच्या प्रमुखांकडून या कक्षाचे संचालक किंवा अधिष्ठात्यांची नियुक्ती केली जाईल. त्याशिवाय अन्य सात सदस्यांचा समितीमध्ये समावेश असेल. शिवाय जोड अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील कमतरता दूर करणे शक्य होणार आहे, असेही यासंदर्भातील मसुद्यात म्हटले आहे.

### आर्थिक दिलासा मिळणार

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या अडचणी कमी करण्यासाठी कमवा आणि शिका योजना प्रस्तावित केली आहे. शिक्षण घेताना रोजगार उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना काही प्रमाणात आर्थिक दिलासा मिळू शकणार आहे. त्यामुळे विद्यार्थी शिक्षणातून बाहेर पडण्याचे प्रमाण कमी होईल. विद्यार्थ्यांना शिकतानाच प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे या योजनेला प्रोत्साहन दिले पाहिजे, असे आयोगाने नमूद केले आहे.

"वंचित घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात समान संधी देण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार अभ्यासपूर्ण मसुदा तयार केला आहे. यात संबंधित विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरविणे, समान संधी देणे, कमवा आणि शिका योजना लागू करणे असे उपाय सुचविले आहेत. तसेच समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षण संस्थांनी आपल्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद करणे आवश्यक असल्याचेही सूचविण्यात आले आहे.

**- डॉ. माणिकराव साळुंखे**, अध्यक्ष, मसुदा तयार करणारी तज्ज्ञ समित

### समान संधी देण्यासाठी सूचना

- समान संधी कक्ष उभारणे
- कमवा आणि शिका योजना लागू करणे
- अध्ययनातील कमतरता दूर करण्यासाठी अभ्यासक्रम
- कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम निर्मिती करणे



### आराखड्यावर नोंदवा सूचना

- सूचना नोंदवण्यासाठी १७ मे पर्यंत मुदत
- शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांसह नागरिकांना नोंदविता येणार मत
- **संकेतस्थळ :** https://uamp.ugc.ac.in/

Pune, Main
25/04/2023 Page No. 5

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

# नवे शिक्षण धोरण बोर्ड परीक्षांसहच

**शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची स्पष्टोक्ती**

- सध्याच्या व्यवस्थेला व्यावसायिक अभ्यासक्रमांची जोड देणार
- दहावी, बारावीप्रमाणे आठवीच्या परीक्षा घेण्याचा सरकारचा विचार

म. टा. प्रतिनिधी, मुंबई/ठाणे



दीपक केसरकर

'नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी करताना कोणत्याही अभ्यासक्रमात बदल करण्यात येणार नाही. त्यामुळे पालकांनी याबाबत कोणताही संभ्रम मनात ठेऊ नये. पुढील वर्षापासून दहावी, बारावीच्या परीक्षा होणार नाहीत, ही अफवाच आहे. अभ्यासक्रमात बदल न करता त्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाचा अंतर्भाव केला जाणार आहे,' अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी मंगळवारी दिली.

राज्यात शिक्षण क्षेत्रात बदलाचे वारे वाहत असून, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार असल्याचे सरकारकडून सांगण्यात येत आहे. 'एनईपी'नुसार शाळांच्या शिक्षण पद्धतीत, अभ्यासक्रमात, गुणांकन पद्धतीत, बोर्डाच्या परीक्षांमध्ये बदल होणार आहेत. त्या वेळी दहावी, बारावीचे बोर्ड रद्द होणार का? शाळांना अकरावी आणि बारावीचे वर्ग सुरू करावे लागणार का? शाळेकडे जागा नसेल, तर काय करायचे? शाळांनी अंगणवाड्या कशा सुरू करायच्या? यांसह अनेक शंकांनी पालक आणि शिक्षकांच्या मनात काहूर माजवले होते. शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे देऊन विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या मनातील संभ्रम दूर केला.

'पुढील वर्षापासून दहावी, बारावीच्या परीक्षा होणार नाहीत, ही अफवाच आहे. असा कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे पालकांनी त्यावर विश्वास ठेवू नये. उलट दहावी, बारावीप्रमाणे इयत्ता आठवीच्या परीक्षा घेण्याचा आमचा विचार सुरू असल्याचे आधीच स्पष्ट केले आहे,' असेही केसरकर यांनी नमूद केले.

Maharashtra Times 26.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

सकाळ SakalNews @SakalMediaNews www.esakal.com ६

# जागर स्त्रियांच्या 'बुद्धिसंपदे'चा

**भाष्य**



**गणेश हिंगमिरे**

**बुद्धिसंपदा हक्क मिळविण्यासाठी महिलांना प्रोत्साहन हे आशयसूत्र यंदाच्या जागतिक बुद्धिसंपदा दिनासाठी (ता.२६ एप्रिल) निश्चित करण्यात आले आहे. महिलांमध्ये पेटंट किंवा तत्सम अधिकारांची जाणीव करून देणे, त्याच्या नोंदींसाठी त्यांना प्रवृत्त करणे, जगभरातल्या ज्या महिलांनी बौद्धिक संपदाहक्क मिळवून प्रगतीची झेप घेतली, त्यांची उदाहरणे समाजापुढे ठेवणे हा उपक्रम खूप उपयुक्त ठरेल.**

आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक महत्त्वाच्या विषयांना आणि घटकांना समोर ठेवून विशेष दिवस साजरा करण्याची एक चांगली प्रथा निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, जागतिक महिलादिन किंवा जागतिक योगदिवस. सदर दिनविशेष निश्चित करताना जगासमोर या विषयाचे किंवा घटकाचे महत्त्व अभ्यासले जाते. त्याचा प्रचार-प्रसार होतो. संयुक्त राष्ट्रांच्या अखत्यारीत काम करत असलेल्या 'आंतरराष्ट्रीय बौद्धिक संपदा संघटने'च्या माध्यमातून साजरा होणारा जागतिक बौद्धिक संपदा दिवस हाही त्यादृष्टीने महत्त्वाचा मानला पाहिजे. बौद्धिक संपदा आंतरराष्ट्रीय कराराचा स्वीकार २६ एप्रिल १९७०ला झाला होता.

बौद्धिक संपदा म्हणजे बुद्धीतून निर्माण झालेली संपत्ती; मग ती पेटंट असो कॉपीराईट असो किंवा ट्रेडमार्क असो. या संपत्तीला जगभराचे द्वार खुले व्हावे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर एक दुसऱ्या सदस्यराष्ट्रांच्या बुद्धीतून निर्माण झालेल्या संपत्तीसाठी जागतिक दालने खुली व्हावीत म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर एक प्लॅटफॉर्म निर्माण होणे आवश्यक असते. हेच लक्षात घेऊन जागतिक बौद्धिक संपदा संघटनेची निर्मिती झाली. थोडक्यात भारतात निर्माण झालेले पेटंट हे अमेरिकेमध्ये सुद्धा उपयोगी पडावे आणि अमेरिकेत तयार झालेले कॉपीराईट हे भारतातही उपयोगी ठरावे, या आंतरराष्ट्रीय समन्वयासाठी सदर जागतिक स्तरावरील संघटना आवश्यक होती आणि त्याची निर्मिती ५२ वर्षांपूर्वी संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिपत्याखाली झाली.

दरवर्षी अशा एक प्रकारे समाजघटकाला जागतिक बौद्धिक संपदा दिवसाच्या माध्यमातून प्रकाशित केले गेले. मागील वर्षी तरुणांच्या सर्जनशीलतेला हा दिवस समर्पित करण्यात आला होता; तर यंदाचा दिवस हा महिलांमधील सर्जनशीलतेला मध्यवर्ती ठेवून साजरा करण्यात येत आहे. अनेक नवनव्या गोष्टी महिलांना सुचत असतात. त्यातून काही नवी उत्पादनेही तयार होतात. पण हे सुचणे, ही निर्मिती यांचे काहीएक 'मूल्य' आहे आणि ते आपल्याला मिळायला हवे, ही जाणीव मात्र महिलांना असतेच असे नाही. भारतात तरी त्याविषयी जागृती घडविण्याची गरज जाणवते आहे. त्यामुळेच समाजातील सर्वच घटकांना अधिकाधिक 'बौद्धिक संपदा' प्राप्त करण्यासाठी प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

जागतिक स्तरावर महिलांचे योगदान खूप मोठे असते. समोर येणारे अनेक प्रश्न त्या केवळ आपल्या बुद्धिमत्तेतून, कल्पनाशक्तीद्वारे सोडवत असतात.



अनेकदा त्यांना जी सोल्यूशन सापडतात, किंवा त्यांच्या हातून जी नवनिर्मिती होते, त्याची नोंद मात्र होत नाही. त्यामागे एक तर बौद्धिक संपदेच्या नोंदींच्या प्रक्रियेविषयीचे अज्ञान असते किंवा एकूणच समाजात महिलांना पुढे येण्यात असलेले सामाजिक वातावरणाचे अडथळे असतात. या दोन्ही बाबतीत सामाजिक प्रबोधन करावे लागेल. त्यासाठी बुद्धिसंपदा दिनाच्या उपक्रमाचा उपयोग करून घेता येईल. अर्थात हे काम एका 'दिवसा'ने होणारे नाही. त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील. महिलांमध्ये पेटंट किंवा तत्सम नवनवीन आविष्कारांची जाणीव करून देणे, त्याच्या नोंदीसाठी प्रवृत्त करणे, जगभरातल्या ज्या महिलांनी बौद्धिक संपदा हक्क मिळवून प्रगतीची झेप घेतली, त्यांची उदाहरणे समाजापुढे ठेवणे हा उपक्रम खूप उपयुक्त ठरेल.

## काही यशोगाथा

यासंदर्भात महाराष्ट्रातील काही महिलांच्या बौद्धिक संपदाविषयक यशोगाथांचे उदाहरण समाजापुढे प्रकर्षाने यायला हवे. अशा काही यशोगाथा प्रसिद्धही झाल्या आहेत. पुण्यात वास्तव्यास असलेल्या जयश्री यादव नावाच्या एका महिलेने गुलाबाच्या पाकळ्यांपासून गुलकंद निर्माण होतो, तर 'गुलाबाची वाईन' तयार होऊ शकेल का, या आपल्या मनात आलेल्या प्रश्नाचा शोध घेतला आणि त्या शोधातून त्यांनी खरोखरच गुलाबाची वाइन बनवली. नुसती ती बनवून त्या थांबल्या नाहीत, तर त्याचे पेटंट भारतात व भारताबाहेर घेतले आणि त्याच पेटंटच्या जोरावर गुलाबाच्या वाईननिर्मितीचा एक उद्योग पुण्याजवळ उभारला. त्याचबरोबर गुलाबनिर्मितीसाठी काही एकर जमीन घेऊन गुलाबाची शेती फुलवली. याच शहरातील शुभांगी पाटील यांनी पतीसाठी एका वेगळ्या प्रकारचे सूप बनविले. त्यांच्या पतीला अपघात झाल्याने उपचार सुरू होते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आहारातून काही घटक पोटात जाणे आवश्यक होते. मांसाहारी पदार्थ टाळून हा पर्याय शोधायचा होता. शुभांगीताईंनी घरातच एक प्रयोगशाळा तयार करून संशोधन केले. त्यातून त्यांना 'वॉलनट रागी' सुपाचा शोध लागला. त्याद्वारे त्यांनी केवळ आपल्या पतीलाच बरे केले नाही, तर भारतातील सीमांवर कार्यरत असलेल्या भारतीय सैनिकांसाठीसुद्धा हा पौष्टिक पदार्थ उपयुक्त ठरला. या पदार्थाचे त्यांनी पेटंट घेतले. थोडक्यात महिलांना बौद्धिक संपदेची माहिती व महती कळली तर त्यांच्या बुद्धीतून अनेक आविष्कार निर्माण होतील आणि पेटंटची संख्या वाढू शकेल.

यापूर्वी अनेक महिलांनी आपल्या सर्जनशीलतेच्या जोरावर अनेक कल्याणकारी पदार्थांना जन्म दिला आहे. केवळ स्वयंपाकापुरते हे नाही. अगदी आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. भारतात स्त्रीला आपण शक्तीचे स्वरूप मानतो. खरे तर शक्ती आणि बुद्धी या दोन्हींतही स्त्रिया सरस कामगिरी करतात. प्रश्न आहे तो या सुप्त शक्तीला जागे करण्याचा. तसे केल्यास त्याचा त्या त्या व्यक्तींना, समाजाला आणि देशालाही फायदा होणार आहे.

तसे पाहता भारतासारख्या अनेक देशांत महिलांमधील बौद्धिकसंपदा विषयक जागरूकता निर्माण होत चालली आहे; पण तरीही त्याचे प्रमाण खूप कमी आहे. गेल्या दहा वर्षांत भारतातील महिला पेटंटधारकांच्या संख्येत केवळ तीन टक्क्यांनीच वाढ झाली होती. जगाचा विचार केला तर महिला संशोधकांच्या पेटंटची संख्या वीस टक्क्यांहून अधिक नाही. ही संख्या वाढावी, यादृष्टीने आता जगभर प्रयत्न होतील. त्यादृष्टीने आजच्या दिवसाचे महत्त्व विशेष आहे. भारत सरकारनेही महिलांचे पेटंटअर्ज लवकरात लवकर विचारात घेऊन त्यावर निर्णय द्यावा, अशी तरतूद केली आहे. साधारण वर्षभरात हे काम मार्गी लावले जाते. विकसनशील देशात महिलांच्या 'बौद्धिक संपदा' अत्यल्प आहेतच. पण लक्षात घेण्याची बाब अशी की, विकसित देशातही पुरुषांच्या बौद्धिक संपदेच्या तुलनेत महिलांच्या नोंदी कमी आहेत. थोडक्यात जगातील महिलांच्या बौद्धिक संपत्तीचा टक्का वाढवून त्यांना बुद्धिजीवी घटक म्हणून व्यापक प्रमाणात अधिमान्यता मिळावी यासाठी यंदाच्या 'बौद्धिक संपदा दिना'पासून प्रयत्नांना सुरुवात करायला हवी.

(लेखक बुद्धिसंपदा हक्क या विषयाचे अभ्यासक आणि अध्यापक आहेत.)

Sakal 26.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

पुढारी

# शिक्षकांसाठी आता चार वर्षांचा अभ्यासक्रम

- **एआयसीटीईच्या सूचना : येत्या शैक्षणिक वर्षापासून पारंपरिक बी.एड्. बंद होण्याच्या मार्गावर**

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

पूर्व प्राथमिक ते बारावीपर्यंतच्या वर्गात शिक्षक म्हणून रुजू होण्यासाठी आता इंटिग्रेटेड टीचर एज्युकेशन प्रोग्रॅम (आयटीईपी) हा चार वर्षांचा अभ्यासक्रम तयार केला आहे. ए आणि त्यावरील नॅक दर्जा असलेल्या उच्च शिक्षण संस्थांनी येत्या शैक्षणिक वर्षापासून या अभ्यासक्रमाचा शैक्षणिक वर्षात समावेश करावा, अशा सूचना एआयसीटीईने जारी केल्या आहेत. यामुळे आता येत्या शैक्षणिक वर्षापासून पारंपरिक बीएड अभ्यासक्रम बंद होण्याच्या मार्गावर आहे.

आयटीईपी हा अभ्यासक्रम चार वर्षांचा असणार आहे. विद्यार्थ्यांना बीए, बीएस्सी किंवा बीकॉम या शैक्षणिक अर्हतेसोबतच बीएड ही व्यावसायिक अर्हता मिळविता येईल. यापूर्वी तीन वर्षांचा पदवीपूर्व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर शिक्षक बनण्यासाठी लागणारी व्यावसायिक अर्हता मिळविण्यासाठी दोन वर्षाचा बीएड कोर्स असा पाच वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या आयटीईपी हा अभ्यासक्रम सुरू करण्याच्या सूचना संबंधित उच्च शिक्षण संस्थांना देण्यात आल्या आहेत.

### असा असणार अभ्यासक्रम....

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार या अभ्यासक्रमांची रचना.
- पूर्व प्राथमिक ते दुसरी, त्यानंतर तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी आणि दहावी तसेच अकरावी आणि बारावी या चार स्तरांसाठी सर्वोत्कृष्ट शिक्षक घडविले जाणार.
- आयटीईपी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर उच्च क्षमता मिळविलेला शिक्षक होणार.

Pune Edition
Apr 29, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# विद्यापीठं आणि मराठी संशोधन

डॉ. यू. म. पठाण

mtedit@timesgroup.com

महाराष्ट्रासह बृहन्महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांत व पदव्युत्तर महाविद्यालयांत मराठी विभाग असून, त्यात मराठी भाषा व साहित्य, त्याचप्रमाणं महाराष्ट्रातील लोकसाहित्य यांविषयी संशोधन केलं जातं. इथं आधीच हे स्पष्ट करायला हवं, की या लेखात कुठलीही व्यक्ती, संस्था किंवा त्यांच्या संशोधनाविषयी टीका करायची नाही. मराठीतील विशिष्ट वाङ्मयप्रवाह, दोन भाषांतील महत्त्वाचे लेखक व त्यांच्या साहित्याची तुलना, इंग्रजीसारख्या परभाषेतील महत्त्वाच्या लेखकाच्या साहित्याचा तत्सम मराठी लेखकाच्या साहित्यावर प्रभाव, मराठीच्या बोलींतील साहित्याचा अभ्यास अशा किती तरी विषयांवर संशोधन करता येतं. यावरून एतद्विषयक संशोधनाची व्याप्ती किती मोठी आहे, याची सहज कल्पना येईल. याची जाण ज्या संशोधन-मार्गदर्शकांना ('गाइड'ना) व संशोधक विद्यार्थी/प्राध्यापकांना असेल, त्यांचं संशोधन निश्चितपणे गुणाधिष्ठित व मूल्यवर्धक होईल.

या दृष्टीनं आज विद्यापीठं व पदव्युत्तर महाविद्यालयांतील मराठी विभागांतील संशोधन फार महत्त्वाचं आहे, असं मला वाटतं. या लेखात एतद्विषयक संपूर्ण माहिती आहे, असं मी म्हणणार नाही. त्यात काही प्रातिनिधिक स्वरूपाची माहिती आहे; कारण तसं म्हणणं अतिव्याप्ती ठरेल, ती अनुचित ठरेल व इतरांवर अन्यायकारकही ठरण्याची शक्यता असेल. विद्यापीठ अनुदान मंडळानं अनुदान दिल्यामुळं, मी काही प्रातिनिधिक संशोधन संस्थांतील विद्यापीठं व पदव्युत्तर महाविद्यालयं, मराठी विभागांतील संशोधनाचं सर्वेक्षण करू शकलो. तिचा उपयोग आपल्याकडं संशोधन करणाऱ्या, भावी काळात करू इच्छिणाऱ्या व्यक्ती व संशोधन संस्थांना निश्चित होईल.



गेल्या चार-पाच दशकांत मराठी व हिंदी संशोधनाच्या संदर्भात आलेल्या अनुभवाच्या आधारे हा लेख हेतुतः लिहिला. केवळ टीका करण्यापेक्षा, यापुढं होणाऱ्या मराठी संशोधनाला विधायक दिशा मिळावी, एवढीच माफक व नम्र अपेक्षा आहे.

मुळात संशोधनच का, कसं व कशासाठी करायचं, याची सुस्पष्ट, नेमकी कल्पना संशोधक आणि त्यांच्या मार्गदर्शकांच्या मनात असेल, तरच त्या संशोधनाची मूलभूत ज्ञानात भर पडेल. मी अमुक विषयांवर संशोधन केलं किंवा मी इतक्या विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी मार्गदर्शन केलं, हे 'गणित' मनात येत असेल, तर त्यात संशोधन नसेलच असं नाही. गणित (अनायासे) येत असेल आणि त्यावर गणितानंच उत्तरोत्तर मात केली, तर संशोधनाची बेरीज शून्यापर्यंत पोहोचण्याचा दाट संभव असेल. असे झाल्यास खऱ्या संशोधनाच्या आनंदास आपण निश्चितपणे मुकू. तो आनंद आपले उत्तरही उजळणारा असतो.

> आज विद्यापीठं व पदव्युत्तर महाविद्यालयांतील मराठी विभागांतील संशोधन फार महत्त्वाचं आहे. मी केलेल्या सर्वेक्षणाचा उपयोग आपल्याकडं संशोधन करणाऱ्या, भावी काळात करू इच्छिणाऱ्या व्यक्ती व संशोधन संस्थांना निश्चित होईल.

वरील संस्थांप्रमाणं अन्य काही संशोधन संस्थांचीही नोंद घ्यायला हवी. पुण्याचं भारत इतिहास संशोधन मंडळ किंवा मुंबईच्या दादरच्या ग्रंथसंग्रहालयातील इतिहास संशोधन मंडळ यांतील संशोधन लक्षणीय आहे. त्यांचा ग्रंथ व हस्तलिखित संग्रहही भावी मराठी संशोधकांना उपयुक्त आहेत. (उदा. औरंगाबादचे न. शे. पोहनेरकर, नांदेडचे कानोले, तुळजापूरचे क. भ. प्रयाग, पैठणचे बाळासाहेब पाटील इ.)

या लेखात मला संशोधकांना व मार्गदर्शकांना महत्त्वाची माहिती द्यायची आहे. औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागात पहिली दहा वर्षं प्रा. वा. ल. कुलकर्णी प्राध्यापक व प्रमुख होते. त्यानंतर दोन दशकं मी होतो. या तीन दशकांच्या काळात मी व दोन संशोधकांनी 'मराठीचं साहित्य व भाषिक सर्वेक्षण' या संशोधन प्रकल्पाच्या अंतर्गत सुमारे चार हजार दुर्मीळ हस्तलिखितांचा संग्रह केला. अशा प्रकारचा व एवढा मोठा मराठी हस्तलिखित संग्रह देशातील कोणत्याही मराठी विभागात नसावा, अशी माझी माहिती आहे. माझ्या निवृत्तीनंतर हा संग्रह बहुधा विद्यापीठ ग्रंथालयाच्या स्वतंत्र विभागात ठेवला आहे.

यांपैकी काही दुर्मीळ व महत्त्वाच्या हस्तलिखितांचं संशोधनपर लेखन, प्रकाशन मी व माझ्या काही संशोधक विद्यार्थ्यांनी केलं असून, विद्यापीठ ग्रंथालयात बसून कुणाही अभ्यासकाला करता येईल. अट एवढीच, की विद्यापीठ ग्रंथालय व मराठी विभाग यांचा उल्लेख त्या संशोधनपर लेखात/ग्रंथात करावा. त्याची एक एक प्रत या सर्वांकडं पाठवावी.

हे सारं तत्त्वविवेचन झालं; पण त्याविषयी, 'आधी केले, मग सांगितले' या विचारानुसार प्रत्यक्षातही काम केलं आहे. सत्तर पुस्तकांखेरीज माझ्या मार्गदर्शनाखाली २५ प्राध्यापकांना पीएच. डी. पदवी मिळाली आहे. त्याचा तपशील जाणकारांना माहिती आहे.

संवाद

Maharashtra Times 30.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

# नव्या शैक्षणिक वर्षात मिळणार कुलगुरू?

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : मेमध्ये मुलाखत

पुणे, ता. २९ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी पात्र ठरलेल्या व्यक्तींना कुलगुरू निवड समितीकडून मुलाखत आणि संवादासाठी निवड झाल्याचे पत्र पाठविण्यात आले आहे. यात निवड झालेल्या व्यक्तींना मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात मुलाखतीसाठी बोलविण्यात आले आहे. त्यामुळे येत्या नवे शैक्षणिक वर्ष (२०२३-२४) सुरू होताच; म्हणजेच जूनमध्ये विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्याची चिन्हे आहेत.

तत्कालीन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचा कार्यकाळ १८ मे २०२२ रोजी संपला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्याकडे अतिरिक्त कुलगुरुपदाचा कार्यभार सोपविण्यात आला. त्यानंतर दीर्घ प्रतीक्षेनंतर जानेवारी २०२३ मध्ये राज्यपालांकडून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरू निवड समिती जाहीर करण्यात आली. यात भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) कानपूरचे संचालक डॉ. अभय करंदीकर, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, तसेच कर्नाटक राज्य महिला विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मीना चंदावरकर (विद्यापीठ अनुदान आयोग प्रतिनिधी) यांना विद्यापीठाच्या कुलगुरू निवड समितीचे सदस्य म्हणून निवडण्यात आले. या समितीमार्फत कुलगुरुपदासाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यासाठी ३० मार्चपर्यंत मुदत दिली होती. यापदासाठी जवळपास ९० अर्ज आले होते. त्यापैकी काही निवड व्यक्तींना पहिल्या टप्प्यातील मुलाखत आणि संवादासाठी १८ आणि १९ मे दरम्यान मुंबईतील भारतीय तंत्रज्ञान संस्थेत (आयआयटी, पवई) निमंत्रित करण्यात आले आहे. या संदर्भातील निवडपत्रे संबंधितांना पाठविण्यात आलेली आहेत.

कुलगुरुपदासाठी होणाऱ्या मुलाखत व संवादातून निवड समितीमार्फत पाच नावे निवडण्यात येतील. त्यानंतर या पाच नावांची शिफारस राज्यपालांकडे करण्यात येईल. यातून राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती हे कुलगुरूंच्या नावाची घोषणा करतील. त्यामुळे जवळपास जूनमध्ये विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या कुलगुरुपदाच्या निवड प्रक्रियेत विद्यापीठातील प्राध्यापकच आघाडीवर असल्याचे दिसून येते.

Sakal 30.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*

सप्तरंग

अनुभवें आले



**प्रताप पवार**
editor@esakal.com

# एज्युकॉन : आपण काय करतो?



माझ्यावर वयाच्या तेविसाव्या वर्षी 'अंधशाळे'ची धुरा सोपवण्यात आली होती. त्यामुळे समाजातील अंध व्यक्तींचं, मुला-मुलींचं समाजातील अज्ञान, आर्थिक क्षमता वगैरेंशी माझा संबंध यायला लागला. अंधत्व का येतं आणि आलं तर काय करायला हवं याची आपोआपच प्रश्नोत्तरं समोर यायला लागली. यानंतर सुमारे पाच वर्षांनी शंतनुराव किर्लोस्करांनी माझी 'किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लिमिटेड' या कंपनीवर संचालक म्हणून नियुक्ती केली. यामुळे किर्लोस्करांशी वैयक्तिक ऋणानुबंध तर वाढलेच, शिवाय खूप शिकायलाही मिळालं. या कंपनीच्या होणाऱ्या सभा, अनेकदा त्यांच्याकडे काही उद्योजक किंवा तत्सम उच्चविद्याविभूषित लोक आले की आम्हा उभयतांनाही बोलावलं जायचं. अनेकदा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक बाबींविषयी चर्चा होत. शिक्षणाबद्दल सार्वत्रिक नाराजी व्यक्त केली जायची. शिक्षणाचा दर्जा, विद्यार्थ्यांची पदवीधर झाल्यावर असलेली क्षमता, उपयुक्तता यावर भरपूर टीका होत असे. मी पिलानीतून शिकल्यामुळे माझी परिस्थिती त्यामानानं चांगली होती. कारण, पदवीधर होईपर्यंत आम्हा पिलानीकरांना चार उद्योगक्षेत्रांत घेतलेल्या प्रशिक्षणाचं पाठबळ होतं. महाराष्ट्रात असं कुठंही नव्हतं. पदवीधराला नोकरीवर घ्यायचं व नंतर वर्ष-सहा महिने प्रशिक्षण द्यायचं; मगच तो औद्योगिक संस्थेत काम करण्याच्या पात्रतेचा होत असे. अशा टीका होई, तेव्हा माझ्या मनात विचार येत असे की, हे मान्य आहे; परंतु ते सुधारण्यासाठी आपण काय करतो?

गरजू, गरीब विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी डॉ. अच्युतराव आपटे यांनी 'विद्यार्थी सहाय्यक समिती' स्थापन केली. अनाथ मुलं आणि महिला यांच्या पुनर्वसनासाठी बाबासाहेब जाधव यांनी 'बालग्राम' सुरू केलं. झोपडपट्टीतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी किशाभाऊ पटवर्धन यांनी 'स्वरूपवर्धिनी' सुरू केली. या सर्व संस्थांशी माझी नाळ जोडली गेली होती. 'बालकल्याण' संस्था - जी सुमारे पाच हजार अपंग विद्यार्थ्यांना मदत करते - तिथंही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करण्याबरोबरच पालक, शिक्षक यांचेही प्रशिक्षण आम्ही महाराष्ट्रभर केलं. ते या मुलांच्या सामाजिक आणि भावनिक दृष्टीनं महत्त्वाचं होतं. घरातील अपंग मूल म्हणजे देवाचा कोप किंवा शाप अशी समजूत होती. 'सकाळ'मध्येही अशा सामाजिक विचारांवर काम करणारे अनेक न्यास आहेत. यामुळे साहजिकच मनात द्वंद्व होत होतं की, शिक्षणाबाबत आपण किंवा समाज काय करतो?

काही काळानंतर चंद्रकांत किर्लोस्करांनी मला 'मराठा चेंबर्स'च्या कामात गुंतवलं. तिथं काही लोक व्यवसायाबरोबरच शिक्षणक्षेत्रातही काम करत होते. उदाहरणार्थ : अतुर संगतानी, जे सिम्बायोसिस संस्थेच्या प्रथम विश्वस्तांपैकी एक होते. त्यांच्याबरोबरही भेटीगाठी होत. आमचा चांगला स्नेह होता.

या सर्व अनुभवांतून 'मराठा चेंबर्स'च्या अध्यक्षपदी माझी निवड करण्यात आली, तेव्हा मी काही नवीन योजनांची आखणी केली. त्यावेळी व्यवसायात मंदी होती आणि संरक्षणखातं लाखो कोटी रुपयांची सामग्री आयात करत होतं. हे खटकणारं होतं. आपल्या देशात ही क्षमता निर्माण करून हेच पैसे देशात का ठेवले जात नाहीत हा विचार मनात होता. यातून संरक्षणखात्याशी समन्वय साधण्यासाठी एक कमिटी - निवृत्त झालेल्या; परंतु सामाजिक जाण असलेल्या - संरक्षणखात्यातील एका व्यक्तीला देऊन कामाला सुरुवात केली.

**दुसरा तितकाच महत्त्वाचा विषय म्हणजे, शिक्षणप्रणालीबद्दलच्या उद्योजकांच्या तक्रारी. यासाठी शिक्षण कमिटी निर्माण केली. या क्षेत्रात काम करणाऱ्या उद्योजकांना सभासद केलं आणि पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. अरुण निगवेकर यांना कमिटीचं अध्यक्ष केलं.**

त्यांना आम्ही असं सांगितलं, 'आमच्या उद्योजकांत अनेक तज्ज्ञ सर्व क्षेत्रांत काम करतात. आमच्याकडे अशा तीन हजार संस्था, सभासद आहेत. त्यांचे तज्ज्ञ तुमच्या कॉलेजमध्ये मोफत शिकवतील. उदाहरणार्थ : 'सकाळ'मध्ये काम करणाऱ्या अकाउंट विभागाचे प्रमुख - जे सीए आहेत किंवा खरेदीविभागाचे प्रमुख, मार्केटिंगचे प्रमुख - तुमच्या कॉलेजमध्ये आठवड्यातील काही तास सहजपणे शिकवू शकतील. यामुळे तुम्हाला अनुभवी प्राध्यापक मिळतील आणि त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर सुपरिणाम होईल. ही कल्पना सर्वांना आवडली आणि कामाला सुरुवातही झाली. मी स्वतः या कमिटीच्या सभांना हजर राहत असे.

माझ्या अध्यक्षपदाची मुदत संपल्यावर येणारे अध्यक्ष साहजिकच वेगळ्या विचारांचे असू शकतात, त्यामुळे मी सुरू केलेल्या दोन्ही कमिट्यांना - शिक्षण आणि संरक्षण कमिट्यांना - दुय्यम स्थान दिलं गेलं.

दरम्यान डॉ. निगवेकर विद्यापीठ अनुदान आयोगाचे (UGC) अध्यक्ष झाल्यानं दिल्लीला गेले. त्यांची मुदत संपल्यावर ते मला व अभिजितला भेटायला आले आणि 'मराठा चेंबर्स'च्या शिक्षण कमिटीचं काम कसं सुरू आहे याची विचारपूस त्यांनी केली.

मी अर्थातच त्यांना वस्तुस्थिती आणि माझ्या मर्यादा यांची माहिती दिली.

**ते म्हणाले : ''उद्योजकांबरोबर घालवलेल्या वेळेचा मला चांगला उपयोग झाला. खरं म्हणजे, हे देशपातळीवर समजायला हवं. तशी चर्चासत्रं आपण 'सकाळ'तर्फे शिक्षणसंस्थांमध्ये घडवू या आणि त्यासाठी मी वेळ द्यायला तयार आहे.'' मला एकंदर संकल्पनेच्या उपयुक्ततेबद्दल खात्री होती; पण यशाबद्दल नव्हती, परंतु आमच्या सर्वांचं एकमत होऊन 'एज्युकॉन'चा जन्म झाला.**

पहिलीच कॉन्फरन्स गोव्यात झाली. त्या वेळचे केंद्रीय शिक्षणमंत्री अर्जुनसिंह यांच्या अध्यक्षतेखाली ती अतिशय यशस्वी झाली. मग 'एज्युकॉन'नं मागं वळून पाहिलंच नाही. यात नंतर परदेशांतील विद्यापीठांशी भेट, संपर्क या गोष्टी सुरू झाल्या आणि उपयुक्तता आणि व्यापकता खूप वाढत गेली. शिक्षणक्षेत्राशी माझा संबंध वाढतच गेला तो आजतागायत!

'एज्युकॉन'च्या अनुषंगानं जगातील अनेक देशांतील सर्वोत्तम विद्यापीठांबरोबर भेटी, चर्चा झाल्या. शिक्षणक्षेत्रातील लोकांची दृष्टी, विचार, आधुनिक आणि सर्वोत्तम शिक्षणसंस्थांमुळे बदलावी, व्यापक व्हावी, प्रेरणा मिळावी ही उद्दिष्टं प्रामुख्यानं आहेत. शिवाय, त्या सर्वांना भारतातीलच शिक्षणक्षेत्रातील विविध तज्ज्ञांबरोबर चर्चा करणं शक्य झालं आहे. हेसुद्धा एक शिक्षणच आहे. 'प्रोफेसर इन प्रॅक्टिस' ही योजना 'एज्युकॉन'मुळेच डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी देशभर अमलात आणली. ती माझ्या मते, 'एज्युकॉन'च्या सिंगापूर इथल्या भेटीनंतरच प्रत्यक्षात आली. यामुळे विविध क्षेत्रांतील अनुभवी तज्ज्ञ शिक्षणसंस्थांशी जोडला जातो. सिंगापूरमध्ये गेलो असताना वेगळाच पैलू लक्षात आला. तो अगदी छोटासा देश; परंतु विख्यात आंतरराष्ट्रीय कंपन्यांची संशोधनकेंद्रं सिंगापूर विद्यापीठात आहेत. या ठिकाणी उद्योगक्षेत्राला कोणत्या अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे याची चाचपणी केली जाते. त्यानुसार अभ्यासक्रम ठरवला जातो. त्यामुळे या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी आणि करिअरच्या दृष्टीनं जगभरात संधी मिळतात. भविष्यकाळाची पावलं काय असतील याचा अंदाज 'एज्युकॉन'मुळे स्पष्ट होत होता. याचा लाखो विद्यार्थ्यांना फायदा व्हावा हेही महत्त्वाचं उद्दिष्ट आहे. 'एज्युकॉन'च्या सातत्यानं आणि वाढत्या प्रतिसादामुळे आमचा हेतू सफल होत आहे याचं मनस्वी समाधान आहे. त्यामुळे पुढील पिढी अधिक सक्षम झाली तर देशभर त्याचे चांगले परिणाम दिसू लागतील.

प्रत्येक देशातील, विशेषतः प्रगतशील देशांमधील भेटीगाठींतून त्यांचं देशप्रेम पावलोपावली जाणवतं. आपल्या देशाच्या गरजेसाठी काय आणि कसं करायला हवं हे विचारमंथन अनुभवायला मिळतं. काळाच्या पुढं राहण्याचा अट्टहास तिथं ठायी ठायी दिसत होता. हे सर्व खूप शिकण्यासारखं आहे. आपण जे पटतं, योग्य वाटतं त्यासाठी योगदान द्यावं एवढंच सुचवावंसं वाटतं.

**(प्रतिक्रिया नोंदवा : व्हॉट्सअॅप क्रमांक : ८४८४९ ७३६०२)**

Sakal 30.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*

आमचा अक्षरबंध



विनोद शिरसाठ
saptrang@esakal.com

# 'साधना'त अवतरली डिजिटल क्रांती...!

साधनाचे सत्तरावे वर्ष संपले तोपर्यंत साप्ताहिकाची एक साधी वेबसाइट होती, तिच्यावर आधीच्या दहा वर्षांचे अंक फक्त पीडीएफ स्वरूपात उपलब्ध होते. मात्र २०१८ या वर्षी बंगलोर येथील आय.पी.एस.एम.एफ. या संस्थेने साधना साप्ताहिकाचे डिजिटल अर्काइव्ह तयार करण्यासाठी ग्रँट देऊ केली. प्रस्ताव त्यांच्याकडूनच आला आणि नंतरच्या चार वर्षांत आम्ही त्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला. हे काम आम्हाला सोपे गेले, याचे कारण या अर्काइव्हचा पाया डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी २००७ मध्येच रचून ठेवला होता. तेव्हा त्यांनी साधनाचे साठ वर्षांचे सर्व अंक स्कॅन करून ठेवले होते. किशोर ऑबळे या डॉक्टरांच्या इंजिनियर कार्यकर्त्याने अवघ्या सहा महिन्यांच्या काळात जवळपास तीन हजार अंकांचे स्कॅनिंग फक्त दीड लाख रुपयांत करून दिले होते. गंमत अशी की, तेव्हा डॉक्टरांना स्वतःला ई-मेल सुद्धा करता येत नव्हता, मात्र येऊ घातलेली डिजिटल क्रांती आणि साधनाचे भवितव्य लक्षात घेऊन त्यांनी तो दूरदृष्टीचा निर्णय घेतला होता.

**जानेवारी २०१९ पासून आम्ही साधनाच्या डिजिटल अर्काइव्हसाठी जणू काही "वॉर रूम"च सुरू केली. अलीकडच्या १५ वर्षांचे अंक, मग त्याआधीच्या ४५ वर्षांचे अंक आणि त्यानंतर सुरुवातीचे १५ वर्षांचे अंक असे तीन टप्पे ठरवले. ओसीआर तंत्राने अंक युनिकोड मध्ये रूपांतरित करणे, नंतर त्या सर्व अंकांची प्रुफे तपासून घेणे आणि मग ते अंक वेबसाइटवर लेखक- विषय-उपविषय अशा वर्गीकरणासह अपलोड करणे, असे त्रिस्तरीय काम सुरू केले.**

या कामासाठी सुदाम सानप, सुहास पाटील, हिना खान, गंधा दीक्षित व समीर शेख या पाच तरुणांची कार्यालयीन टीम पूर्ण वेळ काम करू लागली. शिवाय, त्या त्रिस्तरीय कामासाठी २५ ते ३० तरुण-तरुणी आपापल्या घरी राहून अर्धवेळ काम करत राहिले.

आतापर्यंत या अर्काइव्हचे दोन टप्पे (१९६३ ते २०२३) पूर्ण झाले आहेत, तिसरा टप्पा आणखी सहा महिन्यांत पूर्ण होईल. म्हणजे साधनाचे ७५ वर्षांचे अर्काइव्ह पूर्ण झालेले असेल. या सर्व प्रक्रियेसाठी आम्ही इवोनिक्स टेक्नॉलॉजी कडून सॉफ्टवेअर प्रणाली तयार करून घेतली. एम.के.सी.एल. ने तांत्रिक साह्य, सल्लामसलत व मनुष्यबळ अशी बरीच मदत विनामूल्य केली. शिवाय, सॉफ्टवेअर क्षेत्रातील काही मित्र- हितचिंतक यांचे सहाय्य मिळाले ते वेगळेच.

डिजिटल अर्काइव्हने छापील पुस्तके, ई बुक्स व ऑडिओ बुक्स या तिन्ही आघाड्यांवर प्रचंड शक्यता निर्माण केल्या. उदाहरणार्थ अनिल अवचट यांनी संपादित केलेला १५ ऑगस्ट १९७२ चा 'पंचवीस वर्षातील दलितांचे स्वातंत्र्य' हा विशेषांक, राजा ढाले यांच्या वादग्रस्त लेखामुळे प्रचंड गाजला होता, त्यावर घणाघाती वादसंवाद झाला होता. तो संपूर्ण अंक आणि तो सर्व वादसंवाद यांचे मिळून दोनशे पानांचे पुस्तक गेल्या वर्षी आम्ही सहजतेने आणू शकलो, ते केवळ या अर्काइव्हमुळेच !

या अर्काइव्हचे काम चालू असतानाच, 'कर्तव्य साधना' हे डिजिटल पोर्टल सुरू केले. त्यावर साप्ताहिकाच्या व्यतिरिक्त पूर्णतः नवा मजकूर (लेख) प्रसिध्द करायला सुरुवात केली. शिवाय इंग्रजी लेख व ऑडिओ / व्हिडिओ हे विभागही सुरू केले. कर्तव्य स्थिरावत नाही तोच, साधना

प्रकाशनाची पुस्तके ई-बुक स्वरूपात किंडलवर आणायला सुरुवात केली. पुढील दीड वर्षांत पावणेदोनशे पुस्तके ई-बुक स्वरूपात तर आणलीच, पण साप्ताहिकाचे गेल्या दशकभरातील पन्नासहून अधिक विशेषांकही ई बुक स्वरूपात आणले. हिना व समीर या दोघांनी ते काम पूर्णतः मार्गी लावले.

**हे करत असतानाच आम्ही ऑडिओ बुक्स तयार करण्यासाठी आघाडी उघडली. ते काम अधिक वेळ, ऊर्जा व पैसा घेणारे असल्याने त्याची गती कमी राहिली, परंतु जी ऑडिओ बुक्स केली ती सर्वार्थाने उत्तम दर्जाची आहेत. आतापर्यंत ३० पुस्तके आणि ४० कॅप्सुल्स असा एकूण सव्वादोनशे तासांचा ऐवज स्टोरीटेलवर आला आहे. मृदगंधा दीक्षित व मयूर पठारे या दोघांनी ही आघाडी सांभाळली.**

काही ऑडिओ बुक्स त्या त्या लेखकांच्या आवाजात करून घेतली, उदा. मिलिंद बोकील यांच्या आवाजात ''कहाणी पाचगावची'' आणि ''मेळघाट शोध स्वराज्याचा''. काही पुस्तके कलाक्षेत्रातील लोकांच्या आवाजात करून घेतली, उदा. गोविंद तळवलकर यांचे ''वाचता वाचता'' हे पुस्तक गजानन परांजपे यांच्या आवाजात, तर नवी क्षितिजेकार विश्वास पाटील यांचे ''झुंडीचे मानसशास्त्र'' हे पुस्तक ओंकार गोवर्धन यांच्या आवाजात. काही पुस्तके उत्कृष्ट निवेदकांच्या आवाजात करून घेतली, उदा. सुरेश द्वादशीवार यांची ''मन्वंतर '' व ''युगांतर '' ही पुस्तके गौरी लागू यांच्या आवाजात. याशिवाय, विभूतीभूषण बंद्योपाध्याय लिखित व विजय







पाडळकर अनुवादित ''मुलांसाठी पथेर पांचाली'' या कादंबरीचे ऑडिओ बुक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने दिपाली अवकाळे यांच्या आवाजात आले आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे ''लढे अंधश्रद्धेचे'' हे पुस्तक हर्षल लवंगारे या तरुण मित्राच्या आवाजात, तर गो.ना. मुनघाटे लिखित ''माझी काटेमुंढरीची शाळा'' हे पुस्तक राजकुमार तांगडे यांच्या आवाजात केले; ही दोन्ही ऑडिओ बुक्स मागील पावणेदोन वर्षे सर्व अर्थांनी अव्वल स्थानी राहिली आहेत.

चार वर्षांपूर्वी फक्त साधना साप्ताहिकाची वेबसाईट होती, तिला दरमहा भेट देणाऱ्यांची संख्या तीन हजार दरम्यान होती. आता साप्ताहिक, कर्तव्य व प्रकाशन या तिन्ही विभागांच्या स्वतंत्र वेबसाईट आहेत, मात्र त्या परस्परांना जोडलेल्या आहेत. या तिन्ही वेबसाईटला भेट देणाऱ्यांची एकूण संख्या आता दरमहा साठ हजारांपेक्षा जास्त आहे. चार वर्षांपूर्वीपर्यंत साप्ताहिकाचा एकही लेख युनिकोडमध्ये उपलब्ध नव्हता, आता त्या वेबसाईटवर तीस हजारांपेक्षापेक्षा अधिक लेख शेअर करण्याच्या सुविधेसह उपलब्ध आहेत.

सारांश, साधनाच्या सर्व विभागांना जोडणारा व पुढे घेऊन जाणारा डिजिटल हा चौथा विभाग चांगलाच आकाराला आला आहे. प्रिंट व डिजिटल ही माध्यमे परस्परांना पूरक ठरत आहेत, असाच आमचा अभ्यास व अनुभव आहे. मात्र अर्थकारण, वितरण व व्यवस्थापन हे आव्हान पूर्वीपेक्षा अधिक मोठे झाले आहे. अर्थातच, ते पेलवण्यासाठी पूर्वीच्या तुलनेत संधीही जास्त आहेत. त्या संधी कशा उपयोगात आणायच्या यासाठी आम्ही सक्षम राहणार आहोत की नाही, इतकाच काय तो प्रश्न आहे !

**( लेखक, साधना साप्ताहिक व साधना प्रकाशन या दोहोंचे संपादक आहेत.)**

Sakal 30.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Education*



# चॅटजीपीटी आणि करियर दशसूत्री...

**गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये अचानक चॅटजीपीटी नावाचे 'खेळणे' इंटरनेट विश्वात अवतरले आणि बघता बघता पाच दिवसांत १० लाख लोक ते वापरूसुद्धा लागले. 'लॅण्डलाइन टेलिफोन सर्व्हिस' जगभरातील १० लाख लोकांना पोहोचेपर्यंत ७५ वर्षे लागली होती. म्हणजे जवळजवळ तीन पिढ्या! 'नेटफ्लिक्स'ला हाच टप्पा पार करायला साडेतीन वर्षे, ट्विटरला दोन वर्षे आणि फेसबुकला १० महिने लागले होते. यावरून या नवीन तंत्रज्ञानाचा आवाका आणि वेग किती आहे हे लक्षात येईल. हा वेग कुठली व्यावसायिक क्षेत्रे बदलेल आणि सध्या शाळा, कॉलेजमध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांना या बदलाशी आणि वेगाशी आपले करियर प्लॅनिंग जुळवून घेण्यासाठी काय करायला हवे, याची चर्चा करणारा लेख...**

▶ चिन्मय गवाणकर

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान काही नवे नाही. गेली कित्येक वर्षे आपण त्याचा अनुभव विविध क्षेत्रांत घेत आहोत. हे तंत्रज्ञान आपली कामे करण्याची आणि जगण्याची पद्धत बदलत आहे आणि त्यात चॅटजीपीटी ज्यावर बनवले आहे ते 'जनरेटिव्ह एआय' तंत्रज्ञानसुद्धा अपवाद नाही. आपल्याला आजपर्यंत माहीत असलेले कॉग्निटिव्ह एआय तंत्रज्ञान माणूस कसा शिकतो आणि कसा विचार करतो याचे शिक्षण [illegible] घेऊन समस्यांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करते. पण हे नवीन जनरेटिव्ह एआय नवीन गोष्टी तयार करते, ज्या पूर्वी कधीही अस्तित्वात नाहीत. दोघांच्या 'ट्रेनिंग' मध्येसुद्धा खूप फरक आहे. जेवढी माहिती एका माणसाला साधारण वाचून समजून घ्यायला... अगदी २४ तास नॉनस्टॉप... २००० पेक्षा जास्त वर्षे लागतील तेवढी माहिती चॅटजीपीटीचा कणा असलेल्या 'जीपीटी-४' मॉडेलला देण्यात आली आहे.



## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Education*



# चॅटजीपीटी आणि करियर दशसूत्री...

*(पान १ वरून)* राहण्यासाठी नवीन कौशल्ये विकसित करणे महत्त्वाचे आहे.

एआय आणि ऑटोमेशनचा अवलंब जसजसा वाढत चालला आहे, तसतसे विद्यार्थ्यांनी त्यांच्या भविष्यातील करिअरमध्ये या बदलांसाठी तयारी करणे आवश्यक आहे. सध्या शाळेत, महाविद्यालयात असणारी मुले आणि नुकतेच नोकरीला लागलेले तरुण-तरुणी हे या बदलासाठी तयार होण्यासाठी येथे काही पावले उचलू शकतात आणि हे सर्वांना करावे लागेल. कॉमर्स/ सायन्स/ आर्ट्स वगैरे स्पेशलायझेशनचे दिवससुद्धा आता मागे पडले. आपल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातसुद्धा कौशल्याधारित अभ्यासक्रम आता शिकवला जाणार आहे. त्यामुळे कला शाखेतील विद्यार्थ्यांनी प्रोग्रामिंग का शिकावे आणि इंजिनीयरने मानसशास्त्र का शिकावे असले वाद घालण्यात अर्थ नाही.

सध्या नवीन तंत्रज्ञान आले म्हणून घाबरून न जाता पालक आणि शिक्षकांनी आपल्या मुलांच्या करियर प्लॅनिंगसाठी सांगितलेल्या दशसूत्रींचे पालन करण्यास सुरुवात केली तर उद्याचा मराठी तरुण स्पर्धेला तोंड देण्यासाठी तयार होईल, याची खात्री आहे.

chinmaygavankar@gmail.com

*(लेखक एक बहुराष्ट्रीय कंपनीचे संचालक असून त्यांना डेटा ॲनालिटिक्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात वीस वर्षांहून अधिक व्यावसायिक अनुभव आहे. लेखातील मते वैयक्तिक आहेत.)*

## नक्की करायचे काय?

मी साधारणपणे सर्वांना खालील दशसूत्रीवर विचार करायचा सल्ला देईन.

**१ सखोल पायाभूत शास्त्रीय कौशल्ये :** विद्यार्थ्यांनी गणित, विज्ञान, संख्यिकी (स्टॅटिस्टिक्स) आणि संगणकशास्त्रातील सखोल पायाभूत कौशल्ये विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. एआय आणि ऑटोमेशनची मूलभूत तत्त्वे समजून घेण्यासाठी या विषयांचे ठोस आकलन आवश्यक असेल. गणित आणि विज्ञान 'ऑप्शन'ला टाकू नका, त्यांच्याशी मैत्री करा. गणिताचा बागुलबुवा न करता मूलभूत गणिती संकल्पना समजून घ्या.

**२ कोडिंग आणि प्रोग्रामिंग :** एआय आणि ऑटोमेशनसह काम करू पाहणाऱ्यांसाठी कोडिंग आणि प्रोग्रामिंग ही आवश्यक कौशल्ये आहेत. विद्यार्थ्यांनी पायथन आणि आर सारख्या प्रोग्रामिंग भाषांमध्ये किमान मूलभूत ट्रेनिंग घेण्याचा विचार करावा. हे शिकण्यासाठी काहीही जास्त मेहनत लागत नाही. कुणीही या भाषा अगदी प्रोग्रामिंगचा कसलाही गंध नसताना १० ते १२ दिवसांत शिकू शकते, तेसुद्धा अगदी फुकट. कसे ते पुढे येईलच.

**३ एआय आणि मशीन लर्निंगमधील अभ्यासक्रम :** एआय आणि मशीन लर्निंग अधिकाधिक महत्त्वाचे होत असल्याने विद्यार्थ्यांनी या विषयांमध्ये अभ्यासक्रम घेण्याचा विचार केला पाहिजे. हे अभ्यासक्रम त्यांना एआय ॲप्लिकेशन्स कसे विकसित करायचे आणि एआय कसे कार्य करते हे शिकवतील. अगदी डॉक्टर्स, वकील, आर्किटेक्ट्स, एवढेच काय, पण पत्रकार आणि कलाकारांनासुद्धा बेसिक्स ऑफ एआय समजलेच पाहिजे. आपल्या कामात एआयचा चपखल उपयोग करून अधिक उत्पादकता कशी वाढवता येईल हे समजेलच आणि त्याचबरोबर आपली कुठली कामे एआय 'गिळून' टाकेल हे समजायलासुद्धा याचा फायदा होईलच : हेसुद्धा फुकट शिकता येईल.

**४ गंभीर विचार आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये :** एआय आणि ऑटोमेशन ही समस्या सोडवण्यासाठी उत्कृष्ट साधने आहेत. परंतु तरीही त्यांना आपण आधी चर्चा केल्याप्रमाणे मानवी इनपुट आणि कौशल्य आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी गंभीर विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, जेणेकरून एआय करू शकत नसलेल्या समस्या ओळखू शकतील आणि त्यांचे निराकरण करू शकतील. यासाठी मात्र जरा जास्त प्रयत्न लागतील. शिक्षकांची मदत लागेल. चर्चा, वादविवाद आणि केस स्टडी सोडविण्याची पद्धत शाळांनी विकसित केली पाहिजे.

**५ सर्जनशीलता आणि नवोन्मेष :** एआय आणि ऑटोमेशन विविध उद्योगांमध्ये परिवर्तन घडवत आहेत, सर्जनशीलता आणि नावीन्यपूर्णतेसाठी नवीन संधी निर्माण करत आहेत. विद्यार्थ्यांनी सर्जनशील विचार कौशल्ये विकसित करण्यावर आणि नवीन कल्पना आणि संकल्पनांसह प्रयोग करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. सरकारनेसुद्धा शाळांमध्ये 'अटल टिंकरिंग लॅब्स' सारखे उपक्रम सुरू केलेले आहेत. प्रयोगशीलता आणि 'चुकण्यातून शिकणे' हे अंगीकारले पाहिजे.

**६ संवादकौशल्य आणि नेतृत्वगुण, भरपूर खेळ आणि टीमवर्क :** आपल्या कोशात राहून 'आपण बरे आणि आपले काम बरे', 'आपण नाही बाबा पुढे पुढे बोलायला जात', असे जुने विचार सोडून देण्याचीसुद्धा हीच वेळ आहे. जेव्हा आर्टिफिशियल इंटेलिजन्सने प्रगत मशीन्स सामान्य माणसांची कामे करायला लागतील तेव्हा उरलेल्या नोकऱ्या आणि नवीन निर्माण झालेल्या व्यवसाय क्षेत्रात असलेल्या मानवी स्पर्धेत उठून दिसण्यासाठी मूलभूत संवाद कौशल्ये आणि नेतृत्वगुण ज्यांच्याकडे असतील त्यांना प्रथम संधी मिळतील. नेतृत्वगुण म्हणजे सर्वांनी राजकारणात जाऊन निवडणूक लढवणे नव्हे, पण कुठल्याही क्षेत्रात सर्वोत्तम होऊन इतरांना पुढे जाण्यास मदत करणे आणि त्यांना वेळोवेळी आपल्याला येत असलेल्या चांगल्या गोष्टींचे प्रशिक्षण देऊन सक्षम करणे म्हणजे नेतृत्वगुण दाखविणे. शाळेपासूनच वक्तृत्व स्पर्धांत भाग घेणे, शालेय उपक्रमात नेतृत्व करणे, विविध आंतरशालेय क्रीडा स्पर्धांत भाग घेणे यातून याची सुरुवात करता येईल. टीमवर्क म्हणजे सांघिकता शिकण्यासाठी विविध सांघिक खेळ हे उत्तम व्यासपीठ आहे.

**७ भरपूर वाचन आणि लेखनाची सवय :** सध्याची पिढी पुस्तके वाचत नाही, कारण त्यांना आज ज्ञान आणि मनोरंजनासाठी इंटरनेटची अलिबाबाची गुहा उपलब्ध आहे; पण इंटरनेटवर पाहिलेले 'शॉर्ट्स' आणि 'रील्स' निगुतीने वाचलेल्या पुस्तकातून मिळणाऱ्या अनुभवाची आणि त्यातून काढलेल्या टिपणे आणि त्यांचे मनन करण्याच्या मागच्या पिढीच्या पद्धतीशी बरोबरी करू शकत नाही. 'स्क्रीन टाइम' मनाला विचलित करतो, पण छापील मजकूर मेंदूमध्ये जास्त ग्रहण केला जातो यावर आज विपुल संशोधन उपलब्ध आहे. हे वाचनसुद्धा विविध विषयांवर हवे. राज्यशास्त्र, व्यवस्थापन, नेतृत्वगुण, इतिहास, विज्ञान आणि चालू घडामोडी यांचे ज्ञान हवे. वाचलेले विषय थोडक्यात टिपणे काढून लिहून ठेवण्याची सवयसुद्धा हवी. अगदी रोजचे वर्तमानपत्र वाचण्याची सवयसुद्धा बऱ्याच घरांत हल्ली



अस्ताला चाललेली आहे, ती पुन्हा मजबूत करून वाढवायला हवी. वाचनाने समृद्ध बनलेली वाणी आणि लेखणी तुम्हाला अस्सलपण (*originality*) देऊ शकते. कारण आज कोणीही चॅट जीपीटीसारख्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून काहीही लिहू शकतो, पण माणसाने लिहिलेल्या अस्सल मजकुराला कदाचित अजूनही जास्त 'भाव' मिळू शकतो. त्यामुळे लेखन, वाचन, मनन आणि चिंतन या सवयी अगदी शाळेपासून लावल्या पाहिजेत.

**८ सामाजिक क्षेत्रातील अनुभव आणि प्रवास :** पाश्चात्त्य देशात ज्याला कम्युनिटी सर्व्हिस म्हणतात त्याचे बाळकडू शाळेपासून दिले जाते आणि तरुण-तरुणी आनंदाने सामाजिक कार्य करून अनुभव घेतात. अशा अनुभवाचा फायदा नुसता सर्टिफिकेट मिळवून किंवा फेसबुक चमकोगिरी



करण्यासाठी नसून, खरोखर मानवी जगात काय समस्या आहेत ते समजून त्यांना कसे सोडविता येईल याविषयी एक व्यापक दृष्टी बनवण्यास होतो. तसेच शक्यतो हे सामाजिक कार्य विविध ठिकाणी करता आल्यास त्यानिमित्ताने प्रवास होऊन 'केल्याने देशाटन मनुजा चातुर्य येतसे फार' असासुद्धा फायदा होऊ शकतो. अगदी विविध भागांतील पाणी प्रश्न, शेतकी प्रश्न, ग्राहकांच्या समस्या इत्यादी समजून घेतल्याने 'युरेका' क्षणासरखी तुम्हाला कदाचित एखादी स्टार्ट अप आयडियासुद्धा मिळू शकेल.

**९ पैशाचे व्यवस्थापन :** आपल्या मराठी समाजात याविषयी एक सर्वसाधारण निरक्षरता आजही आहे. हे शिकणे म्हणजे स्टॉक मार्केटमध्ये घुसून पैसे कमवणे नाही, पण पैशाचे विविध स्रोत, भांडवल कसे उभे करता येते, प्रॉफिट मार्जिन कसे मिळविता येते, खेळते भांडवल म्हणजे काय, रोखे बाजार, प्रायव्हेट इक्विटी, व्हेंचर कॅपिटल इत्यादी संकल्पना काय आहेत हे समजून घेतलेच पाहिजे. आज संपूर्ण आर्थिक जग एकत्र आल्याने जगाच्या एका कोपऱ्यात काही खुट्ट झाले की संपूर्ण जगावर परिणाम होतो. ते अर्थकारण समजून घेतले पाहिजे. यासाठीसुद्धा अर्थशास्त्रतज्ज्ञ असण्याची गरज नाही. रोजचे वर्तमानपत्र आणि बिझनेस न्यूज वाचूनसुद्धा पुष्कळ समजून घेता येते.

**१० सदैव शिकत राहणे :** शेवटचे आणि फार महत्त्वाचे सूत्र म्हणजे म्हणजे पदवी मिळताच 'शिकण्याचे दिवस संपून आता कमवायचे दिवस आले' हे विसरून जा. आपण मिळवलेले ज्ञान काळ वेगाने कालबाह्य होणार आहे याचा ऊहापोह आपण याच लेखात केला आहेच. त्यामुळे रोज काही तरी नवीन शिकणे हे सर्वांना करावेच लागणार आहे आणि शिकणे म्हणजे केवळ वर सांगितले तसे प्रोग्रामिंग आणि एआय शिकणे नाही, पण मेंदूची मशागत करायला अगदी काहीही तुम्हाला आवडेल ते शिकत राहा. चित्रकला, संगीत, नृत्य, एखादे वाद्य, परकीय भाषा, नाट्य अनुभव, एखादा खेळ, स्वयंपाक, अगदी काहीही शिका; पण शिकत राहा. कुठल्या ज्ञानाचा उपयोग कुठे होईल सांगता येत नाही. याबाबत आपण प्रसिद्ध शास्त्रज्ञ गॅलिलियोचे उदाहरण घेऊ. गॅलिलियोच्या आधी चंद्रावरील काळ्या रेषा बऱ्याच लोकांनी पाहिल्या होत्या; पण त्या रेषा म्हणजे डोंगर आणि दऱ्यांमुळे बनलेल्या छायारेषा असू शकतात हे गॅलिलियोने पहिल्यांदाच तर्काने शोधले, कारण बऱ्याच लोकांना माहीत नसलेली गोष्ट म्हणजे गॅलिलियो एक शास्त्रज्ञ तर होताच, पण तो एक उत्तम चित्रकारसुद्धा होता! त्याला त्याच्या चित्रांमध्ये विविध पोत दाखविण्यासाठी आणि उंची, खोली, छाया दाखविण्यासाठी रंगांचा आणि विविध शेड्सचा कसा वापर करायचा हे माहीत होते. तोच तर्क लावून त्याने चंद्रावर दुर्बिणीमधून बघितेच काळ्या रेषा का दिसतात याचे उत्तर शोधले! चंद्राच्या 'कॅनव्हास'वरील छाया आणि शेड्स म्हणजे डोंगर आणि दऱ्या हे तेव्हा मानवाला कळाले.

आता तुम्ही म्हणाल हे सगळे शिकायचे, करायचे म्हणजे मजबूत पैसे लागणार! शहरातील मुले ज्यांच्या पालकांना विविध क्लासेस लावणे परवडते तेच हे करू शकतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी काय करायचे? पण त्यासाठी एक चांगली बातमी आहे. आज इंटरनेटवर हे सगळे फुकट शिकण्यासाठी अनेक मंच अगदी यूट्यूबपासून कोर्सेरापर्यंत आणि आपल्या सरकारी 'स्वयम्'पासून ते खासगी अमेरिकेतील हार्वर्ड युनिव्हर्सिटीपर्यंत भरपूर कोर्सेस उपलब्ध आहेत. अगदी ग्रामीण भागातील विद्यार्थीसुद्धा साधा अँड्रॉइड फोन आणि महिन्याचा डेटा पॅक वापरून हे सगळे फुकट शिकू शकतो. इंटरनेटने उपलब्ध करून दिलेली संधीची समानता इकडे उपयोगी येऊ शकते. या मंचांना *'Massive Online Open Courses'* (*MOOC*) असे म्हटले जाते आणि ९०% कोर्सेस शिकायला फुकट असतात; पण शिकून झाल्यावर तुम्हाला परीक्षा देऊन त्या त्या विद्यापीठाचे प्रमाणपत्र हवे असेल तर मात्र नाममात्र फी भरावी लागते.

लोकसत्ता Sun, 30 April 2023
https://epaper.loksatta.com/c/72304026

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Career*

पुढारी

पुढारी EDU दिशा



# 'सायकॉलॉजिकल कौन्सिलिंग' - करिअर संधी

**मानसशास्त्र हे एक असे शास्त्र आहे, ज्यात मानवी मनाच्या वेगवेगळ्या कंगोऱ्यांचा शोध घेतला जातो. मनात कुठेतरी खोलवर दडून बसलेली भीती या शास्त्रामुळे बाहेर येण्यास मदत होते. यामुळे ती व्यक्ती नैराश्यावस्थेत जाण्यापासून रोखली जाते.**

गौरव केतकर

शारीरिक स्वास्थ्याकडे लक्ष देताना मानसिक स्वास्थ्यदेखील महत्त्वाचे आहे, हे सामान्यत: विसरले जाते. म्हणूनच आजच्या काळात मानसशास्त्राची सर्वाधिक गरज आहे.

मानसशास्त्रज्ञांकडे फक्त वेड लागलेल्या व्यक्तीच जातात, हा गैरसमज पूर्वीही होता आणि आताही आहे. यामुळे अनेकदा आपण वेडे ठरवले जाऊ, या भीतीने लोक तज्ज्ञांचा सल्ला घेण्यास कचरतात आणि याचे दुष्परिणाम नंतर दिसून येतात. एखाद्याच्या शैक्षणिक, सामाजिक, कौटुंबिक, वैयक्तिक, आर्थिक समस्यांमधून मार्ग काढून त्याला मार्गदर्शनाने अथवा उपचारांनी मदत करणे, हे काम मानसशास्त्र करते. तसेच, एकटेपणा, नैराश्य, अभ्यासातील अडचणी, नोकरीतील तणाव, वैयक्तिक नातेसंबंधांतील ताण, आत्मविश्वासाचा अभाव, लैंगिक समस्या, अकारण दुय्यमत्वाची भावना आणि अशा अनेक भावनिक समस्यांवर मानसशास्त्र काम करते. तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यापासून आपण त्यावर जास्त अवलंबून राहायला लागलो आहोत. यामुळे जिवंत माणसांपेक्षा सध्या संगणक, मोबाईल, इंटरनेट वगैरेच आपल्या जवळचे होत चालले आहेत. यात आपले काम तर क्षणार्धात होते, पण इतरांशी संपर्कही तुटत जातो. तंत्रज्ञानाच्या आहारी जाण्याचे प्रमाण वाढल्यामुळे एकटेपणा वाढत जातो. आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या अनेकांचे लोकांपासून संपर्क तुटलेले असतात. यामुळे एकटेपणाची भावना अजून वाढीला लागते. या समस्येतून तंत्रज्ञानाशी संबंधित कामे करणाऱ्या व्यक्ती लवकर बळी पडतात. यातूनच तणाव असह्य झाले की आत्महत्या, व्यसनांसारखे मार्ग अनुसरले जातात. तसेच नवरा-बायको दोघेही काम करत असल्यामुळे ऑफिसातील ताण-तणाव घरापर्यंत पोहोचतात. यामुळे घटस्फोटांपर्यंत मजल जाण्याचे प्रसंग वाढू लागले आहेत. स्पर्धात्मक वातावरणाचा परिणाम म्हणून पाल्य आणि पालकांचा सुसंवाद कमी होत चालला आहे. परिणामी, तरुण पिढीमध्ये अपयश आले की आत्महत्येचा मार्ग जवळ केला जातो. म्हणूनच सध्याच्या काळात या प्रकारच्या मानसोपचारतज्ज्ञांची सर्वाधिक गरज आहे.

अलीकडच्या काळात सायकॉलॉजिकल कौन्सिलर हा एक चांगले अर्थार्जन मिळवून देणारा व्यवसाय म्हणून उदयाला आलेला आहे. या क्षेत्रातील प्रवेशासाठी अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमदेखील उपलब्ध आहेत. भारतात याचे प्रमाणपत्रं, पदविका आणि पदव्युत्तर पदविकेचे अभ्यासक्रम चालवले जातात. पदविकेच्या अभ्यासक्रमांसाठी यातील काही संस्था होम सायन्स किंवा मानसशास्त्रातील पदवीधारकांना प्रवेश देतात; तर काही संस्था मानसशास्त्रात एम.ए. केलेल्यांना संधी देतात. बहुतांश अभ्यासक्रमांची पात्रता ही मानसशास्त्रातील पदवी ही आहे. काही ठिकाणी कुठल्याही क्षेत्रांतील पदवी चालू शकते. साधारणत: हे अभ्यासक्रम तीन महिने, सहा महिने आणि वर्षभराचे आहेत. सध्याच्या जगात वैयक्तिक संबंधांपासून ते कामाच्या समस्येपर्यंत सर्वच क्षेत्रांत या मार्गदर्शनाची गरज आहे. तसेच, सध्या अनेक शाळांमधूनही मार्गदर्शकाची नेमणूक करण्यात येते. यामुळे, लहान मुलांमधील मानसिक समस्या मूळ धरण्याआधीच सोडवण्यास मदत होऊ शकते. मात्र, मानसशास्त्रीय मार्गदर्शकाचे हे काम एकाच वेळी जोखमीचे आणि नाजूक दोन्ही आहे. त्यामुळे, इतर पात्रता बघताना स्वत:ची मानसिक तयारी आणि वैयक्तिक आवड या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. समोरची व्यक्ती आपल्याकडे केवळ मन मोकळे करण्यासाठी आलेली नसून तिच्या गुंतागुंतीच्या समस्येमध्ये आधार शोधण्यासाठी आलेली आहे, हे लक्षात ठेवणे गरजेचे असते. प्रत्येकाला आयुष्यात एकदा तरी भावनांच्या भोवऱ्यातून जावे लागते, त्यातून एकट्याला बाहेर पडणे अवघड होते. अशावेळी मदतीचा हात पुढे करणारा सायकॉलॉजिकल कौन्सिलर प्रत्येकालाच हवा असतो.

Pune Edition
Apr 11, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Career*

लोकमत



# व्ही. आर. ॲनिमेशन

## कल्पकतेला उंच भरारी

व्हर्च्युअल रिॲलिटी ॲनिमेशन क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी आहेत. कल्पकतेच्या जोरावर विद्यार्थी उंच भरारी मारु शकतो. या क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी विविध व्यावसायिक कोर्सेस सध्या उपलब्ध आहेत. अनेक खासगी संस्थांद्वारे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले जाते. भारतात व्हर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) ॲनिमेशन तंत्रज्ञानाची लोकप्रियता तसेच विविध क्षेत्रातील प्रयोग वाढत असल्याने चांगल्या आर्टिस्टची मागणी वाढत आहे.

व्हिज्युअल इफेक्ट्स (व्हीएफएक्स), ग्राफिक डिझायनिंग, थ्रीडी ॲनिमेशन, ऑगमेंटेड रिॲलिटी (एआर) आणि व्हर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) गेम्स, मेटाव्हर्स, गेम डिझाइन अँड डेव्हलपमेंट, डिजिटल मीडिया अँड मोशन ग्राफिक्स, थ्रीडी आर्किटेक्चर, एडिटिंग आणि फोटोग्राफी या विषयांचा समावेश आहे. एआर/ व्हीआर डेव्हलपर्सकडे बारकावे टिपण्याची नजर असणे आवश्यक आहे, तसेच आकर्षक अनुभव तयार करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्ये त्यांच्याकडे असले पाहिजेत.

### व्हीआर ॲनिमेटर

व्हीआर ॲनिमेटर हे व्हर्च्युअल रिॲलिटी अनुभव साकारण्यासाठी थ्रीडी मॉडेल आणि ॲनिमेशन तयार करतात. हे थ्रीडी वातावरण जिवंतपणा साकारण्यासाठी सॉफ्टवेअरच्या माध्यमातून काम केले जाते. एखाद्या दृश्यासाठी वातावरण निर्मिती तयार करण्यासाठी प्रकाश योजना आणि टेक्स्च्युरिंग आर्टिस्ट्स, तसेच ॲनिमेशनसाठी पात्रे तयार करण्यासाठी या आर्टिस्टकडून सहकार्य केले जाते.

### ऑगमेंटेड रिॲलिटी (एआर) डेव्हलपर्स

ऑगमेंटेड रिॲलिटी (एआर) डेव्हलपर्स हे तंत्रज्ञानाचा वापर करून इमर्सिव्ह व्हर्च्युअल अनुभव तयार करतात. विविध प्लॅटफॉर्मसाठी सॉफ्टवेअर डिझाइन विकसित आणि कार्यान्वित करतात तसेच आभासी अनुभव आकर्षक आणि इमर्सिव्ह आहेत का? याकडे ते लक्ष देतात.

### मेटाव्हर्स आर्किटेक्ट

मेटाव्हर्स आर्किटेक्ट हे मेटाव्हर्स (अभासी जग) वातावरणासाठी पायाभूत सुविधांचे डिझाइन करतात. मेटाव्हर्स डिझायनर मेटाव्हर्स अनुभवांसाठी थ्रीडी मॉडेल्स आणि ॲनिमेशन तयार करतात. टाव्हर्स आर्किटेक्टकडे उत्तम तांत्रिक कौशल्ये असणे आवश्यक आहे. सर्जनशील आणि चौकटीबाहेर विचार करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.

### सामग्री निर्मिति

सामग्री निर्मिति शिक्षण किंवा गेमिंग हेतूंसाठी आभासी अनुभव डिझाइन करतात.

नवं क्षितिज



### ग्राफिक डिझायनर

ग्राफिक डिझायनर प्रिंट आणि डिजिटल माध्यमासाठी विविध डिझाइन तयार करतात. संगणकाचा साधन म्हणून वापर करून पोस्टर, लोगो, ब्रोशर, मासिके आणि इतर अनेक सामग्री तयार करतात. ह्या मार्फत एखादी कल्पना किंवा माहिती दृश्यमान स्वरुपात आणली जाते. अशा व्यक्तींना ग्राफिक कलाकार म्हटले जाते.

### गेम आर्टिस्ट व गेम डिझायनर

गेम आर्टिस्ट हे टूडी किंवा थ्रीडी व्हिडीओ तयार करतात. गेम डिझायनर गेम मेकॅनिक्स तयार करतात आणि गेम वैशिष्ट्ये कोड, चाचणी अंमलात आणतात. गेम डिझायनरच्या भूमिकेत गेम मेकॅनिक्स तयार करणे आणि चाचणी करणे तसेच गेमसाठी एकंदर दृष्टी प्रदान करणे याचा समावेश आहे. तर गेम प्रोड्युसर हे गेमच्या विकासावर देखरेख ठेवण्याचे काम करतात.

### यूएक्स डिझायनर

यूएक्स (UX) डिझायनर वापरकर्त्यांचा अनुभव विकसित आणि वर्धित करण्यासाठी काम करतात. डिजिटल उत्पादने अथवा टूलसह संवाद स्थापित करताना वापरकर्त्यांच्या सर्व अनुभवांचे अभ्यास, संशोधन व रेकॉर्ड ठेवतात.

### डिझाइन आर्किटेक्ट

डिझाइन आर्किटेक्ट व्हीआर आणि एआर यासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांच्या बाह्य आणि आतील उपकरणांवर काम करतात. ते आर्किटेक्चरल डिझायनर लँडस्केपसाठी लेआऊट व डिझाइन करतात. त्यांचा ग्राहक, आर्किटेक्टसशी थेट संबंध येतो.





राहुल बोजलवार
व्हीआर ॲनिमेशन क्षेत्रातील तज्ज्ञ.

Hello Pune
Page No. 7 Apr 27, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Career*

लोकमत

# 'इतिहासा'मध्ये दडल्यात करिअरच्या असंख्य वाटा

मानवी उत्क्रांती व प्रगतीचा साक्षीदार असणारा इतिहास हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. तसेच तो अभिमानाचा आणि प्रतिष्ठेचाही आहे. भूतकाळात घडलेल्या घटनांची माहिती आपण इतिहासातून समजून घेतो. इतिहास म्हणजे संस्कृतीच्या उदय-अस्ताची गाथा असून ती वर्तमान आणि भावी पिढीने समजून घेणे गरजेचे असते. इतिहासामुळे आपण अनुभव संपन्न होतो, सत्याचा आविष्कार घडतो आणि आपली व समाजाची उन्नती साधता येते. इतिहास विषयांत पारंपरिक व आधुनिक करिअरच्या असंख्य संधी दडलेल्या आहेत. आपण फक्त डोळसपणे त्या हेरणे गरजेचे आहे.

नवीन ट्रेंड अन् संधी



## अध्यापनातील संधी

इतिहासात एम.ए. केल्यानंतर बी.एड. पदवी आणि सेट, नेट या पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा, महाविद्यालयात शिक्षक, प्राध्यापक म्हणून अध्यापनाची मोठ्या संधी उपलब्ध आहे.

## माध्यम क्षेत्रात संधी

इतिहास विषयाची उत्तम जाण असेल तर वर्तमानपत्रे, इलेक्ट्रॉनिक, ऑनलाइन, रेडिओ माध्यमात आणि नियतकालिके या क्षेत्रातही उत्तम राजकीय, ऐतिहासिक, आर्थिक, सामरिक विश्लेषणासाठी इतिहासाचा अभ्यास पूरक आणि महत्त्वाचा ठरतो.

## चित्रपट व मालिका

ऐतिहासिक चित्रपट, मालिका नाटकांना खूप महत्त्व प्राप्त होत आहे. इतिहासाचे उत्तम ज्ञान व जाण असेल तर तुम्ही ऐतिहासिक चित्रपटासाठी संहिता तसेच संवाद लिहू शकता. ऐतिहासिक घडामोडी, वास्तू, साहित्य तसेच पात्रांचा अभ्यास असल्यामुळे मालिका, चित्रपट, नाटकातील विविध विभागात ज्ञानाचा वापर होऊ शकतो.

## इतिहास विषयातील अभ्यासक्रम

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील इतिहास विभागाची स्थापना १९६५ साली झाली. या विभागात एम.ए. इतिहास पदव्युत्तर पदवी तसेच फारशी, मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविले जातात. अभ्यासक्रम आणि प्रवेशाबाबत अधिक माहितीसाठी http://www.unipune.ac.in/dept/mental_moral_and_social_science/history/default.htm या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## केंद्रीय व महाराष्ट्र लोकसेवा आयोग

एमपीएससी आणि यूपीएससी स्पर्धा परीक्षेत इतिहास विषयाला महत्व आहे. पूर्वपरीक्षा तसेच मुख्य परीक्षेत प्रश्न विचारले जातात. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे उमेदवार इतिहास हा विषय पदव्युत्तर पदवीसाठी निवडतात आणि मोठ्या संख्येने यशस्वीही होतात.

## पर्यटन क्षेत्रात संधी

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अंतर्गत तुम्हाला गड, किल्ले, दुर्ग, वास्तू आदी टुरिस्ट गाईड म्हणून कामाची संधी उपलब्ध होऊ शकते. यासह तुम्ही स्वत: पर्यटन कंपनी स्थापन करून ऐतिहासिक ठिकाणांवर सहली आयोजित करू शकता. या क्षेत्रात तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज वाढली आहे. पुरातत्त्व विभाग तसेच संग्रहालयात नोकरीची संधी



**प्रा. बाबासाहेब दूधभाते**
इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Hello Pune
Page No. 7 Apr 27, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Miscellaneous*

# ज्ञानोपासकांना समृद्ध करणारे गाडगीळ ग्रंथालय



"ग्रंथालयाच्या सुविधा विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक आणि सर्वसामान्यांनाही उपलब्ध करून दिल्या जात असल्याने अधिकाधिक वाचकांनी ग्रंथालयाचा लाभ घ्यावा. प्रत्यक्ष ग्रंथालयात येणे शक्य नसल्यास संबंधितांनी डिजिटल लायब्ररीचा लाभ घ्यावा.

- डॉ. नानाजी शेवाळे, ग्रंथपाल




### दुर्मीळ ग्रंथसंपदा

- ग्रंथालयात १६८० ते १९४० या काळातील पाच हजारांपेक्षा अधिक पुस्तकांचा समावेश आहे.
- 'द वर्क्स ऑफ द फेमस निकोलस मॅकव्हिएल, सिटिझन अँड सेक्रेटरी ऑफ फ्लोरेन्स' हे निकोलस मॅक्वव्हिएलचे १६८० मधील हे अतिदुर्मीळ पुस्तक येथे पाहण्यास मिळते.
- भारताच्या राज्यघटनेची ५० च्या दशकात छापलेली लिथोग्राफिक मूळ प्रतीची प्रतही येथे आहे.

### डिजिटल लायब्ररी

बदलत्या काळाला अनुसरून २०००मध्ये ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आले. बदलत्या काळात वाचकांना पुन्हा वाचनाकडे वाळवण्याच्या दृष्टीने २०११ पासून 'ओसीआर' तंत्रज्ञान वापरून डिजिटायझेशनची प्रक्रिया हाती घेण्यात आली. आजपावेतो ६० लाखांहून अधिक पानांचे (सुमारे ३५ हजार ग्रंथांचे) डिजिटायझेशन करून ही ग्रंथसंपदा वाचकांसाठी DSpace@GIPE या डिजिटल लायब्ररीद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. https://dspace.gipe.ac.in यावरून वाचनप्रेमी त्यांना हवी असलेली पुस्तके डाउनलोड करू शकतात. संस्थेचे माजी संचालक डॉ. राजस परचुरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेला हा प्रकल्प आता कुलगुरू डॉ. अजित रानडे यांच्या प्रोत्साहनाने कार्यरत आहे, असे ग्रंथपाल डॉ. नानाजी शेवाळे यांनी नमूद केले.

### ...अशी आहे ग्रंथसंपदा

- ग्रंथालयातील काही पुस्तके ३०० वर्षांहून अधिक जुनी आहेत.
- ब्रिटिश संसदेमधील १८व्या आणि १९ व्या शतकातील कामकाजाचे खंड उपलब्ध.
- देशातील विधीमंडळांच्या कामकाजाच्या, केंद्र आणि राज्य सरकारांच्या कामकाजाच्या नोंदी उपलब्ध.
- प्रांतीय राज्ये; तसेच १८८५ पासून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अहवाल आणि ठरावांचे ५८ खंड येथे पाहायला मिळतात.

### सदस्यत्वाबाबत महत्त्वाचे

येथील ग्रंथसंपदेचा वापर सामान्य वाचक, अभ्यासक, परदेशी अभ्यासकांकडून होतो. नाममात्र वीस रुपये शुल्क भरून एक दिवसीय सभासत्व घेऊन ग्रंथालयातील पुस्तकांचा लाभ घेता येतो. वाचकांना वैयक्तिक वापरासाठी वार्षिक ७०० रुपये आणि आजीव सदस्यत्वासाठी सात हजार रुपये शुल्क आहे.



उपलब्ध आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने या ग्रंथालयाला 'रिपॉझिटरी'चा दर्जा दिल्याने त्यांच्याकडून जाहीर करण्यात येणारी पत्रके, महत्त्वाची कागदपत्रे येथे उपलब्ध आहेत.

ग्रंथालयाबद्दल माहिती देताना ग्रंथपाल डॉ. नानाजी शेवाळे म्हणाले, 'ग्रंथालयात सुमारे दोन लाख ८० हजार पुस्तके असून, त्यामध्ये इंग्रजीसह विविध भारतीय भाषा; तसेच स्पॅनिश, फ्रेंच, इटालियन, रशियनसह अन्य परकीय भाषेतील पुस्तकांचा समावेश आहे. सुमारे पाच हजारांपेक्षा अधिक दुर्मीळ पुस्तकांचा समावेश असून, या पुस्तकांचे स्वतंत्र दालन आहे.'

केंद्रीय अर्थसंकल्प (१७९९ ते १८०५ आणि १८७४-७५ ते २०२३ कालावधीतील) यासह स्वातंत्र्यपूर्व काळातील संस्थानिक आणि प्रांतीय राज्यांचे अर्थसंकल्प; भाषिक आधारावर राज्यांच्या निर्मितीनंतर राज्य सरकारांच्या अर्थसंकल्पांची मालिका येथे आहे. 'इकॉनॉमिक्स टाइम्स', 'फायनान्शिअल एक्स्प्रेस'चा संग्रह; अर्थ, शिक्षण आणि इतिहास शिक्षणाबद्दल नेमलेल्या समित्या, आयोगांचे अहवाल अभ्यासकांना पाहायला मिळतात. त्याशिवाय, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, युरोपीयन कमिटी, कॅनडातर्फे प्रसिद्ध होणारी महत्त्वाची कागदपत्रे संस्थेत नियमित उपलब्ध असतात. देशात १८७२ मध्ये झालेल्या पहिल्या जनगणनेपासूनचे आतापर्यंतच्या सर्व जनगणनांचे अहवाल येथे पाहण्यास मिळतात.

Maharashtra Times 4.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Miscellaneous*



डॉ. भूषण पटवर्धन

# एकात्मिक, सर्वंकष आरोग्यसेवेची गरज

**जागतिक आरोग्य संघटनेच्या अमृतमहोत्सवी वर्षात 'हेल्थ फॉर ऑल' या घोषणेचा जागर पुन्हा होतो आहे. आजच्या (सात एप्रिल) जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने एकात्मिक आणि सर्वंकष आरोग्याची कृतिशील चर्चा होणे महत्त्वाचे आहे.**

आरोग्य दिन

'सर्वे भवन्तु सुखिनः' अथवा 'आरोग्यं परमं भाग्यं' या प्राचीन सूत्रांमधूनच कदाचित डॉ. हाफडेन महालर यांना 'हेल्थ फॉर ऑल' म्हणजेच 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना सुचली असावी. डॉ. महालेर (१९२३ ते २०१६) यांनी जागतिक आरोग्य संघटनेचे (डब्ल्यूएचओ) महासंचालकपद तीन वेळा भूषविले आहे. १९७८मध्ये तत्कालीन सोव्हिएत संघामधील अल्मा आटा (आता हे शहर कझाकस्तान येथे आहे.) येथे 'डब्ल्यूएचओ'च्या बैठकीमध्ये ठराव मंजूर केला गेला. सन २०००पर्यंत जगामधील 'सर्वांसाठी आरोग्य' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी लक्ष्य असलेला हा ठराव 'अल्मा आटा जाहीरनामा' म्हणून ओळखला जातो. यासाठी प्राथमिक आरोग्य सेवेला प्राधान्य देण्याचे निश्चित केले गेले.

या सामाजिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या प्रारूपाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कुटुंबामधील सर्वच घटकांनी आरोग्य संवर्धन व रोग प्रतिबंधात्मक कार्य सर्वसमावेशक पद्धतीने अंगीकारणे अपेक्षित आहे. 'सर्वांसाठी आरोग्य' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सामाजिक न्याय, समता, विश्वबंधुत्व आणि अंत्योदय या तत्त्वांवर आधारित ध्येयधोरणे आवश्यक आहेत. सर्वच घटकांना विशेषतः वंचित, गोरगरीब जनतेला परवडणारी आरोग्य सेवांची उपलब्धता असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, या धोरणांअभावी २०००पर्यंत सर्वांसाठी आरोग्य ही उदात्त संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकले नाही. २०१८मध्ये म्हणजे ४० वर्षांनी कझाकस्तानची राजधानी अस्ताना येथे झालेल्या 'डब्ल्यूएचओ'च्या वार्षिक बैठकीत हा विषय पुन्हा ऐरणीवर आला. सध्याचे 'डब्ल्यूएचओ'चे संचालक डॉ. टेड्रोस अॅदनॉम गिब्रेयेसिस यांनी प्राथमिक आरोग्याचे महत्त्व 'अस्ताना जाहीरनाम्या'द्वारे पुन्हा अधोरेखित केले.

आधुनिक निदान चाचण्या, प्रभावी औषधे, रोबोटिक शस्त्रक्रिया यामुळे सरासरी आयुर्मान वाढते आहे. पंचतारांकित सुसज्ज रुग्णालये आणि वैद्यकीय शिक्षण संस्था ही उपलब्ध आहेत; परंतु सर्वांसाठी आरोग्य देण्याचे स्वप्न अद्यापही धूसरच आहे. वैद्यकीय व्यवसायाचे बाजारीकरण, उपचारांचा अमाप खर्च, ढासळती नीतिमूल्ये, पर्यावरणाचा ऱ्हास, पोषक आहाराची कमतरता, गरिबी, उपासमार असे अनेक घटक यात आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांत उत्तम आरोग्य आणि आनंदी स्थिती तिसऱ्या स्थानावर आहे. यासाठी 'स्वास्थ्य' हा शब्द प्रयोग अधिक योग्य आहे. आरोग्य म्हणजे फक्त 'रोग नसणे' असे नव्हे; तर शारीरिक, मानसिक, सामाजिक पातळीवर स्वस्थता असणे हे होय. आहार, विहार, पर्यावरण, आनुवंशिकता हे स्वास्थ्याचे चार खांब आहेत. ते कमकुवत झाले वैद्यकीय उपचारांचा टेकू द्यावा लागतो. मात्र, सध्या या टेकूवरच सर्व भिस्त ठेवण्याची प्रवृत्ती वाढते आहे.

'स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणम्' हा आयुर्वेदाचा मूलभूत सिद्धान्त आधुनिक वैद्यकामध्ये पुरेसा विचारात घेतला जात नाही. म्हणूनच 'हेल्थ चेकअप' म्हणून पॅथॉलॉजी टेस्ट केल्या जातात. रुग्णाकडे सर्वंकष दृष्टीने बघण्यापेक्षा रोग, लक्षण, औषधे व उपचार यांच्यावरच अधिक भर दिला जातो. रोग प्रतिबंध हा रोग उपचारापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. या मौलिक सिद्धान्ताकडेच दुर्लक्ष होते. यातूनच एक प्रकारच्या यांत्रिक प्रोटोकॉलवर, वैद्यकीय चाचण्या आणि निदानावर आधारित अत्याधुनिक; परंतु संकुचित वा मर्यादित अशा आरोग्यसेवा वा उपचार पद्धती प्रचलित होत आहेत.

प्राथमिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी 'डब्ल्यूएचओ' पुन्हा सक्रिय होत आहे. तातडीच्या उपचारांसाठी व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांसाठी सध्याची अॅलोपॅथीप्रणित आधुनिक वैद्यक पद्धती महत्त्वाची आहेच; परंतु त्यापेक्षा अधिक वैद्यकीय स्वास्थ्य संवर्धन, मानसिक स्वास्थ्य विकास, रोगप्रतिबंधात्मक उपाय, पोषक आहार, शारीरिक तंदुरुस्ती, शुद्ध पिण्याचे पाणी, मलनिस्सारण यंत्रणा, स्वच्छता व निकोप पर्यावरण स्वास्थ्य संवर्धनासाठी आवश्यक आहे. आजार झाल्यास प्रथम साधे घरगुती प्रथमोपचार आणि फॅमिली डॉक्टरांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते. छोट्या छोट्या वैद्यकीय समस्यांसाठी प्रत्येक वेळेस विशेषज्ञांची जरुरी नसते.

'युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज' म्हणजे सर्वांसाठी प्रभावी वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वंकष नियोजनाची, प्राथमिक आरोग्य सेवा सुदृढ करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक वैद्यकीय विद्यार्थ्याने विशेषज्ञ बनण्याची इच्छा बाळगल्यास सर्वसामान्यांची सेवा कोण करील, हा यक्षप्रश्न आहे. म्हणूनच स्वास्थ्य हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे, हे तत्त्व मान्य करावेच लागेल. आज सुमारे ३० टक्के जनता विविध देशांत आवश्यक आरोग्य सेवांपासून वंचित आहे. भारतात दर वर्षी सुमारे साडेपाच कोटी लोकांना परवडत नसल्यामुळे आरोग्य सेवा मिळत नाही.

कोव्हिडकाळात भारतामध्ये आयुर्वेद, योग व आधुनिक वैद्यक यांच्या विज्ञाननिष्ठ उपयोगावर आधारित मोठे संशोधन प्रकल्प यशस्वी झाले. याची दखल घेऊन 'डब्ल्यूएचओ'ने 'ग्लोबल सेंटर फॉर ट्रॅडिशनल मेडिसीन' या नावाने जागतिक पारंपरिक औषध केंद्राची निर्मिती करण्यासाठी भारतामधील जामनगर हे शहर निवडले आहे. थोडक्यात, फक्त औषधे, शस्त्रक्रिया विशेषज्ञ, दवाखाने, निदान शाळा, वैद्यकीय विमा हे पुरेसे नाही. रोगप्रतिबंध आणि स्वास्थ्यकेंद्रित धोरणांची आवश्यकता आहे. प्राथमिक आरोग्य सेवा, लोकशिक्षण, लोकसहभाग, परंपरागत ज्ञान, आयुर्वेद व योगामार्फत शारीरिक व मानसिक स्वास्थ्य संवर्धन, आहार, विहार व पर्यावरण या सर्वच बाबी महत्त्वाच्या आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अमृतमहोत्सवी वर्षात पुन्हा एकदा 'हेल्थ फॉर ऑल' या घोषणेचा जागर होतो आहे. भारताच्या अमृत महोत्सवामध्ये 'जी-२०'च्या माध्यमामधून 'वसुधैव कुटुंबकम्', 'एक देश एक आरोग्यसेवा', 'सर्वंकष आरोग्य' या संकल्पना व उद्दिष्टांद्वारे जागतिक स्तरावर नेतृत्वाची संधी भारताला आहे.

**(लेखक केंद्रीय आयुष मंत्रालयाचे राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक आहेत.)**

Maharashtra Times 7.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Miscellaneous*

# सावरकरांचा जन्मदिवस 'स्वातंत्र्यवीर गौरव दिन'

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा २८ मे हा जन्मदिवस राज्यात 'स्वातंत्र्यवीर गौरव दिन' म्हणून साजरा करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे केली. या दिवशी सरकारतर्फे राज्यभरात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांच्या प्रचार-प्रसारासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम स्वातंत्र्यवीर गौरवदिनी आयोजित करण्यात येणार आहेत.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी, राष्ट्रउन्नतीसाठी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे महत्त्वाचे योगदान आहे. वीर सावरकरांनी अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. त्यामुळे त्यांचा जन्मदिवस सरकारच्या वतीने साजरा करण्याची विनंती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती.

महाराष्ट्राच्या राजकीय घडामोडींमध्ये वीर सावरकरांनी महत्त्वाची भूमिका बजावली राज्यातील आदर्श महापुरुष म्हणून ते आजही आदरणीय आहेत त्यांच्या अतुलनीय योगदानाल आदरांजली अर्पण करण्यासाठी आणि तरुण पिढीला त्यांच्य देशभक्ती, धैर्य आणि प्रगतिशील विचारांना पुढे न्यायचे असेल त स्वातंत्र्यवीर सावरकरांच जन्मदिवस साजरा करणे आवश्यक आहे, असे सामंत यांनी लिहिलेल्य पत्रात नमूद केले होते.

लोकसत्ता Wed, 12 April 2023 https://epaper.loksatta.com/c,

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Miscellaneous*

# बाबासाहेबांचे विचार अन् आजची लोकशाही

**भाष्य**



**डॉ. भालचंद्र मुणगेकर**

**भारतात लोकशाही यशस्वी व्हावी, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आयुष्यभर प्रयत्नशील राहिले. लोकशाही ही केवळ शासनपद्धती नव्हे, तर तो 'जीवनमार्ग' आहे, असे ते मानत. आज देशात लोकशाही टिकवण्याचे आव्हान भारतीयांसमोर आहे. ते आव्हान समर्थपणे पेलणारी समाजरचना निर्माण करणे आवश्यक आहे.**

इंग्रजांच्या साम्राज्यवादी जोखडातून मुक्त होण्यासाठी प्रदीर्घ काळ देण्यात आलेल्या लढ्यामध्ये धर्म, जात, भाषा, प्रांत इ. सर्व गोष्टी विसरून भारतीय जनतेने दिलेल्या अपूर्व लढ्यामुळे काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचा स्वीकार केला. तसेच, इंग्रजांनी शेवटच्या चार दशकांत केलेल्या कायद्यांमुळे अध्यक्षीय लोकशाहीऐवजी 'संसदीय लोकशाही'चा स्वीकार करणे स्वाभाविक होते. त्याचे दुसरे एक महत्त्वाचे कारण म्हणजे भारतातील सर्व प्रकारची विविधता सामावून घेण्याची क्षमता बहुपक्षीय संसदीय लोकशाही पद्धतीच अधिक आश्वासक व सर्वसमावेशक होती/आहे.

भारतात लोकशाही यशस्वी होईल की नाही, याची जगातील अनेक घटनातज्ज्ञ व राजकीय पंडितांना शंका होती. लोकशाही यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींबाबत त्यावेळची भारतातील प्रतिकूल परिस्थिती ध्यानात घेतली, तर त्यांची शंका चुकीची नव्हती. परंतु त्या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करून, दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या व लोकशाही स्वीकारलेल्या सर्व देशांमध्ये शासनपद्धती म्हणून ती यशस्वी करणारा भारत हा एकमेव देश आहे. आणि त्याचे संपूर्ण श्रेय लोकशाहीवर दृढ श्रद्धा असलेल्या भारतीय जनतेला जाते.

लोकशाही म्हणजे 'जीवनमार्ग'. मात्र, असे असले तरी, भारतातील लोकशाहीच्या गाभ्याचे स्वरूप पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्या संदर्भात नेमकी कोणती आव्हाने वाटत होती, ती पेलण्यासाठी कोणत्या अटी वा शर्ती पूर्ण करणे त्यांना आवश्यक वाटत होते, इत्यादी गोष्टी, विशेषतः आजच्या संदर्भात, समजून घेणे आवश्यक वाटते. सर्वांत प्रमुख बाब म्हणजे डॉ. आंबेडकर यांच्या मते लोकशाही ही केवळ शासनपद्धती नव्हे, तर तो 'जीवनमार्ग' आहे. हाच मुद्दा केंद्रस्थानी ठेवून त्यांनी लोकशाहीची व्याख्या केली, ती अशी: "रक्ताचा एकही थेंब न सांडता शांततेच्या मार्गाने समाजामध्ये मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणणे शक्य असलेली व्यवस्था म्हणजे लोकशाही." डॉ. आंबेडकर यांनी लोकशाहीची व्याख्या अशी का केली असावी, याची, माझ्या मते, तीन मुख्य कारणे संभवतात. पहिले समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या आधुनिक मूल्यांवर आधारलेल्या उदारमतवादी लोकशाहीवर त्यांची व्यक्तिशः नितांत श्रद्धा होती. दुसरे, भारतातील सर्व प्रकारच्या विषमतेमुळे शेकडो वर्षे वंचित व शोषित राहिलेलेल्या दलित, आदिवासी आणि स्त्रिया यांना फक्त लोकशाहीच न्याय देऊ शकेल, अशी त्यांची खात्री होती. आणि तिसरे, भारताला पूर्णपणे नवीन असलेली ही मूल्ये रुजवण्यासाठी अपरिहार्य असलेले मूलभूत परिवर्तन संसदीय, शांततेच्या व अहिंसक मार्गानेच व्हायला हवे, असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. भारतात कोणत्याही कारणामुळे हिंसा झाली, तर तिचे पहिले बळी वरील उपेक्षित घटक ठरतील, याबद्दल त्यांच्या मनात शंका नव्हती. त्यामुळे भारतात लोकशाही यशस्वी कशी होईल, यासाठी ते आयुष्यभर प्रयत्नशील राहिले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२ रोजी 'पुणे डिस्ट्रिक्ट लायब्ररी' येथे 'लोकशाही यशस्वी करण्यासाठी पूर्ण करायच्या शर्ती' नमूद करून त्यांचे सविस्तर विवेचन केले आहे. त्या शर्ती अशा : १) टोकाच्या आर्थिक विषमतेचा अभाव २) सत्ताधारी पक्षाला सशक्त विरोधाची ( विरोधी पक्षाची/ पक्षांची ) गरज ३) कायदा व प्रशासनामध्ये समानता ४) घटनात्मक नीतिमत्तेचे पालन ५) अल्पसंख्यांक पक्षावर/ पक्षांवर बहुसंख्यांकांनी जुलूम करता नये ६) समाजाला नैतिक अधिष्ठान हवे ७) जनतेमध्ये प्रखर सद्सद्विवेकबुद्धीची गरज.

लोकशाही यशस्वी करण्यासाठी सांगितलेल्या अटींची इतकी सूत्रबद्ध मांडणी किमान भारतात तरी डॉ. आंबेडकर यांच्याव्यतिरिक्त दुसऱ्या कुणी केल्याचे माझ्या पाहण्यात नाही. मात्र, भारतीय जनतेच्या दृढ श्रद्धेमुळे लोकशाही झाली, हे जसे खरे आहे; त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी सांगितलेल्या वरील मूलभूत शर्ती काळाच्या ओघात अधिक दृढमूल होण्याऐवजी त्या उत्तरोत्तर 'विकलांग' होत गेल्या, हेसुद्धा खरे आहे.

जगात इतर कोणत्याही देशापेक्षा सर्वांत जास्त आर्थिक विषमता भारतात आहे. उदा. भारतात केवळ एक टक्का लोकांकडे ५४ टक्के राष्ट्रीय उत्पन्न व सुमारे ७० टक्के संपत्ती आहे. आजही किमान २५ टक्के जनता निकृष्ट जीवन जगत आहे. त्यामुळे 'समानता' हे तत्त्वच धुळीस मिळत आहे आणि सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विषमतेचे जे शेकडो वर्षे जे बळी गेले, तेच घटक आज त्याचे बळी ठरत आहेत. सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवण्यासाठी 'तुल्यबळ' विरोधी पक्षाची/ पक्षांची गरज असताना अनेक कारणांमुळे भारतातील 'विखंडित' विरोधी पक्ष आपापली क्षेत्रीय सत्ता टिकवण्यासाठी आपले कर्तव्य बजावण्यात अयशस्वी ठरत आहेत. 'कायद्यासमोर सर्व समान' हे लोकशाहीतील मूलभूत तत्त्व केव्हाच निकामी झाले आहे. कायदा गरिबांवर राज्य करतो, श्रीमंतांतील भ्रष्ट कायद्यावर राज्य करीत आहेत. मोठ्या उद्योगपतींनी दहा-बारा लाख कोटी रुपयांचे बँक-कर्ज बुडवले, तर किरकोळ कर्जाची परतफेड न करू शकणाऱ्या अडीच-तीन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. 'घटनात्मक नैतिकता' नावाचे तत्त्व आहे, याचीच भारतीय राजकारणात जाणीव शिल्लक नाही. भारतीय स्वातंत्र्य चळवळींत मध्यमवर्गाने एक मोठे योगदान दिले. परंतु प्रामुख्याने बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेचा एक परिणाम म्हणून आजचा मध्यमवर्ग केवळ स्वतःपुरते पाहत असून त्याचे सर्व लक्ष 'स्टॉक मार्केट'कडे आहे. प्रत्येक दिवशी अस्वस्थ करणाऱ्या अनेक घटना देशात घडत असताना समाजमन इतके 'तटस्थ' झाल्याचे जाणवते की देशात एक 'Social Crisis' निर्माण झाला आहे.

## 'हिंदुत्व' विरुद्ध 'भारतीयत्व'

२०१४ मध्ये केंद्रामध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाल्यानंतर वरील प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. ज्या राज्यघटनेच्या आधारे भाजप सत्तेवर आला, त्यातील मूलभूत तत्त्वांनाच त्यांचा विरोध आहे. सरकारच्या व विशेषतः पंतप्रधान मोदी यांच्या कोणत्याही धोरणाला विरोध म्हणजे 'राष्ट्रद्रोह' असे समजण्यात येत आहे. विरोधी पक्षांची गळचेपी करण्यात येत आहेच, परंतु न्यायव्यवस्थेसह सर्वच लोकशाही संस्थांवर आघात करण्यात येत आहे. 'राजकीय बहुसंख्यांक'ची जागा 'बहुसंख्यांकवादा'ने घेतली आहे. 'हिंदुत्व' म्हणजेच 'भारतीयत्व' या भूमिकेमुळे देशात अस्थिरता निर्माण होईल, अशी परिस्थिती आहे. ख्रिश्चन, मुस्लिम अशा धार्मिक अल्पसंख्याकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. मुस्लिम समाजातही आपली सर्व बाजूंनी कोंडी झाल्याची मानसिकता निर्माण होत आहे. सर्व प्रकारची 'विविधता' (अर्थात जातिव्यवस्था सोडून) हा मूलाधार असलेली भारताची 'व्यामिश्र' संस्कृती मोडीत काढण्यात येत आहे. त्यासाठी शैक्षणिक धोरणाची पुनर्रचना करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रामुख्याने गेल्या एक वर्षांच्या देशाच्या इतिहासाची पूर्णपणे 'मोडतोड' करून त्याचे 'विकृतीकरण' करण्यात येत आहे.

या सर्वांचा अपरिहार्य परिणाम म्हणून भारतीय लोकशाहीचा गाभाच 'उद्ध्वस्त' करण्याकडे देशाचा प्रवास सुरू झाला आहे. भारतात 'आदर्श लोकशाही' निर्माण व्हावी, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते. तशी आदर्श लोकशाही सोडाच; एक 'राजकीय शासनपद्धती' म्हणून तरी भारतात लोकशाही टिकवण्याचे आव्हान आज भारतीयांसमोर आहे. ते समर्थपणे पेलणारी समाजरचना निर्माण करणे, हीच डॉ. आंबेडकरांना आदरांजली ठरेल!

(लेखक अर्थतज्ज्ञ, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू व माजी खासदार आहेत.)

Sakal 14.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

### *Section: Miscellaneous*



बोधकथा

प्रशांत सरुडकर

# डॉ. बाबासाहेबांचे ग्रंथप्रेम

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ग्रंथांची संगत अतिशय आवडे. आपल्या पददलित जनतेला 'मानवी हक्क' मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब पुस्तकांत रमायचे, लिहायचे. समाजाला जागृत करायचे. बाबासाहेब म्हणत, 'ग्रंथ हेच माझे जीवन आहे, ग्रंथसंग्रह जाणे, म्हणजे माझ्या कुडीतून प्राण जाण्यासारखे आहे.' ग्रंथ म्हणजेच जीवन, अशी त्यांची भक्ती होती. पुस्तकच त्यांच्या मनात साठलेले असायचे.

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात शिकत असताना डॉ. बाबासाहेबांनी हाताळलेले ग्रंथ, विद्यापीठाने बाबासाहेबांचे स्मारक म्हणून स्वतंत्र ठेवलेले आहेत. 'दि बुद्ध अँड हिज धम्म' या ग्रंथाचे लेखन सुरू होते. नानकचंद रत्तू हे त्यांचे सचिव म्हणून काम पाहत असत. एके दिवशी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास डॉ. बाबासाहेब पुस्तकाचे लेखन करत बसले होते. त्यांनी नानकचंदांकडे पाहिले व म्हणाले, ''उशीर झाला आहे. तुम्ही घरी जा.'' नानकचंद घरी गेले. सकाळी नेहमीप्रमाणे नऊ वाजता नानकचंद पुन्हा डॉ. बाबासाहेबांच्या निवासस्थानी आले. पाहतात तर बाबासाहेब लिहीतच होते. नानकचंदांना वाटले सकाळी लवकर उठून बाबासाहेबांनी लेखन करावयास सुरुवात केलेली आहे. काय हवे-नको, ते बाबासाहेबांना देण्यासाठी त्यांच्याजवळ उभे राहिले. तेवढ्यात त्यांचे लक्ष नानकचंद यांच्याकडे गेले आणि म्हणाले, ''अरे मी तुला घरी जा म्हणून सांगितले होते. तू अजून गेला नाहीस?'' यावर नानकचंद म्हणाले, ''साहेब, मी घरी जाऊन आलो आहे. आता सकाळचे नऊ वाजले आहेत.'' सलग बारा तास डॉ. बाबासाहेब एका जागी बसून लिहीत होते. हे लक्षात येताच नानकचंदांचे डोळे पाणावले. पाठीमागे एकदा बाबासाहेब म्हणाले होते, ''मला झोपून जमणार नाही, कारण माझा समाज निद्रिस्त आहे.''

'राजगृह' हे डॉ. बाबासाहेबांचे मुंबईतील दादर स्टेशनजवळचे निवासस्थान. या निवासस्थानात बाबासाहेबांनी हॉल सुसज्ज केला होता. बसायला सोफे, भिंती रंगविलेल्या, लाइटची छानशी व्यवस्था आणि आतल्या बाजूला त्यांची झोपायची खोली होती. ही खोली मात्र अतिशय साधी होती. एकदा त्यांचे एक स्नेही, त्यांच्या झोपण्याच्या खोलीमध्ये आले. अतिशय साधी खोली पाहिल्यानंतर त्यांनी बाबासाहेबांना प्रश्न केला. ''हॉल एवढा सजवलेला आणि ही खोली एवढी साधी?'' त्यावर बाबासाहेब म्हणाले, ''हॉलमध्ये माझे कार्यकर्ते येतात. दूर, दूरहून गोरगरीब लोक येतात. त्यांचा सन्मान व्हावा, ही एक गोष्ट आणि दुसरी गोष्ट, 'आपल्यातीलच, आपल्यासारखेच जीवन जगणारी एक व्यक्ती. ग्रंथांच्या आणि ज्ञानाच्या सोबतीने, एवढ्या मोठ्या पदापर्यंत जाऊ शकते,' ही प्रेरणा माझ्या बांधवांना मिळावी, म्हणून मी हॉल सुशोभित असा ठेवलेला आहे आणि झोपायची खोली साधी. याचे कारण मी बालपणापासून गरिबी पाहिलेली आहे. उपाशीपोटी राहिलेलो आहे. माझे जीवन साधेच आहे.'

Sakal 14.4.2023

## *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Miscellaneous*

# बाबासाहेबांचे अंत्योदयाचे स्वप्न

■ सुधीर मुनगंटीवार

शिक्षण, संघटन, संघर्ष आणि धम्मचक्र प्रवर्तन यांच्या साह्याने हजारो वर्षे अस्पृश्यता व गुलामगिरीच्या खाईत लोटल्या गेलेल्या लाखो दलित-पीडितांचे पुनरुत्थान करणाऱ्या महामानवाची आज जयंती. समाजातील खूप मोठ्या घटकावर हजारो वर्षांची लादली गेलेली गुलमगिरी एका व्यक्तीने एका आयुष्यात मुळापासून उखडून टाकली. देश स्वतंत्र होत असताना देशातील इतका मोठा समाज हा जर अंधारयुगातच जगणार असेल तर हे मूठभरांचं स्वातंत्र्य ठरेल आणि हे मूठभरच देशातील पीडितांच्या बोकांडी बसतील आणि आधी परकीयांनी शोषण केले आता स्वकीय करतील ह्याचे पूर्ण भान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होते.

अस्पृश्यतेचे चटके किती दाहक असतात, हे त्यांनी स्वतः अनुभवले होते. त्यामुळे ह्या त्रासातून आपल्या बांधवांची सुटका करायची हा निर्धार त्यांच्या मनात पक्का होता. बाबासाहेबांची तळमळ इतकी तीव्र होती की नियतीने एका अद्वितीय बुद्धिमत्तेच्या व्यक्तीला या देशाची राज्यघटना लिहिण्याची संधी दिली. ह्या देशातील अगदी तळातील व्यक्तीचा विकास घडवायचा असेल, मग ती कोणत्याही धर्माची, जातीची, स्त्री असो की पुरुष, या सर्व व्यक्ती समान आहेत, हे जोपर्यंत देशाची घटना ठरवणार नाही तोपर्यंत देशात खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा सूर्य उगवणार नाही, याची त्यांना जाणीव होती. आणि बाबासाहेबांनी समानता हाच घटनेचा पाया मानला. हा विचार त्यांनी फक्त लिहिला नाही, तर तो विचार संपूर्ण आयुष्यभर ते जगले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने कर्ते सुधारक होते. आपल्या प्रत्येक कृतीतून त्यांनी सहजपणे समानतेचे धडे दिले. यासाठी दोन उदाहरणे मुद्दाम नमूद कराविशी वाटतात. आपले उच्चशिक्षण संपवून बाबासाहेब लंडनहून आले, तेव्हा परिचित लोकांनी, बाबासाहेबांनी मोटारीने घरी जावे असा आग्रह धरला. पण त्यास बाबासाहेबांनी नकार दिला. मग लोकल रेल्वेच्या प्रथम वर्गातून तरी बाबासाहेबांनी प्रवास करावा, असा आग्रह लोकांनी धरला. पण तोही आग्रह मोडत त्यांनी रेल्वेच्या तिसऱ्या वर्गातून प्रवास केला. जेव्हा ते घरी गेले, तेव्हा त्यांच्या भावाने त्यांना बसण्यासाठी टेबल खुर्ची आणण्यासाठी धावपळ सुरू केली. पण इथेही बाबासाहेबांनी घरातील घोंगडीवर बसणेच पसंत केले. अगदी साध्या कृतींमधून समानतेची अशी जाणीव करून दिली. समानता ही बाबासाहेबांची जशी देणगी आहे, तशी अजून एक देणगी त्यांनी दिली. ती म्हणजे गेल्या ७५ वर्षांत 'अंत्योदया'चे स्वप्न या देशाला आता पडू शकते आणि ते पूर्ण करण्याची आकांक्षा बाळगणारी अशाच एका तळागाळातील समाजातून आलेली व्यक्ती टोमण्यांचे, द्वेषाचे, ईर्ष्येचे असंख्य घाव सहन करूनही देशातील सर्वोच्च स्थानावर जाऊन बसू शकली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वर आले. आपण ज्या परिस्थितीतून आलो, याचे शल्य त्यांच्या मनात यत्किंचितही नाही पण आपण कोणत्या परिस्थितीतून वर आलो आहोत, त्याची जाण त्यांना आहे. म्हणूनच बाबासाहेबांनी आखून दिलेल्या मार्गावर त्यांनी



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समानतेचा विचार फक्त लिहिला नाही, तर तो विचार ते जन्मभर जगले. ते खऱ्या अर्थाने कर्ते सुधारक होते. आपल्या प्रत्येक कृतीतून त्यांनी सहजपणे समानतेचे धडे दिले. बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त त्यांचा समानतेचा विचार आणि अंत्योदय याविषयी...**

मार्गक्रमण करत, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या स्वप्नातील 'अंत्योदय'साठी धडपड चालवली आहे.

सन २०१० मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनी हत्तीच्या अंबारीत राज्यघटनेची प्रतिकृती ठेवून 'गौरवयात्रा' चालत पूर्ण केली होती. त्यांच्या पुढाकारानेच संयुक्त राष्ट्रांनीही बाबासाहेबांची १२५वी जयंती साजरी केली. २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिवस' म्हणून साजरा केला गेला. डॉ. आंबेडकर यांचा तीव्र आक्षेप असूनही, ३७० वे कलम आपल्या राज्यघटनेचा भाग झाला. त्यामुळे जम्मू-काश्मीर भारताशी एकरूप होण्याच्या प्रक्रियेला खोडा बसला होता. मोदी यांच्या दृढ वचनबद्धतेमुळे आणि इच्छाशक्तीमुळे हे कलमच रद्द करण्यात आले.

'आत्मनिर्भर भारत'च आपल्याला महासत्ता बनवू शकतो, याची बाबासाहेबांना पूर्ण जाण होती आणि भारत सर्व बाबतीत आत्मनिर्भर आणि स्वयंपूर्ण व्हावा, ही त्यांची तळमळ होती. 'मेक इन इंडिया'सारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात संरक्षण सामग्रीपासून ते कोव्हिडच्या लशीपर्यंत सर्व गोष्टी बनल्या. 'मेड इन इंडिया'ची शक्ती हे पंतप्रधान मोदी यांनी दाखवून दिली. देश डिजिटल पथावर मार्गक्रमण करू लागला तर दशकानुदशके खोलवर रुजलेला भ्रष्टाचार मोडीत निघू शकतो, याची जाणीव मोदी यांना होती. म्हणूनच डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी जे मोबाइल ॲप आणले त्याला त्यांनी नाव दिले, 'भीम'. डॉ. भीमराव आंबेडकरांना वाहिलेली ही अजून एक अनोखी श्रद्धांजलीच होती.

अस्पृश्यता जितकी क्रूर असते तितकीच गरिबी आणि भूक पण क्रूर असते, याचे द... बाबासाहेबांना झाले होते. त्यामुळे, या दे... एकही माणूस उपाशीपोटी झोपू नये, ही त्यांचं... होती. भुकेसाठी संघर्ष करणाऱ्या समाजाला ब... काढण्यासाठी, जर इच्छा तीव्र असेल तर काय घडू शकते, याचे 'पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना' हे ज्वलंत उदाहरण आहे. ही जगातील सर्वांत मोठी मोफत शिधावाटप योजना असून तिचा लाभ करोना महामारीशी धैर्याने लढा देणाऱ्या भारतातील ८० कोटींहून अधिक लोकांना झाला. जनधन योजना असो की प्रत्येक घरात सिलिंडर असो की देशातील प्रत्येक नागरिकाला विमा कवच की पाण्याचा नळ प्रत्येक घरापर्यंत पोहचवणे असो की देशातील प्रत्येक घर विजेने उजळवणे असो. यातून, प्रत्येक नागरिकाच्या आयुष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेने दिलेल्या समानतेच्या परीसस्पर्शाचा अनुभव येतो, हे आज मोदी पाहत आहेत. भीमजन्मभूमी, महू मध्य प्रदेश, भारतरत्न डॉ. भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, दिल्ली, दीक्षाभूमी, चैत्यभूमी, दादर, इंदू मिल स्मारक ही देशातील जनतेसाठीची आधुनिक स्मारकेच आहेत. या पाच स्मारकांचा विकास 'पंचतीर्थ' म्हणून होते आहे.

बाबासाहेबांनी एक आवाहन केले होते, 'तुमच्यासमोर उद्दिष्ट काय आहे ते नीट समजून घ्या. शासनकर्ती जमात बनणे, हेच आमचे उद्दिष्ट व आकांक्षा आहे, हे तुमच्या मनात ठसू द्या. तुमच्या घराच्या भिंतीवर ते कोरून ठेवा. म्हणजे दररोज तुम्हाला आठवण राहील की, ज्या आकांक्षा आपण उराशी बाळगून आहोत, ज्याच्यासाठी आम्ही लढत आहोत ते काही लहानसहान संकुचित ध्येय नाही. थोड्याशा नोकऱ्या किंवा सवलतींसाठी आपला लढा नाही. अंतःकरणातील आकांक्षा फार मोठ्या आहेत. शासनकर्ती जमात बनणे हीच ती आकांक्षा होय.' आज समाजाच्या तळातून आलेली व्यक्ती देशाच्या सर्वोच्च स्थानी विराजमान आहे आणि अंत्योदयासाठी झटत आहे. सर्वांनी का कार्याला यथोचित हातभार लावणे आणि देशातील प्रत्येक नागरिकाच्या चेहऱ्यावर हसू उमटेल, यासाठी झटत राहणे हेच खरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन ठरेल.

**(लेखक हे महाराष्ट्राचे वने, सांस्कृतिक कार्ये आणि मत्स्यव्यवसाय या खात्यांचे मंत्री आहेत.)**

Sakal 14.4.2023

# *News Paper Clippings During April 2023*

## *Section: Miscellaneous*

नवराष्ट्र

जागतिक पुस्तक दिन विशेष • सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र

# अनेक पिढ्या घडविणारे जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र !

**पुणे,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ म्हटलं की झपकन डोळ्यासमोरून काही गोष्टी समोर येतात. त्यात विद्यापीठातील निसर्गरम्य परिसर, इतिहासाची साक्ष देणारी उठली दीडशे वर्षांहून अधिक जुनी विद्यापीठाची मुख्य इमारत आणि मागील अनेक पिढ्यांसाठी ज्ञानाचा स्त्रोत ठरलेले जयकर ग्रंथालय म्हणजेच जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र..!!






### पुस्तकांची दरवर्षी खरेदी

याविषयी माहिती देताना जयकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या प्रभारी संचालिका डॉ.अपर्णा राजेंद्र सांगतात की, या केंद्रात विद्यापीठाच्या विविध विभागांकडून सुचविण्यात आलेल्या पुस्तकांची दरवर्षी खरेदी केली जाते. ग्रंथालयातील संख्यात्मक साहित्य दरवर्षी वाढतेच परंतु गुणात्मक दर्जा देखील टिकविण्याचा आमचा प्रयत्न असतो. या केंद्रात दुर्मिळ हस्तलिखितांपासून ते आर्टिफिशियल इंटेलिजन्स पर्यंत सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील जर्नल विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहेत.

यंदाचे वर्ष हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पंच्याहत्तरावे म्हणजेच अमृतमहोत्सवी वर्ष आहे. तर जयकर ग्रंथालयाचे अमृतमहोत्सवी वर्ष हे पुढील वर्षी सुरू होणार आहे. विद्यापीठाची स्थापना १९४९ मध्ये झाल्यानंतर लगेचच १९५० साली विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत ग्रंथालयाची सुरुवात करण्यात आली. विद्यापीठातील विविध विभागांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या ग्रंथालयाची निर्मिती करण्यात आली. पुढे १९५७ मध्ये ग्रंथालयाला स्वतंत्र इमारत मिळाली व ग्रंथालयाला विद्यापीठाचे पहिले कुलगुरू बॅरिस्टर मु.रा.जयकर यांचे नाव देण्यात आले. २०१७ साली जयकर ग्रंथालयाचे नाव जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र करण्यात आले. विद्यापीठ जसजसे विस्तारत गेले तसे ग्रंथालय देखील विस्तारत होते. आजमितीला ग्रंथ, छापील नियतकालिके, छापील प्रबंध, हस्तलिखिते, नकाशे, ई ग्रंथ, सांगीतिक ठेवा, फोटो, ई डेटाबेस, ई नियतकालिके आदी ४ लाख ७७ हजार ग्रंथांचा संग्रह केंद्रात उपलब्ध आहे. प्रामुख्याने मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत हे ग्रंथ आहेत. या भाषांमध्ये वेगवेगळ्या भाषांमधील भाषांतरित साहित्य उपलब्ध आहे.

विद्यापीठात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी, विद्यापीठातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक या ज्ञानस्त्रोत केंद्राचा लाभ घेतात. त्यासोबतच बाहेरील व्यक्तींना नियम व अटींचे पालन करत येथील पुस्तके संदर्भासाठी वापरता येतात. विद्यापीठातील हजारो विद्यार्थी या ग्रंथालयाचा तसेच येथे असणाऱ्या पाच मजली अभ्यासिकेचा लाभ घेतात. यात जवळपास एकूण हजार विद्यार्थ्यांची अभ्यासाची सोय करण्यात आली आहे.

अभिनेते नागराज मंजुळे देखील याच विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी त्यांच्या अनेक मुलाखतीमध्ये विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचा माझ्या जडण घडणीत वाटा आहे असे सांगितले आहे.

Pune Edition
24 April 2023 Page No. 6
epaper.navarashtra.com

# *Upcoming Events*

## *MAY 2023*

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 ***Sambhaji Maharaj Jayanti*** | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 ***Anti Terrorism Day*** | 22 ***Maharana Pratap Singh Jayanti***  | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 ***Swatantryaveer Savarkar Jayanti***  | 29 | 30 | 31 ***Ahilyabai Holkar Jayanti***  | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*